# स्वयसहायता महिला बचतगट आणि रोजगार निर्मिती सांगली जिल्हयाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास

टिळक महाराष्ट्र विदयापीठ,

तात्वीक आणि सामाजिक शास्त्रांतर्गत

पीएच.डी. (विदयावाचस्पती) पदवी करिता

सादर केलेला शोधप्रबंध.

संशोधक

प्रा.सौ. मंगल भास्कर माळगे

श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविदयालय, सांगली

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. सुहास सहस्त्रबुध्दे

ए.टी.एस.एस. कॉलेज, पुणे

डिसेंबर २०११

Tilak Maharashtra Vidyapeeth ★ Pune ★ Ph.D

# CERTIFICATE

This is to certify that Mrs. Mangal Bhaskar Malage has completed her thesis entitled as 'स्वंयसहायता महिला बचतगट आणि रोजगार निर्मिती सांगली जिल्हयाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास'

The work presented in the thesis has been carried out under my supervision.

This is her original contribution which has been made on her own efforts. This thesis has not been submitted to any other university for any diploma or degree. Therefore she is allowed to submit this thesis for the degree of Doctor of philosophy in Social science of Tilak Maharashtra University, Pune.

Place

Date 23.12.2011

Dr. S. Sahasrabudhe

Research Guide

# प्रतिज्ञापत्र

मी सौ मंगल भास्कर माळगे या प्रतिज्ञापत्राव्दारे घोषित करते की, टिळक महाराष्ट विद्यापीठ, पुणे या विद्यापीठाच्या अर्थशास्त्र या विषयात विद्यावाचस्पती या पदवीसाठी '''स्वंयसहायता महिला बचतगट आणि रोजगार निर्मिती सांगली जिल्हयाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास'' या विषयावर माझा शोध प्रबंध सादर करीत आहे.

सदर शोघप्रंबध मी डॉ सुहास सहस्त्रबुध्दे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला असून घोषित करते की सदरच्या शोध प्रबंधात नमूद असलेली माहिती सत्य असून ती आजवर मी कोठेही प्रकाशित केलेली नाही किंवा कोणत्याही विद्यापीठाला कोणत्याही पदवीसाठी सादर केलेली नाही.

ठिकाण : सांगली

दिनांक

सौ मंगल भास्कर माळगे

संशोधक

# ऋणनिर्देश

'''स्वयंसहायता महिला बचतगट आणि रोजगार निर्मिती सांगली जिल्हयाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास'' हा शोधप्रबंध पूर्ण करून विद्यापीठात सादर करित असताना मला आनंद होत आहे. सदर संशोधन कार्य हाती घेतल्यापासून ते पूर्ण करेपर्यंत मला अनेक व्यक्ती, ग्रंथ व संस्था यांचे सहकार्य आणि प्रोत्साहन मिळाले आहे. त्या सर्वाचे ऋण व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजते.

सुरूवातीला संशोधन कार्यास मुर्त स्वरूप देऊन ते सर्वार्थाने पूर्ण करण्यासाठी सहकार्य करणारे तसेच संशोधनकार्यात अधिक चिकित्सकपणा, सूक्ष्मपणा आणि वस्तुनिष्ठता आणण्याच्या दृष्टीने अतिशय समतोल आणि योग्य मार्गदर्शन करणारे माझे मार्गदर्शक डॉ सुहास सहस्त्रबुध्दे यांचे मोलाचे मार्गदर्शन मी कधीच विसरू शकणार नाही.

संशोधन पूर्ण करण्यास नेहमीच प्रोत्साहन देणाऱ्या गरवारे वुमेन्स एज्युकेशन सोसायटी संस्थेचे विद्यमान अध्यक्ष सौ. मेघा भागवत आणि सेक्रेटरी सौ.उषा कुलकर्णी तसेच. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर.जी कुलकर्णी या सर्वाची मी आभारी आहे.

महाविद्यालयातील ग्रंथपाल श्री. पाटील, राहुल साळुंखे नलवडे तसेच सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सततच्या प्रोत्साहनामुळेच सदरचे संशोधन पूर्ण करू शकले त्यामुळे या सर्वाचे आभार.

प्राथमिक माहिती मिळविण्यास सहकार्य करणारे महिला आर्थिक विकास महामंडळ, सांगलीचे प्रकल्प अधिकारी श्री कुंदन शिनगारे, श्री चव्हाण, प्रा. सुजाता कराडे, डॉ. दिपा श्रावस्ती, सौ. कविता पाटील यांची मदत विसरता येणार नाही म्हणून सर्वाचे आभार.

संशोधन पूर्ण करीत असताना विविध ग्रंथाची मदत झाली त्या ग्रंथाचे लेखक आणि संशोधन कार्यासाठी मदत करणाऱ्या संस्था म्हणून टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे आणि पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या सर्व विद्यापीठाचे ग्रंथपाल व त्यांचे सहकारी आणि आवश्यक ती सांख्यिकीय माहिती पुरविणाचा संस्थामध्ये

जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, सांगली व सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका, जिल्हा मध्यवर्ती बॅंक सांगली, मिरज पंचायत समिती कार्यालय मिरज, नाबार्ड कार्यालय सांगली या सर्व संस्था व पदाधिकारी या सर्वांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. तसेच संशोधनाअंतर्गत मुलाखती दिलेल्या महिला बचतगट सदस्य व पदाधिकारी यांचे आभार.,

तसेच माझ्या शैक्षणिक प्रगतीची अपेक्षा करणारे माझे पती श्री भास्कर माळगे यांनी आपले ऑफिस व्याप सांभाळत मला माझे संशोधन पूर्ण करण्यासाठी सतत प्रेरणा दिली. तसेच माझी आई नानुबाई बंधू अनिल, सुनिल आणि बालमनाचा त्याग करणारे प्रज्ञा व प्रविण यांनी दिलेले सहकार्य शब्दांच्या कितीतरी पलिकडचे आहे या सर्वांच्या बहुमोल सहकार्यामुळे मी माझे काम पूर्ण करू शकले.

शेवटी संशोधनासाठी ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या सहकार्य केले त्याचेही आभार मानून त्यांच्या प्रति सदभावना व्यक्त करते.

सौ मंगल भास्कर माळगे

# अनुक्रमणिका


| | पान क्रं |
|---|---|
| प्रमाणपत्र | iii |
| प्रतिज्ञापत्र | iv |
| ऋणनिर्देश | v ते vi |
| अनुक्रमणिका | vii ते x |
| तक्याचा तपशिल | xi ते xii |
| नकाशे | xiii ते xv |
| १. प्रस्तावना | १ ते ३९ |
| २. संदर्भ साहित्याचा परामर्श | ४० ते ५५ |
| ३. संशोधन पध्दती | ५६ ते ६४ |
| ४. महाराष्ट्र आणि सांगली जिल्हयाचा तपशिल | ६५ ते ८० |
| ५. स्वयंसहाय्यता महिला बचत गटाची वाटचाल (भारत, महाराष्ट्र आणि सांगली) | ८१ ते १२१ |
| ६. महिलांच्या वैयक्तिक आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण | १२२ ते १६४ |
| ७. निष्कर्ष व शिफारशी | १६५ ते १८१ |
| अनुसूची | १८२ते १८४ |
| संदर्भ ग्रंथ सूची | १८५ते १९६ |

## तक्त्याचा तपशील


| नंबर | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| | प्रकरण १ ले | |
| १.१ | महिला स्वयसहाय्यता बचतगट पार्श्वभूमी | ४ |
| प्रकरण ४ थे | | |
| ४.१ | सांगली जिल्हा कृषी संक्षीप्त | ४४ |
| ४.२ | सांगली जिल्हा तालुकानिहाय लोकसंख्या | ७५ |
| प्रकरण ५ वे | | |
| ५.१ | महाराष्ट्रातील बॅक जोडणी कार्यक्रम जिल्हा निहाय स्थिती | ८८ |
| ५.२ | राज्यातील वित्तनिहाय स्थिती | ९० |
| ५.३ | बॅकाकडून स्वयसहाय्यता बचतगटांना वित्तसहाय | ९१ |
| ५.४ | जिल्हा परिषद आर्थिक महामंडळ बचतगट तपशील | ९७ |
| प्रकरण ६ | | |
| ६.१ | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा रोजगारानिर्मित बचतगट | १२० |
| ६.२ | प्रत्यक्ष मुलाखत घेतलेल्या प्रतिसादरकांची तालुकानिहाय सांख्यकीय वर्गीकरण | १२१ |
| ६.३ | प्रतिसादकांचे वय आणि वैवाहिक स्थितीनुसार वर्गीकरण | १२२ |
| ६.४ | प्रतिसादकांचे शिक्षणानुसार वर्गीकरण | १२३ |
| ६.५ | प्रतिसादकांचे गट स्थापन स्त्रोत | १२५ |
| ६.६ | कारणनिहाय प्रतिसादक गट स्थापना | १२६ |
| ६.७ | प्रतिसादक बचत गट संख्या | १२७ |
| ६.८ | प्रतिसादकांच्या मुलांच्या संख्येनुसार वर्गीकरण | १२८ |

| | | |
|---|---|---|
| ६.९ | प्रतिसादकांच्या पतीच्या शिक्षणानुसार वर्गीकरण | १२९ |
| ६.१० | प्रतिसादकांच्या पतीच्या व्यवसायानुसार वर्गीकरण | १३० |
| ६.११ | प्रतिसादकांच्या कुटुंबाचे उत्पन्न (मासिक) नुसार वर्गीकरण | १३१ |
| ६.१२ | प्रतिसादकांची मासिक बचत सरासरी | १३२ |
| ६.१३ | प्रतिसादकांच्या बचतीचा विनियोग | १३३ |
| ६.१४ | प्रतिसादकांच्या बॅंकनिहाय बचतगट संख्या | १३४ |
| ६.१५ | प्रतिसादांची हिशोब व कागदपत्र हाताळणी निहाय वर्गवारी | १३५ |
| ६.१६ | प्रतिसादकांनी घेतलेल कर्ज | १३६ |
| ६.१७ | प्रतिसादकांनी परतफेड केलेल्या कर्जाचे वर्गीकरण | १३७ |
| ६.१८ | प्रतिसादक रोजगार निर्मितीचे वर्गीकरण | १३८ |
| ६.१९ | प्रतिसादक सभेस उपस्थितीचे प्रमाण वर्गीकरण | १३९ |
| ६.२० | प्रतिसादक सभा जागानिहाय वर्गीकरण | १४० |
| ६.२१ | प्रतिसादक सभेची वेळ वर्गीकरण | १४१ |
| ६.२२ | प्रतिसादकांना सेवा स्वरूपात लाभाचे वर्गीकरण | १४२ ते १४३ |
| ६.२३ | प्रतिसादकांची समस्यानिहाय वर्गीकरण | १४४ |
| ६.२४ | प्रतिसादकांचे समस्या निर्मूलनाच्या स्त्रोतनिहाय वर्गीकरण | १४५ |
| ६.२५ | प्रतिसादकांचे सामाजिक/शासकीय योजनेत सहभाग | १४६ |

# प्रकरण १
# महिला स्वयंसहाय्यता बचतगट पार्श्वभूमी संकल्पना आणि कार्यपध्दती

## १.१ प्रस्तावना :–

'मायक्रो फायनान्स'[१] म्हणजे सूक्ष्मवित्तपुरवठा हा जगातील गेल्या दोन वर्षातील सर्वात बहुचर्चित विषय आहे. दारिद्रय कमी करण्यात त्याचा लक्षणीय प्रभाव असल्याची एका गटाची धारणा आहे. (ग्रामीण बॅकेचे प्रा. युनूस मोहम्मद या संकल्पनेचे आग्रही पुरस्कर्ते आहेत) तर काही जण अशा आशावादाविरूध्द सावधानतेचा इशारा देताना त्यांच्या नकारात्मक परिणामाकडे निर्देश करतात. या व्यतिरिक्त मध्यम मार्गावर चालणारे आणखीही काही आहेत. जे सूक्ष्मवित्त योजनामुळे गरीबानांही भांडवल मिळण्याची संधी वाढली असल्याचे मान्य करतात पण त्याचबरोबर दारिद्रय कमी करण्यासाठी अन्य बिगर वित्तीय सेवा सुरू करणे अनिवार्य असल्याची भूमिका मांडतात. कितीही मतमतांतरे असली तरीही आज सूक्ष्मवित्त पुरवठा योजना आणि संस्था गरीबी कमी करण्याच्या किंवा सूक्ष्म आणि लहान व्यवसायाच्या विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आखलेल्या आराखडयाचा महत्वाचा भाग आहे. ही वस्तूस्थिती आहे.


ग्रामीण निमशहरी किंवा शहरी क्षेत्रातील गरीबांना त्यांच्या उत्पन्नाची पातळी उंचविण्याकरिता आणि जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी अल्प रक्कम कर्जाच्या स्वरूपात उपलब्ध करून देणे, काटकसर शिकविणे व अन्य वित्तीय सेवा पुरविणे हाच सूक्ष्मवित्त कार्यक्रमाचा आशय आहे. सर्वसाधारणत: या व्यवस्थेत कर्जाची रक्कम ५० हजार रूपयापेक्षा कमी असते. परंतु सूक्ष्मवित्त म्हणजे केवळ कमी रक्कमेचे कर्ज नव्हे, औपचारिक बॅकिंग क्षेत्रातून वगळल्या गेलेल्या सर्व घटकांसाठी त्यांच्या मागणीनुसार वित्तीय सेवा आणि उत्पादने पोहोचविण्याच्या उद्देशाने धोरणे तसेच सिध्दातांमधील परिवर्तन हा त्याचा खरा अर्थ आहे.

विकास प्रक्रियेसंदर्भात आपल्या आकलनात घडून आलेल्या परिवर्तनाचे अपत्य म्हणजे सूक्ष्मवित्त त्याचा दारिदय निर्मूलनाशी विशेष संबंध आहे. ग्रामीण क्षेत्रात पतपुरवठा केल्यास गरीबी दूर होईल अशा गृहितावर १९७०[२] च्या दशकात आपले ग्रामीण वित्त पुरवठा धोरण आधारित होते. ग्रामीण कुटुंबाचे उत्पन्न वाढावे यासाठी योग्य कार्यक्रम निवडून त्याचा स्तर उंचावणे अशी ती शक्कल होती. यामध्ये एक कुटुंब म्हणजे एक एकक मानून त्यावर भर दिला जात आहे.

या गृहितकांच्या आधारावरच भारतासह अन्य विकसनशील देशामध्ये बॅकाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. परिणामी ग्रामीण क्षेत्रात विशेषत: भारतासारख्या देशामध्ये बॅकाच्या जाळयांचा प्रचड विस्तार झाला पण अवाढव्य भौतिक विस्तार होऊनही सर्वसामान्य जनतेपर्यंत पाहोचवण्याचे प्रमाण तुलनेने कमी राहिले बॅकिंग सेवांचा लाभ घेणाऱ्या

कुटुंबाचे प्रमाण २००१[३] मध्ये फक्त ३५.५ टक्के एवढेच होते. त्यापेक्षा महत्वाची बाब म्हणजे या संदर्भात गंभीर पाद्रेशिक विषमताही होती. ईशान्य भारतातही हे प्रमाण फक्त २०.४ टक्के तर मणिपूर राज्यात अत्यल्प म्हणजे ८.७ एवढेच होते. म्हणजेच अत्यंत प्रशसनीय हेतू असूनही आजही जनतेतील बहुसंख्य घटकांना बॅकिंग सेवाचा लाभ मिळत नाही. त्यासाठी अन्य कारणासोबत बॅक आणि कर्जदार दोन्ही घटकांना व्यवहारासाठी द्यावे लागणारे मोठे शुल्क जबाबदार आहे. त्यामुळे बॅकिंग व्यवस्थेत गरीबांना तर मुळीच स्थान नाही. अत्यंत छोटया रकमाचा अंतर्भाव असलेल्या वित्तीय सेवा आणि उत्पादनाची आवश्यकता असल्याच्या गृहितकानेच सूक्ष्मवित्त योजनांचा आंरभ झाला आहे. त्यानुसार ही यंत्रणा कार्यक्षमपणे सुरू आहे. या उद्देशाने उचित उत्पादने व पुरवठापध्दती निर्धरित केल्या जातात. यामध्ये वित्तीय मध्यस्थीच्या सक्षमीकरणावर भर दिला जातो. तसेच विशिष्ट एककावर नव्हे तर संपूर्ण व्यवस्थेवर लक्ष केंद्रित केले जाते.

मूलभूत उपभोगाच्या गरजेपासून सुरूवात करून कर्ज आवश्यक असलेल्या अन्य गरजा विचारात घेऊन त्यांची श्रेणीबध्द रचना करण्याची पध्दत येथे अनुसरली जाते. या मालिकेत तळाच्या स्थानावर असलेल्या गरजाची पूर्तता जोवर होत नाही. तोवर वरच्या स्थानावरील गरजासाठी पतपुरवठा उपलब्ध करून दिला जात नाही. खालील रेखाकृतीतून हे तत्व स्पष्ट करण्यात आले आहे औपचारिक बॅकिंग क्षेत्रात मात्र फक्त उच्च स्थानावरील गरजांसाठी पतपुरवठा करण्यावर, तोही बऱ्याचदा कमी दराने भर देण्यात आला. उदाहरणादाखल नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी म्हणजेच प्रस्थापित व्यवसायिकांना अन्य क्षेत्रात व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी पतपुरवठा करण्याचे धोरण राबविण्यात आले. या निधीचा वापर निम्मस्तरिय गरजा भागविण्यासाठी करण्यात आला. कर्जाचा विनियोग मूळ उददेशाच्या पूर्ततेसाठी न करता त्यांचा गैरवापर झाला म्हणून परतफेड करण्यावरही विपरित परिणाम झाला.



मागणीला दिलेला प्रभावी प्रतिसाद ग्राहकांना सहजपणे आकलन होईल अशा साध्या उत्पादनांची निर्मिती सूक्ष्मवित्त संस्थेव्दारे सुलभ व्यवस्थापन यांचे सूक्ष्मवित्त व्यवस्थापनातील कळीचे घटक आहेत.

याच तत्वाच्या आणि धोरणाच्या आधारावर बांगला देश, इंडोनशिया व बोर्लिविहया अशा भौगोलिकदृष्टया भिन्न प्रदेशामध्ये सूक्ष्मवित्त संस्थाचा मोठा विस्तार झाला. गरीबाना त्यांच्या मागणीनुसार वित्तीय सेवा पुरविल्यास मोठया प्रमाणात फलकाखाली एकवटलेल्या या संस्था औपचारिक बॅकिंग क्षेत्राने दूर लोटलेल्या समाज घटकांना सेवा पुरविण्यासाठी कटिबध्द झाल्या. जगभरात ठिकठिकाणी विखुरलेल्या या संस्थाच्या गटाने कलौघात चळवळीचे स्वरूप धारण केले. ही चळवळ विकसनशील देशामध्ये झपाटयाने विस्तारली. एवढेच नव्हे तर विकसित देशामधील गरीब वस्त्या भागामध्येही तो पोहोचला आज जगभरात सुमारे ७०००[४] सुक्ष्मवित्त संस्था अंदाजे एक कोटी ३० लाख छोटया कर्जदाराना सूक्ष्मवित्त पुरवठा करीत असून त्यानी ७ अब्ज डॉलर एवढया रकमेचे कर्जवाटप केले आहे. सूक्ष्मवित्त संस्थाच्या कर्जाच्या परतफेडीचे प्रमाण ९७ टक्यापेक्षा अधिक असून त्यांनी अत्यंत लक्षणीय असा ३० टक्के वार्षिक विकास दर नोंदवलेला आहे. सूक्ष्मवित्त संस्थेची वार्षिक उलाढाल सुमारे अडीच अब्ज डॉलर एवढी अवाढव्य आहे. सूक्ष्म आणि छोटे व्यवसाय चालविणाऱ्या ५० कोटी व्यवसायिकापैकी एक कोटीहून कमी व्यक्तीनांच आपल्या व्यवसायाकरिता औपचारीक बॅकीग व्यवस्थेकडून पतपुरवठा मिळू शकतो.जगातील सर्वात गरीब अशा १० कोटी कुटुंबाना सूक्ष्मवित्त पुरवठा करण्यासाठी २१.६ अब्ज डॉलर एवढया निधीची गरज लागेल असा अंदाज सूक्ष्म वित्त शिखर परिषदेने द मायक्रो क्रेडीट समिटी २००५[५] व्यक्त केला होता. त्यापैकी २ अब्ज डॉलर कर्जदारांनी केलेल्या बचतीतून जमा करणे शक्य असल्याचा शिखर परिषेच्या नियोजनकर्त्याचा अंदाज आहे प्रत्यक्षात अंतिम आकडेवारी यापेक्षा उच्च असू शकते.

सूक्ष्मवित्त संस्था समूहाव्दारे किंवा व्यक्तीना थेट पतपुरवठा करण्याची पध्दत अवलंबतात समूहाव्दारे वित्तपुरवठा करण्यात स्वावलंबन गट सेल्फ हेल्प ग्रुप पतपुरवठा संघ, क्रेडिट युनियन संयुक्त उत्तरदायित्व गट आदी यंत्रणाचा अंतर्भाव होतो. जगात वेगवेगळया ठिकाणी विभिन्न यंत्रणाचा वापर केला जातो. तसेच व्यक्तीना निरंतरपणे वित्तीय सेवा पुरविणे आणि या कार्यात अत्यल्प तसेच कर्जदाराला कमीत कमी अडचण व्हावी असे पर्याय अवलंबणे. हे सामूहिक आधारभूत तत्व आहे. परदेशातील अनुभवापासून धडे घेवून भारताने १९९० च्या आरंभी सूक्ष्म वित्त संस्था स्थापन करण्याच्या दिशेने पाऊल उचले आहे. राष्ट्रीय आणि कृषि ग्रामीण बॅकेच्या (नाबार्ड)[६] सर्वदूर पसरलेल्या बॅकिंग जाळयाचा वापर करून गरिबांना निरंतर पतपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी स्वयंसहाय्यता गट ही नवीन आणि अभिनव संकल्पना प्रायोगिक स्वरूपात राबवण्यास सुरूवात झाली. प्रकल्प यशस्वी ठरला आणि ग्रामीण पतपुरवठा करण्याच्या कार्यातील अनेक भ्रामक कल्पना किंवा मिथके त्याने मोडीत

काढली. परिणामी स्वयंसहाय्यता गट बॅक यांची सांगड घातलेल्या या कार्यक्रमाची पूर्ण क्षमतेने व्यापक अंमलबजावणी सुरू झाली.

सदस्यांच्या गरजेनुसार त्यांच्या अटीवर बचत आणि कर्जपुरवठा अशा दोन्ही गरजा भागविणारी सूक्ष्म बॅक[७] असे स्वयंसहाय्यता गटाचे स्वरूप निर्धारित करण्यात आले. त्यामुळे बॅक आणि ग्राहक दोघानाही अडचणीच्या ठरणाऱ्या व्यवहार व खर्चात कमालीची घट झाली. स्वयंसहाय्यता गटामध्ये बहुसंख्य सदस्य स्त्रिया आहेत. हळूहळू स्वयसंहाय्यता गट – बॅक यांची सांगड असलेल्या कार्यक्रमाचा एकाच चळवळीत परिवर्तन झाले. भारतातील स्वयंसहाय्यता गट–बॅक दुवा कार्यक्रमाच्या प्रगतीचे स्पष्ट प्रत्यंतर खालील तक्त्यात दिसून येते.

**तक्ता कं १**

भारतातील स्वयंसहाय्यता गट–बॅक दुवा कार्यक्रमातील प्रवाह

| वर्ष | पतपुरवठा निगडीत स्वयसहाय्यता गटाची एकूण संख्या | पतपुरवठयाची एकूण रक्कम (कोटी रूपयात) |
|---|---|---|
| १९९९–२००० | ३२९९५ | ५७.०७ |
| २०००–०१ | ११४७७५८ | १९२.९८ |
| २००१–०२ | २६३८२५ | ४८०.८७ |
| २००२–०३ | ४६१४७८ | १०२६.३ |
| २००३–०४ | ७१७३६० | २०४८.६७ |
| २००४–०५ | ९४२००० | ३२४०.३८ |
| २००५–०६ | १६१८४७६ | ६८९८.०० |
| २००६–०७ | २३०९२२२ | ९४२७.०० |

**स्त्रोत – नाबार्ड दस्तऐवज**

वरील तक्यात दर्शविल्याप्रमाणे बॅकानी सुमारे २० लाख गटांना ६८९८ कोटी रूपयाचा कर्जपुरवठा केला असून परतफेडीचे प्रमाण जवळजवळ शंभर टक्के आहे. यापूर्वी कधीही एवढया मोठया प्रमाणात पतपुरवठा करण्यात आला नव्हता आणि परतफेडीचे प्रमाणही अभूतपूर्व असेच आहे. या प्रगतिच्या आधारावर सूक्ष्मवित्त कार्यक्रम यशस्वी ठरला असे नकीच म्हणता येईल परंतु सुधारणेस अजूनही वाव आहे. या कार्यक्रमाच्या भौगोलिक प्रसारात विषमता आहे. कारण पतपुरवठयात दक्षिण भारताचे वर्चस्व असून स्वयंसहाय्यता गट–बॅक दुवा कार्यक्रमात ईशान्य भारताचा वाटा फक्त १ टक्के एवढा अत्यल्प आहे. ही प्रोदिशक विषमता दूर करणे अगत्याचे आहे. त्याबरोबर कर्जपुरवठयाचा वापर बहुतांशी उपभोग्य वस्तूंच्या पुर्ततेसाठी झाला असून दुसऱ्या टप्प्यात सूक्ष्म व्यवसायाचा दर्जा उंचावणे व त्याव्दारे कुटुंबाच्या उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ करणे या उदिदष्टावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

देशभरात स्वयंसहाय्यता गट चळवळीचा झपाटयाने विस्तार होत असतानाच भारतीय लघुउद्योग बॅकेने सिडबी (स्मॉल इंडस्ट्रीज बॅक ऑफ

इंडिया) सूक्ष्मवित्त संस्था ही संकल्पना विकसित करण्यास सर्वप्रथम सुरूवात करून नवी दिशा दाखविली. सिडवी सूक्ष्म पतपुरवठा प्रतिष्ठान (SFMC CDB Foundation for Micro Credit)[८] या विशेषकृत संस्थेच्या माध्यमातून बिगर शासकीय संघटना वित्तीयदृष्टया सक्षम संस्था म्हणून रूपांतरित करण्याचा निर्णय भारतीय लघुउदयोग बॅकेने घेतला. देशभरातील गरीब कुटुंबाना विविध वित्तीय सेवा शाश्वत स्वरूपात पुरविणे हा यामागील उद्देश होता. त्यापूर्वी सिडबीकडे सूक्ष्म पतपुरवठा (एमसीएस मायक्रो क्रेडीट स्किम) योजना होती पण विशेषीकृत विभागाच्या स्थापनेमुळे सूक्ष्मवित्त पुरवठयावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करणे शक्य झाले. भारतीय लघुउद्योग बॅकेने या योजने अंतर्गत ३१ मार्च २००७ पर्यंत २२७[९] सूक्ष्मवित्त संस्थामार्फत एकूण ७६१.८१ कोटी रू चा पतपुरवठा केला असून त्याचा लाभ अंदाजे २६ लाख २५ हजार गरिबांना झाला आहे. लाभार्थीमध्ये स्त्रिया बहुसंख्य आहेत. सूक्ष्मवित्त चळवळीला सुरवातीच्या काळात मिळालेल्या यशाची दखल घेवून प्रथम आयसीआयसीआय आणि नंतर खाजगी क्षेत्रातील अन्य बॅका तसेच परदेशी बॅकानीही या क्षेत्रात प्रवेश केला. आज खाजगी क्षेत्रातील सर्व बॅका आणि परेदशी बॅकाच्या सूक्ष्मवित्त शाखा कार्यरत आहेत. भारतातील सूक्ष्म वित्त क्षेत्र आज विकास आणि अन्य क्षेत्रातील विस्ताराच्या टप्पावर येऊन ठेपले आहे.

भारत हा खेडयांचा देश आहे. खेडयाची सुधारणा म्हणजे देशाची प्रगती होय. खेडयांचा म्हणजेच पर्यायाने देशाच्या सर्वागीण विकासासाठी आर्थिक संपन्नता अत्यंत महत्वाची आहे. यासाठी व्यक्ती आणि समाजाने केलेल्या सुयोग्य बचतीचा उपयोग हा महत्वाचा मुदद्‌ा आहे. थेंबे थेंबे तळे साचे म्हणजेच छोटया छोटया बचतीतून मोठी निर्माण होते. बचतीचे फायदे मिळवायचे असतील तर सर्व प्रथम बचत सुरक्षित असणे आवश्यक आहे. त्यासाठी बचतीमध्ये वृध्दी आवश्यक आहे. याचा अर्थ एकाचे दोन, दोनाचे चार, चाराचे आठ या पध्दतीने बचत वाढेल. स्वंयसहाय्यता महिला बचत गटांच्या उपक्रमामुळे बचत करण्याची इच्छा, बचत करण्याची सुविधा, बचत करण्याची सवय निर्माण करणे, बचतीचा उपयोग योग्य पध्दतीने करण्यासाठी नियोजन करणे. अशी यंत्रणा राबवून महिलामध्ये हिशोब ठेवण्याची क्षमता निर्माण करण्यात आली आहे. महिला आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण स्वावलंबी सक्षम होतील तेव्हा महिला विविध क्षेत्रामध्ये आत्मविश्वासाने वावरतील. त्यामुळे कुटूंब, समाज व देशाच्या विकासाला मदत करतील. महिला बचत गट निर्माण करण्याचा हा मुख्य आणि व्यापक विचार आहे.

## १.२ स्वयंसहाय्यता महिला बचततगट संकल्पना आणि स्वरूप :–

ग्रामीण भागातील महिला अज्ञानी आहेत. उंबरठया बाहेरच्या जगाचे तिला ज्ञान नसल्याने उंबरठया अंतर्गत व बाहेर निर्णय प्रक्रियेत स्थान नाही. अशी ही ग्रामीण आणि शहरी महिला मागेच आहेत. या दृष्टीकोनातून महिलांना बाहेर काढण्यासाठी तिचा आर्थिक विकास आवश्यक आहे. महिला विकास म्हणजे तिचा सामाजिक आणि कौटुंबिक दर्जा उचावणे, महिलांची निर्णय प्रक्रीयेतील क्षमता वाढवून त्यानां महत्वाचे स्थान मिळणे, यासाठी तिची जाणीव जागृती करुन तिची जाणीव प्रगल्भ करणे, महिलांचा आत्मविश्वास वाढविणे, महिलांना आर्थिक स्वावलंबनासाठी प्रवृत्त करणे महिलांचा विकास साधण्यासाठी सामाजिक व आर्थिक स्तरावर तिला महत्वाचे स्थान मिळणे आवश्यक आहे. बचत गटाच्या सहाय्याने हे साध्य झाले आहे.

महिला बचतगट कौटुंबिक समस्या सोडवण्यासाठी उपयोगी असल्यामुळे त्याला वेगळे स्वरुप प्राप्त झाले आहे. महिला बचतगटात महिला संघटीत काम करत असल्याने संघटनात्मक बळ वाढले आहे. महिलांना निर्णय घेण्याची क्षमता उपजत असल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. समस्या सोडवणे, चर्चा करणे, अनुभवाची देवाणघेवाण करणे यासाठी महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळाल्याने उद्योग उभारण्याची संधी उपलब्ध झाली आहे. यासाठी सरकारचे काही निर्णय पूरक ठरल्याने रिझर्व्ह बॅंक, नाबार्ड राष्ट्रीय महिला आयोग अशा देशपातळीवरील आर्थिक संस्था महिला बचत गटाला महत्वाचे स्थान दिले आहे. महिलांना विकासाच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

**महिला बचतगटाचा अर्थ खालीलप्रमाणे :**

- स्वयंसहाय्यता बचतगट म्हणजे समविचारांनी प्रेरित होऊन एका समान आर्थिक परिस्थितीत राहणाऱ्या गरिब ग्रामीण किंवा शहरी लोकांनी परस्पर समजूतीवर आधारीत छोटया आर्थिक बचतीतून, एकमेकांना आर्थिक मदतीसाठी आणि त्यामार्फत समुहाचा विकास साधण्यासाठी बनविलेला गट होय.
- परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे जाण्यासाठी स्वेच्छेने, संमतीने आणि सामुदायीकपणे बचतीच्या माध्यमाने केलेली वाटचाल म्हणजे स्वयंसहाय्यता बचतगट होय.
- जीवनातील नव्या आव्हानांना आणि जबाबदाऱ्यांना सामोरे जाण्यासाठी विकसित केलेला संच म्हणजे स्वयंसहाय्यता समूह म्हणजे बचतगट होय.
- समान प्रश्न, समान आचार विचार, परस्पर जवळीक असणाऱ्या महिला एकत्रित येऊन नियमित बचतीच्या माध्यमातून आपल्या लहान मोठया आर्थिक गरजा भागवून आपला सर्वांगीण विकास साधतात त्यास स्वयंसहाय्यता बचतगट म्हणतात.

- कमीत कमी दहा जास्तीत जास्त वीस महिला एकत्रित येऊन बचत करणे, सदस्यांना व्यवसायासाठी कर्ज देणे, उद्योग व्यवसायातून आपल्या जीवनमानाचा स्तर उंचावण्याचा प्रयत्न करणाऱ्या समूहाला महिला स्वयंसहाय्यता बचतगट असे म्हणतात.


  महिलांनी महिलांमार्फत, महिलांसाठी, अखंडीत सुरू असलेली महिलांची संघटीत शक्ती म्हणजे महिला बचतगट होय. बचतगट ही सोपी पध्दतशीर आखणी केलेली कार्यपध्दती आहे. स्वेच्छा, स्वयंशिस्त आणि स्वयंशासन हाच या बचतगटाचा मुलाधार आहे. सर्वासाठी एकजण व एकासाठी सर्वजण या ध्येयाने प्रश्नांचे निवारण आणि आर्थिक स्वावलंबन साधणारा समुह म्हणजे बचतगट होय. ग्रामीण महिलांनी स्वावलंबनासाठी महिला बचतगट ही चळवळ सुरु केली आहे.

१. अल्प बचतगट :
   **उद्देश** — बचत करणे
२. सुक्ष्म कर्ज गट / अशं पत समूह
   MCG / MCI – Micro Credit Group / Micro Credit Institution[10]
   **उद्देश** — बचत आणि कर्ज
३. बचत व कर्ज गट/काटकसर व कर्ज गट
   (SCG/ TCG)
   Saving & Credit Group / Thrift & Credit Group
   **उद्देश** — बचत. आणि काटकसर. आणि कर्ज
४. अशं वित्त संस्था / सुक्ष्म वित्त समुह / लघु पत समुह
   Micro Finance Institute ( MFI )
   **उद्देश** — बचत. आणि कर्ज. आणि विनिमय या तिन्ही सेवा एकत्र झाल्यास वित्त शब्द तयार होतो. (Credit)

पत, तंत्र सहाय. व्यवसाय सहाय म्हणजे मागचे पुढचे पुढे म्हणजे बचत गट. मिळकत गट = मिलाप, वरीलप्रमाणे तयार झालेल्या समीकरणावरुन असे वाटते की, परस्परावलंबी मानसिकता तयार होणे महत्वाचे असते. वित्तीय संस्था, बॅंक यामध्ये व्यक्ती, कुटूंब समाज, गांव तालुका, जिल्हा, देश हे सर्व एकमेकांमध्ये अडकले आहेत. CDFI [ Community Development Finance Institution],[११] म्हणून अशा अंश बचत, पत, विमा, व्यवसाय सहाय्य, समाज उपयोगी प्रयत्न करून समुह विकास संस्था तयार होतो. गटाकडून व्यक्तीगत कौटुबिक् समूह. गाव विकासाचे प्रयत्न होतात. त्यामुळे धनव्यवहार आणि मनव्यवहार एकत्र येण्यास मदत होते. म्हणूनच सध्या बचतगटांना प्राधान्य क्रम असल्याचे दिसून येत आहे.

दिलासा केंद्र[१२]

मन मोकळे करण्याचे ठिकाण




अशा पध्दतीने बचतगट हा चक्राकार गतीने प्रश्न सोडवणुक करणारा मंच आहे. त्यामुळे हा चक्राकार मंच सतत फिरत राहणारा असा आहे.

बचत – कर्ज, शिक्षण – अभिवृध्दी – जागृती

बचतगटातील महिला आपल्या सदस्यांना नियमित बचत करण्यास प्रोत्साहान देतात. गोळा झालेल्या सामूहीक निधीतून लहान लहान कर्जे दिली जातात. शिल्लक रक्कम बॅकेत बचतगटाच्या खात्यावर जमा केली जाते. असा जमा केलेला निधी गटाचा सामूहीक निधीचा भाग असतो. भविष्यात निर्माण होणाऱ्या अडचणीसाठी बचत करणे ही मानवाची उपजत आणि नैसर्गिक प्रवृत्ती आहे. आर्थिक देवाणघेवाण व्यवहार हे स्वयंसहाय्यता बचतगटाचे महत्वाचे वैशिष्ठ आहे. अशा आर्थिक व्यवहारातून महिलांना त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी कुटूंबातील आणि समाजातील स्थानाची जाणीव जागृती होण्यासाठी मदत होत आहे. स्वयंसहाय्यता बचतगट महिलांना आणि गरिब लोकांना सबळ आणि आत्मनिर्भर करणारा महत्वाचा दुवा आहे. या बचत गटात सहभागी महिलांचे मानसिक, वैचारिक परिवर्तन होऊन त्यांना स्वबळावर उभे करण्यास मदत होत आहे.

**स्वयंसहाय्यता गटाचे वर्गीकरण**[१३] **:**

बचतगटाची स्थापना ही ग्रामीण भागातील गरिब कुटूंबातील महिलांनी एकत्र येऊन सामुहीक रित्या स्थापन केली आहे. महिला बचतगटाच्या स्थापनेमागे प्रेरकाची कामगिरी महत्वाची असते. गटनिर्मिती किंवा गटाची स्थापना कोणत्या उद्दिष्टानुसार केली आहे त्यावर गटाचे वर्गीकरण अवलंबून असते. बचत गटाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे :

- **<u>मिश्र बचत गट</u> :—**

ज्या गटांमध्ये पुरुष व महिला हे दोघेही सदस्य असतात अशा गटांना समीश्र गट असे म्हणतात.

- **<u>महिला स्वयंसहाय्यता बचत गट</u> :—**

गटामध्ये फक्त महिलाच असतात. त्याच सर्व गटाचे व्यवहार सांभाळतात. गटाच्या मदतीने लहानलहान स्वतंत्र उद्योग सुरू करतात अशांना महिला स्वयंसहाय्यता बचतगट असे म्हणतात. सध्या अशा प्रकारच्या गटाची संख्या सर्वाधिक आहे.

- **<u>पुरूष स्वयंसहाय्यता बचत गट</u> :—**

अशा गटामध्ये फक्त पुरूषच गटाचे व्यवस्थापन करतात म्हणून अशा गटांना पुरूष स्वयंसहाय्यता गट असे म्हणतात.

- **<u>स्वर्णजयंती स्वरोजागारातर्गत स्वयंसहाय्यता बचत गट</u> :—**

अशा गटामध्ये स्त्री आणि पुरूष दारिद्रय रेषेखालील सदस्यांचा समूह असतो. या योजनेनुसार फक्त दारिद्रय रेषेखालील महिला, पुरूषांना अनुदानाचा फायदा मिळविण्यासाठी अशा प्रकारच्या गटाची निर्मिती केली जाते. मिळणाऱ्या उत्पन्नातून काटकसरीने बचत करून त्याद्वारे सदस्यांना गरजेनुसार कर्ज रूपाने पैसे देणे, कर्जाची परतफेड करणे, व्यवसाय करणे, वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारणी करणे सर्व सभासदांना आत्मनिर्भर बनविणे यासाठी स्थापन झालेले आहेत.

- **स्वयंसहाय्यता गटाचे स्वरूप :—**

भारतातील १२१[१४] कोटी लोकसंख्येपैकी ४० कोटी लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहेत. यातील ३० कोटी लोक ग्रामीण भागातील असून ते कर्जबाजारी आहेत. या लोकांना सावकारी कर्जबाजारीपणाच्या मगरमिठीतून मुक्त करण्यासाठी बचत गट मदत करत आहेत. महिला बचत गट म्हणजे समान सामाजिक व आर्थिक स्तर असलेल्या महिला समूह होय. गावातील जवळपास राहणाऱ्या दहा ते वीस महिलांच्या एकत्रिकरणातून बचतगट तयार होतो. त्यातच ते आपले प्रतिनिधी निवडतात. अशा प्रतिनिधीतून अध्यक्ष काही ठिकाणी संघटिका निवड करतात. दहा ते वीस महिलांपैकी एक अध्यक्ष असल्याने ती बचत गटाचे बॅंक खाते व इतर व्यवहार सांभाळते. बचत गटातील इतर महिला ठरलेल्या रक्कमा दरमहा नियमित जमा करतात. जमा रक्कमेतून गटाअंतर्गत कर्जाची देवाणघेवाण करतात. अशा बचतगटांना बॅंका या कर्ज देतात.

भारतामध्ये औपचारिक कर्ज वितरण व्यवस्थेचा मोठया प्रमाणात विस्तार झाला. अद्याप ग्रामीण भागातील गरिब महिला त्यांच्या निकडीच्या कर्जासाठी सावकारावर अवलंबून रहावे लागते. गरिब महिलांच्या कर्जाच्या गरजा सामाजिक आणि आर्थिक परिस्थीतीतून निर्माण झालेल्या असून त्या अतिशय गुतागुंतीच्या आहेत. अशा कर्जविषयक गरजा तातडीच्या वारंवार आणि विविध स्वरुपात निर्माण होतात. कर्ज रकमेची मागणी लहान असल्याने बॅंका याकडे दुर्लक्ष करतात. अशा परिस्थितीतील गरीब लोकांचे बचतगट विशेषतः महिलांचे बचत गट यांच्यातून झालेले बॅंक व्यवहार हे बॅंका व गरीब ग्रामीण जनता यांना निश्चितच लाभदायक ठरु लागले आहेत. स्वयंसहाय्यता बचतगट हे समविचाराने प्रेरीत होवून एका समान परिस्थितीत असणाऱ्या गरीब ग्रामीण आणि शहरी लोकांनी परस्परांना समजून घेऊन लहान आर्थिक बचतीतून एकमेकांना आर्थिक मदतीसाठी सघंटीत समूहाचा विकास साधण्यासाठी तयार झालेले आहेत.

अशा पध्दतीने बचतगट प्रामुख्याने ग्रामीण महिलांचे मोठया प्रमाणात स्थापन झालेले दिसून येतात. हे बचतगट सदस्यांना नियमित बचत करण्यास प्रेरणा देतात. संघटीत सामुहीक निधीतून गटातील सदस्यांना लहान लहान रक्कमेची कर्ज देतात. उर्वरित शिल्लक रक्कम बॅंकेत बचतगटाच्या बचत खात्यावर जमा केली जाते. अशा प्रकारे बॅंकेत जमा केलेली बचत सामुहीक निधीचाच भाग असतो. भविष्यात येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी बचत करणे हा मानवाचा नैसर्गिक गुणधर्म आहे. विशेषतः सर्वच स्तरातील लोकांना बचतीची गरज असते. गरिबांना बचतीची आवश्यकता सर्वात अधिक असते. पण कौटुंबिक, सामाजिक कारणामुळे ते बचत करु शकत नाहीत. त्यांची ही गरज महिला बचत गटाच्या माध्यमातून पूर्ण झाली आहे.

आर्थिक देवाणघेवाण व्यवहार हे बचत गटाचे महत्वाचे वैशिष्ठ आहे. अशा आर्थिक व्यवहारातून महिलांना त्यांचा आत्मविश्वास

वाढविण्यास आणि कुटूंबातील समाजातील त्यांचे स्थान याची जाणीव निर्माण होण्यास मदत होत असल्याने ग्रामीण महिलांची पाऊले बदलत्या विकासाच्या दिशेने पडू लागली आहेत.

भारतातील गरीब वर्गातील महिलांचे स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करणे आणि त्यातून महिलांचे सबलीकरण करणे हा विचार सध्या आपल्या देशात रूजू लागली आहे. भारत सरकार त्यासाठी प्रयत्नशील असून देश पातळीवर महिला बचतगटाच्या कार्याचा विस्तार करणे, महिला बचतगटांना बँकिगच्या सुविधा निर्माण करुन देणे आणि महिलांचे सबलीकरण करणे यासाठी सरकारने हे काम नाबार्ड बँकेकडे सोपविले आहे. आज बऱ्याच मोठया प्रमाणात हे काम आपल्या देशात सुरू आहे. जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था, निर्गुतंवणुकीचे धोरण व खुला व्यापार यामुळे आपल्या देशातील एकूणच उद्योगक्षेत्र, शेती क्षेत्र, सेवाक्षेत्र यामध्ये परकीयांनी प्रवेश केला आहे. त्यामुळे जागतिकीकरण आणि खुली अर्थव्यवस्था यातून उद्याचा भारत कसा निर्माण होईल हे सांगणे कठीण आहे. अशा या वातावरणामध्ये सरकारपेक्षा देशातील समाजाने प्रत्येक खेडयातील महिला बचत गटाच्या माध्यमातुन भारतीय जीवनाचे परिवर्तन घडवून आणू असा संकल्प केला तर महिला बचतगट या वादळातून देशाला तारुण नेणारी सर्वात बलशाली चळवळ ठरणार आहे. त्यामुळे समाजाने या चळवळीकडे आशादायी दृष्टीकोनातून पहाणे अपेक्षित आहे.

स्वयंसहाय्यता बचतगटाच्या माध्यमातून विकासाच्या सर्व प्रक्रीयेत महिलांचा समावेश केल्यास कोणत्याही प्रकारची मदत न घेता आपण देशाचा विकास साध्य करु शकतो. देशाला जगाच्या पातळीवर सर्वोच्च स्थान मिळवून देऊ शकतो. अशा पध्दतीचा नवीन उपक्रम स्वत:च्या कल्पनेतून साकारणारे शिल्पकार डॉ. महमंद युनुस महिला बचतगट स्थापन करुन जगासमोर एक आदर्श निर्माण केला. महिलांचे सक्षमीकरणाचे माध्यम म्हणून महिला बचतगट ही निश्‍चितच मदत करु शकतात. डॉ. महमंद युनुस यांनी ही संकल्पना साकार करुन एका अर्थाने महिलांना सामाजिक जीवनात महत्वाचे स्थान मिळवून दिले. महिला सबलीकरण, सक्षमीकरण, गरिब महिलांचा आधारस्तंभ, महिला उन्नतीचे प्रणेते यांना त्यांच्या कार्याची पोहच पावती म्हणजेच त्यांना मिळालेला नोबेल पुरस्कार होय.

महिला बचतगट ही केवळ महिलांची बचतीची चळवळ नसून देशातल्या दारिद्रय निर्मूलनाची चळवळ आहे. जागतिक पातळीवर जी प्रचलीत बँकीग पध्दत, वित्तीय संस्था किवां वित्तिय क्षेत्रासाठी शासनाच्या योजना आहेत. अशा सर्व योजना गरिबांसाठी निरुपयोगी आहेत. कारण या योजनाचा गरीबांना फायदा कसा होणार नाही याचा विचार करुनच योजना निर्माण केलेल्या आहेत. विद्यमान प्रचलित बँकीग पध्दतीला डावलून गरिबांनी गरिबासाठी स्थापन केलेली ग्रामीण बँक म्हणजे सद्या जगाच्या पातळीवर चालू असलेल्या बँकिग पध्दतीला दिलेले आव्हान आहे.

महिला बचतगटातील महिलांचे असे म्हणणे आहे की, आमचा आधारस्तंभ म्हणजेच आम्ही आमचे स्थान बदलू शकतो. त्यासाठी समाजाने आणि सरकारने आम्हाला कामाची संधी निर्माण करुन द्यावी. आम्ही महिला आहोत म्हणून आम्हाला कुणाच्या आर्थिक मदतीची अपेक्षा नाही तर उपजत आमच्याकडे असलेल्या कौशल्य, सेवा, त्याग, सहनशीलता, संयम, समजुतदारपणा, सुस्वभावी, सालस, नम्रतापूर्ण, विनयशील, साहसी, मितभाषी, गोड, हसरी, या सर्व गुणांची साश्वत मुर्ती एक स्त्रीच असू शकते. त्याचा उपयोग ती स्वत:साठी स्वत:च्या कुटूंबासाठी चिकाटीने केल्यास त्याचा लाभ देशाच्या विकासासाठी निश्चितच होऊ शकतो. आर्थिक विकासात स्त्रीयांचे योगदान मोलाचे आहे. महिला बचतगट महिलांना सक्षम आणि आत्मनिर्भर बनवण्याचे एक प्रभावी साधन आहे. महिला बचतगटामध्ये सहभागी झालेल्या महिलांचे मानसिक, वैचारिक परिवर्तन झाल्याने त्यांना स्वबळावर उभे राहण्यास मदत झाली आहे. गावाचा सामाजिक विकास साधण्यासाठी एकमेकांना मदत करुन सर्वांगीण विकास प्रक्रीयेत महिलांचा सहभाग वाढविणे हा बचत गटाचा मुख्य हेतू आहे. महिला बचतगटातून मोठा सामुहीक निधी उभारता येणे शक्य आहे.  या गटाची कामाची पध्दत अंत्यत साधी, सोपी आणि बदल विचारात घेता येण्यासारखी आहे. म्हणजेच लोकशाही तंत्राचा वापर केला जातो. महिला बचतगटातील प्रतिनिधींना विनाकारण विनातारण कर्ज दिले जाते. परस्परांवरील विश्वास आणि स्वत:चा आत्मविश्वास हेच गटाचे तारण आहे. त्यामुळे गटाअंतर्गत दबाव व सामुहीक शिस्त असल्याने कर्जाची परतफेड शंभर टक्के हाते. गटामध्ये सर्व सदस्य एका समान आर्थिक परिस्थितीतून एकत्र आले असल्याने गटाच्या समान फायदयासाठी काम करत असतात. गटातील सर्वच व्यवहार काम करण्याची पध्दत ही पारदर्शक असल्याने सदस्यांना काम करण्यास प्रेरणा मिळते. बचत गटाचे ध्येय हे प्रथम बचत नंतर कर्ज. बचतीच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबनेकडे वाटचाल आहे. महिला बचतगटाची स्थापना करणेही एक सार्वभौम प्रक्रिया आहे. समान आर्थिक आणि सामाजिक पार्श्वभूमितून समविचारांच्या महिला बचतगट स्थापन करु शकतात.

सध्या महिला बचतगट चळवळ महत्वपूर्ण वळणावर कार्यरत असून महिलांच्या सक्षमीकरणांचे प्रमुख यंत्रणा बनली आहे. साधारणता ग्रामीण भागांतील महिलांना त्यांच्या समस्या, आचार—विचारांची देवाण—घेवाण करण्यासाठी महिला बचतगट हे एक व्यासपीठ तयार झाले आहे. स्पर्धात्मक व जागतिकीकरणाच्या युगामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या ग्रामीण विकास यंत्रणाद्वारे स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेअंतर्गत खेडयातील महिलांना आर्थिकदृष्टया स्वावलंबनासाठी महिला बचतगट स्थापनेला प्रोत्साहन मिळाले आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील महिलांना त्यांच्या कलागुणांना वाव मिळाला आहे. गटामार्फत सभासद कुटुंबाच्या गरजा पूर्ण केल्या जातात. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील महिलांची समाजात पत निर्माण केली जाते. महिला बचतगट चळवळ

भारतात प्रथमत: कनार्टक राज्यात १९८६–८७ मध्ये सुरू झाली. आंध्रप्रदेशात महिला बचतगटाच्या चळवळीने आघाडी घेऊन १५००[१५] कोटी रूपयांची बचत केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही ही चळवळ जोमाने सुरू झाली.

व्यक्तीला उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झाला की, कर्जाची गरज निर्माण होते. अशा गरजांच्या पूर्ततेसाठी अनेक वित्तीय संस्था कार्य करीत आहेत. या संस्था गरिबांसाठी कर्ज पुरवठा करण्यास उत्सुक नाहीत. कारण गरिबांच्या उत्पन्नांची साधने मर्यादित आहेत. तारणाची कमतरता असल्याने कर्ज दिले जात नाही. त्यामुळे लोक सावकाराकडून विनातारण अनुत्पादक, तात्काळ कर्ज घेतात. यातूनच हे सावकाराच्या कर्जाच्या जाळयात अडकतात. अशांना सावकारी पाशातून सोडवण्यासाठी सहकार चळवळ सुरू झाली. परंतु शंभर वर्षानंतर ही चळवळ सरकारी चळवळ बनली. राजकारण, भ्रष्टाचार, दप्तरदिरंगाई यामुळे सहकार चळवळ बदनाम झाली. आज सुवर्णमध्य म्हणून बचतगट चळवळ जोमाने वाढत आहे. त्यामुळे सध्या खेडोपाडी महिला बचतगट स्थापन करून आर्थिक परिवर्तनासाठी प्रबोधन आणि छोटयाछोटया उदयोगांची सुरूवात झाली आहे. स्वत:च्या मिळकतीवर जगणाऱ्या स्वाभिमानी कुटुंबाच्या परिवर्तनासाठी व्याख्याने, शिबीरे, चर्चासत्रे, दौरे, सुसंवाद, प्रत्यक्ष कार्यवाही इत्यादी माध्यमातून बचतगटाचे कार्य चालू आहे.

## १.३. <u>स्वयंसहाय्यता बचतगट आवश्यकता आणि वैशिष्टे</u> :—

### ♣ स्वयंसहाय्यता बचतगट आवश्यकता[१६] :—

आवश्यक वस्तूंचा संग्रह करणे आणि त्याचा अडचणीच्यावेळी वापर करणे ही प्रवृत्ती अनादिकाळापासून प्रचलीत आहे. स्वत:साठी काहीतरी मिळवणे त्यातील आवश्यक भाग वापरून उर्वरित आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांसाठी जपून ठेवणे ही प्रवृत्ती मानवाबरोबर प्राण्यांमध्येही आहे. आपली स्वत:ची आणि समुहाची गरज भागवण्यासाठी मुंगीसुध्दा कणाकणाने बचत करते. चिमणीसुध्दा आपल्या घरटयामध्ये पिलांसाठी काही राखून ठेवते. तसेच बचत हा मानवाचा सुध्दा स्थायीभाव आहे. बचत ही संकल्पना फार व्यापक आहे. त्यात केवळ पैशाची बचत एवढाच विचार नाही तर पैसा, अन्नधान्याची बचत, इंधनाची बचत, वेळेची बचत, पाण्याची बचत, साहित्यांची बचत, श्रमाची बचत, अशा पध्दतीने यादी तयार करता येईल. त्यामुळे बचत ही संकल्पना मर्यादित अर्थाने विचारात घेऊन चालणार नाही. या ठिकाणी बचतीचा विचार पैशाची बचत या अर्थाने आहे. अनेक स्वयंसेवी संस्थांनी महिला विकास कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण भागात बचतगट सुरू केले आहेत. महिला विकास आणि उद्योजकता या हेतूने महिला बचतगटाची संख्या वाढत आहे. महिलानां संघटित करणे., महिलांना शिक्षण—प्रशिक्षण देणे, महिलांचे प्रबोधन करणे म्हणजे सर्वार्थाने महिलांना सक्षम करण्याच्या हेतूने बचतगटाचे काम सुरू आहे. बचतगट हे महिला संघटनांचे एक उत्तम

माध्यम आहे. काही ठिकाणी या गटाचे रूपांतर महिला मंडळात होऊन यातून विकासात्मक, रचनात्मक, संघर्षात्मक असे विविध कार्य सुरू आहेत. बचतगटातील महिलांनी एकत्रित येऊन दारूबंदीचा कार्यक्रम यशस्वी केल्याची अनेक उदाहरणे आहेत.

बचतगट कार्यक्रमातून महिलांचे संघटन बांधले जाऊन महिलांना पत, प्रतिष्ठा, मान, सन्मान मिळतो आहे. घरात, समाजात, तिच्या विचारांचा आदर केला जातो आहे. कुटुंबातील निर्णयपक्रीयेत तिला आदराचे स्थान दिले जात आहे. महिला समाजविकास कार्यात सहभागी होत आहेत. बचतगटामुळे महिलांच्या सामाजिक आणि कौटुंबिकस्थिती सकारात्मक झाल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण विकासाची कामे ग्रामीण महिला हाती घेऊ लागल्या आहेत. बचतगट कार्यक्रमांतर्गत महिला उद्योजकांचा विकास हा महत्वाचा हेतू आहे. महिला उद्योजकता विकास करण्यासाठी प्रशिक्षण, उपक्रमांना भेटी देणे इत्यादी कार्यक्रम राबविले जात आहेत. जाणीव जागृती उपक्रमाबरोबर महिलांमधील उद्योजकाला प्रोत्साहन दिले जात आहे. बचतगटाच्या उपलब्ध पैशातून सामुदायिक शेती किंवा भाडयाने जमीन घेऊन भाजीपाला पिकवणे, शहरात विक्री करणे इत्यादीतून बचत गट आर्थिकदृष्टया सक्षम होण्यास मदत होत आहे. बचतगटांची आवश्यकता पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. स्वयंसहाय्यता बचतगट महिलांना एकत्रित करुन विचार करण्यास प्रवृत्त करण्याचे माध्यम आहे. त्यामुळे बचतगटाच्या महिला आर्थिक सक्षमीकरण झाल्याने सावकारापासून सुटका झाली आहे.
२. महिला बचतगटातून विविध महिला एका विचारांनी एकत्रित आल्यामुळे परस्परांशी सुख दु:खाची देवाणघेवाण करणे शक्य होत आहे.
३. बचत गटातून बचतीची सवय लागल्याने एकमेकांना आर्थिक मदत करून दैनंदिन अडचणी सोडवणे सोपे झाले आहे.
४. स्वत:ची आर्थिक परिस्थीती लक्षत घेऊन ती सुधारण्यासाठी स्वत:चे बीजभांडवल तयार करणे सुकर होत आहे.
५. बचत गटामुळे केवळ आर्थिक विकासाचे मार्ग आणि संधी मिळते असे नाही तर अनेक प्रकारचे प्रशिक्षण, जगाचा अनुभव, एकमेकांबद्दलची सहानुभूती वाढल्याने महिलांमध्ये आत्मविश्वास वाढून घरात, बॅंकेत व पर्यायाने गावात त्यांची पत निर्माण झाली आहे.
६. महिला आत्मविश्वासाने पुढे आल्यामुळे महिला आणि गावाच्या निर्णय प्रक्रियेत कृतीशील सहभागाला सुरुवात झाली आहे.
७. संघटीत महिलांना स्वत:च्या आणि समाजाच्या अनेक समस्यांची जाणीव झाल्याने यावरील उपाय संघटीत बळावर प्रत्यक्ष कृतीत उतरवला जात आहे.

८. गटविस्तार जसजसा होईल तसतसा महिलांचा दृष्टीकोन मी पासून आम्ही पर्यत विस्तारल्याने स्वयंविकासाकडून सामाजिक विकासाकडे त्यांची वाटचाल सुरु झाली आहे.
९. बचतगट हे स्वावलंबन, मानसिक, वैचारिक विचार आणि आर्थिक व सामाजिक प्रगतीचे उत्तम माध्यम आहे.
१०. एक व्यक्ती म्हणून महिलांना बचतगटात स्थान मिळाल्याने एक स्त्री म्हणून स्वत:चे स्थान निर्माण करण्याच्या प्रक्रीयेला सुरुवात झाली आहे.
११. लहान उद्योग आणि व्यवसायातून स्वतंत्र रोजगार निर्मितीस प्रोत्साहन मिळत आहे.

**♣ स्वयंसहाय्यता बचतगटाची वैशिष्टे :—**

समान विचारांनी आणि समान उद्दिष्टांनी काम करणाऱ्या महिला एकत्र आल्यास कोणतेही काम करता येणे शक्य असते. गट समुहाचे महत्व लक्षात आल्यानंतर गटपातळीवर काम सहज शक्य होते. त्यामुळे स्वयंसहाय्यता बचत गटाची वैशिष्टे खालीलप्रमाणे —


१. स्वयंसहाय्यता बचतगट महिलांना एकत्रित करुन विचार करण्यास प्रवृत्त करण्याचे माध्यम आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील सावकारावर अवलंबून राहणाऱ्या महिला कर्जदारांना मुक्ती मिळाली आहे.
२. नियमित बचतीतून मोठया सामूहीक निधीची उभारणी तसेच लहान उद्योग व्यवसाय सुरु झाल्याने रोजगार निर्मितीस चालना मिळाली आहे.
३. बचतगटाची देवाण घेवाण करण्याचे अंत्यत सोपे आणि सोयीने बदलता येणारे नियम आणि कार्यपध्दती आहे.
४. बचत गटाच्या सर्व कार्यपध्दतीत लोकशाही मुल्यांची जपणूक होत असल्याने सर्व सभासदांना सक्रीय सहभाग आहे.
५. सदस्यांना बचत गटामार्फत, विनातारण अर्थसहाय्य उपलब्ध होते.
६. बचत गटातील सभासदाच्या परस्परांवरील विश्वास आणि स्वत:चा आत्मविश्वास हेच कर्जाचे तारण असते.
७. बचतगटा अंतर्गत कर्ज वाटपाचे नियम अटी सभासद परस्पर सहकार्याने निर्णय घेऊन ठरवितात.
८. बचतगटा अंतर्गत व्यवहारामध्ये बाहेरील व्यक्तीचा संबध येत नाही.
९. बचतगटामध्ये एकाच ठिकाणी राहणाऱ्या महिला एकत्र आल्याने एकमेकांबददल आदर, भावनिक संबध, ‘‘एकासाठी सर्वजण व सर्वासाठी एकजण“ अशा भावना वाढीस लागल्या आहेत.
१०. बचतगट हे सहकाराप्रमाणे साकार झाल्याने सदस्याकडून सदस्यांना सहकार्य मिळत आहे.

११. बचतगटासाठी सर्व समावेशक शासकीय नियम नसल्याने प्रत्येक गट स्वनिर्मित नियमावली तयार केल्याने लवचिकता आहे.
१२. बचतगटाव्दारे धनव्यवहार आणि मनव्यवहार होत असल्याने आर्थिक व्यवहारात बचत, कर्ज, विमा व्यवसाय, कौटुंबिक, सामाजिक, वैयक्तिक समस्यांची सोडवणूक केली जाते.
१३. बचतगट हे महिला एकत्रित करण्याचे, त्यांच्या कलागुणांना, कौशल्यांना आणि विचारांच्या देवाणघेवाणी हक्काचे व्यासपीठ आहे.
१४. स्वयंसहय्यता चळवळ अनौपचारिक असल्याने नोंद करावी लागत नाही. त्यामुळे मित्रमंडळ, क्रीडा मंडळे, नाटयमंडळे, भजनी मंडळे, सामाजिक संस्था इ. सक्रीय सहभागी होऊ शकतात.
१५. गटातील सदस्यांना अंतर्गत दबाव आणि सामुहीक शिस्त असल्याने कर्जाची परतफेड नियमित आणि शंभर टक्के होते.
१६.. महिला बचतगटात वीसपेक्षा अधिक सभासद नसतात. त्यामुळे ते सामुहीक लाभासाठी नेहमी सक्रीय असतात.
१७. बचत गटाचे संपूर्ण व्यवहार आणि कार्यपध्दती ही पूर्णपणे पारदर्शक असते.
१८. गटांअर्तगत मतभेद निर्माण झाल्यास त्यावर सामुहीक चर्चा करुन गटांच्या हितासाठी एकमताने निर्णय घेतला जातो.
२०. सभासदांची सामाजिक व आर्थिक पातळी समान असल्याने, त्यांच्यामध्ये जवळीकता निर्माण होऊन परस्परांच्या कौटुंबिक अडचणी सोडविण्याची जाणीव होते.
२१. स्वयंसहाय्यता गटाचे ध्येय प्रथम बचत मग कर्ज आणि बचतीच्या माध्यमातुन आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल आहे.

## १.४ स्वयंसहाय्यता बचत गट रचना व निर्मिती :—

### ✧ स्वयंसहाय्यता बचतगट रचना :

स्वयंसहाय्यता बचतगटाच्या चळवळीमुळे असंख्य गरिबाच्या जीवनात प्रथमतः विनातारण कर्ज मिळण्याची सोय निर्माण झाली आहे. या कर्जाचा उपयोग कोणत्या ना कोणत्या व्यवसायासाठी करुन कर्जाची परतफेड समर्थपणे करु शकतो हा महिलांच्या जीवनातील अनोखा आंनद आहे. त्यामुळे महिलांचा आत्मविश्वास आणि आत्मसन्मान जागा होतो. महिला जिद्दीने बचतगट चालवितात आणि निखळ आनंद मिळवतात. स्वकर्तृत्वाने महिलांचा विकास करणाऱ्या स्वयंसहाय्यता महिला बचतगटाचे व्यवस्थापन आणि अमंलबजावणी केंद्र, राज्य, जिल्हा, तालुका आणि गावपातळीवर सुरू आहे. प्रत्येक पातळीवर समित्या आहेत. स्वयंसहाय्यता महिला गटाच्या योजनांची रचना त्रिस्तरीय यंत्रणा खालीलप्रमाणे —




### ✧ स्वयंसहाय्यता बचतगट निर्मिती :—

आपल्या देशातील बचतगटाकडे पाहताना लाभ, आनंद व तत्वे या तीनही घटकांची कसरत करावी लागते हे लक्षात येते. अर्थात नियमांचे पालन करताना स्वाआनंद लाभ प्राप्ती हे गटाचे उदिदष्ट आहे. स्वत:च्या कुटूंबातील गरिब, दुर्लक्षीत माऊली, जग रुढीच्या बंधनाने दुर्बल ठरलेली अबला, दारिद्रय, कर्ज व गुलामगीरीतून बाहेर येणे अशक्य असणाऱ्या महिलांना संघटीत करण्याचा राजमार्ग संघटन शक्तीचा अविष्कार म्हणजे ग्रामीण भागातील महिला बचत गट होय. बचतगटाची उभारणी टप्याटप्याने हळूवारपणे होत असते. गरजू महिलांची गरज, तीव्रता, प्रतिसाद, सामंजसपणा व कृती करण्याची क्षमता यामध्ये स्थानपरत्वे फरक आढळतो. परिणामी प्रत्येक ठिकाणी वेगवेगळया टप्यापासून प्रक्रीया सुरु करावी लागते. खालील टप्यावर बचतगट निर्मिती प्रक्रीया :—

✧ शिवारफेरी[१८] :— गावाचा आर्थिक नकाशा — गावाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थीती, रुढी, पंरपरा यांची माहिती करुन घ्यावी लागते.

✧ गावफेरी :— गावाचा सामाजिक नकाशा — गावात भेटी देवून

सरपंच, ग्रामसेवक, शिक्षक, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका यांच्याशी संपर्क साधून गृहभेटी देऊन महिलांचा विश्वास मिळवणे.

- ✧ शोधफेरी :— स्त्रीचा शोध — इच्छूक उत्साही महिलांचा गट तयार करुन सोयीनुसार बैठका.
- ✧ संपर्कफेरी :— गरजा, प्रश्न, स्थिती, क्षमता, कौशल्य, उत्पन्नाचे मार्ग — यातून संपर्काला सुरुवात.
- ✧ निवडफेरी :— समूह बैठकीतून संवाद साधने, दारिद्रय निर्मूलन माहिती
- ✧ प्रबोधनफेरी :— बचतगट गरज — विविध उपक्रम
- ✧ गटबांधणी :— समस्यांची नांवे व संख्या निश्चिती
- ✧ प्रशिक्षण :— स्वनिर्मिती नियम, कर्ज — उद्योग — व्यवसाय
- ✧ संचलन सराव :— गटासाठी कोणतेही निर्णय स्वत: न घेता आणि स्वत:चे निर्णय गटावर न लादता लोकहिताच्या निर्णयासाठी गटाला प्रवृत्त करुन निर्णय क्षमता विकसीत करणे.
- ✧ रुढीकरण :— एकजण सर्वासाठी आणि सर्वजण एकासाठी स्वेच्छेने संघटित काम करण्याचा निश्चय करणे.

स्वयंसहाय्यता बचतगटाची संकल्पना समजावून देणे, गटाची वैशिष्टे कार्यप्रणाली माहिती देणे, गटाअंतर्गत सभासद, संघटिका यांच्या जबाबदाऱ्या समजावून देणे, स्वयंसहाय्यता बचतगटाची निर्मिती करण्यासंदर्भात अधिकारी/कर्मचारी व कार्यकर्ता यांची भूमिका स्पष्ट करणे, बचतगट हे गाव विकासाचे माध्यम कसे होऊ शकते हे स्पष्ट करुन सांगणे, समाजामध्ये प्रचलित स्त्री—पुरुष विषमतेची वास्तव जाणीव करुन देणे, महिलांच्या व्यवहारिक ज्ञानामध्ये भर घालणे, घराबाहेर पडून, महिलांना गांव, तालुका, जिल्हा पातळीवर शासकीय यंत्रणाच्या कामकाजाची प्रत्यक्ष माहितीसाठी प्रवृत्त करणे, शासकीय यंत्रणा गावासाठी बांधली आहे. त्याकरिता त्यांच्याकडून मदत मिळविणे. सर्वाचे योगदान देऊन स्वत:च्या गावाच्या विकासासाठी एकत्रित कृती या सर्वाची जाणीव महिलांना करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे महिला बचत गटनिर्मिती आवश्यक आहे.


कोणत्याही कामासाठी प्रेरणा प्रोत्साहन आवश्यक असते. गांव, वाडी, वस्तीतील महिलांना एकत्रित करुन गट स्थापन करावा लागतो. गट स्थापन करणे, गटाला सर्वानुमते नांव देणे, गटाचा कारभार व्यवस्थीत चालवण्यासाठी पदाधिकारी निवडणे, गटांअतर्गत जमा केलेली बचत सुरक्षीत ठेवण्यासाठी बॅकेत खाते उघडणे यासाठी प्रक्रीया गट स्थापनेसाठी पूर्ण कराव्या लागतात. तसेच नियम तयार करणे आणि त्या नियमाचे पालन करावे लागते.

बचत गटाचे नियम स्वयंप्रेरणेने, चर्चेतून, अडचणीतून निर्माण होत असल्याने चिरकाल टिकणारे असतात. बचतगट चळवळीतील नियमासाठी महिला नसून महिलांसाठी नियम असतात. महिलामहिलांना बांधून ठेवताना

वेळ पडल्यास नियमात तडजोड करावी लागते. बचतगटातील महिला गरिब, ग्रामीण, निरक्षर आणि अल्पसाक्षर असल्याने त्यांची लेखन, वाचन, आकलनक्षमता, लक्षात घेऊनच नियमांची भाषा, शब्दरचना, सरळ, साधी, सोपी, स्पष्ट आणि पारदर्शक अशी आहे. बचतगट स्थापनेबाबत नियम[१९] खालील प्रमाणे स्पष्ट करता येतील —

१. एकमेकांवर विश्वास असलेल्या आणि सहजपणे एकत्र येऊ शकतील अशा १५ ते २० महिला एकत्र येऊन बचतगट सुरू करतात.
२. बचत गटांच्या बैठका घेऊन अनौपचारिक गटातून सर्वांना योग्य असे नियम तयार करून ठराव केला जातो.
३. बचत गटातील सुशिक्षीत आणि समजूतदार दोन महिलांना सर्वानुमते निवडून त्यांना अध्यक्ष व सचिव असे पद दिले जाते.
४. निवडून दिलेल्या दोन महिलांना गटाचा हिशोब ठेवण्याची जबाबदारी आणि सदस्यांना योग्य ते प्रशिक्षण देण्याची जबाबदारी असते.
५. सहा महिने झाल्यानंतर बचतगट व्यवस्थित सुरू झाल्यावर बॅंकेत बचत गटाचे खाते उघडावे लागते. खाते उघडेपर्यंत ती रक्कम संबंधीत संस्थेकडे ठेवता येते. अशी सोय नसल्यास बॅंक खाते केंव्हाही उघडता येते. खाते उघडण्यासाठी वेळेचे बंधन नसते.
६. बचत गटाची बैठक वेळ, ठिकाण, तारीख ही सर्व सभासदांच्या सोयीनुसार ठरविली जाते.
७. बचत व आर्थिक मदत देणेघेणे याबाबतचे निर्णय चर्चेतून एकमताने बैठकी मध्येच घेतले जातात.
८. बचत गटांतर्गत व्यवहारातील नोंद नोंदवहीमध्ये बैठकीच्या वेळी लिहिले जातात आणि सभासदांना वाचून दाखविले जातात.
९. बचतगट स्थापनेच्या सहा महिन्यानंतर सभासदांना सर्वसाधारण कर्ज देण्यास सुरूवात होते.

अशाप्रकारे बैठकी संबंधात सर्वसाधारण नियम आहेत परंतू बचतगटाची संख्या वाढेल त्याप्रमाणे नियमात बदल होतात.




**१.५ स्वयंसहाय्यता बचतगट कार्यपध्दती :**

सभासदांच्या अडचणीच्या वेळी परस्परांना स्वत:च्या बचतीतून अर्थसहाय्य करणे, सभासदांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी बीजभांडवल तयार करणे, यासाठी बचतगट स्थापन झाले आहेंत. महिलांची शक्ती व आत्मविश्वास वाढविण्यासाठी परस्परांच्या सहकार्याने निर्माण केलेल्या बचत गटांना स्वयंसहाय्यता गट किंवा बचतगट असे संबोधले आहे. आपण स्वत:हा केलेल्या बचतीव्दारे कर्ज घेऊन उद्योग व्यवसाय करून स्वावलंबी व्हावे आणि स्वतंत्र रोजगार निर्मितीस मदत व्हावी हा या बचतगटाच्या स्थापनेमागील महत्वपूर्ण उद्‌देश आहे.

महिला बचतगटामध्ये ग्रामीण भागातील महिला स्वत:ची ठरलेली बचतीची रकम एकत्र करतात. गटातील गरजू सभासद गरजेनूसार आर्थिक

सहायाची मागणी करतात. आर्थिक सहाय्य देण्यासाठी लोकशाही पध्दतीने निर्णय घेतले जातात. बचतगटामध्ये सभासदांची संख्या मर्यादित असते. किमान दहा व कमाल वीस सभासद असल्यामुळे सर्वांचा एकमेकाशी चांगला संपर्क असतो. बचत किती करावी, सभासद संख्या किती असावी, कर्ज किती घ्यावे, किती सेवा शुल्क आकारावे,[२१] इत्यादी नियम बचत गटातील सभासद स्वतंत्रपणे ठरवित असतात. आठवडा, पंधरवडा किंवा महिन्यातील ठराविक दिवशी सर्व सभासद एकत्र येऊन बचत जमा केली जाते. ज्यांना कर्जाची निकड असते त्यांचे कर्ज मागणी अर्ज घेतले जातात. घरगुती अडचणी निवारण्यासाठी आणि उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी कर्ज दिले जाते. सर्वसाधारणपणे असे लक्षात येते की, बचत गटाच्या पहिल्या वर्षामध्ये घरगुती अडचणी निवारण्यासाठी कर्ज मागणीचे अर्ज अधिक संख्येने येतात. दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात उत्पादन उद्योग व्यवसायासाठी कर्ज मागणीचे अर्ज अधिक संख्येने येतात. तपशीलवार केलेल्या कामकाजाची नोंद ठेवली जाते.. प्रत्येक सभासदाला पासबुक दिले जाते. त्याचा नमुना पुढे दिलेला आहे. बचतगट चालविणाऱ्या संघटकांना आणि बचतगटाच्या सभासदांना कामकाजासंबधी प्रशिक्षण दिले जाते. बचतगट संघटक वारंवार एकमेकांना भेटतात व एकमेकांच्या अनुभवाची देवाण घेवाण करतात.

बचतगटातील बचत करणारे व कर्ज घेणारे यांचे हितसंबध असतात. बचत व कर्ज यांची सांगड घालणे आवश्यक असते. बचत गटाअंतर्गत कामकाजाची पध्दत सोपी, लवचिक व कमी खर्चीक असते. सर्व कामकाज सभासदाच्या सहभागाने चालविला जातो. कामासंबधीचे धोरण व त्यांची अंमलबजावणी करण्याचे काम गटातील सभासद करत असतात. सभासदांना कर्ज देण्याबरोबर काही सेवाही पुरविल्या जातात. उदा. कौशल्य वाढविण्याचे प्रशिक्षण, आर्थिक थकबाकी दूर करण्यासंबधी मार्गदर्शन, चर्चा अनुभवांची देवाण घेवाण करुन समस्या सोडविण्याचे प्रशिक्षण इत्यादी गटाअंतर्गत सर्व व्यवहार विश्वासावर आधारित असून तारणाचा आग्रह धरला जात नाही. बचतीची व कर्जाचे व्यवहार गटाच्या माध्यमातून प्रवृत्त केले जातात.

अशा प्रकारे गटाचा विस्तार झाल्यामुळे आणि सुरळीत व्यवहार सुरु झाल्यामुळे बचत गटाची बॅकेत व गावात पत वाढीस लागते. महिला बचत गटानां बॅका व इतर संस्थाकडून आर्थिक स्त्रोत उपलब्ध होत आहे. दैनंदिन गरजा पूर्ण होत असल्या कारणाने महिला स्वबळावर उभ्या राहत असल्याचे दिसून येते. त्यामुळे महिलांची आर्थिक पत वाढून गटाअंतर्गत बचतीतून बॅकेचे कर्ज घेऊन महिला आर्थिकदृष्टया सक्षम व आर्थिक स्वावलंबनासाठी मदत झाली आहे. सभेचे सर्व आर्थिक व्यवहार नियमाने पूर्ण होत आल्याने सामाजिक प्रश्न आणि इतर प्रश्नाची चर्चा करुन सर्वानुमते निर्णय घेतले जातात उदा. ठराव, शैक्षणिक समस्या, व्यक्तिगत समस्या, गावपातळीवरील प्रश्न, यावर चर्चा करुन निर्णय घेतले जात असल्याने वैयक्तिक बोलण्याची संधी निर्माण होते. त्यातून मानसिक

आधार मिळाल्याने विचाराला सुरुवात होते. निर्णय प्रक्रियेत सहभागी झाल्याने एकप्रकारे वेगळा आनंद मिळतो. स्वतंत्र काम करण्यास प्रोत्साहान मिळाल्याने कौटुंबिक अडचणी सोडविणे शक्य होते. बचत गटातील महिला 'एकमेका सहाय्य करु बचतगट विस्तार करु' असे म्हणू लागल्या आहेत. त्यामुळे महिलांच्यामध्ये 'मी तुमच्यासाठी व तुम्ही माझ्यासाठी आहात' ही भावना वाढीस लागली आहे. त्याच्या मनामध्ये आपली मुले आपल्यालाच घडवायची आहेत कारण हीच मुले आपल्या देशाचे आदर्श नागरिक म्हणून पुढे येणार आहेत. मुले चांगली घडवली तर देश चांगला घडण्यास वेळ लागणार नाही ही प्रवृत्ती महिला बचतगटामध्ये वाढीस लागली आहे. एकूणच महिलांचा आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक , शैक्षणिक व आर्थिक साक्षरतेला प्रेरणा मिळत आहे. देशातील एकूण लोकसंख्येपैकी निम्या महिला आहेत हे विचारात घेता आर्थिक विकासात ग्रामीण भागातील महिलां बचतगटाचे योगदान मोलाचे आहे.

## १.६ महिला स्वयंसहाय्यता गटाच्या कार्यपध्दतीतील घटक[२२]

### ❖ बचत गटातील प्रवेश :—

१. बचतगटात फक्त महिलांना प्रवेश दिला जातो.
२. जात, धर्म, आणि आर्थिक स्थिती याचा विचार न करता प्रत्येक गरजू महिलेस प्रवेश दिला जातो.
३. प्रवेश घेणारी महिला ही गावात कायम राहणारी असावी.
४. तात्पुरत्या वास्तव्यास असणाऱ्या महिलांना बचतगटात प्रवेश देता येत नाही.
५. नवीन सभासदाला प्रवेश देताना गटातील सभासद महिलांची संमती घ्यावी लागते.
६. बचतगटात सभासद होण्यासाठी कुणावरही जबरदस्ती केली जात नाही.
७. सभासद नोंदणी शुल्क प्रत्येक महिलेकडून एकदाच घेतले जाते.

### ❖ बचतीची पध्दत :

१. सर्व सभासद महिलांच्या बचतीची रक्कम समान असते.
२. दरमहा बचतगटाने ठरविलेल्या तारखेला, ठरविलेल्या ठिकाणी, ठरविलेल्या वेळी एकत्रित येऊन आपआपली बचतीची रक्कम जमा करतात.
३. महिला बचत गटाच्या सभासद महिलांनी दरमहा गटाच्या बैठकीला उपस्थित राहणे अनिवार्य असते.
४. प्रत्येक सभासद महिलेने बैठकीला येताना आपल्या जवळचे कार्ड आणि पासबुक आणणे आवश्यक असते. त्यावर जमा केलेल्या बचत रक्कमेची नोंद करुन घ्यावी लागते.
५. बैठकीच्या दिवशी गट प्रमुख (अध्यक्ष) जमा झालेल्या बचत रकमेचा तपशिल सर्व महिला सभासदांना समजावून सांगतात.

६. महिला बचत गटात सहभागी झाल्यापासून पहिले सहा महिने फक्त बचत करावी लागते. सातव्या महिन्यापासून कर्जा देण्यास सुरुवात होते.

७. जमा झालेली रकम नजीकच्या राष्ट्रीयकृत सहकारी किंवा शेडुल्ड बॅकेत बचतगटाच्या नांवाने ठेवली जाते. एकुण बचतीच्या ७५ टक्के रकम बॅकेत ठेवावी लागते आणि २५ टक्के रक्कम नियुक्त गटप्रमुखाकडे तातडीच्या गरजा भागविण्यासाठी ठेवली जाते.

### ❖ <u>कर्ज देण्याची पध्दत</u> :

१. ज्या सभासदाने सहा महिने नियमितपणे बचत रक्कम जमा केली आहे अशाच महिला सभासदाला कर्ज मिळते.

२. कर्ज घेऊ इच्छिणाऱ्या महिला सभासदाने गटप्रमुखाकडे लेखी कर्ज मागणी अर्ज करावा लागतो.

३. अर्जदार महिलेस कर्ज दयायचे की नाही याचा अंतिम निर्णय सर्व सभासद महिला घेतात.

४. कर्जाच्या अर्जासोबत दोन जामिनदार (बचत गटातील दोन सभासद महिला) देणे बंधनकारक आहे.

५. बचतीच्या तिप्पट किंवा अर्जदार व जामीनदार यांच्या बचतीइतकी रक्कम कर्ज म्हणून दिले जाते.

६. कर्जावरील व्याज दरमहा वसूल केले जाते.

७. कर्जाचा हप्ता आणि व्याज वेळेवर न भरणाऱ्या महिला सभासदांना ठरलेला दंड आकारला जातो.

८. महिला सभासदाच्या गरजेनुसार कर्जाचा विनियोग केला जातो.

९. प्रत्येक बचत गट विद्यमान परिस्थितीचा विचार करुन व्याजादर ठरवितो उदा. दरमहा दर शेकडा २ रु.

१०. बचत गटाचा एकूण नफा बचतीच्या प्रमाणात सर्व सभासद महिलांना समान प्रमाणात वाटून दिला जातो.

### ❖ <u>सभासदत्व रदद् करण्याविषयी</u> :

१. ज्या महिला सभासदाला आपले सभासदत्व रदद करावयाचे आहे तिने बचत गटाकडे लेखी अर्ज करणे आवश्यक आहे.

२. सभासदत्व रदद करण्याअगोदर संबधीत महिलेने घेतलेले कर्ज, व्याज इत्यादीची रकमांची पूर्ण परतफेड करणे आवश्यक असते.

३. सभासदत्व रदद झाल्यानंतर स्वत: चे नोंदणी कार्ड गटाकडे जमा करावे लागते.

४. सभासदत्व रदद केल्यांनतर एक महिन्याने जमा रक्कम व्याजासह त्या महिलेस परत मिळते.

५. सतत चार महिने वेळेवर उपस्थित न राहणाऱ्या आणि बचत जमा न करणाऱ्या महिला सभासदांचे सभासदत्व रदद केले जाते.

## ❖ बचतगट उपक्रमामध्ये स्वयंसेवी संस्थाची भूमिका :—

१. महिलांना बचतगटाचे महत्व पटवून देणे.
२. महिला बचतगट परिणामकारकपणे चालविण्यासाठी लागणाऱ्या कौशल्याची जाणीव करुन देणे.
३. महिला बचतगट गावात स्थापन करण्यासाठी महिलांना प्रेरित करणे.
४. स्थानिक महिला मंडळात महिलांच्या सक्रीय सहभागाव्दारे त्यांच्या बचतगटांची शक्ती वाढण्यास प्रोत्साहान देणे.
५. विविध गांवात विविध ठिकाणी महिला बचतगटांचे जाळे निर्माण करणे.
६. अनेक महिला महामंडळ/संघ/बॅंका/संलग्न संस्था यांच्याशी महिला बचत गटांशी संपर्क वाढविणे.

## १.७ बचत गट बॅंक संलग्नता आणि कर्जव्यवहार —

मध्यवर्ती बॅंकेच्या स्वतंत्र परिपत्रकानुसार[२३] महिला बचत गटांना बॅंकेत गटाच्या नावे खाते उघडण्यास परवानगी दिलेली आहे. बचत गट स्थापनेनंतर एक दोन बैठका झाल्यावर बॅंकेत गटाच्या नावे खाते उघडता येते. बैठकीत खाते उघडण्यासंबंधी चर्चा करून ठराव मंजूर केल्यानंतर सर्व सदस्य त्यावर सहया करतात. बचतगट आपल्यापैकी तीन सदस्यांना खात्यावर व्यवहार करण्यासाठी अधिकृत ( Authories) करून त्यापैकी दोन सदस्य खात्यावरील अधिकृत व्यवहार करू शकतात. बचत गटाने तयार केलेली नियमावलीची एक प्रत बॅंकेच्या माहितीसाठी दयावी लागते. नियमानुसार हस्ताक्षरातील अर्ज व ठरावाची प्रत बॅंकेत सादर करावे लागते. गटाचे खाते उघडल्यानंतर बॅंकेकडून बचत खाते पासबुक गटाच्या नावे दिले जाते.

महिला बचतगटांना बॅंक शाखा कर्जपुरवठा करतात. कर्ज नेहमी गटाच्या नावाने मंजूर केले जाते. गटामधील कोणत्याही सभासदाच्या व्यक्तीगत नांवावर कर्ज मंजूर केले जात नाही. बचतगटांना बॅंकेकडून कर्जपुरवठा हा बचतगटांनी केलेल्या बचतीशी निगडीत असतो. बचत व कर्ज रक्कमेचे प्रमाण १:१ पासुन १:४ दरम्यान असते. हे प्रमाण बचतगटाच्या मुल्यमापनावर आधारित असते. उदा. चांगला बचतगट, मध्यमगट, कनिष्ट गट कर्ज मंजूरीसाठी साधारणपणे नियम खालील प्रमाणे असतात.

१. महिला बचतगट कमीतकमी सहा महिने सक्रीय अस्तीत्वात असला पाहिजे.
२. महिला बचत गटाचा कारभार लोकशाही पध्दतीने झाला पाहिजे जेणेकरून प्रत्येक सदस्याच्या मतास महत्व आहे असा विश्वास व्यक्त केला पाहिजे.
३. महिला बचत गटाने नियमित बचत आणि स्वत:च्या निधीतून अंतर्गत कर्ज व्यवहार केले असावेत.
४. महिला बचत गटाने योग्य ते रेकॉर्ड आणि हिशोब पारदर्शक ठेवला

पाहिजे.

५. महिला बचत गटाची निर्मिती करण्यामागे परस्पर मदत करण्याची इच्छा आणि संघटित काम करण्याची गरज असल्याचे जाणवले पाहिजे.

❖ **बचत गटाच्या कर्ज व्यवहाराचे बॅकांना होणारा फायदा :—**

१. महिला बचतगटाच्या २० सभासदांना एकच कर्ज खाते उघडावे लागते. जर एखादया शाखेत १०० महिला बचत गटाची खाती असतील तर ती शाखा त्याच्या २००० ग्राहकांना सहजगत्या सेवा पुरवू शकते.

२. महिला गटात बचतीची रक्कम लहान असली तरी बॅकेच्या दृष्टीकोनातून फायदयाची असते. काही कालावधीनंतर यामध्ये वाढ होऊ शकते.

३. कर्जाचे योग्य वितरण देखरेख आणि नियमित परतफेड याबाबत नैतिक बंधन सामुहिक स्वरूपाचे असल्याने बॅकांचे काम कमी होते.

४. कर्जासाठी कागदपत्रे आणि दस्तऐवज सुलभ असल्याने व्यवस्थापन खर्चात कपात होते.

५. कर्जाची वेळेवर आणि खात्रीदायक परतफेड आणि उपलब्ध निधीचा पूर्ण वापर यामुळे बॅकांना एक लाभधारक व्यवसाय प्राप्त होतो.

६. बचतगटाबरोबर बॅकींग व्यवहार केल्याने समाजात वेगळे मानाचे स्थान मिळते. सर्वसामान्य लोकांच्या मनात बॅकेबद्दल सद्भावना वृध्दींगत होते. तसेच गावाचा विकासासोबत बॅकींग व्यवसाय वाढविण्यास मदत होते.

७. उत्तम खातेदार बॅकेच्या प्रगतीचे लक्षण असल्याने बचतगटाच्या माध्यमातून बॅकेला उत्तम व विश्वासू खातेदार मिळाला आहे.

महिला बचतगट योजना अधिक प्रमाणात राबविल्यामुळे बॅकेमध्ये ग्राहकांच्या एकूण संख्येतही लक्षणीय वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे बचतगटातील महिला सभासद आत्मविश्वासने बॅक व्यवहाराची स्वत: माहिती घेऊन स्वत:च्या आणि कुटूंबातील इतर सदस्यांची स्वतंत्र खाती उघडून बॅक सेवेचा लाभ घेत आहेत. बचतगटातील महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी बॅकांचे योगदान मोलाचे आहे.

## १.८ स्वयंसहाय्यता बचत गट हिशोब व्यवस्थापन आणि दस्तऐवज :—

स्वयंसहाय्यता महिला स्वावलंबी गटाचे दोन पैलू आहेत एक म्हणजे महिलांमधील आत्मविश्वास किंवा परस्पर विश्वास, भरवशाच्या पायावर बचतगट उभा आहे. दुसरी गोष्ट म्हणजे असे गट बचत पैशाशी निगडीत आहेत. जेव्हा पैसा देण्याघेण्याचा व्यवहार असतो तेव्हा त्याचे देवाणघेवाणीचे लेखी रेकॉर्ड ठेवणे पैपैचा हिशोब ठेवणे आवश्यक आहे. असा व्यवहार जेवढा पारदर्शक असेल तेवढा विश्वास पक्का आढळून

येतो. अर्थात पैसा माणसाला तोड तोही व जोड तोही. जर जोडून रहायचे असेल तर व्यवहार पारदर्शक लिखित आवश्यक ठरते. आरश्यात बघितल्यावर जो जसा आहे तसाच दिसतो. त्याप्रमाणे गटाचे व्यवहार पाण्यासारखे निर्मळ व स्वच्छ असणे आवश्यक आहे. बचतगटाच्या हिशोबामध्ये कोणत्याही सदस्याची तिळमात्र शंका निर्माण होता कामा नये. यामुळे विश्वास वाढतो सर्वजण एकसंघपणे काम करतात. त्यातूनच प्रत्येकाच्या विकासासाठी एकमेकांची मदत होते. यातूनच अल्पावधीत गट सक्षम होण्यास मदत होते.

## ♣परिशिष्ट १♣

बॅंकेचे नांव : ————————————————————————————

शाखा : ————————————————————————————

तालुका : ————————————————————————————

बचत गटाचे शाखेत खाते उघडताच महिना अखेरची माहिती नियमितपणे दरमहा गटवार पुढीलप्रमाणे तयार करून पाठवावी. बॅंक कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नातून स्थापन झालेल स्वयंसहाय्यता बचत गट

१. बचतगटाचे नांव
२. बचत गटाचा पूर्ण पत्ता
३. गटाच्या अध्यक्षांचे नांव
४. गटाच्या सचिवांचे नांव
५. अध्यक्ष निवडीबाबतचा ठराव क्रमांक व तारीख
६. मासिक सभेची तारीख (उदा दर महिन्याची ५ तारीख)
७. बॅंकेत खाते उघडल्याची तारीख
८. मासिक बचतीची रक्कम
९. बचत गटातील सभासदांची नावे ( १ ते २० सभासद)

१) ——————————————————————————
२) ——————————————————————————
३) ——————————————————————————
४) ——————————————————————————
५) ——————————————————————————
६) ——————————————————————————
७) ——————————————————————————
८) ——————————————————————————
९) ——————————————————————————
१०)——————————————————————————
११)——————————————————————————
१२)——————————————————————————
१३)——————————————————————————
१४)——————————————————————————
१५)——————————————————————————

१६)———————————————————————
१७)———————————————————————
१८)———————————————————————
१९)———————————————————————
२०)———————————————————————

≈≈≈≈≈≈ ≈≈≈≈≈≈ ≈≈≈≈≈≈

## ♣परिशिष्ट :२ ♣

बॅंकेचे नांव : ———————————————————————
शाखा : ———————————————————————
तालुका : ———————————————————————
श्री व्यवस्थापक,
शेती कर्जे/महिला कक्ष, केंद्रीय कार्यालय
———— माहे ——————————— अखेरची माहिती
बॅंक कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतरांकडून स्थापन झालेल्या स्वयंसहाय्यता बचतगटाची माहिती
क्र. ———————————————————————
बचत गटाचे नांव :———————————————————————
सभासद संख्या : ———————————————————————
बचत गटाने जमा केलेला स्वनिधी (लेजर जमेची बाजू लक्षात घ्यावी) —
बॅंकेकडून घेतलेले कर्ज : ———————————————————————
बॅंक कर्ज वसुली : ———————————————————————

महिला बचतगटाचे बॅंकेत बचतखाते उघडण्याचे वेळी घ्यावयाचे ठराव

बॅंकेचे नांव ———————————————————————
दि. ——————— रोजी ——————— येथे ——————— बचत गटाची सभा ——————— यांच्या घरी झाली. त्यावेळी पुढीलप्रमाणे बचत गटाचे सर्व सभासद उपस्थित होते. त्यांची नांवे :—

| सभासदाचे नाव | सही/अंगठा |
|---|---|
| १) ——————————— | ——————— |
| २) ——————————— | ——————— |
| ३) ——————————— | ——————— |
| ४) ——————————— | ——————— |
| ५) ——————————— | ——————— |
| ६) ——————————— | ——————— |
| ७) ——————————— | ——————— |
| ८) ——————————— | ——————— |
| ९) ——————————— | ——————— |
| १०) ——————————— | ——————— |
| ११) ——————————— | ——————— |
| १२) ——————————— | ——————— |

१३) —————————————————————— ———————————

१४) —————————————————————— ———————————

१५) —————————————————————— ———————————

१६) —————————————————————— ———————————

१७) —————————————————————— ———————————

१८) —————————————————————— ———————————

१९) —————————————————————— ———————————

२०) —————————————————————— ———————————

सभेमध्ये सभेचे अध्यक्षस्थान ————————— यांनी स्वीकारले असे ———— यांनी सुचविले त्यास ————————————— यांनी अनुमोदन दिले. त्यानुसार ———————— यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले व सभेला सुरूवात झाली.

विषय क्र. १ : बचत गटाचे नाव ठरविणे

ठराव क्र. १ : बचत गटाचे नांव ———————————————— महिला बचत गट असे ठरविण्यात आले.

सूचक :— ————————————————

अनुमोदक :— ——————————————

विषय क्र. २ : बचत गटाचे पदाधिकारी निवडणे

ठराव क्र. २ : बचत गटाचे अध्यक्ष म्हणून ————————— यांची व उपाध्यक्ष म्हणून ——————————————— याची निवड करण्यात आली

सूचक :— ————————————————

अनुमोदक :— ——————————————

विषय क्र. ३ : बचत गटाच्या व्यवहारासाठी सचिवाची निवड करणे

ठराव क्र. ३ : बचत गटाचे सचिव म्हणून ——————————— यांची निवड करण्यात आली.

सूचक :— ————————————————

अनुमोदक :— ——————————————

विषय क्र. ४ : महिला बचत गटाचे खाते बॅकेत उघडणे व खात्यावर व्यवहाराचे अधिकार देणे

ठराव क्र. ४ : महिला बचत गटाच्या नावाने ——————————— या बॅकेच्या शाखा ——————————— येथे बचत खाते उघडण्यात यावे खात्यावरून रक्कम काढतेवेळी बचत गटाच्या वतीने सहया करण्याचे अधिकार अध्यक्ष —— व सचिव ———————— यांना संयुक्तपणे देण्यात यावेत.

सूचक :— ————————————————

अनुमोदक :— ——————————————

## ♣महिला बचत गटाचे बॅकेत बचतखाते उघडण्यासाठीचा बॅकेस करावयाचा अर्ज ♣

दिनांक

प्रति,
श्री शाखा व्यवस्थापक
बॅकेचे नांव ———————————————————— गांव ——————————
विषय ———————————————— महिला बचत गटाचे खाते आपल्या बॅकेच्या शाखेत उघडण्याबाबत

महोदय,

वरील विषयास अनुसरून आम्ही पुढीलप्रमाणे सहया करणारे ———————— महिला बचत गटाचे सभासद या सर्वानी एकमताने पुढीलप्रमाणे आमच्या प्रतिनिधीची बॅकेतील बचत खात्याचे व्यवहार करण्याची निवड केलेली आहे.

१) श्रीमती/सौ/कु ———————————————————————— (अध्यक्ष)
२) श्रीमती/सौ/कु ———————————————————————— (सचिव)

आमच्या ——————————————— महिला बचत गटाच्या नावे आपल्या बॅकेच्या शाखेत बचत खाते सुरू करून सदर खात्याचे व्यवहार चालविण्या अधिकार आम्ही त्यांना देत आहेत.

सोबत ठरावाची झेरॉक्स प्रत जोडावी

कृपया वरीलप्रमाणे कार्यवाही करून सहकार्य द्यावे ही विनंती.

| सभासदाचे नाव | सही/अंगठा |
|---|---|
| १) ———————————————————— | ——————————— |
| २) ———————————————————— | ——————————— |
| ३) ———————————————————— | ——————————— |
| ४) ———————————————————— | ——————————— |
| ५) ———————————————————— | ——————————— |
| ६) ———————————————————— | ——————————— |
| ७) ———————————————————— | ——————————— |
| ८) ———————————————————— | ——————————— |
| ९) ———————————————————— | ——————————— |
| १०) ———————————————————— | ——————————— |
| ११) ———————————————————— | ——————————— |
| १२) ———————————————————— | ——————————— |
| १३) ———————————————————— | ——————————— |
| १४) ———————————————————— | ——————————— |
| १५) ———————————————————— | ——————————— |
| १६) ———————————————————— | ——————————— |
| १७) ———————————————————— | ——————————— |
| १८) ———————————————————— | ——————————— |
| १९) ———————————————————— | ——————————— |
| २०) ———————————————————— | ——————————— |

## ♣ महिला बचतगटाचे इतिवृत्त पुस्तक ♣

गटाचे नांव —————————————————— महिला बचत गट सभा क्रमांक सभेची तारीख ——————— वेळ ——— स्थळ ——————
एकूण सभासद —— उपस्थित सभासद —— अनुपस्थित सभासद ———
चर्चेचा विषय —————————
घेतलेला निर्णय ——————————

≈≈≈≈≈≈≈ ≈≈≈≈≈≈≈ ≈≈≈≈≈≈≈

## ♣महिला बचत गटातील सभासदाने अर्थसहायासाठी करावयाचा अर्ज♣
## सभासद कर्ज मांगणी अर्ज

प्रति,
अध्यक्षा / सचिव
——————————————————

अर्जदार : — ———————————————

विषय :— कर्ज मिळणेबाबत...

महोदया,

मी श्री / श्रीमती / सौ. ——————————————— रा. —————— ता. मिरज जि. सांगली आपल्या ——————————— स्वयंसहाय्यता महिला बचत गटाची सभासद असून सभासद क्रमांक आहे. मला ——————————या कारणासाठी गटाकडून आर्थिक सहाय्याची गरज आहे. तरी मला रक्कम रू ————— (अक्षरी —————————— ) मिळावे. ही नम्र विनंती.

आपली विश्वासू

≈≈≈≈≈≈≈ ≈≈≈≈≈≈≈ ≈≈≈≈≈≈≈

## ♣ आर्थिक सहाय्य मंजूरी ♣

श्रीमती / श्री / सौ.—————————————————— सभासद क्रमांक गटाच्या वतीने आर्थिक सहाय्य खालील अटीवर मंजूर करण्यात आले. मंजूर रक्कम रू ————————— (अक्षरी —————————)

१) हप्ता मासिक राहील. ———————
२) हप्ता रू —————————— राहील.
३) आर्थिक सेवा शुल्क दरमहा रू —————नियमित भरावे लागेल.
४) इतर अटी

गट प्रमुख सचिव

## ♣वचनचिठ्ठी ♣

मी श्रीमती/श्री./सौ.—————————————— वय. वर्षे व्यवसाय ———————— राहणार ———————— गांव ——— तालुका ——————— जिल्हा ————————
———————————————— या कारणासाठी गटाकडून आर्थिक सहाय्य म्हणून रू ——————— (अक्षरी ——————— ) फक्त घेत आहे. या वचन चिठ्ठीव्दारे वचन देतो की, सदरची रक्कम मी रू —————— च्या समान मासिक हप्त्याने परतफेड करीन. सोबत आर्थिक सहाय्य सेवा शुल्क दरमहा रू——— नियमित शेवटपर्यंत भरत राहीन. वचनपूर्ती नंतरच सदर चिठ्ठी रदद होईल.

एखादया प्रसंगी मी ही रक्कम परत करण्यात अयशस्वी झालो, तर गटाने माइया बचतीतून व वस्तू विक्रीतून, मूळ रक्कम व सेवाशुल्क वसूल करावे, त्यानंतर बाकी येणे रक्कमेच्या बाबतीत व त्यासाठी लागणाऱ्या इतर खर्चाच्या वसूलीसाठी कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकारी गटाला राहील. याची मला जाणीव असून, ते मला मान्य आहे.

सबब ही वचनचिठ्ठी समजून उमजून स्वेच्छेने मी सही करून देत आहे.

तारीख

ठिकाण सही (अंगठा) (साक्षीदार सही/ अंगठा/नांव)

## ♣ जामीनपात्र ♣

जामीन तयारी पत्रातील माहिती आधारे मी श्रीमती/सौ/श्री/ ——— ———————————————— यांच्या अर्थ सहाय्यास जामीन राहत आहे. वरील नमूद केलेप्रमाणे मी त्यांचे आर्थिक सहाय्य परतफेडीची जबाबदारी वैयक्तिक व सही मालमत्तेवर अर्थसहाय्य वसूलीसाठी पूर्ण अधिकार राहील.

सबब हे जामीनपत्र स्वेच्छेने समजून उमजून लिहून देत आहे.

१ जामीनदाराचे नांव(पति/वडील) ———————————— सही ———
सभासद क्रमांक

२ जामीनदारांचे नांव(गटातील एक सदस्या) ———————— सही ——
सभासद क्रमांक

## ♣ स्वयंसहाय्यता बचत गटाचा मासिक ताळेबंद ♣

गटाचे नांव :—

पत्ता :—

फोन नं.

दिनांक :— — —२० ते — —२०

| अ. नं. | नाव | दिनांक | घेतलेले कर्ज | जमा रक्कम | येणे बाकी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |
| ७ | | | | | | |
| ८ | | | | | | |
| ९ | | | | | | |
| १० | | | | | | |
| ११ | | | | | | |
| १२ | | | | | | |
| १३ | | | | | | |
| १४ | | | | | | |
| १५ | | | | | | |
| १६ | | | | | | |
| १७ | | | | | | |
| १८ | | | | | | |
| १९ | | | | | | |
| २० | | | | | | |

## ♣ बॅक कर्ज मागणी अर्ज ♣

दिनांक

प्रति,
मा. शाखाधिकारी,
————————————————
————————————————

**विषय :— अर्थ सहाय्य मिळणेबाबत....**
**अर्जदार :— गटाचे नांव ———————————**

स. न. वि. वि.

वरील विषयास अनुसरून आपल्या बॅकेकडे विनंती अर्ज करतो की, आमचा वरील ————————————— महिला बचत गट कार्यरत असून, दरमहा जमा झालेली बचत आम्ही सेव्हिंग खात्यात (खाते नं.                          ) मध्ये भरत आहोत. तसेच जमा झालेल्या बचत रकमेमधून महिलांच्या घरगुती कामासाठी गरजेनुसार कर्ज वाटप करत आहोत. परंतु महिलांची कर्ज मागणी ही जास्त असल्याने आमच्या बचत गटास रक्कम रूपये ———— ( रूपये ———————————मात्र) इतके अर्थसहाय्य मिळणेबद्दल विनंती आहे.

कळावे.

आपले,

सोबत
१. बचत गटाची माहिती
२. कर्ज मागणी व सहयांचा अधिकाराचा ठराव.

≈≈≈≈≈≈ ≈≈≈≈≈≈ ≈≈≈≈≈≈

## ♣ कार्य वृत्तांत (ठराव) ♣

———————— महिला बचत गट ———————————— या गटाची दिनांक ——————— वार ————रोजी दुपारी/सांयकाळी ———— वाजता बैठक सौ. ————————————————— यांचे घरी झाली. त्यावेळी खालील महिला उपस्थित होत्या. व पुढील विषयांवर चर्चा करण्यात आली आणि ठराव मंजूर करणेत आले.

**विषय कं. १ : मागील सभेचे इतिवृत्त वाचन**

**ठराव कं १ :** मागील सभेचे इतिवृत्त सौ. ————————— यांनी वाचून दाखविले. त्यावर चर्चा होउन इतिवृत्त कायम करणेत आले.

**सूचक** ————————————————————
**अनुमोदक** ——————————————————

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्रं. २ : बॅकेकडून अर्थसहाय्य मागणी करणे व सहयांचे अधिकार देणेबाबत...**

**ठराव क्रं २ :** ———————————————— महिला बचत गटाचे सेव्हिंग खाते येथील ———————————— शाखा —————————— मध्ये असून जमा झालेली बचत ही सेव्हिंग खात्यावर भरली जाते व त्यातून कर्ज वाटप केले जाते. परंतु बचतीची रक्कम कर्ज वाटपाकरिता अपुरी पडते. त्यासाठी बॅकेकडून रक्कम रू ————————( रूपये ————————————————
मात्र) कर्ज (अथसहाय्य) मागणीसाठी अर्ज करण्यात यावा व कर्ज मागणी अर्जावर व बॅक कागदपत्रांवर व चेकवर महिला बचत गटातर्फे अध्यक्षा/गट प्रमुख सौ —————————— व सचिव सौ. ————————या दोघींना सहया करण्याकरता अधिकार देणेत यावेत असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**सूचक** ————————————————

**अनुमोदक** ————————————————

**ठराव सर्वानुमते मंजूर**

≈≈≈≈≈≈≈≈ ≈≈≈≈≈≈≈≈ ≈≈≈≈≈≈≈≈

**♣ताळेबंदपत्रक व नफातोटापत्रक♣**

**गटाचे नांव :** ————————————————————————

**दि. / / अखेरचा गटाचा ताळेबंद**

| जमा | नावे |
|---|---|
| १) गटाची एकूण बचत रू | १) रोख शिल्लक |
| २) बॅकेचे देणे अर्थसहाय्य | २) बॅकेतील शिल्लक |
| ३) केंद्र/गट यांचेकडील देणे आर्थिक सहाय्य | ३) सभासदाना येणे कर्ज |
| ४) बचत गटाचा नफा | ४) गटाना येणे अर्थसहाय्य |
| अ) मागील नफा | |
| ब) चालू नफा | |
| | |
| मिळालेला नफा = सेवा शुल्क + दंड + व्याज =<br>यातून उणे= दिलेले सेवाशुल्क +दंड+<br>व्याज + इतर खर्च | |

सचिवाची सही गटप्रमुखाची सही

## ♣बॅक कर्ज प्रकरणाचा तपशील♣

दिनांक

रक्कम रू

१) गटाचे नांव : ————————————————————————

२) पत्ता—गाव ———— तालुका ————— जिल्हा —————

३) गट स्थापनेची तारीख / /

४) मुख्यप्रवर्तकाचे नांव : ——————————

५) सभासदाची संख्या : ——————————

६) प्रत्येक सदस्याची मासिक बचत ——————————

७) मासिक बचत न ठेवल्यास दंड ——————————

८) आत्तापर्यंत जमा झालेली बचत ——————————

९) हात शिल्लक/बॅकेत शिल्लक ——————————

१०) कर्ज कोणत्या कारणासाठी दिले जाते ——————————

११) किती सभासदांनी कर्ज घेतले आहे ——————————

१२) प्रत्येकी —— कमीत कमी कर्ज —— जास्तीत जास्त ————

१३) आत्तापर्यत दिलेले कर्ज ——————————

१४) कर्जाची येणे बाकी सभासदांकडून ——————————

१५) थकबाकी रक्कम ——————————

१६) थकबाकी असलेले सभासद, केव्हापासून थकबाकी आहे, रक्कम किती (स्वतंत्र यादी जोडावी.

१७) परतफेडीचा कालावधी किती: कमीत कमी — जास्तीत जास्त ——

१८) व्याजाचा दर ——————————

१९) थकबाकीवर दंड, व्याज ——————————

२०) बॅकेकडून किती कर्ज हवे आहे. ——————————

त्याला आधार काय? ——————————

२१) बॅकेतून कितीजणांना कर्ज देणार —— संख्या —— रक्कम ———

कारणे : ————————————————————————————

२२) तेरीज ताळेबंद व नफा—तोटापत्रके सोबत जोडावीत.

### १.९ ग्रामीण महिलांमधील प्रेरणा, प्रोत्साहन स्वयंसहाय्यता बचतगट :—

राणी लक्ष्मीबाईनां झांशी की राणी म्हणून ओळखले जाते. दिडशे वर्षानंतरही[२४] या महान महिलेची आठवण आजही सर्वाना होते. राणी लक्ष्मीबाईच्या झुंजार वृत्तीची आज जास्त गरज फक्त महिलांनाच नव्हे तर सर्वच समाजाला आहे. त्यामुळे झांशी की राणी या फक्त महिलांचे आदर्श नाहीत तर साऱ्या समाजाच्या दृष्टीने आदर्श आहेत. महिलांचे प्रश्न म्हटले की, त्यांच्यावरील अन्याय, अत्याचाराबरोबर कितीतरी प्रश्न महत्वाचे आहेत. अत्याचारा पलीकडे भारतीय महिलांनी जगाच्या नकाशावर आपला ठसा उमटवला आहे. देशाच्या आर्थिक विकासाचे नेहमीच कौतुक होते. पण त्यात खेडयापाडयातील महिला बचत गटामुळे स्वाभीमानाने बोलणाऱ्या महिलांचे योगदान आहे हे विसरून चालणार नाही. देशातील महिलांच्या सन्मानाच्या रक्षणाची त्यांना पुढे जाऊ देण्याची आणि त्यांच्या हक्काची पूर्तता करण्याची जबाबदारी सर्वावर आहे.

महिलांच्या प्रश्नांचा विचार करतांना शहरी महिलांचे व ग्रामीण महिलांचे प्रश्न वेगळे केले पाहिजेत. आज खरी गरज आहे ग्रामीण महिलांच्या श्रमांना मान्यता देण्याची. ग्रामीण भागात महिला बोलक्या झाल्या आहेत. पंचायत राज्य व्यवस्थेमुळे व महिला सबलीकरणामुळे स्थानिक प्रशासनात महिलांचा सहभाग वाढलेला आहे. बचतगट चळवळीमुळे महिलांचे आत्मविश्वासाने उभारी घेतली आहे. परिणामी एखादया शासकीय योजनांचा, ग्रामीण विकासाच्या प्रश्नांचा नेमका वेध घेण्याचे सामर्थ्य सध्या स्त्री शक्तीमध्ये दिसून येत आहे. पण तरीही लोकसभेत महिला विधेयक मंजूर करताना जो विरोध होतो तो विसरता येणार नाही. आज प्रत्येक शंभर पुरुषामागे महिलांचे प्रमाण कमी आहे. मुलीचा जन्म होऊ द्यायचा नाही अशा प्रवृत्ती समाजात आहे. महिलांच्या आरोग्याची समस्या भिषण आहे. शहरी व ग्रामीण रोजगारीचा विचार केल्यास शहरापेक्षा तिपटीने, ग्रामीण महिलांचा रोजगारात सहभाग आहे. पण प्रामुख्याने हा रोजगार अंगमेहनती कामातच अधिक आहे. शेती क्षेत्रात आज सर्वाधिक काम महिलाच करतात. देशभरातील सर्वेक्षण असे सांगते की, ८० टक्के[२५] महिला शेतात राबतात. शेतात महिला आहेत म्हणुनच प्रत्यक्ष उत्पादनाने आज एवढा मोठा पल्ला गाठल्याचे मानले जाते. पुरुषांच्या अडीचपट मेहनत शेतात महिला करताना दिसतात. त्यामुळेच देशाच्या शेतीच्या उर्जितावस्थेतील महिलांचे योगदानही खुलेपणाने मान्य करायला हवे. पण त्यापलीकडे जाऊन कायदेही महिलांच्या बाजूने होणे गरजेचे आहे. मळणी, खुरपणी, वेचणी अशा कामामध्ये तर महिला अग्रभागी आहेत. दूध उद्योगात महिलांची मक्तेदारीच आहे. दुध काढणे, चारा घालणे, गुराढोरांची निगराणी, दुध संकलण ही सर्व कामे महिला करत असली तरी प्रत्यक्षात जबाबदारीने अर्थिक निर्णय घेण्याचे अधिकार महिलांना नाहीत. ही विसंगती आहे. आज मत्सशेती, सेंद्रिय, वनशेती, शेतीपुरक व्यवसायातील महिलांचे प्रमाण पुरुषापेक्षा अधिक आहे. पण समाजातील त्यांचे स्थान तरी डळमळीत आहे. बचत गटचळवळीमुळे

महिलांमध्ये चेतना आल्याचे दिसते. आर्थिक व्यवहारातही त्या अधिक तरबेज होत आहेत. शेतीमधील अनेक संशोधनातही स्त्रीयांचा पुढाकार अधिक आहे. एका बाजूला संसाराचा गाढा ओढतानाच शिवारातील सुबत्ता राखण्याचे कामही महिलांच करत आहेत. ग्रामविकासातील बाटलीच्या अडथळयास आडवे करण्याचे सामर्थ्यही महिलाच दाखवत असल्याने झांशी की राणी मधील ही झुंझार वृत्ती जोपासण्यास साऱ्यांची मदत झाली तर देशाला तारण्यासाठी महिला संघटनांची मदतच होणार आहे. याची सुरूवात महिला बचत गटांतून होताना दिसते आहे.

**१.१० सारांश** : थोडक्यात वेद काळात महिलांना वेद अध्यापन व अध्यायन कला शिक्षण घेण्याचा अधिकार होता. त्यामुळे वेद कालखंड आणि गौतम बुध्दाच्या काळाचा अपवाद वगळता प्राचीन काळापासून ते १९ व्या शतकापर्यंत हिंदू धर्म व्यवस्था अधिक प्रमाणात प्रचलित होती. अशा व्यवस्थेमध्ये महिलांना दुय्यम स्थान होते. महिलांना भौतिक व्यवस्थेमध्ये समाविष्ठ केल्याने महिलांच्या आचार विचारावर अनेक बंधने होती. तसेच या व्यवस्थेविरोधात एखादी महिला वर्तन केली तर समाज तिला बहिष्कृत करत होता. अशा महिलांना पुरूषापासून मुक्ती मिळविण्यासाठी जोतिबा फुल्यापासून आजपर्यंत महिलावादी विचारांचे प्रामाणिक प्रयत्न झालेले आहेत. असा कृतिशील प्रयत्न ग्रामीण महिलासाठी १९९० शतकापासून शासनानी हाती घेतला आहे. याचाच एक भाग स्वयंसहाय्यता महिला बचत गट आहे. ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वयप्रेरित रोजगार निर्मिती करणे हा या योजनेचा उद्देश आहे. सध्या लाखो ग्रामीण महिला स्वंयप्रेरित या योजनेमध्ये सहभागी होत आहेत. त्यामुळे त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणास मदत होत आहे.

## <u>संदर्भ सूची</u>

१. चौधरी राजेश — महिला बचत गट हस्तपुस्तिका
प्रथम आवृत्ती — १५ ऑगस्ट २००५
व्दितीय आवृत्ती — डिसेंबर २००६
तृतीय आवृत्ती — जानेवारी २००७
चतुर्थ आवृत्ती — एप्रिल २००७
पाचवी आवृत्ती — २००८
प्रकाशक — १/१७ आनंदनगर,
पौड रोड, पुणे ४११०३८

१ प्रा. कुलकर्णी विजय — बचतनामा
शहाजानी चैतन्य प्रकाशन, पुणे
राजगुरुनगर २०००

३. डॉ घाणेकर बि.वि. — स्वयंसहाय्यता समुह बचतगट प्रकाशन मुद्रणालय, १४११ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०, २००६

४. डॉ. गोटे शुभांगी — महिला सबलीकरण स्वरूप व समस्या वरद पब्लिकेशन, एन १/५ सारा प्राईड, रणजीतनगर, औरगांबाद ४१३००५ पुणे ३८ पाचवी आवृत्ती २००८

६. थेकेकरा टी. एफ. — स्वयंसहाय्यता बचतगट प्रशिक्षण कृती आराखडा प्रकाशक व्यवस्थापकीय संचालक, म. वि. म. मर्यादित वांद्रे पुर्व मुंबई.

५. श्री जाधव टी. एस — स्वयंसहाय्यता बचतगट गरिबांची बॅक व्यवस्थापक— मायक्रोफायनान्स विभाग लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि. मुख्य कार्यालय लातूर ४१३५१२

८. प्रा. मुलाणी एम. यू. — महिला स्वयंसहाय्यता बचतगट डायमंड पब्लिकेशन, पुणे डिसे.०६

७. देशपांडे मेघा — भारतीय स्वयंसहाय्यता गट — पार्श्वभूमी व वाटचाल अर्थसंवाद खंड २१ अंक ४ जानेवारी, मार्च २००६ पान नं. ३७०

९ रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया — परिपत्रक दि. १०/२/१९९८

११. साने गिता — भारतीय स्त्रीजीवन, मौज प्रकाशन गृह मुंबई १९८६.

१०. वैद्य मोहन — महिला बचतगट हस्तपुस्तिका प्रकाशन विश्व, पुणे ३८

१३ Datar Chhaya, 2003
Status of Women in Maharashtra An Update unit for Women’s Studies, Tata Institute of Social Sciences, Mumbai.

१४ Desai Neera & Krishnaraj Maithreyi 1990
Women and Society in India, Ajanta Publications, Delhi.

१२ Borain M. P. Empowerment of Rural Women Deterrents and Determinats Concept Publishing Company, New Delhi 180059
First Published 2008

१५. Dr. Desai Sambhaji N. - Theory and Practice of Macro Finance
Published by Registrar, Shivaji University, Kolhapur, August 2005

१७ Jain Devaki
Indian Women (Edited) Publications Division, New Delhi 1975

२१ Suguna- Employment & Rural women through self help Groups- Discovery publishing House 4831/24 Absuri Road Prahhad Street Parya Gunj New Delhi- 11002 (India) 2006

१८ Mukhopdhay Dr. Lipi.
Tribal Women in Development, publication Division, New Delhi 2002

१९ Pande Sunita
Women's Subordination (Origins) Kanak Publication New Delhi 1989

२४ Varma S. B. 2005
Status of Women in Modern India, Deep and Deep Publication Pvt. Ltd., New Delhi.

२० Sengupta Padmini 1974
The Story of Women of India, Indian Book Company, Delhi.

२३ Upadhya H.C. 1991
Status of Women in India, Anmol Publications, New Delhi.

२२ Studies on self help Groups of the Rural poor- National Bank for Agriculture and Rural Development Bombay 1989

१६ Harish Ashok Kumar - Women Power Status of Women in India, Pub. Gian Publishing house, New Delhi. 1991

# प्रकरण २ रे
# साहित्याचा परामर्श

## २.१ प्रस्तावना

भारतात आर्थिक व समाज व्यवस्थेत महिलांना दुय्यम स्थान असून त्या विद्यमान स्थितितही संधी वंचित अर्थवंचित सत्तावंचित, निर्णय आणि प्रतिष्ठा वंचित राहीलेल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आलेले असले तरी अपेक्षित यश प्राप्त झालेले नाही. महीला समस्याचे मूळ आर्थिक असल्याने त्या समस्याचे उच्चाटन करून आर्थिक सुबत्ता प्राप्त झाली तर महीलांना दर्जा व स्थान प्राप्त होईल. महीलांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनवून समाजात मानासन्मान व गुणांना मान देण्यासाठी रोजगाराचे नवे दालन म्हणून स्वयंसहाय्यता बचत गटाच्या पर्वाचा प्रारंभ झाला आहे. सध्यस्थितीत याची प्रचिती येत आहे. त्यामुळे महीलांचे आर्थिक व सामाजिक परिवर्तन होत असून अर्थव्यवस्थेत नवी विचारप्रणाली, नवी व्यवस्था, नवी मानसिकता घडविण्यात स्वयंसहाय्यता बचत गटाचे महत्वपूर्ण योगदान आहे.

सांगली जिल्हात दहा तालुक्यातील महीलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाच्या योगदानाचा शोध आणि सद्यस्थितीचा आढावा घेऊन स्वयंसहाय्यता बचत गटात महीला समाविष्ठ झाल्याने होणाऱ्या लाभांचा व त्याचा समस्या व उपाययोजना इ. अभ्यास केला आहे. संशोधनामध्ये फक्त महीला स्वयंसहाय्यता बचतगट घेतलेले आहेत. आपल्या समाजात विविधता आहे. या विविधतेमध्ये एकता आहे. एकता हे आपले बळ आहे. महिला बचत गटांनी एकता निर्माण केली आहे हेच खरे आर्थिक विकासाचे सामर्थ्य आहे.

जगातील जवळजवळ सर्वच देशांना कमी जास्त प्रमाणात बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे. उपलब्ध आकडेवारीवरून असे दिसून येते की, १० वर्षापूर्वी म्हणजे १९९८–९९[१] च्या जागतिक रोजगार अहवालानुसार १९९७ मध्ये अंदाजीत ६ अब्ज लोकसंख्येपैकी ३ अब्ज लोकसंख्येचा समावेश श्रमशक्तीत होता. १६० दशलक्ष लोक पूर्णपणे बेकार होते. १५ ते २४ वयोगटातील ६० दशलक्ष लोक रोजगाराच्या शोधात होते. विशेष म्हणजे या काळात कुशल व अकुशल मजुरांची अर्थव्यवस्थेतील मागणी मर्यादित होती. २००५ मधील सांख्यिकी लक्षात घेता असे दिसते की, या वर्षात जगातील १९१.८ दशलक्ष लोक बेकार होते. एकूण श्रमशक्ती मधील बेरोजगारीचा दर ६.३ टक्के होता. १.३७ अब्ज कामगारांचे उत्पन्न प्रती दिन २ यू. एस डॉलरपेक्षा देखील कमी होते तर ५२०.१ दशलक्ष कामगारांचे प्रती दिन उत्पन्न १ डॉलर पेक्षाही कमी होते. एकूण श्रमशक्तीपैकी शेती उदयोग व सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे जागतिक स्तरावरील प्रमाण अनुक्रमे ४०.१ टक्के व २१ टक्के व ३८.९ टक्के होते तर हेच प्रमाण भारतात अनुक्रमे ५८.५

टक्के, १८.१ टक्के व २३.४ टक्के होते यावरून भारतातील शेती क्षेत्रातील पर्यायाने ग्रामीण भागातील श्रमिकांच्या संख्येची स्पष्ट कल्पना येते.

भारतातील बेरोजगारीची समस्या सोडविण्यासंदर्भात दृष्टिकोणामध्ये वेळोवेळी बदल झालेले आहेत. नियोजन काळातील सुरूवातीच्या वर्षामध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या दरापेक्षा रोजगार वाढीचा दर फार कमी होता. भारतात पडलेल्या तीव्र दुष्काळामध्ये तसेच काही वर्षाच्या मान्सूनच्या अपयशामुळे अर्थव्यवस्थेत मोठया प्रमाणात बेरोजगारीची परिस्थिती निर्माण झाली होती. अशा काळात शासनाकडून रोजगार निर्मितीच्या विविध योजना सुरू केल्या गेल्या तसेच जुन्या योजनांची पुनर्बांधणी केली गेली. अशा प्रकारे रोजगार निर्मिती हे ध्येय ठेवून त्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले सत्तरच्या आणि ऐशीच्या दशकात एनआरपी व आरएलजीपी सारख्या रोजगार योजना सुरू करण्यात आल्या. सार्वजनिक कामांना प्राधान्य देवून त्याव्दारे गरिबांच्या स्वयंरोजगार व संयोजक वृत्तीला चालना देण्यात आली. साक्षर लोकामधील वाढत चालेली बेकारी हा देखील अलिकडील काळातील ज्वंलत प्रश्न निर्माण झाला आहे.

भारतातील वाढत्या दारिद्रयाचे व बेरोजगारीचे प्रमाण लक्षात घेवून शासनामार्फत गेल्या कित्येक वर्षापासून विविध योजना राबविल्या जात आहेत. ज्यामुळे रोजगार निर्मिती, उत्पादक संपत्ती, तांत्रिक व संयोजन कौशल्यातील वाढ आणि गरीबांच्या उत्पन्न पातळीतील वाढ घडून येण्यास मदत होत आहे. शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या व आलेल्या काही प्रमुख रोजगार योजनांचा उल्लेख या ठिकाणी करणे गरजेचे आहे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना[२], ग्रामीण भूमीहीन रोजगार हमी योजना, जवाहर रोजगार योजना (१९८९) आश्वासित रोजगार योजना (१९९५) जवाहर ग्राम समृध्दी योजना (१९९९) संपूर्ण ग्रामीण योजना (२००२) यासारख्या विविध योजनांचा समावेश होतो स्वातंत्रोत्तर ग्रामीण व शहरी भागासाठी ज्याप्रमाणे केद्रांमार्फत अनेक रोजगार योजना सुरू केल्या गेल्या. तसेच राज्य शासनामार्फत देखील विविध योजना सुरू केल्या गेल्या या सर्व रोजगार योजनांचा कळस म्हणजे केंद्राने सुरू केलेला राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ हा होय अलीकडे या कायदयाचे महात्मा गांधीच्या नावाने नामकरण केलेले आहे. या कायद्यान्वये ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वर्षातून किमान १०० दिवस रोजगार देण्याचे आश्वासन शासनाने दिलेले आहे या कायद्याव्दारे मागेल त्याला काम दिले जाते. जगातील अशा प्रकारे मागेल त्याला काम पुरवणारी योजना राबविणारा भारत हा बहुधा एकमेव देश असावा या कायदयाव्दारे ७ डिसेंबर २०१० पर्यंत ४.१ कोटी[३] ग्रामीण कुटुंबाना रोजगार पुरविण्यात आला होता. या योजनेत अनुसूचित जाती १ जमातीचा सहभाग ४७ टक्के नी वाढला आहे. योजनेच्या प्रारंभापासून शासनाने या योजनेवर १२,८६१ कोटी रू खर्च केले आहेत. यापैकी ७,४८,६७७ कोटी रू फक्त वेतनावर खर्च

झाले आहेत. अशाच प्रकारची फक्त महिलाना रोजगार निर्माण करण्याची संधी एसएचजी मधून मिळत आहे.

अशा प्रकारे स्वातंत्रोत्तर काळातील भारताची रोजगार स्थिती व त्या अनुषंगाने शासकीय धोरणाचा विचार केला असता असे लक्षात येते की, विकसीत देशांच्या तुलनेत भारत रोजगाराबरोबरच श्रमशक्तीचे विविध पैलू पिछाडीवर आहेत परंतु ही बेरोजगारांची समस्या सोडविण्यासाठी सुरूवातीपासूनच शासन प्रयत्नशील आहे. तरीदेखील या प्रयत्नामध्ये अजूनदेखील योग्य दिशेने वाढ होणे गरजेचे आहे. भारतीय आर्थिक नियोजनाचे बेरोजगारीचा दर सातत्याने कमी करणे हे एक प्रमुख उदिदष्ट आहे. काम करण्याची इच्छा व पात्रता असलेल्या प्रत्येक व्यक्तीला रोजगार मिळावा हे प्रत्येक देशाचे आर्थिक सामाजिक राजकीय व सांस्कृतिक उदिदष्ट असते. भारताच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास बेरोजगारीचा प्रश्न हा एक भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील प्रमुख प्रश्न आहे. आजही भारत हा मोठया प्रमाणात शेतीवरच अवलंबून आहे. शेतीमध्ये बेकारीचे हंगामी बेकारीचे प्रमाणे मोठे आहे. जोपर्यंत उदयोग सेवा क्षेत्र व इतर क्षेत्रामध्ये रोजगारांच्या संधी उपलब्ध होत नाही. तसेच ग्रामीण भागाच्या विकासास पूरक अशा नव्या सर्व समावेशक रोजगार योजना निर्माण होत नाहीत तो पर्यंत बेरोजगारीचा प्रश्न सुटणे कठीण आहे. अलीकडेच देशाचे अर्थमंत्री श्री. प्रणव मुखर्जी यांनी असे विधान केले आहे की, देशातील सामाजिक विकास योजनाच्या यशस्वीतेसाठी रोजगार निर्मिती मोठया प्रमाणात केली जाईल वाढती लोकसंख्या, अयोग्य शिक्षण व्यवस्था, भांडवल प्रधान उत्पादन तंत्राचा स्वीकार अशा अनेक कारणांनी भारतात बेरोजगाराची स्थिती गंभीर होत चालली आहे. तेंडूलकर समितीनुसार सन २००५ मध्ये देशातील ४०.७७ टक्के[४] लोक गरीब होते. प्रचंड मोठया प्रमाणात असणाऱ्या बेकारांना वाढत्या वेगाने रोजगार उपलब्ध करून देणे ही प्रमुख गरज आहे. अशा परिस्थितीत जलद विकास दराची गरज लक्षात घेता भांडवल प्रधान उत्पादन तंत्राची का श्रम प्रधान उत्पादन तंत्राची निवड करायची हा अत्यंत महत्वाचा यक्ष प्रश्न नियोजनकारासमोर निर्माण होतो. ज्या उत्पादन तंत्रात भांडवलाच्या तुलनेत श्रमाचा अधिक वापर केला जातो त्याला भांडवल प्रधान उत्पादन तंत्र असे म्हणतात. भारतासारख्या अतिरीक्त लोकसंख्या असलेल्या देशात श्रमप्रधान व भांडवल प्रधान अशा दोन्ही उत्पादनतंत्राचे मिश्रण वापरणे अत्यावश्यक आहे. अशाच प्रकारची वाटचाल महिला बचत गटातून होताना दिसत आहे.

देशामध्ये रोजगार, वेतन व दारिद्रय निर्मूलनासाठी स्वंसयहाय्यता बचत गटाचा उपयोग अधिक होताना दिसतो. महिलामधील जीवनमान सुधारणे व दारिद्रय निर्मूलन यासाठी त्याचे अधिक महत्व असल्याचे दिसते. म्हणून SHG ला विकासाचे नंदनवन म्हटले आहे. यावदारे आर्थिक सेवेची व्यापकता वाढून बहुतांशी ग्रामीण लोकसंख्येला बचत गटाव्दारे (S.H.G.) औपचारीक आर्थिक तत्वाशी जोडले आहे.

नाबार्ड ही (NABARD)[५] भारतामधील सूक्ष्म वित्त पुरवठा करणारी पहिली संस्था आहे. बचत गटाव्दारे सू.वि पुरवठयाचे लोन पसरत आहे. १९९८ मध्ये नाबार्डने सर्व SHG ना बॅकेशी संलग्न केले. १९९८ मधेच नाबार्डने Rural finance programme शी संलग्न होऊन BPL कार्यक्रमास सुरूवात केली. नाबार्डनुसार SHG मध्ये किमान १५ लोक (सभासद) असावेत. ते एकाच सामाजिक व आर्थिक स्तरातील सभासद असावेत. बचत गटातील सदस्यानी नियमित बैठका घेवून पैसे एकत्र करावेत. एकत्र झालेली रक्कम कर्ज रूपाने सदस्यास दिली जावी. वित्ताचे व्यवस्थापनही केले जावे. पैसे एकत्र करून तो बॅकेमध्ये ठेऊन कर्ज घेतले जावे अशा प्रकारे SHG ना बॅक व NGO शासकीय कार्यक्रमातून प्रोत्साहन दिले जाते.

SHG ला भारतामधे कार्यरत होऊन जवळजवळ दशक झाले. NABARD च्या २००५—०६ च्या अहवालानुसार मार्च २००६ अखेर बचत गटाची संख्या २.३ million आहे. व त्यामधील सहभागी महिला सभासदाची संख्या ३२.९८ million इतकी आहे. शिवाय २००६—०७ मध्ये ७.८ लाख नविन बचत गटाची निर्मिती शक्यता आहे. प्रांतवार विचार केल्यास दक्षिणेमधे निम्म्यापेक्षा अधिक बचतगट १२.१ लाख (upto March 2006 ) कार्यरत आहेत.

पूर्वेकडे ३.९ तर मध्य भारतामध्ये १.७ लाख व उत्तर पूर्व ६०००० SHG कार्यरत आहेत. प्राप्त माहितीनुसार बचत गटांचा लोकांच्या सामाजिक आर्थिक जीवनमानावर उपयुक्त परिणाम झालेला दिसतो. अभ्यासकांचे संशोधन बचत गटाशी संबंधित सामाजिक आर्थिक घटनावर प्रकाश टाकणारे आहे. (संख्यात्मक) Structural aspect i.e. बचत गटाचा उददेश उद्योगात सुलभता नेतृत्वाची निवड, संविधानीक पध्दतीने निवड प्रक्रिया इ कार्यक्रमाविषयी म्हणजे बैठका, उपस्थिती, पुनरावृत्ती इ. जबाबदारीची देवाणघेवाण कार्यपध्दती अहवाल यासंबंधी आहे. प्रभावी गट होण्यासाठी आत्मविश्वास, संवाद कौशल्य, सकारात्मक वर्तन, बचत वेतन, भांडवल आणि गटांची निरतरता या गोष्टी महत्वाच्या ठरतात. यामुळे ३१ मार्च २००६पर्यंत २३ लाख बचत गट प्रभावीपणे कार्यरत असल्याचे दिसून येते.

भारतामध्ये बचतगटाचे प्रथम सर्वेक्षण NABARD आणि APRACA ( Asian and pacific Regional Agricultural Credit Association) ने केलेले आहे. हे सर्वेक्षण मर्यादित स्वरूपातील होते व विशेषत: त्यांनी ग्रामीण भागात केले. या सर्व बचत गटाना Self help promoting institutions कडून सहाय व प्रोत्साहन मिळाले होते व यामध्ये बऱ्यापैकी कमकुवत घटकाचा समावेश होताना दिसतो. SHG ना सहाय मिळालेल्या बचत गटानी प्रौढ शिक्षण, आरोग्य शिबीर व प्रयोगशाळा विविध कार्यक्रम राबविले. यामधे लोकांना; Thrift) काटकसरीचे महत्व पटवून देण्यात आले व गरीब लोकांचा समावेशही अधिक असल्याचें दिसते. महिन्याअंती १०—२० रू ची काटकसर करून मी बचत करू शकते गरीब महिलांना ही बचत

सुरक्षित ठेवण्यासाठी योग्य ठिकाण नसते. घरामधे त्याचे नवरे ते इतर कारणासाठी वापरू शकतात व गावामध्ये विश्वासर्ह अशा संस्थेचा अभाव होता. याकरिता Ghosh[6] Women thrift co-operative ही पोकळी भरून काढते. बचतीमुळे सुरक्षितता मिळाली. अशी काही महिलांची भावना निर्माण झाली आहे. कोणत्याही कारणासाठी हाताशी पैसा उपलब्ध राहू शकतो.

Bansal[7] – SHG Bank Linkage programme in India च्या मते गटांची निर्मिती आणि दारिद्रय व मानव विकास दर Human development India ( HDI) याचा काही संबंध नाही. अधिक सूक्ष्म अभ्यासांती असे मत व्यक्त केले आहे की राज्य सबल राष्ट्रीय दारिद्रय सरासरी (२६.१) अशामध्ये बचत गटाची निर्मिती अधिक आहे. महत्वाचे म्हणजे बचत गट बॅंक संलग्नता कार्यक्रमामध्ये SHG चा सहभाग अधिक दिसतो. यावरून बचत गटाच्या वाढीसाठी बॅंकेचे प्रोत्साहन दिसून आले.

Harper[8] “ Promotion of SHG under the SHG Bank Linkage programme in India बचत गटांमध्ये राजकीय लोकांचा हस्तक्षेप दिसून येतो. गट हे राजकीय लोकांचे लक्षच असते असे म्हणावे लागेल. विशेषत: Subsidy अनुदान यावर कार्यालयीन कामकाजावेळी राजकीय दबावामुळे अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात परंतु गट आपापल्या कुवतीप्रमाणे हे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करतात. बरेच (State holder) आधार शोधणारे लोक हे गटांना उपयोगी वाद्य समजतात. त्यांच्या सामाजिक व राजकीय वापराच्या चिंतेत असतात. नाण्याच्या दुसऱ्या बाजूचाही विचार करावा लागतो. म्हणजे आर्थिक पेक्षा सामाजिक उद्‌देशानी होताना दिसते. विकास हा सामाजिक का आर्थिक हे ठरविण्यासाठी योग्य दृष्टी उददेश व त्याकडे जाण्यासाठी क्षमता व मार्गदर्शन याची आवश्यकता आहे. Sinh[९] च्या मते बचत गट या शब्दाव्दारे सर्व वित्तीय (Financial) व आणि (non financal) बिगर वित्तीय गटाचा समावेश होतो. भारतामधे (ASCA) Accumalating Saving and credit Association NGO याचाही समावेश होतो.

Bouman[१०] गटाचा उगम आणि वित्ताचा उगम यावरून बहुसंख्य गटामध्ये फरक करता येतो. काही गटावर बॅंकाचा तर काही वर (DRDA) – District rural development agencies चा प्रभाव दिसतो तसेच गटाची निर्मिती ही वेगवेगळया सामाजिक प्रकल्पातूनही झालेली दिसते. NABARD[1] NABARD SHG Bank linkage programme बचत गटांना बॅंकेशी संलग्न केल्यामुळे स्वयंरोजगाराच्या संधीची जाणीव जनसामान्यत होताना दिसते.

Ditchln[11] NGO in microfinance part present future has classified NGO’s into five categories यामध्ये NGO चे ५ गटात वर्गीकरण केले आहे.

१) Single method replication Network. यामध्ये स्थानिक ही आतंरराष्ट्रीय NGO शी संलग्न असते.

२) Multipurpose cgqmnns’kh; National NGO अंतर्गत सूक्ष्म वित्त पुरवठा केला जातो पण याचा संबंध कोणत्याही family शी औपचारिक संबंध नसतो. Ex CARD in phillppines MYRADA & SEWA in India.

३) Multipurpose National NGOs CARE SAVE the children

४) Microfinance dilicated national NGO या केवळ वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था असतात. यांना आंतरराष्ट्रीय पुरवठा असतो. [PRADAN in India K REP in Kenya]

५) National Localized & Sometimes Community based NGO अशा प्रकारच्या १००० NGO's Registered आहेत व क्वचित यांचा इतर संस्थाशी संबंध असतो.

यावरून NGO म्हणजे सहाय्य करणाऱ्या संस्थेच्या रचनेविषयी अभ्यास होतो. त्याव्दारे त्यांचा सहाय्य करण्या मागचा उददेश दृष्टी व कार्य यांचा अंदाज बांधता येतो.

Ary[१२] Decade of collaboration between government and NGO in Rejasthan NGO व शासन याच्यातील संबंधावर प्रकाश टाकला आहे हे संबंध खालीलप्रकारचे असतात.

१) Schematic असा संबंध हा दाता व उपभोक्ता असा असतो यामध्ये SHG ची भूमिका कंत्राटदारांची असते.

२) Dyadic या संबंधामध्ये प्रकल्प परस्पर सामंजास्याने राबविला जातो NGO चे प्राबल्य असते. अशाच एका प्रबल NGO शी शासनाचे संबंध असतात.

३) Catalylic NGO व शासन एकमेंकाच्या सहकार्याने काम करते. इतर समान घटकास याचा फायदा होतो.

४) Confronational या संबंधामध्ये कार्यापेक्षा लक्षावर लक्ष केंद्रीत असते. SHG Bank Linkage programme हा अशा प्रकारामध्ये मोडतो. अशा प्रकारे NGO चे SHG च्या वाढीसाठी शासनाशी संबधित असते.

Satish[१३] Institutional alleratives for the Promotion of microfinance SHG च्या वाढीसाठी NGO, Bank Government याची भूमिका यांचा अभ्यास आहे.

NGO ने मोठया प्रमाणात गटांची निर्मिती केली आहे. शिवाय ग्रामीण भागातील बॅकानीही गटांची निर्मिती केली आहे. पण गुणात्मकदृष्टया NGO नी तयार केलेले गट हे अधिक प्रभावी आहेत. बॅक कर्मचारीनी बळजबरी व बॅकेचे व्यवहार यामुळे बॅकाकडून गट बनवण्याचे प्रमाण कमी आहे. NGO व बॅक यापेक्षाही शासन ही प्रभावी यंत्रणा आहे. गटाच्या वाढीसाठी प्रयत्न करणे हें जिल्हापूरते मर्यादित राहते. यामध्ये SHG हे अग्रस्थानी आहे. शेवटी असा निष्कर्ष दिला की संख्यात्मक विचार करता अशाच गटास प्रभावी म्हणता येईल जो स्वत: वाढीसाठी प्रयत्न करतो.

MYRADA[१४] Capacity building of self help group यामध्ये Enterpreneurial Leadership व्यवस्थापकीय नेतृत्वावर प्रकाश टाकला आहे. ती सहाय्य करणाऱ्या संस्थेचे योगदान अमान्य करीत नाही. पण नेतृत्वास आणीबाणी किंवा विकासाच्या दृष्टिकोणातून महत्वाची मानले. याची प्रमुख २ कारणे दिली आहेत. यामधील व्यवस्थापकीय नेतृत्वास पूर्णपणे संधी दिलेली नाही किंवा याचे परिक्षण ही केलेले नाही.

दुसरे म्हणजे जर SHG ची चळवळ वाढीस न्यायची असेल तर सहाय करणाऱ्या सदस्यांना मागे टाकता आले पाहिजे SHG हे महिलामधे अधिक कार्यरत असल्यामुळे स्थानिक नेतृत्वास प्राधान्य दिले पाहिजे.

Dhan [१५] NGO हे संलग्न प्रक्रियेमध्ये महत्वाची भूमिका पार पाडते. ही भूमिका आर्थिक नसते. ते गटाना प्रोत्साहित करतात. बचत उसनवारी देवाणघेवाण यांचे अवलोकन करतात. या गटांचे बॅंकेमध्ये खाते उघडले जाते व पुढे त्यास कर्ज मंजूर केले जाते यामध्ये NGO चा प्रत्येक घडामोडीमध्ये सहभाग असू शकतो. गरीब लोकाना बचत गटाचा फायदा होत नाही. किंवा त्यांना यातून वगळले जाते हा राष्ट्रीय चर्चेचा मुददा आहे.

Harper[१६] यांच्या मते गटातील सदस्य इतर गरीब सदस्यांना वगळतात किंवा गरीब लोक स्वत:ला आर्थिक प्रक्रिया पासून दूर ठेवतात किंवा भेदभावामुळेही ते दूर राहतात असे मत व्यक्त केले आहे. Harper Promotion of SHG under the SHG Bank Linkage programme in India' कोणत्या प्रतीचे व कशा प्रकारे कार्य करावे हे बचत गटातील सदस्यांवर अवलंबून असते. यामधे SHG ची भूमिका दुय्यम ठरते. व्यक्ति व त्या व्यक्तिचा कामाकडे पाहण्याचा कल यावर त्या गटाचे काम निर्धारित आहे.

Ray and Vasundhar[१७] womens thrift and credit comperatives in South India यांच्या परिक्षणावरून असे दिसते की, काही महिला गटामध्ये येतात. अगदी पैसाशी गरज असतेच असे नाही पण एकमेंकीच्या संगतीत गटात सहभागी होतात या वरून असे दिसते की फक्त फायदा व्हावा हाच हेतू असतो असं नाही व यामुळे सर्व स्तरातील महिलांचा सहभाग होताना दिसतो.

Org-Marg[१८] सर्व जाती समाजातीतील महिलांचा सहभाग दिसतो जिल्हयानुसार याचे प्रमाण कमी अधिक आहे.

Raju and Ali [१९] Jayalakshmi [२०] Narayan — Jayanath[२१] Kanchaya[२२] प्रत्येक जिल्हयामध्ये जातीची लोकसंख्या सारखी असू शकत नाही. पण अनु जाती जमाती व मागास जातीचा गटामध्ये अधिक समावेश दिसतो विधवा जी गरीबातील गरीब आहे तिचे प्रमाण ९ टक्के आहे. गटाची निर्मिती पूर्वी सदस्यांच्या उत्पन्नाच्या स्थितीचे व जीवनमानाचे परिक्षण केल्यास गटामध्ये गरीबांचा समावेश कमी आहे असे म्हणावे लागते.

Goap[२३] यांच्या मते गरीब लोक म्हणजे गरीबांची त्यांच्या बचतीविषयी खात्री नसते. रोजच्या गरजा पुरवता पुरवता पैसे शिल्लक राहू शकतील या विषयी ते शाशंक असतात. यामुळे त्यांचा सहभाग हा कमी दिसतो. शिवाय इतर सदस्याकडून त्याची अवहेलनाही होऊ शकते. बचत कर्ज परतफेड यासंबंधी भेदभाव होऊ शकतो.

APMAS [२४] च्या मते बॅंका हे सदस्या निवड हे बिनरोध करतात बरेच गट हे पूर्वी अस्तित्वात असलेल्या गटातून निर्माण होतात. काही लोक गरीब आहे किवा नाहीत या तत्वावर गटामध्ये सहभागी होतात असे म्हणता येत

नाही पण काही वेळा NGO च्या प्रमाणापेक्षा अधिक हस्तक्षेपामुळे गटाचे स्वायत्त लोकतांत्रिक कार्य पध्दत संपुष्टात येऊ शकते

Grameean —SHG structural peculiarites — SHG model यातील तुलना केली आहे. त्याच्या मते सदस्यांनी गटाची निर्मिती होते. वाढीसाठी किंवा बॅक सहकार्य करतात किंवा गटाची निर्मितीही पारंपारिक भिशी पध्दतीतून होऊ शकते बॅकेशी किंवा MFI शी संलग्न होण्यामध्ये खाली पायऱ्याचा समावेश असतो त्याला महिने किंवा वर्षही लागू शकतात

- गटातील सभासद नियमित बचत करू लागतात व ती प्रमुखाकडे किंवा बॅकेमधे ठेवता
- काही सदस्य जमा झालेली रक्कम वापरण्यास घेतात व नियोजित व्याजही भरतात.
- गटाच्या नावाने बॅकेमध्ये खाते उघडले जाते नियमित व्यवहाराने कर्ज घेण्यासाठी विश्वासार्य हा निर्माण केला जातो.
- बॅक किंवा MFI गटांच्या नावाने कर्ज देते व ती रक्कम उसनवारीने सभासदांना दिली जाते

वरील सर्व पायऱ्याप्रमाणे काम होतेच असे नाही यामधे बदल होऊ शकतो

तेव्हा कार्यपध्दती प्रमाणे SHG चे काम होतेच परंतु हे स्वतंत्ररित्या करतात. कारण SHG हे सूक्ष्म पेढीच असते. जी बचत किंवा कर्जाचे कामकाज करते किंवा बॅक हे SHG ना Record keeping साठी मदत करते. पण सभासद कर्ज देणे घेण यासंबंधी नियम घालू शकते. SHG ही स्वयशासीत वित्त अधिकार प्राप्त संस्था आहे सभासदाचे बॅकामधून खाते असते पण बॅकेचा सभासदाशी प्रत्यक्ष संबंध नसतो. शिवाय वाढीस मदत करणाऱ्या संस्थाचा मधील SHG हस्तक्षेपाच्या पातळीचा विचार लेखकाने केला आहे हस्तक्षेप न करण्याच्या कारणामध्ये SHG ची रचना कारणीभूत असते

Kany[२५] च्या मते In one of the study by Andhra Pradesh Participatory Trubul Development project (APPTDP) महिलाना गटामध्ये सामील होण्यास भिती वाटते. कारण समाजाप्रमाणे घरात व गटामध्येही पुरूषाचे वर्चस्व असते. त्याच्या मते पुरूष गटांमध्ये सामील झाले तर स्त्रीया या दुयम स्थानी राहतात.

Narendra Nath[२६] च्या मते आर्थिक बाबीची भूमिका वेगळी आहे ही संस्था च्ममत समंतदपदह या तत्वावर आधारित आहे या तत्वामुळे समाजाचा विकास होवू शकतो. सभासद एकमेकापासून शिकतात व हे इतर गटाच्या काम करण्याच्या पध्दती शिकू शकतात.

Kropp — Suran [२७]. Linking Banks – Financial Self Help In India बचत गट हे २० सदस्याचे अनौपचारिक संस्था (संघटन) आहे. यामघे गरीब लोकाना सामावून घेतले जाते. स्वतंत्ररित्या कार्यरत असून सभासदांचे परस्पराचे संबंध हे ऐक्याचे विश्वासाचे असतात. एकाच वेळी सर्वाचे हित साधले जाते. यामध्ये साधारण एकाच घरातील शेजारी किंवा

नातलगाचा समावेश होताना दिसतो. SHG चा आराखडा हा सामाजिक असल्यामुळे सभासद हे एकमेंकास जबाबदार राहतात. सभासदाची निवड ही एखादया सभासद करतो व गैरवर्तन करणाऱ्या गटापासून दूर केले जाते. दुसऱ्या अभ्यासामध्ये बॅंक व NGO ने सहाय केलेल्या बचत गटाचा तुलनात्मक अभ्यास केला आहे बॅंक कर्मचाऱ्याच्या कमी अधिक कार्यक्षमतेमुळे सोप्या पध्दतीने Formation Concept अवलंबतात व स्वंय निर्धारीत मतावर भर देतात. गट बनवण्यासाठी पुढाकार घेतात पण गरीब घटकांचा समावेश होतो किंवा नाही याच्याकडे लक्ष देत नाही. त्यांच्या मते SHG ने सहाय केलेल्या बचत गटात व NGO ने प्रोत्साहीत गटांच्या कामकाजामधे फरक आढळून आला यामधे एक साम्य असे आहे की, SHG ना बॅंकेच्या व्यवहाराची आवश्यकता होती. आतापर्यंत दारिद्रयामुळे नाकारली गेली SHG संलग्न व बॅंक संलग्न SHG यांचा तुलनात्मक अभ्यास करता एक गोष्ट लक्षात आली की, समाजातील इतर प्रश्नाचे निराकरण असे की, कुटुंब नियोजन, पाण्याचा प्रश्न, मुली व अनाथ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, बालकाचे पोषण, घरगुती समस्या इ संचलित SHG कडून काही प्रमाणात यावर काम होताना दिसते.

Gulab and Rao [२८]. Development women and children in Rural Areas ( DWCRA) programme which was started in १९८२.८३ Andhra Pradeesh with unicef corporation rural poor women – Unick या अंतर्गत निर्माण झालेल्या बचत गटामधे एकाच सामाजिक व आर्थिक स्तरातील १०—१९ गरीब महिलांचा समावेश केला गेला. हे गट Mahila Bank शी संलग्न केले गेले. आपल्या क्षमतेनुसार महिलांनी उपक्रम राबविले. नेतत्व विकास त्यांचे प्रशिक्षण त्याच्या दृष्टीकोनात बदल करणे यासाठी सहाय्य करते. विविध कार्यक्रम राबवण्याच्या गटास रू ५००० चे अनुदान दिले जाते. हे फिरत्या स्वरूपाचे असते. कर्ज व अनुदान यांचा आराखडा ठेवला जातो. दैनंदिन गरजा भागवण्या करिता उसनवारीवर पैसे दिले जातात. यामधे महिलाचे शिक्षण आरोग्य बालसंगोपन व पोषण यावर ही भर दिला जातो. अंतर्गत गटामधील सभासदाचे वय सरासरी ३५ वर्षे असते.

Dev Mahendra [२९] यांच्या मते उत्पन्न जात व शेजारधर्म या तत्वावर गटांची निर्मिती होते. Self help group of the Rural poor समाजातील प्रभावी वर्गातील ५—१३ सदस्यांची समिती स्थापली जाते. काम करण्याची मर्यादा ही ६ महिने ते ३ वर्षापर्यंत असते. कमिटीतील सदस्य होण्यासाठी पात्रता प्राप्त होण्याकरिता विश्वास, जाणीव, शिक्षण खात्याचा नोंदी ठेवणे व नेतृत्व करण्याची क्षमता या बाबीवर भर दिला गेला. लोकांना एकत्र करणे व गटासाठी वेळ देणे ही बाबही महत्वाची होती. उदा. रू ५० रू चे मानधन दिले गेले.

CDF[३०]. Member participation in New Generation thrift corporation around warugal in A.P. मध्ये नेतृत्व हे आनु जाती व जमातीच्या लोकामधे इतर मागास जातीपेक्षा अधिक दिसून आले. सदस्याच्या प्रमाणात भूमिहीन लोकांचे प्रतिनिधीत्वही कमी प्रमाणात दिसून आले. याचे कारण म्हणजे

रोजगार बुडवून सदस्यांना बैठकीस येणे परवडणारे नव्हते. My RADA) Mysore Resettlement and Development Agency काही गटाच्या सभासदामधे भेदभावास काही समस्या निर्माण झाल्या पण गरीब लोकांना सदस्य बनवण्याकडे तीचा कल होता.

Karmaarkar K.G [३१] याच्या मते गरीब लोकांना कर्जाची मर्यादा किंवा परतफेड याविषयी सविस्तर माहिती दिली जात नाही. SHG मधील फरकावरून असे दिसते की कर्ज घेण्यासाठी गरीबामधे भेदभाव केला जात नाही किंवा त्याचे प्रमाण कमी आहे. कारण गरीब लोकांची समाजामध्ये पत कमी असते त्याचा आत्मविश्वास कमी असल्याचे दिसते. वस्तूस्थिती अशी आहे की, गरीब लोकांचा समावेश कार्यकारणी मधेही होताना दिसतो. Ray and Vasudhara Thrift and Credit Co-Operative in South India बचत गटातील सदस्य हे नियमित बैठकीस उपस्थित राहतात. (महिला) निर्णय प्रक्रियेमधेही सहभागी होतात. कर्ज देणे व परतफेड या बाबत जागृत असतात. एखादया सभासदाच्या गैरहजेरीत तीचा हप्ता स्वत गोळा करताना दिसतात. AP मध्ये ३९ टक्के गटाच्या बैठकी होत नाहीत. २३ टक्के गट कागदपत्रे व्यवस्थित बाळगत नाहीत. याचे २ कारणे आहेत १) निरीक्षरता २) सम प्रमाणात वाटप केल्यामुळे कागदपत्रांची आवश्यकता भासत नाही. बचतीमध्ये नियमितता होती पण बुडवणारे लोक ८ टक्के होते. ७८ टक्के गट नियमित बचत करतात. महिन्याची बचत रोजगार एवढी असते. घरोघरी जाऊन ती गोळा केली जाते. बचत न करणाऱ्यास दंडही नव्हता. काहीमध्ये स्वयंप्रेरणेचा अभाव होता. काही गट हे बंद झाले. काही एक दोन वर्षासाठी कार्यरत राहिले. २ टक्के गट हे नैसर्गिक रित्या बचत करतात.

Halvet all [३२] याच्या मते कृती संशोधन (Action Research) बैठक ही SHG ची व्ययच्छेद लक्षण आहे. कार्यप्रणालीही बैठकीतून SHG च्या कार्याचे प्रतिबिंब दिसते बैठकीमध्ये चर्चा व निर्णय घेतले जातात. सभासदांना माहिती देणे बचत करण्यास प्रवृत्त करणे हाच बैठकीचा उददेश असतो. हा भाग पाणस्थळ शेतीचा असल्यामुळे बऱ्याच महिला वर्ष भर शेतीच्या कामामधे व्यस्त असतात. बैठकीचे महत्व पटावे या दृष्टीकोनातून दंड आकारला जातो. शेतीतील वेगवेगळी कामे व घरी आल्यावर घरातील जबाबदाऱ्या यामुळे महिलांचा सहभाग कमी असतो. तरीही या सर्व गोष्टीना तोंड देत महिला बैठकीस येतात. बैठकीस न येण्याच्या कारणांचा आढावा घेतल्यास फक्त माहिती मिळवणे हा उददेश असतो असे त्यांना वाटते म्हणूनच बचत करणे व त्याचे कौशल्य वाढविणे हाही बैठकीचा उददेश असतो. कौशल्यात वाढ झाल्यास बचत गट लोकांना आवडू लागतात.

Kanitkar [३३] – 'Exloring empowerment and leadershiop at the gross root social entrepreneurship in the SHG movement in India' १३ ते ३६ महिने पूर्ण झाल्यावर गट अधिक उत्पन्न काढण्याचे कार्यक्रम हाती घेताना दिसतात. अशा वेळी SHG ने सहाय करणे थाबविले तरी चालते. संघटिका

यानी अशा प्रकारे बचत गटाना रणनीतीने सहाय केले. पूर्ण गटांच्या जीवन क्रमामध्ये सहकार्य केले व एका प्रभावी संस्थेच्या रूपामध्ये गटास नेले व त्यानंतर संघटिका त्याचे सहकार्य थाबवू शकतो. यामधे नेतृत्व किंवा Social enternership वर भर दिला आहे. Harper [१६] बचत गटाच्या निर्मितीमध्ये अनेक प्रक्रिया असतात. त्याचे सामर्थ्य हे गट स्थापन्यास लागणाऱ्या कालावधीवर ठरत नाही SHG व त्यातील कर्मचाऱ्यांचा दृष्टीकोन हा वेगवेगळा असू शकतो. समाजातील लोकांचीही परिस्थिती वेगवेगळी असू शकते पण बऱ्याच NGO नी गटाना वाढवण्यासाठी केलेल्या प्रयत्नामध्ये साम्य आहे. बचत गटा अंतर्गत आर्थिक कार्यक्रमामध्ये ३ विभाग येतात. शेतीव्यवसाय पशुपालन आणि कारखाने नोकरी व व्यवसाय नोकरी पेक्षा उत्पादन वाढवण्यावर भर देतात. Harpern in profit for poor cases in macro finance SHG च्या रचनात्मक बाबीकडे लक्ष केंद्रीत केले SHG मधील सदस्यांना हवा तो व्याजदर ठरवण्याचे स्वातंत्र होते. वार्षिक व्याजदर १२ ते ६० टक्के इतका होता. उसनवारीवर समप्रमाणात रक्कमेचे वाटप याचा प्रभाव असतो. याची ४ कारणे आहेत.

१) परतफेडीचे भय

२) प्रत्येकास कर्ज रकमेतील समान वाटा

३) व्याज भरण्यास नाखूशी

४) जिल्हयामध्ये अंतर्गत उसनवारी कार्यक्रमाचा विकास झालेला नाही.

idele fund संपूर्ण रक्कमेच्या प्रमाणात ३३ टक्के असते यामध्ये सदस्याची बचत अनुदान व्याज इ चा समावेश होतो ७८ टक्के हे रक्कम ही फिरत्या स्वरूपाची असते. गरीब लोकांच्या बाबतीत तो भेदभाव केला जातो. ते कर्ज घेण्यावरून किंवा गटामध्ये पद घेण्यावरून होत नाही. याठिकाणी SHG ने पुरवलेल्या शक्तीचा विचार होतो. कारण SHG चा हा स्वायत्त लोकशाही शासनावर आहे. लेखक पुढे असा म्हणतो की, अशा प्रकारचे सहकार्य त्यांना मदत करणाऱ्या कडून होत नाही.

Kanitkar याच्या लेखामध्ये संस्थात्मक सामाजिक जबाबदारीची भूमिका आणि संघटिका यांच्या नेतृत्वाकडे पाहण्याचा दुहेरी दृष्टीकोनाची चर्चा केली आहे. पहिल्या दृष्टीकोनाचे संघटिकानी प्रमुखाची नियुक्त करून वर्षभरासाठी करून ते पद फिरते ठेवावे असे मत मांडले आहे. याव्दारे नविन सभासदांना संधी प्राप्त होऊ शकते. दुसऱ्या दृष्टिकोणामध्ये नेतृत्वास या जबाबदारीविषयी चर्चा केली आहे. लेखकांचे असे निरीक्षण आहे की, ज्या वेळेस गटामध्ये फिरते नेतृत्व प्रस्थापित केले. त्याची जबाबदारी हे समाजातील मूख्य व्यवस्थापकच घेताना दिसतात. दुसऱ्या शब्द व थोडयाच महिला नेतृत्वाची अशी जबाबदारी घेताना दिसतात. रितसर त्याची नेमणूक झाली असो किंवा नसो तरी बऱ्याच जणीकडे क्षमता असतानाही जबाबदारी घेतली जात नाही. Kanitkar म्हणण्यानुसार गटाच्या निर्मितीबरोबर अनेक गोष्टी उदयास येतात. एका बाजूस नेतृत्व विश्वासर्हता सहभाग या गोष्टीचा विचार करावा लागतो. दुसऱ्या बाजूस उद्योगासंबधी निर्णय घ्यावा लागतो. उदा. एखादया सभासदाने उत्पन्न

वाढवण्यासाठी कर्जाची मागणी केली तर व्यवस्थापकास यावेळी योग्य निर्णय द्यावा लागतो. योग्य निर्णय झाल्यास गटाची पत वाढते पण काही वेळा गट धोक्यात येऊ शकतो. Ray and vasudhara[17] like my mothers house मध्ये म्हणतात की, महिलाचे women thrift co-operative मधील सहभागामुळे इतर वित्तीय संस्था किंवा भांडवल देणाऱ्या संस्थाकडे त्याची विश्वासार्हता वाढली आहे. सबलीकरणाची वेगवेगळया पध्दतीने व्याख्या केली जाऊ शकते.

Kay[३४] याच्या मते ज्या प्रक्रियेमध्ये महिला आपल्या आवडी निवडी वर ताबा व मालकी गाजवू शकते त्यास सबलीकरण असे म्हणता येईल अशा प्रकारे क्षमता विकसीत करणे व धोरणाने आवडी निवडी ठरवणे असा याचा भाग येतो. सबलीकरणाच्या महत्वाच्या घटकास ध्येय निश्चित करून त्यामध्ये साध्य करण्याची क्षमता विकसित करणे स्वत:च्या बदल्याने, जाणणे, जगणे, आत्मसन्मान इ. बाबीचा समावेश होतो. सबलीकरणाची व्याख्या अनेक प्रकारे करता येते.

United nations[३५] अशी प्रक्रिया त्यामुळे महिलेचा आपल्या आवडीनिवडीवर पूर्ण मालकी व ताबा प्रस्थापित होतो. सबलीकरणामधील महत्वाचा भाग म्हणजे एखादे उदिदष्ट ठरवणे व प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे बलस्थानांची जाणीव स्वत्व व आत्मविश्वास सबलीकरण वेगवेगळया पातळीवर होऊ शकते. Kabeer[३६] याच्या मते महिला सक्षमीकरण वेगवेगळया अंगानी वैयक्तिक घरगुती, सामूहीक, समाजात हे काही प्रोत्साहन देणाऱ्या घटकामुळे सभवू शकते. उदा. नविन कार्यक्रमाची ओळख यामुळे क्षमता निर्माण होऊ शकते. अडथळा निर्माण करणारे घटक दूर करणे व संसाधनाची कमतरता, कौशल्याचा अभाव इ. बचत गटामुळे महिलांचे सबलीकरण झाले आहे.

Zaman[37] याच्या मते महिला सक्षमीकरण SHG मुळे झाले आहे परंतु ते लहरीप्रमाणे आहे. गरीबी काही प्रमाणात कमी झाली. मालमत्ता निर्माण झाली. पैशाची निर्मिती व खर्च होऊ लागला. महिलांची मालमत्तेवर मालकी प्रस्थापिती झाली व त्याची अस्मिता जागी झाली. According to united nation दोन महत्वाच्या घटना घडल्या १) सामाजिक pssruk Social mobilization आर्थिक स्थैर्य Economic security

Ranjuni et al [३८] यांच्या मते . impact assessment of south Asian poverty Alleviation programme in Andha Pradesh India women empowerment three dimensions are considered. They are power to 'power with' and ' power within' सामर्थ्य प्राप्त झाले आहे जगण्यासाठी कामासाठी संसाधन निर्माण करण्यासाठी स्वातंत्र वावरण्यासाठी नेतृत्व करण्यासाठी प्रजननासाठी इ.

Power within सामर्थ्य स्वत:ची बाजू मांडण्यासाठी समाज लिंग इ मध्ये Power within

Hannover[३९] सामर्थ्य स्वत चे स्त्रीपण जपण्याचे (strategic gender awareness) महिला अशिक्षित असली तरी ती बचत करते, गुंतवते, कर्ज घेते, परतफेड करते व गटाचे सर्व कामकाज पाहते. कागदपत्रे ठेवते बॅकेचे

कारभार पाहते व घरातील व्यवहार सांभाळते. कुटुंब सुधारणे, मुलांच्या शिक्षणावर भर देणे, पहिल्यांदा ती जिवनाकडे सकारात्मक दृष्टीने SHG मुळे पाहते.

Lalitha and Nagurujan[40] in there studyb on impact assetssment studies points asset creation as on the man indicator मालमत्ता करणे हा महत्वाचा मुददा आहे दूग्ध व्यवसाय करणाऱ्या गटामध्ये महत्वाचे बदल घडतात. त्यांची प्रगती ही दागिने घेणे, जमीन खरेदी करणे, घर बांधणे इथपर्यंत झाली आहे. SHG Model and Gramen Model ची तुलना सबीकरणाच्या दृष्टीने केल्यास एक गोष्ट लक्षात येते की, महिला स्थानिक स्वराज्य संस्थामधे भाग घेऊ लागल्या आहेत. उदा पंचायत राज २००० सालामध्ये ७७.४९५ सदस्यापैकी २०० (about 25%) सदस्य ग्रामपंचायतीत निवडून आले.

Yunus[४१] Observed that some self help groups have reportedly been able to purchase or lease land or user right to community forests ( Nepal) and fishing ponds (Bangladesh) Collectively, there by laying the foundation for enhanced social security and agricultural productivity. प्रगतीत महिलांनी सामूहिक शेती (Community forest NEPAL) Bangladesh केलले आहेत. महिला आत्मनिर्भर झाल्यामुळे सोडचिठ्ठी (Divorse)प्रमाण कमी झाले आहे.
Goetz and sen Gupt[४२] च्या मते यांनी महिलाचे सबलीकरणाला आक्षेप घेतला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार घरातील इतर व्यक्ति तिचे पैसे हडप करतो. परतफेडीची जबाबदारी तिव्यावर येते. Wilson[४३] याच्या मते The role of self help Group is important in society सर्वच महिला यामध्ये सहभागी होतात असे नाही. काही निर्णय प्रक्रियेमध्ये भाग घेतात. त्यामुळे पुढील सर्व परिणामावर त्याचा प्रभाव पडतो. त्यामुळे सोसायटी प्रॉब्लेम काही प्रमाणात कमी झालेचे दिसतात उदा बलात्कार, व्यसनाधिनता, खून, घरेलू हिंसाचार, हुडांबळी इ. काही ठिकाणी, रस्ता विज निर्मिती यासाठीही गटांनी काम केले आहे.

**सारांश** : वरील सर्व साहित्यांचा परामर्श घेता असे लक्षता येते की, भारतातील महिलांची लोकसंख्या पुरूषाच्या बरोबरीने असली तरी ग्रामीण तळागाळातील महिलांचा आर्थिक विकासासाठी सहभाग हा जवळजवळ नव्हता. असे असले तरी महाराष्ट्र, कर्नाटक ही राज्ये आघाडीवर होती. संविधानातील ७३ व्या घटना दुरूस्तीमुळे अपरिहार्यपणे सर्वच राज्यातील महिलांना ३३ टक्के आरक्षण देवू केले. यानंतर मात्र काही प्रमाणात महिलांचा निर्णय प्रक्रियेतील सहभागाला सुरूवात झाली. आज ग्रामीण महिला स्वयंसहायता बचत गटातून कौटूंबिक प्रश्न, स्त्रीभ्रूण हत्या, शिक्षण, आरोग्य प्रश्न, पाणी स्वच्छता, दारूबंदी, हुंडाबळी यासारखे विषय हाताळत आहेत. अशा तऱ्हेने ग्रामीण महिला गुणवत्तापूर्ण आर्थिक विकासात सहभागी होत असल्याने यास संत गतीची क्रांती असे संबोधले जात आहे. हीच क्रांती चिरकाल टिकणारी आहे.

Reference


1) Jeti Narindar K ( Edu) India : Manpower employment policy and labour welfare 1947 to 2007 New century publication New Delhi 2006

2) Kumar Ashok and Mamgain ER.P. Manpower planning in India Criterian publication New Delhi 1989

3) Sign V.B. Introduction the study of India Labour problems Shiva Lal Agarwal and Company Agra 1967

4) Misra 8 K and puri V.K. Indian economy Himalaya publishing House New Delhi 2008

5) NABARD (1998) SHG- Bank linkage programme, status report as on 31st March 1989, National Bank for Agriculture and Rural Development Mumbai.

6) Ghosh Jayati (1998) Cooperative Under the Andhra Pradesh Mutually Aided Cooperatives Societies Act 1995 Centere for Economis Studies and planning school of Social Sciences Jawaharlal nehru University New Delhi.

8) Harper M (1998) Profit for poor Cases in micro-finance Oxford & IBH, New Delhi and Intermediate Technology Publications London

9) Sinha Frances (2006) Self Help Group sin India 'A study of the lights and shades' by EDA Rural systems PVt Ltd in association with APMAS

10) Bouman F (1995) " Rotating and Accumulating Savings and Credit Associations A Development Perspective World Development 23:30, pp 371

11) Dichter T. (1999) Case Studies in site Non government organizations (NGOs) in Microsfinance Past present and future An essay

12) Arya Ved (1999) Towards a relationship of significance Lessons from a decade of collaboration between government and NGOs in Rajasthan

13) Satish P (2000) Institutional Alternatives for the promotion of Microfinance journal of Microfinance Volume 3 Number 250

14) MYRADA (2000) The MYRADA experience A manual for capacity building of self help groups MYRADA Bangalore

15) Sa-Dhan (2001) Micro finance regulation in India Sa Dhan New Delhi

16) Harper M (2000) in a study Promotion of Self Help Groups under the SHG Bank Linkage Programme in India SHG Innovations Department National Bank for Agriculture

17) Ray Nandita and Vasundhara D.P,. (1996) Like my Mothers House Women's Thrift and Credit Cooperatives in South India in M Carr M Chen and R Jhabvala (eds) Speaking Out Women's Economic Empowerment in South Asia Vistaar Publications new Delhi

18) ORG MARG Research Limited (2000) Consultancy on Strengthening of Self Helop Groups in Andhra Pradesh SWOT Analysis of the Groups Sutrveyede in A P Report of the Study Sponsored by Department of Rural Development Government of Andhra Pradesh Hyuderabad

19) Raju B.Y and Ali A Giradausi (1996) Evaluation of DWCRA in Cuddapah District Report Submitted to Government of Andhra Pradesh Administrative Staff College of India Hyderabad

20) Jayalakshmi Rn (1997) Evaluation of Rural Development Programmes in Adilabad District Report Submitted to the Government of Andhra Pradesh Institute of Cooperative Management Hyderabad

21) Narayanswamy R and Jagannathan P (1999) Evaluation Study of IRDP TEYSEM Tool Kits and DWCRA Schemes in Adilabad District Report Submitted to the Governhment of Andhra Pradesh Institute of Cooperative Management Huderabad.
22) Kanchaqnya K (1998) Women and Development A case study of DWCRA Programme in West Godavari District of A P Dissertation submitted to Dr B R Ambedkar Open university Hyderabad
23) GoAP (1999) DWCRA and Womens Emporivement A success story of Self Help movement in A P panchayat Raj and Rural Development Department AP Hydeerabad
24) APMAS (2002) Eva,uation of Self Help Groups in Adilabad Cuddapah and Visakapatnam Districts Draft Report Prepared for the Government of Andhra Pradesh Hyderabad
25) Kanu M (2000) India and Nepal Human Stories of Rural poor IFAD
26) Narendranath D. (2001) Group Dynamics : Clearing the concepts motivations and methods of our Self Help Group programme to better assess its impac' Newseaqrch the in-house journal of PRADHAN pp 1-5 New Delhi
27) Kropp & Suran (2002) Linking Banks and (Financial) Self Help Groups in India mocro credit Innovations Department National Bank for Agriculture and Rural Development.
28) Galab S and Rao N Chandrasekhara (2003) Womens Self Help Groups povery Alleviation and Emprovement Economic and political weekly March 22-29 1274 1283
29) Dev Mahendra S and Rao padmanbha P (2002) Poverty Alleviation Programmes in A.P. An Assessment Report of the Study Sponsored by Planning Commission Government of India
30) CDF (1999) Member Particdipation in New Generation Thrift Cooperatives Around Warangal Town in A P 1997 Cooperative Development Foundation Hyderabad
31) Karamkar K.G. – Rural Credit and Self Help Groups macro Finance needs and concepts in India Saga publication India Pvt Ltd New Delhi 1990.
32) Halve veena Khadilkar S. B and pratibha L S (2005) Action Research Study on Best Practices in SHG and Participation of SHG Members in Developmetn Swayamsiddha project
33) Kanitkar A (2000) Exploring empowerment and leadership at the grass roots Social enterperenurship in the SHG movement in India Beyond micro credit putting development backs into micro finance
34) Kay T (2002) Empowering women through self-help microcredit programmes Bulletin on Asia-Pacific Perspectives 2002/03.
35) United nations (2001) Empowerment of women throughout the life cycle as a transformative strategy for poverty eradication (EGM/POV/2001/REPORT)
36) Kabeer N (2001) Resources agency achievements reflections on the measurement of womens empowerment in Dkiscussing womens Empowerment Theory and Practice SIFA Studies No 3
37) Zaman H. (2001) Assessing the poverty and vulnerability impact of micro-credit in Bangladeshi a case study of BRAC unpublishede

background paper for World Bank World Development Report ( Washington World Bank)

38) Ranjani K.M. Raju K and Kamath Amitha (2002) Towards Womens Empowerment and Poverty Reduction lessons from the Participatotry Impact Assessment of South Asian Poverty Alleviation programme in Andhra Pradesh India Report of the Study Commissioned by United Nations Development programme

39) Hannover QW (2005) Summary of major Results from Existing Studies on the Impct of the Microfinance Linkage Banking Program in India on the Millennium Development Goals GTZ Eschborn

40) Lalitha N and Nagarajan B.S. (20020 Self help Groups in Rural Development (New Delhi Dominant Publishers and Distributors)

41) Yunus Muhammad (2002) Grammen Bank II designed to open new possibilities available at www.grameeninfo.org/bank/bank2.html, 8 November 2002

42) Goetz A and Sen Gupta R (1996) “ who take the credit? Gender, power and control over loan use in rural Credit programme in Bungladesh,” world Development Vol. 24, No 1

43) Wilson K (2002) The Role of Self Help Group Bank Linkage Programme in Preventing Rural Emergencies in India Micro Credit Innovations Department National bank for agriculture and Rural Development.

# प्रकरण ३ रे
## पध्दतीशास्त्र

### ३:१ प्रस्तावना :

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. तेंव्हा पासून आजतागायत ग्रामीण भागातील गरीब हा एक चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. ग्रामीण भागातील परंपरागत गरीबीवर मात करण्यासाठी सर्वानीच आत्मचिंतन आणि प्रयत्न करण्याची गरज आहे. मानवाला आयुष्यात सर्व सोंग घेता येतात पण पैशाचे सोंग घेता येत नाही. आपल्या जवळ पैसा असेल तर सर्वच वस्तू स्वस्त वाटायला लागतात. पैसा नसेल तर स्वस्त वस्तू सुध्दा महाग वाटतात. गरिबी म्हणजे काय तर स्वत: जवळ कुटूंबाच्या प्राथमिक गरजा भागविण्याइतके पैसा नसणे होय. पैसा नसेल तर इच्छा असली तरी मुलांना शाळेत पाठवता येत नाही. आजारपणात आवश्यक त्यावेळी उपचार घेता येत नाही. गरिबाला उधार कोणीही काहीही देण्यास तयार होत नाही. अडचणीच्या वेळी लाचारी पत्करून दुसऱ्याकडे पैसे मागितले तर ते मिळतीलच याची शक्यता फार कमी असते. अन्न, शिक्षण, आरोग्य, स्वाभिमान आणि आत्मसन्मान असा हा जीवनप्रवास पैशावर अवलंबून आहे. म्हणून आजच्या युगात पैशाला अनन्यसाधारण महत्व आहे. अशातच ग्रामीण भागातील महिलांचा विचार केला तर त्यांची स्थिती अतिशय बिकट व दयनीय आहे. कारण त्यांच्या नावावर कुठलीही संपत्ती किंवा मालमत्ता नाही. त्यांना कोणतेही स्वतंत्र निर्णय घेता येत नाही. आपल्या कुटूंबाच्या दैनंदिन गरजा भागवताना त्यांची अतिशय दमछाट होते. तरीपण त्या संयम राखून अनेक समस्यांना सामोरे जात संसाराचा गाढा ओढतात. म्हणून स्त्री बाबत असे म्हणावेसे वाटते की, “परमेश्वराने स्त्री निर्माण केली ती चंद्रम्याचा गोलावा, तंतू कोंभाची लगट, तृणपात्याची थरथर, वेलीच्या शिडशिडपण, वेळूचा अणुकुचीदारपणा,कांबीचा कणकखपणा, सशाचा भित्रेपणा, बर्फाचा थंडावा, मधाचा गोडवा, लांडग्याची लबाडी, कोल्हयाचा धुर्तपणा, चिमणीचा चिवचिवाट, कोकिळेचे कुहूकुहू, कुंजान व चक्रवाक पक्षाची प्रेमनिष्ठा व श्रमाची प्रतिष्ठा याचा सुरेख संगम असलेल्या महिलेची ओळख सध्या बचतगटाच्या माध्यमाने समाजासमोर येत आहे”.

गरीबी दूर करण्याचे जगात अनेक मार्ग आहेत. गरिबीतून स्वत:च्या कुटूंबाच्या विकासाला चालना देणे, लहानसहान आर्थिक अडचणी सोडविणे आपल्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना उजाळा देणे, मुलांचे शिक्षण, आरोग्य, बालमजूरीचे उच्चाटन करून त्यांचे भविष्य उज्वल करणे, लाचारीचे निर्मूलन करून स्वाभिमान व आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी महिला बचतगट ही चांगली संकल्पना आहे. स्वंयसहाय्यता महिला बचतगटाचे जाळे सध्या देशभर विखुरलेले आहे. महिला गटांची संख्यात्मक व गुणात्मक वाढही झालेली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील

महिलांचे आर्थिक परिवर्तन झाल्यांने त्यांचा जीवनप्रवासच बदलेला आहे. स्वंयसहाय्यता महिला गट ग्रामीण जनतेच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाचे एक प्रभावी साधन असल्याने केंद्रशासन नाबार्डच्या मदतीने नियोजनबध्द कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यामुळे महिला बचतगट खेडयापाडयातून आर्थिक विकासाच्या चळवळीत सक्रिय सहभागी झाले आहेत. बचतगटातील महिला एकूण आर्थिक व्यवहाराची माहिती करून घेत आहेत. हिशोबाची माहिती, बाजारपेठेची उपलब्धता, अंगभूत कलागुणाच्या आधारे स्वयंरोजगार आणि निर्णयशक्तीचा वापर करून उद्योग व्यवसाय करून स्वंयपूर्ण व स्वावलंबी होत आहेत.

महिला बचतगटातील महिला सध्या मुलीचे शिक्षण, बालविवाहाचे तोटे, दारू, मटक्यामुळे होणारे नुकसान, अंधश्रध्देच्या आहारी गेल्याने होणारे नुकसान, निरक्षरता इत्यादी विषयावर स्वत:चे विचार मांडू लागल्या आहेत. ग्रामीण भागातील महिलांमध्ये सामाजिक परिवर्तन होवून वैचारिक प्रगती झाल्याचे दिसून येते. सावकारांचे उच्चाटन, रूढी, परंपरा, अन्याय याच्याबध्दल विचार करण्याची मानसिकता त्यांच्यामध्ये निर्माण होत आहे. त्यामुळे महिला बचतगट महिलांच्या वैचारिक प्रबोधनाची प्रभावी केंद्रे झाली आहेत. नवऱ्याची दारू पिऊन मारहाण आणि सासरचा न सोसण्यासारखा छळ, याबद्यल उघडपणे चर्चा आणि विरोध करण्यासाठी महिलांना बचत गटांचा मिळणारा पाठिंबा हे सामाजिक क्रांतीचे बीजच म्हणावे लागेल.

सामाजिक आणि आर्थिक क्रांती ही ग्रामीण भागात स्वंयसहाय्यता महिला गटामुळे आता बोलकी ठरत आहेत. बचत गटामुळे महिलांना कुटूंबात मानाचे स्थान आणि समाजात सन्मान मिळत असल्याचा अनुभव हे आशादायी आणि सुखद चित्रच म्हणावे लागेल. कारण ग्रामीण भागामधील सर्वसामान्य महिला एकत्र येणे हे सामाजिक घडामोडीचे सर्वात महत्वाचे पाऊल आहे. महिलांचा उपजत गुण म्हणजे बचत करणे होय. महिलांना बचत स्वत:च्या नावावर ठेवण्याची सोय नव्हती. ही सुविधा बचत गटांनी उपलब्ध करून दिली आहे. महिलांनी बचतीच्या आधारावर मिळालेली पत वापरून कर्ज मिळवण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे. त्यामुळे स्वयंरोजगाराचे नवे दालन खुले झाले आहे. त्याची पुरेपूर संधी महिला बचतगट घेत आहेत.

**सारांश :**

सांगली जिल्हयातील दहा तालुक्यामधून महिला बचतगटासंबंधी उपयुक्त माहिती संकलित केली आहे. सदर माहिती क्षेत्रीय सर्वेक्षणात भरून आणि संबंधित पदाधिकाऱ्यांच्या मुलाखतीचा सांकलिक अभ्यासा आधारे केला आहे. सांकलिक अभ्यासावरून विविध घटकांचे विश्लेषण केले. स्वंयसहाय्यता महिला बचत गटासंदर्भात उपयुक्त पुस्तके जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, आर्थिक विकास महामंडळ, महानगरपालिका, पंचायत समिती यांच्या नोंदी, आणि सरकारी/ निमसरकारी कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती बॅक, अग्रणी बॅक ऑफ इंडिया, एकता समाजकेंद्र

यांच्याकडून माहिती संकलित केली आहे. ग्रामीण महिलांचा आर्थिक विकासातील सहभाग वाढविण्याच्या ध्येयाने महिलांचा बचतीत पुढाकार, त्याला शासनाचा आधार अशा योजनेचा अभ्यास केला आहे.

## ३:२ संशोधन उद्‌दिष्टये :—

"स्वंयसहाय्यता महिला गट आणि रोजगार निर्मिती: सांगली जिल्हयाच्या संदर्भातील चिकित्सक अभ्यास" असा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. संशोधनाची उदिदष्टे खालीलप्रमाणे

१) शासनाने आजपर्यत राबविलेल्या महिला सक्षमीकरणाच्या योजनेपेक्षा महिला बचतगट आर्थिक सक्षमीकरणाचे माध्यम म्हणून तळागाळातील वाडयावस्त्यामधील महिलेपर्यत ही योजना पोहचली आहे का? हे तपासून पाहणे.

२) आर्थिक स्वावलंबन हा आत्मविश्वासाचा गाभा आहे. या ध्येयाने स्वयंप्रेरीत महिला बचतगटाच्या समस्यांचा अभ्यास करणे, त्यांच्या समस्या निर्मूलनासाठी उपाययोजना सूचविणे.

३) महिला स्वंयसहाय्यता गटातून बेरोजगारी कमी करण्यासाठी लहान उद्योग/व्यवसायाना मदत होते आहे काय ? याचा अभ्यास करणे.

४) महिला स्वंयसहाय्यता बचत गटातून सुरू झालेल्या उद्योग आणि व्यवसायाचा अभ्यास करून बेरोजगारी कमी होण्यासाठी त्याचा फायदा कोणाला होतो? हे तपासणे.

५) महिला स्वंयसहाय्यता बचत गटातून स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, लिंगभेद, दारिद्रय निर्मूलन, बेरोजगारी निर्मूलन, स्त्री भृणहत्या यांचे महत्व समाजाला पटवून देण्यासाठी किती यश मिळाले आहे? याचा अभ्यास करणे.

६) महिला स्वंयसहाय्यता गटांच्या नियमित बचतीतून लहान मोठे उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी शासकीय आणि निमशासकीय संस्था कोणत्या प्रकारे मदत करतात? याचा अभ्यास करणे.

७) ग्रामीण भागातील कृषी व्यवसाय विभागासाठी महिला बचतगटांनी किती सहकार्य केले आहे? ते तपासणे.

८) स्वंयसहाय्यता बचत गटातून उद्योग आणि व्यवसायाच्या माध्यमाने मिळालेल्या उत्पन्नाचा विनियोग महिलांनी कसा केला आहे? हे अभ्यासणे.

९) आर्थिक शक्ती निर्माण करण्यासाठी महिला बचतगटामध्ये महिलांचे योगदान कोणत्या स्वरूपाचे आहे? याचा अभ्यास करणे.

१०) ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बॅकांचा पतपुरवठा कार्यक्रम कितपत यशस्वी ठरला आहे ?याचा अभ्यास करणे.

११) बचतगटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांचा समाजिक आणि आर्थिक दर्जा सुधारणेसाठी किती यश मिळाले आहे? हे तपासणे.

१२) ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासात महिला बचतगटाचे योगदान कोणत्या स्वरूपाचे आहे ?याचा अभ्यास करणे.

## ३:३ संशोधन समस्या :—

सुशिक्षित बेरोजगारांना उद्योग आणि व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवलाचा अभाव ही गोष्ट लक्षात घेऊन केंद्र सरकारने पंतप्रधान रोजगार योजना सुरू केली. अनेक वर्षे ही योजना सुरू आहे. हजारो तरूणांनी त्याचा फायदा घेऊन मोठया प्रमाणावर व्यापार, व्यवसाय आणि उद्योग सुरू केले आहेत. कोणत्याही जामीनाशिवाय कर्ज देणारी ही योजना असून या अंतर्गत अनुदानही दिले जाते. या योजनेत सुधारणा करून महिला बचतगटांना या योजनेत सामील करून घेण्यात आले आहे. त्यामुळे सध्या ही योजना कार्यान्वित आहे. दरमहा ठराविक बचत करून त्याची प्रमाणिकपणे परतफेड करणारी महिला बचतगटाची चळवळ देशात जोमाने काम करते आहे. बचत गटांतील महिला सभासद घरगुती आणि छोटया व्यवसायासाठी बॅकेंकडून कर्ज घेतात आणि ठराविक हप्त्यात कर्जाची परतफेड करतात. महिला बचतगटांचा गेल्या कांही वर्षातील उत्साहवर्धक अनुभव लक्षात घेऊनच शासनाने महिला बचतगटांना पंतप्रधान रोजगार योजनेची दारे खुली केली आहेत. छोटी मोठी कर्जे घेऊन नियमित परतफेड करणाऱ्या बचतगटांतील महिलांनी उद्योग सुरू केले आहेत. यातूनच ग्रामीण भागातील निरक्षर महिला या आर्थिक साक्षर झाल्याने आर्थिक उलाढाल वाढत आहे. स्वत:चे घर आणि शेती सांभाळून शेतमजूर महिला बचतगटाच्या माध्यमाने मोठया संख्येनी संघटित होत आहेत. महिला नियमित बचत करत असल्याने त्या आर्थिकदृष्टया सक्षम होत आहेत. नियमित होणाऱ्या बैठकीमध्ये विचार विनिमय आणि निर्णय प्रवृत्ती वाढीस लागलेली आहे. अनेक वर्षापासून भेडसावणारा ग्रामीण स्वयंरोजगाराचा प्रश्न महिला बचतगटातून सोडवला जात आहे काय, ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्यासाठी या योजनेची कितपत मदत झाली आहे, ग्रामीण भागाच्या विकासासाठी महिला बचतगट किती यशस्वी झाले आहेत?, बचतगटातून महिलांचा होणाऱ्या विकासाचा फायदा खेडी सुधारण्यासाठी होत आहे काय?, बचतगटातून महिलांचा वैयक्तिक विकास, समाजाच्या आणि देशाच्या विकासासाठी कितपत मदत करून घेता येईल ?, महिला सक्षमीकरणाचे माध्यम म्हणून स्वंयसहाय्यता बचतगट कितपत यशस्वी झालेले आहते?, स्त्रीपुरूष यामधील असमानतेची दरी कमी करण्यासाठी महिला बचतगटाची मदत करून घेता येईल काय?, महिलांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार, बलात्कार, हुंडाबळी, भृणहत्या या समस्या सोडवण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करता येतील काय?, महिला बचतगटांमधून सुरू केलेल्या उद्योगव्यवसायाचा फायदा रोजगार निर्मितीला झालेला असून ही योजना घरोघरी कशी पोहचवता येईल?, जेणेकरून देशातील प्रत्येक कुटूंबाचा आर्थिक विकासात सहभाग वाढवता येईल काय? महिलांमध्ये आत्मविश्वास,

मतमांडण्याची संधी, चाकोरीबध्द आयुष्यामध्ये नवीन दिशा, नवनवीन गोष्टी शिकायला मिळाल्याने स्वतःचे अस्तीत्व, स्वतःच्या पायावर उभे राहून भविष्यातील जाणीव जागृतीचा फायदा महिलांना खरोखर किती झालेला आहे? या संबंधीत प्रश्नांचा अभ्यास आणि तसेच स्वंयसहाय्यता गटांच्या समस्यांचा विचार करून त्यावर उपाय सुचवणे शक्य आहे काय? या सर्व प्रश्नांचा विचार समस्या संशोधनामध्ये केला आहे.

## ३.४ संशोधनाचे महत्व

भारतातील पुरूषप्रधान व्यवस्थेमध्ये प्राचीन काळापासून महिलांना गौण समजण्यात येत होते. त्यांना कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रामध्ये देखील कोणतेच अधिकार व हक्क नव्हते. महिलांना कनिष्ठ मानले जात होते. अर्थात वैदिक काळापासून ते ब्रिटीशपूर्व काळापर्यंत फारसे परिवर्तन झाले नसले तरी ब्रिटीश काळ आणि स्वातंत्रोत्तर कालखंडात त्यांना समानतेची वागणूक देण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले. संविधानानी त्यांना हक्क अधिकार देवू केले. १९९३ च्या ७३ व्या व ७४ व्या घटना दुरूस्तीपर्यंत त्यांना निर्णय प्रक्रियेत वाव नव्हता पण घटनादुरूस्ती नंतर त्यांना सर्वत्र संधी मिळाली. महाराष्ट्रामध्ये समाजसुधारकांनी केलेले कार्य विशेष रूपाने जोतिबा फुले, महर्षी कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे स्त्री मुक्तीची वाटचाल सुरू झाली. याची प्रचिती सध्या ग्रामीण भागातील महिला बचत गटात लाखो महिला सहभागी होवून आर्थिक सक्षम होत आहेत.

छोटामोठा व्यवसाय सुरू करण्यासाठी आणि लघुपतपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी महिला बचतगटांचा उपयोग होत आहे. ग्रामीण भागातील महिला बॅकेत जाऊन बॅकेतून कर्ज घेत आहेत. बॅकांना स्वंयसहाय्यता गटाच्या माध्यमाने विश्वासू खातेदार मिळाल्याने खाजगी सावकाराच्या तावडीतून महिलांची सुटका झाली आहे. आर्थिक स्वालंबनातून आलेला आत्मविश्वास महिलांना संघटित करण्यास गती देणारा ठरला आहे. केवढी ही जाण, परिस्थितीचे भान व स्वावलंबनाचे वरदान त्यामुळेच नजिकच्या काळात महिलांनी, महिलांसाठी, महिलामार्फत सुरू केलेली बचतगट चळवळ लहानमोठया बॅका म्हणून उदयास येतील आणि ग्रामीण आर्थिक विकासाचा अविभाज्य अंग म्हणून भूमिका बजावतील असा आत्मविश्वास वाटतो आहे.

## ३:५ अभ्यासक क्षेत्र :—

महाराष्ट्र राज्य १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले. तेंव्हा राज्यात ४ विभाग २६ जिल्हे होते. आज राज्यात ६ विभाग व ३५ जिल्हे आहेत. २००१ च्या आकडेवारीनुसार राज्याची लोकसंख्या ११.५० कोटी इतकी आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्हा आहे. जिल्हयात दहा तालुके आहेत. सांगली जिल्हयातील ग्रामीण आणि शहरी भागामध्ये महिला बचतगटांची संख्यात्मक वाढ होत आहे. जिल्हयाच्या सामाजिक

आणि आर्थिक विकासामध्ये बचतगटाचे योगदान मोलाचे ठरत आहे. तसेच जिल्हा साहित्य, सहकार, औद्योगिक, नाटय, गायन, क्रिकेट अशा विविध क्षेत्रात नावारूपास आला आहे. महाराष्ट्रातील राजकारणात सांगली जिल्हयाची स्वतंत्र अशी ओळख झाली आहे. या जिल्हातील मंत्र्यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. सांगली जिल्हयातील तीन गावे आदर्श म्हणून गणली गेली आहेत. तसेच जिल्हयात अनेक आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक संस्था नावारूपास आलेल्या आहेत. अशा सर्व कारणामुळे संशोधकाने अभ्यासासाठी 'सांगली जिल्हा' निवडला आहे.

## ३:६ संशोधन गृहीतके :—

अभ्यासकांनी निवडलेल्या विषयाचे संशोधन करताना खालील गृहीतके निवडली आहेत.

१. स्वंयसहाय्यता महिला बचत गटातील सभासदामध्ये नियमित बचत करण्याची सवय लागलेली असल्याने सदर गटांचे कार्य योग्य तऱ्हेने सुरू आहे असे वाटते.
२. महिला बचत गटातील सदस्यांना स्वत:ची बचत बॅकेंमध्ये ठेवण्याची आवश्यकता पटत आहे. त्यामुळे बॅकींग सवयी विकसित होण्याच्या शक्यता आहेत.
३. बॅकेकडून गटातील सदस्यांना व्यक्तिगत सामूहिक पातळीवर उत्पादन कार्य करण्यासाठी आवश्यक कर्ज पुरवठा उपलब्ध होत आहे का ते तपासणे.
४. बचतगटातील महिलांनी बचतीचा विनियोग उपात्दन कार्यासाठी असण्याची शक्यता आहे ते पहाणे.
५. स्वंयसहाय्यता महिला बचत गटामुळे ग्रामीण महिला आर्थिकदृष्टया सक्षम होण्याची वाटचाल सुरू आहे.
६. प्रतिसादकामध्ये सामाजिक व शैक्षणिक कार्यासंबंधी आस्था निर्माण होण्याची शक्यता आहे.
७. ग्रामीण भागात महिला बचत गटातून महिलांना रोजगार उपलब्ध होत आहे ते पडताळून पाहणे.

## ३:७ संशोधन कालखंड :—

संशोधनास निश्चित दिशा आणि वास्तवता प्राप्त होण्यासाठी कालखंडाची निवड करणे गरजेचे असते. "स्वंयसहाय्यता महिला बचतगट आणि रोजगार निर्मिती सांगली जिल्हयाच्या संदर्भातील चिकित्सक अभ्यास" प्रस्तुत संशोधन विषयाचा योग्य अभ्यास करण्यासाठी आणि विषयाच्या विश्लेषणाची व्याप्ती निश्चित व्हावी या दृष्टिकोणातून १९९७ ते २००७ या कालावधीची निवड करून माहिती संकलित केली आहे. निवडलेल्या कालखंडात महिला बचतगटाची प्रगतीचा आढावा घेतलेला आहे. महिलांचा स्वयंरोजगार ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन ग्रामीण

विकास आणि महिला महिलांच्या आर्थिक साक्षरतेसाठी बचतगटाची भूमिका या सर्व बाबींचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.८ नमुना निवड :—

"स्वंयसहाय्यता महिला बचत गट आणि रोजगार निर्मिती सांगली जिल्हयाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास प्रस्तुत संशोधनाकरीता सांगली जिल्हयातील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकामधील रोजगार निर्मिती केलेल्या प्रतिसादक महिलांची नमुना निवड केली. त्यांची शैक्षणिक पात्रता, कौटुंबिक पार्श्वभूमी, त्यांनी हाताळलेले प्रश्न आणि आर्थिक व सामाजिक सहभाग, त्यांनी केलेल्या इतर कार्याचा, त्यांच्या समस्या यांचा अभ्यास केला आहे.

## ३.९ अनुसूची तंत्र :

प्रस्तुत संशोधनासाठी वापरण्यात आलेली अनुसूची एकूण सहा विभागात विभागली आहे. पहिल्या विभागात वैयक्तिक माहिती उदा. वय, शिक्षण, गटस्थापना, उद्‌द्देश, सभासद इ. संबंधात माहिती मिळवण्यात आली आहे. दुसऱ्या विभागात प्रतिसादकाच्या बचतगटासंबंधी माहिती आणि त्यांची आर्थिक माहिती अंतर्भूत करण्यात आली आहे. तिसऱ्या विभागात प्रतिसादक कर्जासंबंधी माहिती आणि बॅकेशी त्यांनी केलेला व्यवहार, त्यांनी घेतलेल्या कर्जाचा विनियोग कसा केला याची माहिती आहे. इ. बाबींशी संबंधित एकूण अकरा प्रश्न अंतर्भूत आहेत. चौथ्या विभागात कर्जासंबंधी माहिती अंतर्भूत आहे. पाचव्या विभागात प्रस्तुत संशोधनाशी निगडित असलेल्या या प्रतिसादकाच्या रोजगार निर्मितीसंबंधी पार्श्वभूमी, वार्षिक उत्पादन या संबंधीत एकूण नऊ प्रश्न अंतर्भूत केलेले आहेत. सहाव्या विभागात प्रतिसादकाच्या अपेक्षित कार्य अंतर्भूत केलेली आहे.

अशा प्रकारे एकूण ५३ प्रश्न आणि तक्ते समाविष्ट करून माहिती संकलित केली आहे. वरील अनुसूचीमार्फत प्रतिसादकाच्या मार्च २००८ ते डिसेंबर ०८ पर्यत प्रतिसादकाच्या घरी आणि कार्यालयालयामध्ये जावून त्यांच्याकडून माहिती संकलित केली आहे. व्यस्त असणाऱ्या प्रतिसादकांची पूर्व नियोजित वेळ घेऊन मुलाखत घेतली आहे. प्रतिसादकांच्या गावी पत्ता शोधताना अनेक अडचणी जाणवल्या. त्यांच्या कौटुंबिक समस्या, मुलांचे भवितव्य, शिक्षणाबाबत अज्ञान त्यामुळे त्यांच्या मनातील भावना लक्षात आल्या. कामे करणाऱ्या महिला सदस्य भेटले. त्यांच्या भेटीत अनेक अनूभव संशोधनाला उपयुक्त ठरले.

**नमुना निवड पध्दतीचा वापर** : सांगली जिल्हयात दहा तालुक्यात एकूण ७०५ गावे आहेत. त्या प्रत्येक तालुक्यातून दहा गावे जिथे स्वंयसहाय्यता महिला बचतगटातून काही प्रमाणात रोजगार निर्मिती झालेली आहे. अशी दहा गावे निवडलेली आहेत. गावातील बचत गटांची नांवे

त्या गावातील ग्रामपंचायत व अंगणवाडी शिक्षिका यांच्याकडून घेतली आहे. संपूर्ण सांगली जिल्हयाला भेटी देणे व माहिती संकलित करणे, वेळ व पैसा यांचा अपव्यय करणार असल्याने नमुना निवड पध्दतीचा वापर करून साधा या यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने सांगली जिल्हयातील रोजगार निर्मिती केलेल्या महिला बचतगटांची निवड केली आहे. अशा निवडलेल्या रोजगार निर्मित बचतगटांची माहिती संकलित करून निष्कर्ष काढलेला आहे. स्वंयसहाय्यता महिला बचतगटातून रोजगार निर्मिती होऊन महिला आर्थिक सक्षम झाल्या आहेत. हा सर्वेक्षणाचा सार आहे.

## ३.१० तथ्य संकलन

### ३.१०.१ प्राथमिक स्त्रोत

संशोधन विषयाची प्राथमिक माहिती चांगल्या पध्दतीने संकलित करता यावी. यासाठी महिला स्वंयसहाय्यता बचतगट प्रतिसादकासाठी स्वतंत्र प्रश्नावली तयार करून नमुना निवड पध्दतीने जिल्हयातील दहा तालुक्यातून प्रत्येकी दहा गावांची निवड केली आहे. त्या प्रत्येक गावातून दोन महिला बचतगटांकडून आणि प्रतिसादकाकडून प्रश्नावली भरून घेतल्या आहेत. अशा प्रत्येक तालुक्यातून वीस आणि एकूण दहा तालुके दोनशे प्रश्नावली आणि मुलाखतीच्या आधारे सदर माहिती संकलित केली आहे. माहिती संकलनासाठी नमुना निवड पध्दतीने निवडलेल्या गावातील रोजगार निर्मित महिला बचत गटांना प्रत्यक्ष भेट देऊन उपयुक्त माहिती व आकडेवारी जमा केली आहे. याबरोबरच स्वंयसहाय्यता महिला बचत गटातील अधिकारी यांच्या मुलाखती घेऊन माहिती संकलित केली आहे.

### ३.१०.२ दुय्यम सामग्री :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने दुय्यम स्त्रोत म्हणून संशोधकनासंबंधी विविध पुस्तके, शासकीय योजना, विविध अहवाल आणि प्राथमिक स्त्रोताबरोबर या विषयासंबंधी दुय्यम सामग्री संकलित केली आहे. शासकीय आणि निमशासकीय कार्यालयाद्वारे प्रकाशित होणारी संशोधनासाठी उपयुक्त माहिती व आकडेवारी संकलित केली आहे. स्वंयसहाय्यता महिला बचतगटासंबंधी पुस्तके, मासिक, हॅण्डबुक, दैनिके, पुरवण्या, ॲग्रोवन इत्यादी प्रकाशित साहित्यातून माहिती व आकडेवारी संकलित केली आहे.

## ३.११ तथ्याचे विश्लेषण :

उपलब्ध प्राथमिक माहिती आणि आकडेवारीचे विविध तक्त्यामध्ये वर्गीकरण करण्यासाठी संगणकामध्ये नकाशे समाविष्ट असलेल्या विविध संस्थामधील सांख्यकिय माहितीचा (SPSS) उपयोग करून ते सरळ व दुहेरी

तक्ते तयार केले आहेत. आवश्यक तक्त्याचे आलेख तयार केले आहेत. उपलब्ध माहितीचे नुसार रोजगार निर्मितीत महिला बचतगटांचा सहभाग असून महिला आर्थिकदृष्टया सक्षम होण्यास महिला बचतगट माध्यम महत्वाचे ठरले आहे. उपलब्ध तथ्याचे ग्रामीण महिलामधील स्वंयप्रेरित रोजगारनिर्मित्या दृष्टिकोणातून विश्लेषण केलेले आहे.

## ३.१२ प्रकरणाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| प्रकरण १ | — | प्रस्तावना : स्वयंसहाय्यता बचत गट पार्श्वभूमी कार्यपध्दती. |
| प्रकरण २ | — | प्रस्तुत संशोधनास अनुसरून असलेल्या अभ्यासाचा आढावा. |
| प्रकरण ३ | — | संशोधन पध्दतीशास्त्र. |
| प्रकरण ४ | — | संशोधनासाठी निवडलेल्या सांगली जिल्हयाची रूपरेषा |
| प्रकरण ५ | — | स्वयंसहाय्यता महिला बचत गट चळवळीची वाटचाल भारत, महाराष्ट, सांगली. |
| प्रकरण ६ | — | महिला स्वयंसहाय्यता बचत गटातील प्रतिसादकांची वैयक्तिक आर्थिक, कौटुंबिक पार्श्वभूमी. |
| प्रकरण ७ | — | निष्कर्ष व शिफारशी. |

# प्रकरण ४ थे
# सांगली जिल्हा पार्श्वभूमी व रूपरेषा

## ४.१ प्रस्तावना

सांगली नगरी ही अनेक कर्तृत्ववान आणि कल्पक कार्यकर्त्यांनी वसविलेली आहे. अगदी शेदिडशे वर्षाचा इतिहास असला तरी सांगली आज महाराष्ट्रातले एक प्रमुख केंद्र आहे. व्यापार, उद्योग, कारखानदारी, शिक्षण, सहकार, शेती, कला, क्रीडा या सर्व क्षेत्रात सांगली अग्रेसर आहे. चिंतामणराव पटवर्धनांनी ही सांगली वसविली आणि मा. पद्‌मभूषण वसंतदादा पाटील यांनी ही सांगली सुंदर विकसित केली आहे. श्री. गजाननाच्या कृपा छत्राखाली या सांगली नगरीत लक्ष्मी आणि सरस्वती सुखाने नांदत आहेत. या सांगलीत धनवानांच्या नाण्यांचा खणखणाट आहे. तसेच गुणवंतांच्या गुणांचा बाणा झंकारही आहे. सांगलीतील श्री गणपतीचे देवालय म्हणजे सांगली वासियांच्या श्रध्देचे आगार आहे. दिवस उजाडला की, आपल्या नैमित्तीक कामाला सुरू करण्यापूर्वी सांगलीतील बहुसंख्य नागरीक मंदिरात जाऊन विघ्नहर्त्याचे दर्शन घेतात. त्याच्यापुढे मस्तक भनमवून ''मंगलमूर्ती मोरया'' चा गजर हा दिनक्रम आहे.

इंग्रजानी हिंदुस्थानावर जितके वर्षे राज्य केले जवळजवळ तितकीच वर्षे (१८०१ ते १९४७) पटवर्धन सरदारांनी सांगली संस्थानावर राज्य केले. पण इतर संस्थानिकाप्रमाणे मदिरामदिराश्री, रेस इ. दुष्टप्रवृत्तीच्या मागे न लागता नेकीने राज्य कारभार केला. चांगल्या परंपरा निर्माण केल्या आणि ब्रिटिश शिस्तीनुसार त्याचे संवर्धन केले. त्यामुळेच तर काही संस्थांनाच्या तुलनेत नगण्य असूनही सांगलीचा दबदबा सर्वत्र राहिल्याने सांगली बहु चांगली हा एक वाक्यप्रचार सर्वत्र रूढ झाला आहे. त्या परंपरा व त्यांची पार्श्वभूमी हा खरा तर खूप मोठा आवाका असलेला विषय आहे. ऐतिहासिकदृष्टया सांगलीचा जन्म १८०१ सालचा आहे. पेशवाई कालखंडात मिरज परगणा ही पटवर्धन सरदारांची मोठी जहागीर कौटूंबिक कुरबुरीला कंटाळून थोरले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांनी पेशवे सरकारच्या मध्यस्थानुसार जो मुलुख स्वतःच्या वाटणीला आला. त्याचे वेगवेगळे संस्थान बनवले त्यातूनच कृष्णा नदीकाठची सांगली संस्थानची राजधानी बनवली. सहा गल्ल्यांचे छोटे नगण्य गाव असलेल्या सांगलीला त्यामुळे महत्व प्राप्त झाले.

सांगली संस्थानवर तीन अधिपतीनी राज्य केले. १. चिंतामणराव (१८०१ ते १८५१) २. तात्यासाहेब (१८५१ ते १९०१) ३. दुसरे चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (१९०१ ते १९४८) हे तीन अधिपती सांगली नगरीचे भूषण आहेत. भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र मिळाल्यानंतर दुसऱ्या चिंतामणरावांनी ८ मार्च १९४८ रोजी सांगली संस्थान स्वतंत्र भारतात विलीन केले.

सांगली नगरी म्हणजे नाटयपंढरी असल्याने पहिले नाटक रंगभूमीवर १९४३ साली अवतरले ते या सांगलीतूनच, याचे श्रेय विष्णूदास भावे यांचेकडे जाते. महत्वाची विशेष गोष्ट म्हणजे आज जी नाटयकंपन्यांची नाटके घेऊन गावोगावी दौरे करण्याची परंपरा महाराष्ट्रात सुरू झाली आहे. ती सुध्दा विष्णुदास भावे यांच्या काळात सांगलीतूनच सुरू झाली. विष्णुदासांच्या सांगलीतून अनेक नाटक कंपन्या उदयास आल्या होत्या. सुदैवाने पुढे गोविंद दलाल देवल आणि कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर हे मराठीतील मातब्बर नाटककार सांगलीतून उदयास आल्याने सांगली ही नाटयपंढरी म्हणून सर्वत्र ख्यातनाम झाली आहे.

संस्थानी काळात सांगलीतून आणखी मोठी पंरपरा निर्माण झाली ती गणपती उत्सवांनी सर्व पटवर्धन सरदार हे गणपती भक्त सांगली संस्थान स्थापन झाल्यावर आणि स्थिरस्थावर झाल्यानंतर थोरल्या चिंतामणरावांनी १८११ साली सांगलीत गणपती मंदिर बांधण्यास सुरूवात केली व तब्बल ३० ते ३२ वर्षे काम चालू होते. १८४४ साली बांधकाम पूर्ण झाले. तेव्हापासून मोठया श्रध्देने गणेश ऊत्सव सुरू आहे. लो.. टिळकांनी या उत्सवाला सार्वजानिक स्वरूप दिल्याने सांगली नगरी दुमदुमून जाते. सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण सुरू करणारे सांगली हे तत्कालीन मुंबई प्रांतातील पहिले संस्थान होते असे सुप्रसिध्द लेखक सय्यद अमीन यांनी नमूद केले आहे. सांगलीचे राजेसाहेब (दुसरे चिंतामणराव) स्वत: शिक्षणप्रेमी असल्याने विलिंग्डन कॉलेज १९१९ व वालचंद कॉलेज १९४७ स्थापनेसाठी त्यांनीच प्रयत्न केले होते. त्यामुळेच सांगली जिल्हा हे महाराष्ट्रातील शिक्षणाचे मोठे ज्ञान केंद्रच निर्माण झाले आहे. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यानंतर उत्तम शैक्षणिक परंपरा असलेले गाव म्हणून सांगली सर्वाना परिचित आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाचा कायापालट करणाऱ्या व्यक्तींमध्ये कै. आबासाहेब शिंदे, म्हैसाळकर यांचा समावेश आवर्जून करावा लागेल. पारंपारिक पध्दतीने दुमडून केलेल्या शेतकरी वर्गाला व प्रामुख्याने कोरडवाहू रानाचा तुकडा आयुष्यभर सांभाळून स्वत:चा उदरनिर्वाह न करता येणाऱ्या अल्पभूधारकांना जलसिंचन योजना जीवनदान ठरल्या. सांगली जिल्हयात नद्यांचे पोट फोडून शेतकऱ्यांच्या जीवनात बदल करण्यांचे स्वप्न त्यांनी पूर्ण केले. यात सांगली जिल्हयाच्या जलसिंचन योजनाच साक्ष देतात. कर्तृत्व, श्रध्दा आणि प्रत्यक्ष योजना अशा तिहेरी संगमातून स्वहिताची कास न धरता सर्व सामान्य माणसाच्या मनात घर करण्याचे सामर्थ्य कै. आबासाहेब शिंदे म्हैसाळकर यांच्यामध्ये होते. अशा ध्येयवेडया माणसाची गरजा समाजकारणाला, अर्थकारणाला एकूणच महाराष्ट्राच्या कायापालट करण्यासाठी आवश्यक आहे. अशी माणसे दुदैवाने एका हाताच्या बोटावर मोजण्याइतपत असली तरी सुरूवात सांगली जिल्हयातून झाली आहे.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला नवी दिशा देणाऱ्या अनेक नामवंत व्यक्ती नेते होऊन गेले. कै. वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव

गाडगीळ, पद्‌मश्री डॉ. विठठ्लराव विखे पाटील, महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, पद्‌मभूषण वसंतदादा पाटील, कर्मवीर तात्यासाहेब मोहिते, तात्यासाहेब कोरे, म.ह. गोडबोले, गुलाबराव पाटील, वि. स. पागे यासारख्या थोरांनी सहकारी चळवळ राज्यात रूजावली. यापैकी बरीच मंडळी सांगली जिल्हयाच्या लौकीकात भर घातली आहे. रूढ पारंपारिक शिक्षणापेक्षा स्वानुभवातून शिकत राहणे, मुंगीप्रमाणे स्वानुभवाचे शहाणपणाचे कणकण गोळा करून हजारांच्या हातांनी सामाजिक, सहकार विधायक कार्याचा आश्‍र्चजनक मेरूपर्वत उभा करणे, अशी जन्मजात वृत्ती ज्याच्या रक्तात होती असे हे स्मृतीशेष व्यक्तीमत्व आणि सांगली जिल्हयाच्या नावाची नोंद आपल्या अर्थपूर्ण जगण्याने भारताच्या पटलावर करणाऱ्या कै. वसंतदादा पाटील हे होय. कै. वसंतदादा पाटील सांगली जिल्हयातील पद्‌माळ या छोटया गावातील शेतकरी कुटूंबात जन्मास आले. पद्‌माळच्या कृष्णाकाठच्या क्रांतीकारी मातीतले हे रोपटे वाढत जाऊन त्याची पाळेमुळे कृष्णे पासून ते थेट यमुनेपर्यत पसरत जाऊन देशभर विस्तारली. असे हे सांगली जिल्हयातील पद्‌माळ गावचे अजरामर व्यक्तीमत्व सांगली जिल्हयाचे भूषण आहे.

मराठी चित्रपट सृष्टीतील चंद्रसुर्य म्हणून ओळखले जाणारे चंद्रकांत व सूर्यकांत हे सांगलीचेच. महाराष्ट्राचा ज्ञानयोगी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची ज्ञानगंगा झोपडीपर्यत नेऊन पोहचवली. शैक्षणिक क्रांती केली असे शिक्षणप्रेमी भाऊराव ऐतवडे बुद्रुक जि. सांगलीचे भाऊराव पाटील यांचा जन्म आजोळी कुंभोज जि. कोल्हापूर येथे २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. जुन्या पिढीच्या प्राच्यविद्या संशोधकांच्या परंपरेचे शेवटचे शिलेदार म्हणून डॉ. गणेश वासुदेव तगार हे होय. सलग सात दशक या व्यक्तीने भारतीय पुराण साहित्यांचा बारकाईने अभ्यास व संशोधनपर अनेक ग्रंथ लिहिले. प्राचीन भारतीय वाङःमय, भाषाशास्त्र, व्याकरण यासारख्या बहुविध शाखामध्ये मुलगामी संशोधन करून जागतिक स्वरूपाची किर्तीचे डॉ. तगार हे मूळचे सांगली जिल्हयातील आष्टा गावचे होते.

कर्मवीरांचा वारसा आणि निसर्गाने काहींना बुध्दीमत्तेची व स्मरणशक्तीची असामान्य देणगी दिलेली असते. त्यापैकी बॅ. पी.जी. पाटील यांचा जन्म सांगली जिल्हयातील कवलापूर या लहानशा गावात झाला. पांडूरंग गणपती पाटील आजची प्रसिध्द गायिका आशा खाडीलकर व शिवाजी विद्यापीठाच्या ललित कला विभागाच्या प्रमुख डॉ. भारती वैशंपायन हया सांगलीच्या श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी आहेत. शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे हे सांगली जिल्हयातील धनगांवचे आहेत. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सांगली जिल्हयाच्या वाळवा तालुक्याचे महनीय व्यक्तीमत्व म्हणून जागतीक पातळीवर त्यांचा नावलौकीक आहे.

सांगली जिल्हयाची किर्ती जशी कर्तुत्ववान व्यक्तीमुळे पसरली तशीच ती मळीकाठची वांगी, भुईमुगाच्या शेंगा, मक्याची कणसं, उसाचा

रस, फिके पेढे, कुरकुरीत चटकदार भडंगामुळे सर्वत्र प्रसिध्दी मिळाली आहे. सांगलीतील कर्तबगार व्यक्तीनी जसे सांगली जिल्हयाचं नाव पुढे केले. तसेच काही संस्थंमुळेसुध्दा सांगली नावाजली आहे. सांगली जिल्हा वाचनालय एक सांस्कृतिक विचारमंच म्हणून या संस्थेची स्थापना १८६९ मध्ये झाली आहे. चेंबर ऑफ कॉमर्स शतक पूर्तीकडे वाटचाल करणारी गौरवशाली संस्थेची स्थापना १० जुलै १९१० रोजी तत्कालीन सांगली संस्थानचे अधिपती श्रीमंत दुसरे चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांच्या प्रेरणेने झाली आहे. सांगली अर्बन को. ऑप. बॅक लि. ची स्थापना ४ नोव्हेंबर १९३५ रोजी सांगली संस्थानच्या सहकारी कायद्याखाली झाली. सांगली बॅक लि. ची १९१६ रोजी स्थापना झाली. सर्वात जुनी बॅक म्हणून लैकिक असून देशात सहा राज्यामध्ये मिळून बॅकेच्या १८४ शाखा आहेत. व्यापार व उद्योग क्षेत्रात सांगलीला या बॅकेमुळे मोठे नांव मिळाले. १७० पेक्षा जास्त काळ परंपरा असलेली मे. पुरूषोत्तम नारायण गाडगीळ सराफी पेढी १८३२ साली स्थापन झाली. अनेक सराफी पेढया मागे पडल्या. काही नामशेष झाल्या पण गाडगीळ यांची सुवर्णपेढी मात्र आज एखादया बोधीवृक्षाप्रमाणे विस्तार पावत आहे.

वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. सांगली सारख्या ठिकाणी साखर कारखान्याची उभारणी ही पन्नास वर्षापूर्वीची एक प्रकारची क्रांतीच म्हणावी लागेल. सांगली माधवनगर रस्त्यावरील ९० एकर जागेवर १९५८ मध्ये कै. वसंतदादा पाटील यांच्या प्रयत्नाने पहिला गळीत हंगाम सुरू केला. या कारखान्यामार्फत डॉ. वसंतदादा पाटील इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सांगली हे इंजिनिअरिंग कॉलेज व पॉलिटेक्नीकही १९८३ पासून चालवले जाते. सहकारी क्षेत्रात साखर आणि उपपदार्थाचे उत्पादन करणारा आशिया खंडातील सर्वात मोठा कारखाना अशी या कारखान्याची प्रसिध्दी आहे.

तरूण भारत व्यायाम मंडळ जुन्या जमान्यातील वैशिष्ठपूर्ण व्यक्तीमत्वाचे क्रीडा शिक्षक कै. नाना देवधर यांनी १९३० मध्ये या संस्थेची स्थापना केली. १८८४ साली सांगलीत सांगली हायस्कूल या जुन्या हायस्कूलची स्थापना झाली. सद्या नव्वदीकडे वाटचाल करणाऱ्या सिटी हायस्कूलची स्थापना ४ डिसेंबर १९१४ साली झाली आहे. २२ जून हा भौगोलिकदृष्टया मोठा दिवस असेल पण सांगलीकरांच्या दृष्टीने नक्कीच हा मोठा दिवस आहे. कारण या दिवशी म्हणजे २२ जून १९१९ रोजी विलिंग्डन महाविद्यालय, सांगली नगरीतील पहिल्या महाविद्यालयाची स्थापना झाली. त्याच्यापुढे सांगली मिरज रस्त्यावर १०० एकरांच्या विस्तृत जागेत १९४७ साली वालचंद कॉलेजची स्थापना झाली. आज या महाविद्यालयाच्या आवारात आधुनिक पध्दतीची वास्तु शिल्पकलेचा एक उत्तम नमुना म्हणून ही इमारत प्रेक्षणिय आहे.

जेष्ठ समाजसेवक बापूराव साठे यांनी स्थापन केलेली आणि वा. द. नामजोशी सरांनी अल्पावधीत नावारूपाला आणलेली स्वा. सावरकर प्रतिष्ठान ही संस्था १९७३ साली स्थापन झाली.

आधुनिक काळात सांगलीच्या वैभवात भर टाकणाऱ्या ज्या काही भव्य इमारती उभ्या राहिल्या त्यातील भारती विद्यापीठ विभागीय कार्यालय, सांगली या संस्थेची सात मजली इमारत सर्वाचे लक्ष वेधून घेते. या इमारतीचे बांधकाम १९८९ मध्ये पूर्ण झाले. मा. नामदार डॉ. पतंगराव कदम यांच्या नेतृत्वाखाली भारतात अनेक ठिकाणी सांगली जिल्हयाचे नांव शैक्षणिक क्षेत्रात उज्वल केले आहे. सांगली जिल्हयात स्थापन झालेल्या भारती विद्यापीठाच्या कामाला खऱ्या अर्थाने सुरूवात १९८३ साली झालेली आहे.

सांगलीत येणाऱ्या पर्यटकांसाठी आराध्य दैवत श्री गणपती मंदिर, बागेतील गणपती, आर्यविन पूल, सांगली वस्तुसंग्रहालय, अंबराई, प्रतापसिंह उद्यानही प्रेक्षणीय स्थळे तर आहेतच तसेच हरीपूर सांगलीवाडी परिसरातील हळदीचे पेवे आवश्य पाहण्यासारखी आहेत. तासगांव येथील मराठयांचे दक्षिणेतील सेनानी परशुराम भाऊ पटवर्धन यांनी तासगांव येथे भव्य गोपूर असलेले गणेशमंदीर १७९९ मध्ये बांधले असून ते अति प्राचीन वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना आहे. त्याशिवाय मिरज व कवठेमहांकाळ तालुक्याच्या सरहदद्दीवर असलेल्या दंडोबा डोंगरावरील शिवमंदीर, ब्रम्हनाळ येथील कृष्णा, येरळा नदयांच्या संगमाजवळील महादेव मंदीर, हरिपूर येथील कृष्णा वारणा नदयांचा संगम, बहे तालुका वाळवा येथील रामलिंग मंदीर, किल्ले मच्छिंद्रगड येथील नाथ संप्रदायातील मच्छिंद्रनाथाची समाधी, परिसरातील मंदिरे, औदुंबर, नरसोबावाडी ही देवस्थाने पाहण्यासारखी आहेत. निसर्गप्रेमीसाठी सागरेश्वर, चांदोली सारखी अभयारण्ये, शुक्राचार्याचा डोंगर आणि डोंगरावरील मंदीरे पुढे पाचगणीसारखी निसर्गरम्य ठिकाणे ही मोठीच आकर्षणाची ठिकाणे आहेत. खिद्रापूरची लेणी प्रेक्षणिय आहेत. मिरजेतील मंदीरे, समर्थ श्री या वेणाबाईचा मठ, हजरत मिरासाहेब दर्गा, करगणीचे मंदीर अशी सांगली जिल्हयाच्या आसपास मुदद्दाम भेट देण्यासारखी ठिकाणे आहेत. बत्तीस शिराळयाच्या नागपंचमीच्या उत्सवासाठी आणि जिवंत नाग पकडण्यामधील थरार अनुभवण्यासाठी दूरदूरचे पर्यटक आवर्जून सांगलीत येतात. पुढील काळात कुणा कल्पक प्रवासी संस्थेने सांगली दर्शन अशी नैमित्तीक सहल सुरू केली तर आश्चर्य वाटायला नको इतकी गुणवत्ता सांगली जिल्हा परिसरात निश्चित आहे.

सांगली जिल्हा म्हणजे नररत्नांची खाणच आहे. स्वर्गीय वसंतदादा पाटील, क्रांतीसिंह नाना पाटील, बर्डे गुरुजी, बाबूरावजी पाटणकर, कासेगांवकर वैद्य, शिरगावचे रंगराव पाटील चरणकर, गणपतराव पाटील बिळासकर, मा.सु. कांबळे गुरुजी कवलापूर, बॅरीस्टर बी.सी. कांबळे पलूस, असे एकाहून एक बुलंद आवाजाचे क्रांतीकारक झाले. क्रातीवीर

नागनाथ आण्णा नायकवडी व क्रांती अग्रणी जी.डी. बापू लाड हया दोन श्रेष्ठ माणसांनी आपल्या क्रांती कार्याला आणखी एक विलोभनीय अशीच किनार प्राप्त करुन दिली आहे. ही त्यांच्या स्वातंत्र चळवळीतील असाधारण कागगिरी इतकीच महत्वाची आहे. स्वातंत्र प्राप्तीनंतर आदरणीय नागनाथ आण्णा नायकवडी व आदरणीय जी.डी. बापू लाड हयांनी समाज बांधणीचे चांगले काम उभे केले आहे. शिवाजी विद्यापीठाने क्रातीवीर नागनाथ आणा नायकवडी यांच्या समाजकार्याची नोंद घेऊन त्यांना डी. लिट या बहुमानाने सन्मानित करुन सांगली जिल्हयाचा माथा आणखीणच उंच केला आहे. शिक्षणाच्या माध्यमातुन सांगली जिल्हयाचे थोर सुपुत्र कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ऐतिहासिक स्वरुपाचे काम उभे करुन बहुजन समाजाच्या शिक्षणाला एक अधिष्ठान प्राप्त करुन दिले आहे. असा हा जिल्हा क्रांतीकारकांचा तसाच लेखक शाहिरांचा आणी रचनात्मक कार्याचा आहे.

स्वातंत्र चळवळीत झोकून देऊन बाबुरावजी पाटणकर यांनी जे कार्य केले त्यांच्या कामाचा वसा घेऊन त्यांचे सुपुत्र डॉ. भारत पाटणकर यांनी संघर्षातुन जे रचनात्मक कार्य उभे केले आहे. त्यांचे पण सांगली जिल्हयाच्या सामाजिक इतिहासात महत्व आहे. याबरोबरच बलवडी येथील संपतराव पवार यांच्या हुतात्मा स्मारकाच्या कामाबददल म्हणता येईल. सांगलीत असेच मोलाचे काम शांतिनिकेतन लोक विद्यापीठाच्या माध्यमातुन प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील यांनी उभे केले आहे. डॉ. पंतगराव कदम यांनी भारती विद्यापीठाच्या माध्यमातुन जिल्हयात व जिल्हयाबाहेर दर्जेदार काम केले आहे.

सांगलीत लिहीत असलेले अनेक लेखक, कवी मंडळी ही आहेत. श्रीरंग विष्णू जोशी, कविवर्य प्रदीप पाटील, जी.के. ऐनापुरे कथालेखक, नाटककार अरुण मिरजकर, अरविंद लिमये, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वसा घेऊन जाणारे प्रा. गौतमीपुत्र कांबळे असे अनेक सांस्कृतिक क्षेत्रातील सांगलीची मंडळी आज आम्हा सर्वाचे अभिमानाचे स्थान बनलेले आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात अंत्यत सहज वावर असलेले सांगलीचे आदरस्थान व बलस्थान म्हणुन गुरुवर्य म. द. हांतकणंगलेकर सांगलीत भरलेल्या ८१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले याचा प्रत्येक सांगलीकरास जास्त अभिमान आहे.

## ४.२ सांगली जिल्हा भौगोलिक रचना

सांगली शहर हे भारतात दख्खनच्या पठारावर महाराष्ट्र राज्यात कृष्णा नदीच्या पूर्वतीरावर वसलेले आहे. या शहराचे पूर्व रेखांश ७४/४८ व अक्षास १६/४४ असे आहेत. शहराचा एकंदर उताराचा भाग पश्चिमेस नदीकडे आहे. कृष्णा नदी सांगली शहराच्या सीमेत उत्तरेकडुन

दक्षिणेकडे वाहते. जुना गांवभाग इतर भागापेक्षा थोडा उंच आहे. पूर्व बाजूस या शहरात खडक दोन फुटावर आहे. पण पश्चिम बाजूस तीस फुट खोलीवरही खडक लागत नाही. कृ"णा नदीला २६ जुलै २००६ मध्ये मोठा पूर आला असता शहरात पाणी घुसले होते. कोयना धरण झाल्यापासुन धोकादायक पुराचे प्रमाण कमी झाले आहे. सांगली शहराचे कमाल उष्णतामान ४१.५ व किमान उष्णता १७ आहे. शहरातील पावसाचे प्रमाण सरासरी ६८१५ मि.मि. आहे. सांगली शहराचे क्षेत्र ७००० एकर आहे. त्यातील सुमारे ३००० एकर क्षेत्र गांवठाणात समाविष्ठ झाले आहे. पूर्वी शहर आखणीच्यावेळी १८०७ मध्ये गांवठाण क्षेत्र ८०० एकर होते.

सांगली शहराजवळील सांगलीवाडी ही पूर्वी गवळीवाडा या नांवाने प्रसिध्द होता. हा गवळीवाडा सांगली, इस्लामपूर रस्त्यावरील लक्ष्मीच्या देवळाजवळ वसलेला आहे. सांगली डिग्रज सीमेवर कृष्णा नदीकाढाला या गवळीवाडयाचा पाणवठा होता. सन १८५३ साली कृष्णा नदीला आलेल्या महापुराने या गवळीवाडयाचे स्थलांतर झाले. सद्या नदीच्या पश्चिमेस सांगलीवाडी म्हणुन संबोधण्यात येणाऱ्या ठिकाणी ही वसाहत अलीकडे सांगली जवळची ही वसाहत म्हणून हिला सांगलीवाडी असे म्हटले जाते.

देशाला स्वातंत्र मिळाल्यानंतर १९४९ मध्ये तत्कालीन सातारा जिल्हयामधील तासगांव, खानापूर, वाळवा व शिराळा हे चार तालुके हस्तांतरीत करण्यात आले. तसेच राजाच्या संलग्न भागातुन मिरज व जत हे आणखी दोन तालुके निर्माण झाल्याने सहा तालुक्याचा दक्षिण सातारा नावाचा नवीन जिल्हा स्थापन करण्यात आला. त्यामध्ये प्रामुख्याने औद्य, जत, सांगली कृरुंदवाड, मिरज या संस्थानाचा समावेश करण्यात आला होता. कालातंराने दिनांक २१ नोव्हेंबर १९६० रोजी दक्षिण सातारा हे नांव बदलून सांगली असे करण्यात आले. १९६५ साली मिरज व खानापूर तालूक्याचे विभाजन झाल्याने कवठेमहकांळ व आटपाडी असे नवीन दोन तालुके निर्माण करण्यात आले. यानंतर पुन्हा १ जुलै १९९९ रोजी खानापुर (१३ गांवे) व तासगांव (३९ गांवे ) या दोन तालुक्याचे विभाजन केल्याने पलूस हा (५२ गावाचा) नविन तालुका स्थापन करण्यात आला आहे. यानंतर दिनांक २८.३.२००२ रोजी पलूस मधील १३ गांवे आणि खानापूरमधील ४२ गांवे जोडून कडेगांव हा नवीन दहावा तालुका निर्माण करणेत आला आहे. त्याचा परिणाम म्हणून पलूस तालुका हा ३९ गांवाचा सध्या आहे. आज सांगली जिल्हा दहा तालुक्यांचा निर्माण झाला असून जिल्हयात सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका १९९८ सालामध्ये उदयास आली आहे. याबरोबरच इस्लामपूर, आष्टा, तासगांव व विटा या चार तालुक्यामध्ये नगरपालिका कार्यरत आहे. शिराळा, वाळवा, पलूस, खानापूर, आटपाडी, तासगांव, मिरज, कवठेमहकांळ, जत, कडेगांव अशा दहा तालुक्याने सांगली जिल्हा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रामध्ये उत्तंग भरारी झेप घेत आहे. त्यामुळे सांगलीचा जिल्हयाचा विकास साधलेला आहे. म्हणुन सांगली बहुगुणी चांगली ही युक्ती पुढे आली.

सांगली जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ ८५७२ चौ. कि.मी. आहे. भौगोलिक क्षेत्रफळाचा दृष्टीने महाराष्ट्र राज्यामध्ये सांगली जिल्हा २१ व्या क्रमांकावर आहे. जिल्हयाचा विस्तार १६.४५ अंश ते १७.२२ अंश उत्तर अक्षांस इतका असून ७३.४२ अंश ते ७५.४० अंश पूर्व रेखांश असा आहे. जिल्हयाची पूर्व पश्चिम लांबी साधारण २०५ कि.मी. असून दक्षिण उत्तर रुंदी अंदाजे ९६ कि.मी. इतकी आहे. समुद्र सपाटीपासूनची जिल्हयाची उंची ५५३ मिटर आहे. जिल्हयाच्या उत्तरेला सातारा आणि सोलापूर जिल्हा आहे. दक्षिणेस कोल्हापूर व कर्नाटक राज्यातील बेळगांव जिल्हा आहे. पूर्वेस विजापूर जिल्हा आणि पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा वसलेला आहे. पर्जन्यमान, सुपष्ठ, हवामान, यांच्यानुसार जिल्हयाचे तीन भागात विभागणी झालेली आहे.

- ❖ पश्चिमेकडील डोगंराळ व जास्त पावसाचा प्रदेश.
- ❖ नदयाच्या सानिध्यातील माध्यम पावसाचा सपाट प्रदेश.
- ❖ पूर्वेकडील पठारांचा व कमी पावसाचा काहीसा दुष्काळी प्रदेश.

सांगली जिल्हयाचा पश्चिमेकडील डोंगर रांगा व त्यातुन निघणाऱ्या भैरवगड डोगररांगा मुख्यतः शिराळा व वाळवा मधील पश्चिम भाग व्यापलेला आहे. कृष्णा, वारणा, येरळा या नदयांच्या मध्यम पावसाचा सपाट सुपीक प्रदेश यामध्ये मिरज, पश्चिम व उत्तर भाग पलूस, वाळवा, शिराळा पूर्वेकडील भाग येतो. पूर्वेकडील भागात पाऊस कमी पडतो. यामध्ये आटपाडी, जत, कवठेमहकांळ, खानापूर, या तालुक्यांचा समावेश होतो. तसेच मिरज व तासगांव या तालुक्यांचा पूर्व भागाचाही समावेश होतो.

सांगली जिल्हा पुणे महसुल विभागात व कोल्हापूर कृषि विभागात येतो. जिल्हयात एकूण १० तालुके असून ७०५ गांवे आहेत. यापैकी खरीपाची ६२९ व रब्बीची १०२ गावे आहेत. जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्र ८६१०६५ हेक्टर असून ५९५००० हेक्टर हे निव्वळ पिकाखालील क्षेत्र आहे. दुसोटा पिकाखालील क्षेत्र ९१०० हेक्टर आहे. एकूण पिकाखालील क्षेत्र ६८६००० हेक्टर इतके आहे. सांगली जिल्हयात एकूण बागायती क्षेत्र १४७००० हेक्टर असून विहीरीखालील ९५४०० हेक्टर आहे. तसे विहीरीव्यतिरिक्त ३५००० हेक्टर असून दुसोटा बागायत २६१०० हेक्टर आहे.

## ४.३ सांगली जिल्हा कृषी विभाग संक्षिप्त :

जिल्हयामध्ये गेल्या तीन वर्षात अल्पप्रमाणात व पावसातील खंडामुळे पेरणी कमी झालेली असून गेल्या ३ वर्षात खालीलप्रमाणे पाउस झालेला आहे.

| अ. क्र. | वर्ष | सरासरी पाऊस ( मि.मि .) | पडलेला पाऊस ( मि.मि .) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | २००३—२००४ | ५१८.७० | ५४५.४० | १०५.२० टक्के |
| २. | २००४—२००५ | ५१८.७० | ३७३.५० | ७२ टक्के |
| ३. | २००५—२००६ | ५१९.०० | २४३.०० | ४७ टक्के |
| ४. | २००६—२००७ | ५१९.०० | ४४२३.६० | ८५२ टक्के |

सांगली जिल्हयामध्ये विविध प्रकारची माती आढळून येते. शिराळा तालुक्यामध्ये पिवळसर तांबडी, तपकिरी, मुरूम मिश्रीत आणि लोहाचे कण अधिक असलेली माती आहे. डोंगराळ उतार सोडल्यास इतर भागात करडया रंगाची माती आहे. कृष्णा, वारणा व येरळा या नदयांच्या खोऱ्यात काळी कसदार उच्चप्रतिची ९० से.मी. पेक्षा अधिक खोल माती आहे. अशा प्रकारच्या जमीनीत वाळवा, तासगांव व मिरज तालुक्यांचा समावेश झालेला आहे.

## ४.४ सांगली जिल्हा तालुका निहाय लोकसंख्या :—

सांगली जिल्हयाची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार २५,८३,५२४ इतकी आहे. या एकूण लोकसंख्येपैकी १३,२०,०८८ पुरूष व १२,६३,४३६ इतकी स्त्रियांची संख्या आहे. सांगली जिल्हा लोकसंख्येत महाराष्ट्रात १५ वा क्रमांक आहे. जिल्हयाची प्रत्येक खेडेगाव सरासरी २६९२ इतकी लोकसंख्या असल्याचे लक्षात येते. जिल्हयाच्या एकूण दहा तालुक्यापैकी सर्वात अधिक लोकसंख्या मिरज तालुक्यात आहे. म्हणजेच ती २९ टक्के इतकी आहे आणि सर्वात कमी लोकसंख्या आटपाडी तालुक्यात असल्याचे दिसून येते. म्हणजेच ती ५ टक्के इतकी आहे. तसेच या जिल्हयाची एकूण साक्षरता ६२०४१ टक्के इतकी असून यापैकी ७४.८८ टक्के पुरूष साक्षर आहेत. तर केवळ ४९.९४ टक्के स्त्रीया साक्षर आहेत.

**आलेख क्र. १**
**सांगली जिल्हयाची लोकसंख्या**

| वर्ष | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|
| ग्रामीण | १०.३९ | १२.५३ | १४.४० | १७.०७ |
| नागरी | १.९२ | २.८७ | ३.९४ | ५.०२ |
| एकूण | १२.३१ | १५.४० | १८.३४ | २२.०४ |

वरील तक्ता क्र. १ मधील आकडेवारीचा विचार करता सांगली जिल्हयातील एकूण लोकसंख्या २५,८३,५२४ इतकी आहे. त्यापैकी २०११ च्या आकडेवारीनुसार ग्रामीण भागातील लोकसंख्या १९ लाख ५० हजाार इतकी म्हणजे ८० टक्के आहे. नागरी भागातील लोकसंख्या ६ लाख ३३ हजार ५२४ म्हणजेच २० टक्के इतकी आहे. याचाच अर्थ ग्रामीण भागातील लोकसंख्या ही नागरी भागापेक्षा अधिक आहे. एकूण शहरी लोकसंख्येपैकी ६९ टक्के लोक सांगली, मिरज, कुपवाड महानगरपालिका क्षेत्रात वास्तव्य करीत आहेत.

**तालुक्याप्रमाणे लोकसंख्या :—**

| नांव | प्रकार | क्षेत्र | गांव | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| मिरज | एकूण | ९२६.१ | ६४ | ६३५ |
| | ग्रामीण | ८४१.९ | ६४ | २७१ |
| | नागरी | ८४.२ | ०० | ३६४ |
| तासगांव | एकूण | ११११ | १०४ | ३४० |
| | ग्रामीण | १०६८०.१ | १०४ | ३१० |
| | नागरी | ४३.१ | ०० | २९ |
| खानापूर | एकूण | १३२६ | १२० | २५४ |
| | ग्रामीण | १२७०.७ | १२० | २२२ |
| | नागरी | ५५.३ | ०० | ३२ |
| आटपाडी | एकूण | ८७१.७ | ६० | ११२ |
| | ग्रामीण | ८७१.७ | ६० | ११२ |
| | नागरी | ०० | ०० | ०० |
| जत | एकूण | २२४६.९ | ११८ | २४१ |
| | ग्रामीण | २२४६.९ | ११८ | २४१ |
| | नागरी | ०० | ०० | ०० |
| वाळवा | एकूण | ८८६.७ | ९४ | ३६३ |
| | ग्रामीण | ६६९.७ | ९४ | २९३ |
| | नागरी | ११७.० | ०० | ७० |
| शिराळा | एकूण | ६३४.९ | १०३ | १४८ |
| | ग्रामीण | ६३४.९ | १०३ | १४० |
| | नागरी | ०० | ०० | ७ |

संदर्भ : (सांगली जिल्हा परिषद, सांगली वार्षिक प्रशासन अहवाल सन २००६—२००७)

## ४.५ सांगली जिल्हा संक्षीप्त व प्रेक्षणीय स्थळे

### ❖ सर्वसाधारण माहिती

| | |
|---|---|
| १. भौगोलिक क्षेत्र | ८५७२ स्क्वे. कि.मी. |
| २. तालुके | १० |
| ३. शहरे | ८ |
| ४. गांवे एकूण | ७०५ |
| निर्जन : | ८ |
| एकूण | ७३४ |
| ५. अवर्षण प्रषण क्षेत्र कार्यक्रमांतर्गत गावे : | ३७४ |
| ६. डोंगरी विभाग | |
| अ) शिराळा तालुका गावे | १२० |
| ब) खानापूर तालुका गांवे | १०३ |

### ❖ कृषी २००० अंतिम क्षेत्र हजार हेक्टरमध्ये

| | |
|---|---|
| १. भौगोलिक क्षेत्र | ८६१.०६५ |
| २. जंगल क्षेत्र | ४८ |
| ३. शेतीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | ७७ |
| ४. बागायती | ५८००१० |
| ५. पिकाखालील क्षेत्र | ११०.७४१ |

### ❖ स्थानिक स्वराज्य संस्था

| | |
|---|---|
| १. पंचायत समित्या | १० |
| महानगरपालिका | ०१ |
| नगरपरिषदा | ०४ |
| ग्रामपंचायती | ७०५ |
| पिकाखालील क्षेत्र | ११०.७४१ |

### ❖ लोकसंख्या २०११ (जनगणनेप्रमाणे)

| | |
|---|---|
| १. एकूण लोकसंख्या | २५,८३,५२४, |
| २. ग्रामीण लोकसंख्या | १९४९००० |
| ३. नागरी लोकसंख्या | ६,३४,५२४ |
| ४. अन. जातीची लोकसंख्या | २,७७,००० |
| ५. अनु जमातीची लोकसंख्या | ११,००० |
| स्त्री पुरूष प्रमाण १००० पुरूष प्रमाणावर | ९५७ |
| लोकसंख्येची घनता ( प्रति चौ.कि.मी) | ३०१ |
| ६. सहकार | |
| अ) एकूण सहकारी संस्था | ४८३४ |
| ब) पैकी दुध उत्पादक सह संस्था | ७६९ |

७. साक्षरतेचे प्रमाण २००१ नुसार

| | |
|---|---|
| १. एकूण टक्केवारी | ७६.७९ |
| २. पुरूष टक्केवारी | ८६.२५ |
| ३. स्त्री टक्केवारी | ६६.८८ |

**❖ पशुसंवर्धन (संख्या हजारात)**

| | |
|---|---|
| १. पशुधन | १४३८ |
| २. गाई व बैल | २२५ |
| ३. म्हैस व रेडे | ४६८ |
| ४ मेंढया व शेळया | ५८३ |
| ५. कोंबडया व बदके | २४८३ |

**❖ जिल्हयामधील पशुवैद्यकीय संस्था**

| | |
|---|---|
| अ) राज्य स्तरावरील | ६० |
| ब) स्थानिक स्वराज्य संस्था | १९७ |
| क) एकूण | २५७ |

**❖ वीज**

| | |
|---|---|
| १. वीज पुरवठा केलेली शहरे | ८ |
| २. वीज पुरवठा केलेल्या खेडयाची संख्या (संख्या हजारात) | ७२४ |
| ३. वीज पुरवठा केलेले पंप | ११३ |
| ४. गोबर बॅस संयंत्रे | ०६४३ |

**❖ सार्वजनिक आरोग्य**

| | |
|---|---|
| १. ग्रामीण रूग्णालये | १७ |
| २. दवाखाने | ७० |
| ३. प्राथमिक आरोग्य केंद्रे | ५९ |
| ४. प्राथमिक आरोग्य पथके | ०२ |
| ५. एकात्मिक बालविकास योजनागट | ०८ |

**❖ शिक्षण**

**अ) प्राथमिक शिक्षण ( संख्या हजारात)**

| | |
|---|---|
| १. एकूण प्राथमिक शाळा | १८४५ |
| २. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी | ३०५ |
| ३. प्राथमिक शाळेतील शिक्षक | ००९ |
| ४. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी | ३३ |

**ब) माध्यमिक शिक्षण ( संख्या हजारात)**

| | |
|---|---|
| १. माध्यमिक शाळा | ४२६ |
| २. माध्यमिक शाळेतील विद्यार्थी | १४५ |
| ३. माध्यमिक शाळेतील शिक्षक | ००४ |

**क) उच्चशिक्षण**

| | |
|---|---|
| १. वरिष्ठ महाविद्यालये | ५५ |
| एकूण विद्यार्थी | ३६००० |

**ड. तांत्रिक शिक्षण**

| | |
|---|---|
| अ) औद्योगिक प्रशिक्षण संस्था | १५ |
| १. शासकीय व शासन सहयीत | ०८ |
| २. अशासकीय (इतर) | ०७ |
| ब) शासकीय शासन सहायीत व इतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये मंजूर झालेल्या जागा (विद्यार्थी) | १५४० |

**❖ वहातूक व दळणवळण**

| | |
|---|---|
| १. एकूण रेल्वेमार्ग लांबी कि.मी. | १७३.२० |
| २. एकूण रस्त्याची लांबी किं.मी. | ९७०३ |
| ३. राष्ट्रीय महामार्गाची लांबी कि.मी | ३० |
| ४. राज्य महामार्गाची लांबी कि.मी | ९३१ |
| ५. महत्वाच्या जिल्हा रस्त्यांची लंाबी कि मी | २२२८ |
| ६. इतर जिल्हा रस्त्यांची लंाबी किं मी | २७१५ |
| ७. ग्रामीण रस्त्यांची लांबी कि मी | ३३४४ |
| ८. एकूण पोस्टाची संख्या | ४१६ |
| ९. एकूण तारघरांची संख्या | ९८ |
| १०. एकूण दूरध्वनी संख्या | ४४१०२ |

**❖.एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम**

| | |
|---|---|
| १. दारिद्रय रेषेखालील कुटुंबे | ७८८८० |
| २. लाभार्थी | ६०६८८ |

**❖मागासवर्गीयांचे कल्याण**

| | |
|---|---|
| १. वस्तीगृह — राज्यक्षेत्र | १० |
| २. वस्तीगृह — स्थानिक क्षेत्र | ६२ |
| ३. वस्तीगृहात राहणारे विद्यार्थी राज्यक्षेत्र | ६८० |
| ४. वसतीगृहात राहणारे विद्यार्थी स्थानिकक्षेत्र | ३०९८ |

**❖ जिल्हा नियोजन**

| | |
|---|---|
| १. जिल्हा वार्षिक योजना (१९९६—९७) खर्च लाखात (बिगर आदिवासी, आदिवासी क्षेत्राबाहेरील व स्थानिक विकास कार्यक्रमासह) | ४०३९.१२ |
| २.स्टेट पूल योजना | २६७६.३८ |
| ३.अनुशेषाचा कार्यक्रम (जिल्हा स्तर व राज्य स्तर योजना) | ६१८.६५ |

**❖ नागरी पुरवठा**

| | |
|---|---|
| १. रास्त भावाची दुकाने | १२२३ |
| २. शासकीय गोदामे | २९ |
| ३. गोदामाची साठवणूक क्षमता मे. टन | १३७६० |

**❖ बॅका कार्यालये**

| | |
|---|---|
| १. राष्ट्रीयकृत बॅकाच्या शाखा | १७५ |
| २. सहकारी बॅकाच्या शाखा | ३८८ |

❖**नद्या** :— कृष्णा वारणा या मुख्य नद्या मोरणा, येरळा, अग्रणी, मणी, मान, कोरडा, बोर, पाटणा या उपनद्या आहेत

❖**हवामान** :— जिल्हयातील उन्हाळयातील तापमान ३८ ते ४६ डिग्री इतके पोहाचते तर हिवाळयात १० ते १२ डिग्री इतके खाली येते.

❖**पर्जन्य** :— सरासरी पर्जन्य ८०० ते १०३५ मि.ली

❖**माती** :— जिल्हयात लालसर काळीमाती व राखाडी काळी माती बघावयास मिळते

❖**जंगल** :— हिरडा, आवळा बेहेडा आंबा वड कुंभल बोर जाभुळ हे वृक्ष पहावयास मिळतात

❖**प्राणी नीलगाय :—** जंगली बैल, सांबर, चितळ, हरीण, जंगली डुक्कर, लांडगा, कोल्ह,ा ससा, इ.

❖**मासे** :— प्रामुख्याने नदीत मिळणारे मासे, वाम, अहिर, वाडसी, ललकुट झोऱ्या, सोळुंखी, दंडाई मुळया, वाटणी कोरी द.

❖ **खनिजे** :— बॅसॉल्टशिवाय, क्वार्टस, चाल्सीडीनो, सिओआईट वगैरे सापडतात.

**सांगली जिल्हा प्रेक्षणीय स्थळे**

**मिरज**

- सांगली येथील श्री गणेश मंदीर व कृष्णाकाठी कै वसंतरावदादांची समाधी.
- सांगली येथील आयर्विन पुल व गणेश दुर्ग.
- हरिपूर येथील कृष्णा व वारणा नद्यांचा संगम व श्रीसंगमेश्वर देवालय बागेतील गणपती.
- तुंग येथील समर्थ रामदास स्वामींनी स्थापन केलेले श्री मारूती मंदीर.
- मिरज येथील रेल्वे जंक्शन, ख्वॉजा शमशुद्दीन मिरासाहब दर्गा.
- भोसेजवळ दंडोबा डोंगरावरील दंडेश्वर मंदीर व अभयारण्य.

**तासगांव**

- तासगांव येथील श्री गोपूर, गणेश मंदीर.
- अंकलखोपजवळ श्रीक्षेत्र औदुंबर व दत्त मंदीर.
- पलूस येथील श्री धोंडी महाराज समाधी.
- ब्रम्हनाळ येथिल कृष्णा व वेरळा संगम व राजयोगी आनिदमूर्ती समाधी.
- भिलवडीजवळ (भुवनेश्वरवाडी) येथील भुवनेश्वरी देवीचे अति प्राचीन मंदीर.
- कवठेएकंद येथे अतिप्राचीन श्री सिध्दराज देवालय येथे विजया दशमी दिवशी शोभेच्या दारूकामाची आतषबाजी केली जाते.

**वाळवा**

- बहे येथे श्रीकृष्णेच्या पात्रातील श्री रामलिंग

- नरसिहंपूर येथील भुयारातील श्री नृसिंह मंदीर.
- किल्ले मच्छिद्रगड येथे श्री मच्छिंद्रनाथाचे देवालय.
- येडे निपाणी येथील मल्लीकार्जुन मंदीर.
- उरूण इस्लामपूर येथील संभूआप्पा देवालय.
- शिवपुरी येथील सिध्देश्वर देवालय.

**कवठेमहांकाळ**

- कवठेमहांकाळ येथील श्री महाकाली मंदीर.
- आरेवाडी येथील श्री बिरोबा देवालय.

**शिराळा**

- शिराळा येथील नागपंचमी उत्सव श्री गोरखनाथ मंदीर.
- चांदोली येथील वारणा धरण व अभयारण्य.
- प्रचीतगड सांगली जिल्हयातील प्रेक्षणीय किल्ला.
- चांदोली खु. प्रेक्षणिय कंधार डोह धबधबा.
- गिरजेवाडे येथील जोतिर्लिंग देवस्थान.

**आटपाडी**

- आटपाडी येथील खुला तुरूंग (स्वतंत्रपूर).
- खरसुंडी येथील श्री सिध्दनाथ मंदीर.
- करगणी येथील श्रीराम मंदीर.
- वलवण येथील माराचे थवे.
- राजेवाडी येथील इंग्रज काळातील तलाव.
- श्री जकाईदेवी (जागृत देवस्थान मानेवाडी नेलकरंजी)

**जत**

- जत येथील श्री यलम्मा देवी मंदीर श्री राम मंदीर.
- गुड्डापूर येथील दानम्मा मंदीर.
- बनाळी येथील बनशंकरी मंदीर.
- गिरगांव येथे डोंगरावरील श्रीलक्ष्मी मंदीर.
- बिळूर येथील मोठा मठ.
- सोर्डी येथी श्री दत्त मंदीर, मलाकसिध्द.
- गुडघरी सिध्दनाथ येथे हेमाडपंथी देवालय.

**खानापूर**

- देवराष्ट्रे येथील कैं. यशवंतराव चव्हाण याची जन्मभूमी व सागरेश्वर अभयारण्य.
- रेणावी येथील श्री रेवणसिध्द मंदीर.
- पळशीजवळ श्री शक्राचार्य मंदीर.

- कडेपूर येथील श्री डोंगराई देवी.
- सोनसळ येथील चौरंगीनाथ मंदीर.
- पारे येथील दरगोबा देवस्थान.
- वेताळ गुरूदेव रे वणगांव.

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १. अविनाश टिळक | — | सांगली आणि सांगलीकर प्रकाशन सांगली जिल्हा नगरवाचनालय राजवाडा चौक, महात्मा गांधी रोड, सांगली मार्च २०११ |
| २. जाधव तुकाराम | — | (संपादीत २००८) महाराष्ट्र वार्षिक युनिक ॲकॅडमी, पुणे, पान क्रं. ७९ |
| ३. महाराष्ट्र सरकार | — | महाराष्ट्र जिल्हे, सांगली, महाराष्ट्र सरकारच्या प्रसिध्दी विभागाचे प्रकाशन, १९६३ |
| ४. जिल्हा परिषद | — | सांगली वार्षिक प्रशासन अहवाल सन २००७—०८ भाग १ ला |
| ५. महाराष्ट्र दर्शन मासिक | — | संपादक, अरूण नासिककर |
| ६. जाधव तुकाराम | — | (संपादीत) २००८, महाराष्ट्र वार्षिक २००८—०९ द मुळीक अकॅडमी पुणे पान क्रं ४२० |
| ७. सतोष दास्ताने | — | महाराष्ट्र १९९७—९८ प्रकाशक, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी ८३०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० |

८- www.maharashtracitities/sangli/
9- www.maharashtra Sangli/city
10- www.maharacities/Sangli
11- www.Sangli district

# प्रकरण ५.
# स्वयंसहाय्यता महिला बचतगट चळवळीची वाटचाल
# (भारत, महाराष्ट्र आणि सांगली)

## ५.१ प्रस्तावना :—

आपत्तीचा सर्वात मोठा फटका महिला, अपंग, वृध्द आणि लहान मुलांना बसतो. महिला पदर खोचून आपत्तीचा धीराने सामना करून आपले घर आणि आपले गाव पुर्ननिर्मितीच्या वाटेवर आणते. शासन कर्त्यांनी आणि धोरण ठरवणाऱ्यांनी हे समर्थपणे ओळखून आपत्ती व्यवस्थापनाच्या कामात महिलांना सक्रीय सहभागी करून घ्यायला हवे आहे. माहिती आणि संसाधने महिलांच्या हाती देऊन पुनर्वसन पुननिर्मिती आणि दिर्घकालीन विकास प्रक्रियेची जबाबदारी सोपवली तर महिला ग्रामीण विकासात उत्तम कामगीरी बजावू शकतात. म्हणूनच महिला बचतगटातून नव्या वाटा शोधत नवे पायंडे पाडत बचत गटाच्या महिला बघता बघता ''ग्लोबल व्हिलेज''च्या घटक बनल्या आहेत. सद्या महाराष्ट्रातच नव्हेतर सपूंर्ण देशात बचतगटाच्या संख्यात्मक वाढीवरून दिसून येत आहे.

ग्रामीण भागातील महिला अशिक्षीत असेल पण तिचे व्यवहार ज्ञान, चोख हिशोबी वृत्ती, पै अण पैचा मोबदला देण्याघेण्याची सवय यात तिचा कुणी हात धरू शकत नाही. एकमेकीचे विचार ऐकूण, मार्गदर्शन, घेऊन आपल्याला अजूनही कुटुंब, समाज आणि देशासाठी खूप काही करायचं आहे अशी जाणीव प्रत्येकीच्या मनात बचतगटानी निर्माण केली त्यामुळेच बचतगटातून ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणाला व आर्थिक साक्षरतेला सुरूवात झाली आहे. समाजातील महिलांनी समविचाराने प्रेरित, होऊन एका समान परिस्थितीत राहणाऱ्या ग्रामीण किंवा शहरी गरीब लोकांनी परस्पर समजूतीवर आधारीत, छोटया आर्थिक बचतीमार्फत एकमेकांना आर्थिक मदतीसाठी आणि त्यातूनच समूहाचा आर्थिक विकास साधण्यासाठी बचतगट तयार केलेले आहेत. बचत गटातील महिला आपल्या सदस्यांना बचतीसाठी प्रेरित करतात.

महिला बचत गटांनी जमा केलेल्या सामूहिक निधीतून महिला सदस्यांना छोटेछोटे कर्ज दिले जाते. उर्वरित जमा बचत गटाच्या सामूहिक निधीचा भाग असतो. अशा आर्थिक व्यवहारातून महिलांना त्याचा आत्मविश्वास वाढविण्यास, त्यांच्या कुटुंबातील आणि समाजातील अस्त्विाची जाणीव होण्यास मदत झालेली आहे. यातूनच महिलांची पाऊले बदलत्या दिशेने आणि प्रगतीच्या दिशेने पडत आहेत. स्वयंसहाय्यता गट हे ग्रामीण महिलांना सक्षम आणि आत्मनिर्भर करण्याचे माध्यम आहे. गटामध्ये सहभागी महिलांचे मानसिक आणि वैचारिक परिवर्तन झाल्याने त्यांना स्वबळावर उभे राहण्यास आणि निर्भयपणे पुढे जाण्यास मार्ग सापडला आहे. सामाजिक विकास साधण्यासाठी परस्परांना

सहकार्य करून सर्वागिण विकासाच्या प्रक्रीयेत महिला समाविष्ट झालेल्या आहेत. अशा महत्वाच्या टप्प्यावर बचत गटाचा इतिहास जाणणे आवश्यक आहे.

स्वयंसहाय्यता गट चळवळीचा उगम बांगलादेशामध्ये झाला. प्रा. डॉ. महंमद युनूस यांना स्वयंसहाय्यता गट संकल्पनेचे जनक मानले जाते. ''डॉ. युनूस'' हे हॉवर्ड विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. मातृभूमीच्या प्रेमासाठी १९७६ मध्ये बांगलादेशात परत आले. त्यानंतर चितगाव विदयापीठात प्राध्यापक म्हणून काम करू लागले. त्यांच्याकडे घरकामासाठी जोब्रा गावची मोलकरीण होती. तेथील आठवडा बाजारात गट चलनाची आपापसात देवाणघेवाणीचे व्यवहार करत होते. हे व्यवहार फक्त विश्वासावर चालत होते. या व्यवहारामध्ये जोब्रा गावच्या मोलकरणीचाही सहभाग होता. डॉ. युनूस यांनी या व्यवहाराचा अभ्यास केला. त्यांना असे सूचले की, हा समूह बांगलादेशातील कृषी बॅकेशी जोडल्यास फायदा होईल. याला शासनाकडून प्रतिसाद न मिळाल्याने १९७९—८० मध्ये डॉ. युनूस यांनी स्वत: पुढाकार घेऊन ग्रामीण बॅकेची स्थापना केली. या बॅकेला १९८२ मध्ये सरकारनी कायदेशीर मान्यता दिली. डॉ. युनूस यांनी ग्रामीण बॅकेच्या मदतीने खेडयापाडयामध्ये आठवडा बाजारात पैशाचे विनिमय करणाऱ्या लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न सुरू केला. अशा प्रयत्नातून स्वयंसहाय्यता गटाची निर्मिती झाली. या बॅकेचे कर्मचारी आठवडा बाजारात जाऊन लोकांची बचत गोळा करण्याचे आणि त्यांना गरज भासल्यास कर्ज देण्याच्या कामाला सुरूवात केली. अशा व्यवहारातून ग्रामीण बॅकेचा शाखाविस्तार झाल्याने त्यांची संख्या ४३०० पर्यंत पोहचली. बचतगट चळवळीच्या मदतीने बांगला देशामध्ये आर्थिक विकासाचे एक नवे पर्व सुरू केले. यामुळेच डॉ. महंमद युनूस हे जगप्रसिध्द झाले. त्याचवेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन बांगला देशाच्या दौऱ्यावर आले होते. डॉ. महंमद युनूस यांचे स्वयंसहाय्यता बचत गटाचे काम पाहून बिल क्लिंटन प्रभावित झाले. अमेरिकेत परतल्यानंतर त्यांनी डॉ. युनूस यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसहाय्यता गट स्थापन केले. आज जगात अनेक देशांनी या संकल्पनेचे अनुकरण केले आहे. ग्रामीण भागातील महिला बचतगटांतील महिलांच्या पुढाकाराने दारूबंदीची चळवळ सुरू झाली आहे. महिलांच्या एकत्रिकरणानी निर्माण झालेली संघ शक्ती बचतगटांना आर्थिक हिताच्या पलीकडची विधायक चळवळ उभारण्यासाठी मदत करीत आहे. हे सर्व बचतगटातील संघटित महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे फलीत समाजाला आणि देशाला हितावह ठरली आहे हे वास्तव आहे.

## ५.२ भारतातील स्वयंसहाय्यता गटाची वाटचाल आणि प्रगती :—

भारत हा खेडयांचा देश आहे. खेडी स्वयंपूर्ण झाल्यास देशाच्या आर्थिक विकासास मदत होते. अशा खेडयांच्या आणि पर्यायाने देशाच्या सर्वागीण विकास आणि प्रगतीसाठी आर्थिक संपन्नता महत्वाचा आहे.

यामध्ये व्यक्ती आणि समाजाने केलेल्या सुयोग्य आणि परिणामकारक बचतीचा उपयोग हा महत्वाच्या मुददा आहे. थेंबे थेंबे तळे साचे या म्हणीचा अर्थ लहानलहान बचतीतून मोठी बचत अशी आहे. तसेच तळे राखेल तो पाणी चाखेल याही म्हणीची जोड द्यावी लागेल. साठवलेल्या बचतीची मधुर फळे चाखण्यासाठी तर सर्वप्रथम ती बचत सुरक्षीत आणि त्यामध्ये सातत्याने वाढही झाली पाहीजे. तरच एकाचे दोन, दोनाचे चार, चाराचे आठ, आठाचे सोळा, या पध्दतीने पैसा वाढत जाणार आहे. महिला बचतगटाच्या उपक्रमाने महिलांमध्ये बचत करण्याची, योग्य विनियोग करण्याची आणि आर्थिक नियोजन व हिशोब करण्याची क्षमता निर्माण झाली आहे. जेंव्हा महिला आर्थिकदृष्टया स्वावलंबी होतील तेव्हां त्या सर्व क्षेत्रात स्वयंप्रेरीत पणे आत्मविश्वासाने, निर्भयपणे, निसंकोचपणे कार्य करुन कुटूंब, समाज आणि देशाच्या विकासामध्ये सहभागी होतील. बचतगट स्थापनेचा हेतू आणि व्यापक विचार हा आहे.[२] ‘‘भारतात सर्वप्रथम मध्यवर्ती बॅकेच्या सहायाने राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बॅकेने नाबार्ड म्हैसूर पुनर्वसाहत/पुर्ननिवारण आणि विकास एजन्सी; Mysore Resettlement and Development Agency ) स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने १९८६—८७ मध्ये स्वयंसहाय्यता बचतगट प्रकल्प सुरु केला. सन १९८९—९० मध्ये भारताने निमंत्रण दिल्याने डॉ. महमंद युनूस, दिल्लीत आले. नेहरु विद्यापीठात त्यांनी बचतगट संकल्पनेवर व्याख्यान दिले. सुरुवातीस या संकल्पनेकडे दुर्लक्ष झाले. नाबार्डनी १९९२ मध्ये APRACA म्हणजे Asian Pacifie Rural And Agricultural Credit Association च्या मदतीने आपल्या देशात बचतगट संकल्पनेची सुरुवात झाली. ही संकल्पना राबविण्यासाठी नाबार्डनी ४३ स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली. याचा परिणाम म्हणून मध्यवर्ती बॅकेच्या कृती समितीने ग्रामीण भागात बचत आणि कर्जपुरवठा करण्यास बचतगटांना प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. १९९२ मध्ये २२५ बचतगटनां बॅकाशी जोडण्यात आले. १९९३ मध्ये मध्यवर्ती बॅकेनी बचतगटास मान्यतेनंतर बचतगटाची प्रगती जलदगतीने सुरु झाली. १९९६ मध्ये २५०० बचतगटानां बॅकेशी जोडले गेले.

देशात प्रथमत आंध्रप्रदेश, तामिळनाडू, गुजरात या राज्यामध्ये बचतगट संकल्पना राबविली. त्याला यशही मिळाले. स्वयंसहाय्यता बचतगटाच्या मदतीने ग्रामीण भागात बचत आणि कर्जपुरवठयाचा ओघ सुरु झाला. स्वयंरोजगाराला सुरुवात झाल्याने दारिद्रिय कमी होण्यास मदत झाली. स्वयंसहाय्यता गटचळवळीने ग्रामीण भागाचा कायापालट झाल्याचे पाहून शासनाने ग्रामीण भागातील विकासासंबधीच्या सर्व योजनाचे एकत्रिकरण केले. परिणामी बचतगट कार्यक्रम सुवर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजना म्हणजेच Swarna Jauanto Gram-Swarozgar Yojna अंतर्गत अंमलबजावणीस सुरुवात झाली. काही वर्षामध्ये या चळवळीला यश मिळाले. संयुक्त राष्ट्रसंघाने २००५ हे वर्ष सुक्ष्मवित्त पुरवण्याचे वर्ष म्हणून; International Year of Micro Credit) जाहीर केले. याचाच एक भाग म्हणून नाबार्डने महिला बचतगटांना कर्जपुरवठा करण्यास सुरुवात केली.

मार्च २००५ अखेर एकुण १६.१७ लाख बचतगट होते. आजही आकडेवारी २० लाखापर्यत पोहोचली आहे. सन १९९३ ते २००५ पर्यत बचतगटामार्फत केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठा ०.३ कोट रुपयावरुन ६८९८ कोटी रुपयापर्यत वाढ झाली. भारतातील एकूण स्वयंसहाय्यता गटापैकी ४० टक्के बचतगट हे स्वंसेवी संघटनांच्या प्रयत्नातुन स्थापन झालेले आहेत.

गरीब वर्गातील महिलांचे स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करून महिलांचे सक्षमीकरण करणे या विचारांनी बचतगटाची स्थापना झालेली आहे. देश पातळीवर महिला बचतगटाच्या कामाचा विस्तार करणे, शासन बचतगटांना बॅकेच्या सुविधा निर्माण करुन देणे व महिलांचे सक्षमीकरण करणे हे काम शासनाने नाबार्ड बॅकेकडे सोपविले आहे. जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था, निर्गुतवणुकीचे धोरण व खुला व्यापार यामुळे आपल्या देशातील एकूणच उद्योगक्षेत्र, व्यापारक्षेत्र, शेती व्यवसाय, सेवाक्षेत्र, यामध्ये परकीय कंपन्यानी प्रवेश केला आहे. त्यामुळे या नवीन आर्थिक धोरणातून उद्याचा भारत कसा असेल  हे सांगणे सध्यातरी कठीण आहे. तेव्हां सरकारपेक्षा समाजाने आणि खेडयांनी मिळून महिला बचतगटाच्या माध्यमातून देशाचे परिवर्तन घडवून आणावे. महिला बचतगट ही बलशाली चळवळ असल्याने शासनाने या चळवळीकडे आशावादी दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. महिला बचतगटाच्या माध्यमातून विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग करुन घेतल्यास  आपल्या देशाचा पूर्णपणे विकसित करु शकतो. जागतिक पातळीवर आपल्या देशाचे स्थान निर्माण करू शकतो. हा नवीन उपक्रम भारतात मोठया प्रमाणात विस्तारत आहे. ही एक प्रकारची विकासाच्या दिशेने वाटचाल करण्याची नांदीच आहे.

बचतगट  ही एक संमग्र चळवळ झाली आहे. आज  महाराष्ट्रात २.५ लाखाहून अधिक महिला बचत गट कार्यरत आहेत. महिला बचतगटांची संख्या वाढत आहे. सहकारी संस्था आणि बचतगट या ग्रामीण अर्थव्यवस्थेला उर्जितावस्था आणणाऱ्या दोन चळवळी आहेत. भ्रष्टाचार, दादागिरी आणि विशिष्ट घटकांकडेच एकवटलेली सत्ता यामुळे सहकार चळवळ अपवाद वगळता अपेक्षे इतकी यशस्वी ठरली नाही. बचत गटात सभासदांची मर्यादित संख्या, एकमेकीतील सुसंवाद, सरकारी पाठींबा आणि नियमांचा जाच नसल्याने परिणामकारक ठरली आहे. विविध जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक, स्टेट बॅक ऑफ इंडिया इतर राष्ट्रीयकृत बॅका, नागरी सहकारी बॅका, यांच्या प्रोत्साहनाने बचतगटाची चळवळ जलदगतीने वाढते आहे. बचतगटांच्या सशक्तीकरणाच्या अनेक योजना नाबार्डने आखल्या असून अनेक प्रोत्साहनपर योजना सुरू केल्या आहेत. बचतगटांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, त्यांचा दर्जा सुधारणे, त्यात सातत्य राखणे, त्यांना पॅकेजिंग विषयक मदत करणे यासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत.

बचतगटाच्या चळवळीत प्रेरक आणि सल्लागार यांना करियरला संधी आहे.  लाखोंच्या संख्येने बचत गट स्थापन झाले असलेतरी त्यांना

योग्य मार्गदर्शनाचा अभाव ही एक समस्या झाली आहे. पैसे जमा करणे व गरज पडल्यास ते कर्ज रूपाने देणे हे बचतगटाचे काम सुरू आहे. यामुळे गावागावातील महिलांचे बचतीसाठी दहा ते पंधरा च्या समूहात बांधून राहणे सुरू आहे. यातून या चळवळीला जी प्रेरणा मिळाली ती वेगवेगळया सरकारी प्रकल्पातील बचतगटांना सामावून घेण्याच्या योजनेमुळे जलस्वराज्य प्रकल्प, पंचायत राज्य कार्यक्रम, जिल्हा उद्योग, जिल्हा ग्रामीण विकास कार्यक्रम राबविल्या गेल्याने महिला बचतगटांना वेगळया दिशेने बळ मिळाले आहे. उद्योगामधील त्यांची भरारी लक्षणीय ठरली आहे. वैयक्तिक पातळीवर महिलांनी अनेक उदयोग सुरू केले आहेत. ही आशेची बाब आहे.

''**सारांश :**

- ६८.५७५ स्वयंसहाय्यता गटांची स्थापनेचे लक्ष होते. ६५ हजार योजनेमुळे दहा लक्ष महिलांना अर्थसहाय्य.
- ६५ हजार गट योजनेमुळे दहा लक्ष महिलांना सहाय्य.
- स्वयंसहाय्यता गटांचे ९२८० समुहांची स्थापना
- स्वयंसहाय्यता गटांचे ४८० गटपातळीवरील महासंघ स्थापना
- योजनेमुळे सहाय्यता गटांची रू. ११०.१० कोटीची बचत
- ६१.८२६ गटांची ९५ टक्के बॅकखाती
- स्वयंसहाय्यता गटांच्या रू. ८२.८० कोटीच्या बॅकांमध्ये ठेव
- २७.१२३ सहाय्यता गटांनी ४२ टक्के बॅक कर्ज सहाय्य घेतले आहे.
- रू. १०२.८३ कोटी कर्ज स्वयंसहाय्यता गटांनी बॅकेकडून घेतले.
- ४४.२७६ स्वयंसहाय्यता गटांतील ४.८१ लक्ष महिला उत्पादन निर्मिती कामात गुंतलेल्या आहेत.
- ३४.९४५ स्वयंसहाय्यता गटांना ५४ टक्के इतर शासकीय योजनामधून सोयीचा लाभ आजवर अनेक राज्यांनी सामुहिक मिळकत निर्माण केली आहे. ३४०० गट मिळकत गट निर्माण झाले आहेत.'' [३]

- स्वयंसहाय्यता गटांना दहा विषयासंबंधी प्रशिक्षण दिले गेले आहे. स्वयंसिध्दा, स्वयंसहाय्यता गट हया संकल्पना, बचत व पत, समूहगट नियम, गटांतील भावनिक, प्रत्यक्ष व्यवहार, विश्वास निर्मिती, संघर्ष सोडवणूक, हिशोब व रोख रक्कम व्यवस्थापन, बॅक खाते उघडणे, नेतृत्व विकास, २००६—०७ वर्षामध्ये (३१.०१.०७ पर्यत) महाराष्ट्रासाठी एक कोटी रूपयाचा निधी दिला गेला आहे. २० जिल्हयामधील २६ विकास गटामधील ३९३९ स्वयंसहाय्यता गटांना अर्थसहाय्य मिळाले. २००५—०६ व २००६—०७ वर्षात स्टेप योजनेत

अनुक्रमे ११०.१४३ व ६.७६ लक्ष अर्थसहाय्य व लाभार्थी १००० व १२५ (१५.०१.०७) पर्यत होते.

संपूर्ण देशात स्वयंसहाय्यता बचतगटाची चळवळ फोफावली आहे. खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक ५.१**

| वर्ष | वित्तपुरवठा गट संख्या | | बॅक कर्ज रू दशलक्ष | |
|---|---|---|---|---|
| | गटसंख्या | प्रतिशत | रक्कम रू | प्रतिशत |
| १९९२—९९ | ३२९९८ | १.४७ | ५७१ | ०.५० |
| २०००—०१ | १४९०५० | ६.६५ | २७८९ | २.५४ |
| २००५—०६ | ६२०१०९ | २७.७० | ४४९९०७ | ३६.३९ |
| एकूण | २२३८५६५ | १०० | ११३९७५ | १०० |

स्त्रोत progress of SHG – Bank Linkgage in India 2006-2007

वरिल तक्ता क्रमांक १ वरून असे निदर्शनास येते की, भारतात २००५—०६ पर्यंत स्वंयसहाय्यता बचत गटांची संख्यात्मक वाढ होऊन कर्ज रकमेत वाढ झालेली आहे.

## ५.३ महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता बचतगटाची वाटचाल :—

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तीत्वात आले. त्यावेळी राज्यात चार विभाग आणि २६ जिल्हे होते. सध्या महाराष्ट्र सहा विभाग आणि ३५ जिल्हयामध्ये वसला आहे. देशातील इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र प्रगत आणि आकाराने सर्वात मोठे राज्य आहे. महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासाची वाटचाल कृषी औद्योगिक क्रांतीच्या माध्यमातून झाली आहे. औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकाचे यश संपादन केले आहे. राज्यात औद्योगिक गुंतवणुकी बरोबर पायाभूत सुविधाचा विकास झाला आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवरील राज्य म्हणून नावारूपाला आलेले आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३ लाख ७ हजार ५७७ चौ.कि.मी. आहे. राज्याची एकूण लोकसंख्या ९ कोटी ६७ लाख ७६ हजार ६२७ इतकी असून त्यापैकी शहरी लोकसंख्या ४३.४० टक्के आहे. साक्षरतेचे प्रमाण ७६.८८ टक्के इतके आहे. [४]राज्यात एकूण ४३ हजार ७२३ इतकी खेडी आहेत.

महाराष्ट्र राज्य देशात सर्वप्रथम महिला धोरण जाहिर करणारे पुरोगामी राज्य आहे. राज्यात असंख्य ज्ञात आणि अज्ञात स्त्रीयांनी क्रांत्या घडविला. त्यांनी समाज व्यवस्थेमध्ये परिवर्तन घडवून आणले आहे. अशा कर्तृत्ववान/क्रांतीकारक स्त्रीयामुळे या राज्याला अभिनव कल्पनाची आणि नाविन्यपूर्ण संस्थाची जन्मभूमी अशी ख्याती मिळाली आहे. याचाच एक भाग म्हणून राज्यात महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी

स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करण्यात येत आहेत. कारण यातून पुन्हा लहान बदल घडून जलद आर्थिक विकास साधता येईल.

महाराष्ट्रात गटाची संकल्पना नवीन नाही. संयुक्त राष्ट्र संघाच्या अगोदर पंचवीस पैसे बचतीने गट सुरू केला होता. सध्याची स्वयंसहाय्यता बचत गटाची पार्श्र्वभूमी राज्यात १९७० पासून आहे. कारण याच दरम्यान इलाबेन भट[५] यांनी महिला आणि सुक्ष्म वित्तपुरवठा या संदर्भातील मांडणीला सुरूवात केली होती. राज्यात महिला धोरण १९९४ मध्ये आंतराष्ट्रीय कृषी विकास निधीच्या आणि केंद्र शासनाच्या सहाय्याने ग्रामीण पतपुरवठा प्रकल्प नमुना म्हणून चार जिल्हयात राबविण्यात आला. या प्रकल्पाचा एक भाग म्हणून महिला विकास योजनेची जबाबदारी महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपविण्यात आली होती. पुढे या योजनेअंतर्गत महिला स्वयंसहाय्यता गट स्थापनेस सुरूवात झाली.

दारिद्रय निर्मूलनाच्या लढयात एक परिणामकारक चळवळ म्हणून हे माध्यम ग्रामीण भागात अत्यंत लोकप्रिय झाले आहे. बचत गटांचा प्रवास पाहता नाविन्यपूर्ण क्रांतीचे पर्व ग्रामीण महिलांनी सुरू केली आहे. कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय अडचणीची चर्चा बचत गटातील जमलेल्या महिला करू लागल्या आहेत. देशाच्या लोकसंख्येच्या दृष्टीने विचार केला असता पन्नास टक्के स्त्रीया आहेत. ग्रामीण भागाच्या कामात, रोजगारात, श्रमात ८० ते ८५ टक्के इतका हिस्सा महिलांचा आहे. पण महिलांचा उत्पन्नातील हिस्सा नगण्य आहे. १९९० च्या दशकात नाबार्ड, राज्यसरकार केंद्रसरकार यांच्या संयुक्तकिारत्या ग्रामीण विकासाच्या योजना राबविल्या जात आहेत. विकास प्रक्रियेतील नवीन उपक्रम म्हणून बचतगटांचे मूळ रूजवण्यास आंध्रप्रदेश, तामिळनाडू या राज्यांनी प्रथत सुरूवात केली. सध्या देशात ३० लाख[५] बचतगट असून ४.५ कोटी महिला या चळवळीत सहभागी झाल्या आहेत. याची उलाढाल साधारणपणे २० हजार कोटी रू. इतका आहे. महाराष्ट्रात २.५ लाख बचतगट असून ९४३८६ हजार बचतगट बॅकेंशी सलंग्न झालेल्या आहेत.

महाराष्ट्रामध्ये स्वयंसहाय्यता गटातील बॅकांचा सहभाग अतिशय मोलाचा आहे. या योजनेत एकूण सहकारी बॅकांची संख्या ६९ इतकी आहे. त्यांच्या शाखांची संख्या ६६० इतकी आहे. त्यापैकी १९ व्यापारी बॅका, ७ विभागीय ग्रामीण बॅका, ३० मध्यवर्ती बॅका, १३ अर्बन को.ऑप बॅका आणि १६० स्वयंसेवी संस्थाचा सहभाग आहे. म्हणजेच प्रत्येक जिल्हयामधील मध्यवर्ती बॅकेला या स्वयंसहाय्यता गटांना जोडलेले आहेत. १९९२ मध्ये केवळ ५०० बचतगटांचे उदिद्ष्ट राज्याने स्विकारून या चळवळीला सुरूवात केली. या चळवळीतील वेग प्रचंड मोठया प्रमाणात वाढलेला आहे. २००६ साली देशात २२ लाख ३८ हजार ५२५ बचतगट बॅकेशी जोडण्यात आलेले आहेत. या गटांना ११ हजार ३१७ कोटी रू. कर्जवितरण केले आहे. सन २००६—०७ अखेर महाराष्ट्रात ६० हजार ३२४ बचतगटांना १७१ कोटी रूपयांचे वित्तसहाय केले गेले. या

संदर्भात जिल्हानिहाय २००० ते २००७ अखेर महाराष्ट्रातील ३३ जिल्हयामधील स्वयंसहाय्यता बचतगट बॅक संलग्नता पुढीलप्रमाणे —

**तक्ता क्रमांक ५.१**

**बचतगट बॅक जोडणी कार्यक्रम जिल्हा परिषद निहायस्थिती मार्च २००७ अखेर वर्षनिहाय जोडलेले बचतगट**

| अ.नं | जिल्हा | १९९७ | १९९८ | १९९९ | २००० | २००१ | २००२ | २००३ | २००४ | २००५ | २००६ | २००७ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अ.नगर | ७ | १६ | ० | ३३ | २६ | १२५ | ५३ | १६७ | ५८३ | ११०१ | २९०५ | ५०१६ |
| २ | अकोला | ० | २ | १३ | १०२ | ४६४ | ४७३ | ८४७ | ८७४ | ७४४ | १२९१ | २१६३ | ६९७३ |
| ३ | अमरावती | ० | ० | ० | ५९ | २५० | ५६९ | २८५ | १३१ | ६४४ | १३९७ | ३०६६ | ६४०१ |
| ४ | औरंगाबाद | ० | १ | १२ | ८५ | ७५ | ६०४ | ४९९ | २५० | ५३८ | १२२३ | १४३५ | ४८२२ |
| ५ | बीड | ० | ० | ० | ५९ | १२ | ७६ | १४८ | १६३ | ९२६ | १५८७ | २१४७ | ५११८ |
| ६ | भंडारा | ० | ० | १७ | १०७ | ४७३ | ९३२ | ३७२ | ३११ | १२८६ | १९१२ | ३०४० | ८४५० |
| ७ | बुलढाणा | ० | ० | ० | १० | ० | ११३ | ५१ | ४२ | ६१६ | १३३१ | २१८३ | ४३४६ |
| ८ | चंद्रपूर | **१५४** | **८३** | **४५३** | **१००८** | **२०४४** | **२०९९** | **१४२५** | **१९९७** | **५७४७** | **५७४५** | **७३१९** | **२८०७४** |
| ९ | धुळे | ० | २ | ० | ३९ | ९० | २११ | १२३ | १९४ | १०१६ | ६०२ | ११३२ | ५४०९ |
| १० | गोंदिया | ० | ० | ० | ० | ० | ७३ | १०१ | १५५ | ८४८ | १४९४ | १५९० | ४२६१ |
| ११ | गडचिरोली | १२ | ३१ | १३२ | १४७ | १९५ | ४७९ | ३३९ | ४८० | १२८५ | १८१४ | २१२२ | ७०३६ |
| १२ | हिंगोली | ० | ० | ० | ० | ० | ० | ७ | ३६ | १८९ | २९१ | ६६३ | ११८५ |
| १३ | जाळगाव | २ | ० | ० | १४८ | २३८ | ३९९ | २१७ | ६५ | ६८५ | १०७० | १५५५ | ४३७१ |
| १४ | जालना | २ | ० | ० | ० | ११ | २०८ | ११५ | १९७ | ४११ | ८३० | ११८८ | २९६२ |
| १५ | कोल्हापूर | **१२** | **५** | **१०** | **९** | **६** | **२७१** | **३४६** | **५४६** | **२०७०** | **५२७७** | **५८४२** | **१४३९४** |
| १६ | लातूर | ० | १ | ० | ६५ | ४७ | ३२ | २९ | १३६ | ११९० | २०९६ | २६८६ | ६३२२ |
| १७ | नागपूर | ० | ० | ० | ५ | १ | २१ | १४२ | २४० | ७९९ | १६३१ | ४३६४ | ७२०१ |
| १८ | नांदेड | ३५ | ४६ | ११९ | २२६ | २१२ | २९८ | ५२८ | ६१५ | १२९० | २१२७ | २०५६ | ७५५२ |
| १९ | नंदूरबार | ० | ० | ५ | ० | ५१ | ० | ५६ | २१३ | ४५२ | २२८ | ४३६ | १४४१ |
| २० | नाशिक | ५७ | ० | ० | २४ | १७ | १३२ | २२१ | २६० | ४२० | ९०५ | ९९५ | २९०१ |
| २१ | परभणी | ० | ० | ० | ८६ | ८० | ८१ | २९ | ३६ | २९२ | ६५७ | १४१४ | २६७५ |
| २२ | रायगड | ० | ० | ० | ३५ | ९० | ९७ | १४२ | १५६ | ८५३ | ८९२ | ८८० | ३१४५ |
| २३ | रत्नागिरी | ० | ० | ९ | २५ | ७४ | १२४ | १५६ | २५६ | ५१० | २४६ | १०३८ | २४३८ |
| २४ | सांगली | **७** | **५** | **६** | **१८** | **१३** | **४५** | **१२८** | **१९०** | **८७३** | **२६६८** | **५१८१** | **९१३४** |
| २५ | सातारा | ० | ० | ० | ० | ० | १२५ | ११६ | १४७ | ६४० | ३३६१ | ४४०१ | ८७९० |
| २६ | सिंधुदुर्ग | ० | ० | ० | ९ | ४ | २५ | ६७ | ७७ | २११ | ४३३ | ९१४ | १७४० |
| २७ | सोलापूर | ० | १ | ० | ११७ | ५५ | २६५ | ३०५ | १४९ | ८६७ | २४३४ | ४३०७ | ८५०० |
| २८ | ठाणे | ० | २ | ० | ३६ | ३१ | ११० | ५३ | ४३९ | ५५३ | ६८२ | ११५४ | ३०६० |
| ३९ | उ.बाद | ० | ० | ० | ६७ | ६३ | ६० | २०८ | ६८ | ९०९ | २०५१ | २१९२ | ५६१८ |
| ३० | वर्धा | ० | ० | ० | ० | ५० | ३० | २७० | २०६ | ७११ | १२२० | २७८२ | ५२६८ |
| ३१ | वाशिम | ० | ० | ० | ० | ९७ | १३७ | २३० | ८४८ | ४४३ | ६२८ | १७२१ | ३८०४ |
| ३२ | यवतमाळ | **३८** | **११०** | **१४९** | **२७०** | **४८५** | **५३६** | **६१४** | **५०४** | **१८१७** | **५०८३** | **५६१०** | **१५२१४** |
| ३३ | पुणे | **९८** | **१४३** | **१३३** | **२४०** | **२५५** | **४०१** | **२२४** | **६७५** | **२१२५** | **५८१७** | **१४१०५** | **२४२१६** |
| | **एकूण** | २२४ | ४४८ | १०५८ | ३०२४ | ५५०९ | ९१५१ | ८४४६ | १०४७० | ३२६११ | ६०३२४ | ९४३८६ | २२५८५६ |

संदर्भ : (Statistical Statements on SHG Bank Linkage Programe 2006-07)

वरील तक्त्याचा विचार करता महाराष्ट्रात १९९७ ते २००७ अखेर बचतगट बॅकसंल्गनता संख्या प्रचंड वाढलेली आहे. सुरूवातीपासून या कार्यक्रमात चंद्रपूर जिल्हा प्रथम क्रमांकावर असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. म्हणजेच संपूर्ण महाराष्ट्रातील २००७ अखेर एकूण बॅक संलग्नता २२५८५६ इतकी असून त्यापैकी चंद्रपूर जिल्हा २८०७४ व त्याच्या खालोखाल पुणे जिल्हा २४२१६ इतके बचतगट बॅक संलग्नता योजनेत समाविष्ट झाला आहे. या संख्येवरून स्पष्ट होते की, बचतगटांना बॅकांचे महत्व पटले आहे आणि बॅकेच्या कर्जातून उद्योग, व्यवसाय म्हणजेच बीज भांडवलांसाठी बॅकांची नितांत गरज आहे. बॅकांनाही लहान लहान बचती गोळा करून मोठी गुंतवणूक करण्यासाठी गटांची मदत

मोलाची ठरत आहे. इतक्या मोठया प्रमाणात ग्रामीण भागातील महिलांचे शक्तीप्रदर्शन इतर कोणत्याही चळवळीत दिसून येत नाही. हेच स्वयंसहाय्यता बचतगट चळवळीचे फलीत आहे.

## ♦ राज्याची वित्तनिहाय स्थिती :—

महाराष्ट्र राज्यामध्ये सन १९७० पासून स्वयंसहाय्यता बचतगट चळवळीला सुरूवात झाली. सन १९९३ मध्ये ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रमाअंतर्गत आणि १९९९ साली स्वर्णजयंती ग्रामस्वंयरोजगार योजनेअंतर्गत दारिद्रय निर्मूलनासाठी ग्रामीण भागात ही योजना जोमाने सुरू झाली आहे. मार्च २००७ अखेर ९४३८६ बचतगट असून त्यांना २१३३२.६४ लाख रूपये वित्तसहायक बॅकांनी केले आहे. या चळवळीमध्ये ५७०६ बॅकशाखा आणि १६० स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. या चळवळीत राज्यातील ३३ जिल्हे समाविष्ठ झाले आहेत. मार्च २००७ अखेर जिल्हा निहाय स्वयंसहायता बचत गट संख्या व बॅकांनी केलेला वित्तपुरवठा स्थिती खालीलप्रमाणे

## तक्ता क्रमांक ५.२
## राज्यातील स्वयंसहायता बचतगट व वित्तनिहाय स्थिती
## मार्च २००७ अखेर

| अ. नं. | जिल्हा | बॅकांची एकूण संख्या | स्वयंसहायता बचतगट संख्या | वित्तसहाय लाखात |
|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | १२३ | १२९३ | ४०६.८८ |
| २ | अकोला | १७ | ८६५ | १८७.३ |
| ३ | अमरावती | १०७ | २३६५ | ९८९.५३ |
| ४ | औरंगाबाद | २८ | ७३६ | १८७.७४ |
| ५ | बीड | ८ | ५७७ | २४३.८१ |
| ६ | भंडारा | ४३ | ११८२ | २२४.४६ |
| ७ | बुलढाणा | ३५ | १७४९ | ३८४.९४ |
| ८ | चंद्रपूर | ८७ | २१७० | ६६३.६७ |
| ९ | धुळे | २६ | ८३१ | १९३.१७ |
| १० | गडचिरोली | २५ | ५३२ | १६३.९७ |
| ११ | गोंधिया | ३२ | ५४१ | १८४.०३ |
| १२ | हिंगोली | ९ | ११७ | ५०.९७ |
| १३ | जळगांव | ७ | १२१० | ६३७.४२ |
| १४ | जाालना | ३८ | ६४१ | २१४.२६ |
| १५ | कोल्हापूर | ९७ | १९७५ | ५००.९७ |
| १६ | लातूर | ४६ | ७६० | २९३.८ |
| १७ | नागपूर | २२३ | ३६८४ | १२१५.९८ |
| १८ | नांदेड | ४७ | १२४२ | २९६.५१ |
| १९ | नंदूरबार | २५ | ८०३ | ५४ |
| २० | नाशिक | ७१ | ७६५ | .४२ |
| २१ | परभणी | १९ | ७१६ | १६७.५७ |
| २२ | पुणे | १८८ | ६७६७ | ३२१.७६ |
| २३ | रायगड | १०६ | ५१४ | २०८८.६१ |
| २४ | रत्नागिरी | ४९ | ३१८ | १९४.४८ |
| २५ | सांगली | ३३ | १२२८ | १४५.१५ |
| २६ | सातारा | ११६ | १८३१ | १८५.०२ |
| २७ | सिंधुदुर्ग | ५६ | ३६१ | २६८.९७ |
| २८ | सोलापूर | ०० | १६८५ | १०८.५१ |
| २९ | ठाणे | १२ | २२२ | ३४७.०३ |
| ३० | उ.बाद | ३३ | ६४६ | ४९.७४ |
| ३१ | वर्धा | ६५ | २३४२ | १११.०२ |
| ३२ | वाशिम | २९ | ७८२ | ४०४.९६ |
| ३३ | यवतमाळ | ७४ | ३१७१ | १८९.७८ |
| | **एकूण** | **१८७४** | **४४१८१** | **१२४७३.१२** |

संदर्भ :— ( Progress of Bank Linkage in India Nabard 2007)

## बॅकांकडून स्वयंसहायता बचत गटांना वित्तसहाय :

राज्यात स्वयंसहाय्यता बचतगट चळवळीस मार्च २००७ अखेर व्यापारी बॅका, प्रादेशिक ग्रामीण बॅका, जिल्हा मध्यवर्ती बॅका व सहकारी बॅका यांनी केलेला वित्तपुरवठा खालीलप्रमाणे :—

**तक्ता क्र. ५.३**

**बचतगट संख्या व वित्तसहाय्य**

| अ. नं. | अभिकर्ते | अभिकर्ते बॅकांची संख्या | स्वयंसहायता बचतगट संख्या | वित्तसहाय लाख.रू. |
|---|---|---|---|---|
| १. | व्यापारी बॅका | १८७४ | ४४१८१ | १२४७३.१२ |
| २. | प्रादेशिक बॅका | ६५३ | १२८११ | ३३६४.७९ |
| ३. | जिल्हा मध्यवर्ती बॅका | ३१७५ | ३०८९६ | ४४६४.२७ |
| ४. | सहकारी बॅका | ०४ | ६४९८ | १०३०.४६ |
| | **एकूण** | **५७०६** | **९४३८६** | **२१३३२.६४** |

संदर्भ : (National Bank for Agriculture and Rural Development Statical Statement on SHG Bank Linkage Programme 2006-07] Page No.13)

तक्ता क्र. ३ वरून स्पष्ट होते की, सर्वाधिक वित्तसहाय्य १२४७३.१२ व्यापारी बॅकानी केलेला आहे. त्यांच्या खालोखाल जिल्हा मध्यवर्ती बॅकेनी (४४६४.२७) वित्तसहाय्य केला आहे. त्याचप्रमाणे बचतगटांची संख्या अधिक जिल्हा मध्यवर्ती बॅकानमध्ये असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्य पुरोगामी विचारांचे असून महिला धोरणाचे प्रथम पुरस्कार करणारे राज्य असून महिला धोरणात स्वयंसहाय्यता बचतगटाला प्राधान्य देऊन त्याव्दारे महिलांचे सबलीकरण करण्यास वित्तिय स्त्रोत निर्माण करीत आहे. महाराष्ट्रात स्वंयसहाय्यता बचतगट प्रगती खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक ५.४**

| विभाग | २००२—०३ | | २००३—०४ | | २००४—०५ | | २००५—०६ | | २००६—०७ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्व.ब.ग. | वित्त पुरवठा | स्व.ब.ग. | वित्त पुरवठा | स्व.ब.ग. | वित्त पुरवठा | स्व.ब.ग. | वित्तपुरवठा | स्व.ब.ग. | वित्त पुरवठा |
| कोकण | ४१८ | ८.९४ | ९.२८ | ३५.२२ | २१२७ | ८६.२८ | २२.५३ | ६४.७६ | ३९८६ | ८६१.१२ |
| नाशिक | ६७० | २९.५८ | ८९९ | ५२.२५ | ५२६ | १२२.५५ | ३९०६ | ५३.१५ | १०८०९ | १८६३.१ |
| पुणे | १११९ | ४१.४६ | १७०७ | १००.४४ | ६५१५ | २०८.४२ | १९५५७ | ४३४.४४ | ३३८३६ | ६५३८.७४ |
| औरंगाबाद | १५३६ | ४०.१५ | १६५१ | ६.६३ | ५७४५ | २०२.५२ | १०९०७ | ३३३.७१ | १३७८१ | २६५३.०० |
| अमरावती | २०२७ | ६३.९६ | १८९७ | ७०.१ | ४२६४ | १५८.२८ | ९९३० | २७६.५२ | १४७४३ | ३६२७.९१ |
| नागपूर | २६४९ | ९०.८९ | ३३८८ | १२.१ | १०६७४ | ३१७.८४ | १०४८६ | ४७०.८८ | २१२१७ | ४७९६.६७ |
| एकूण | ८४४६ | २७४ | १०४७० | ४३९.०८ | ३२६११ | १०९.८० | ६०३२४ | १७६९.६३ | ९४३.८८ | २१३३२६४ |

स्त्रोत Progressed SHG Bank Linkage in India 2006-07

तक्ता क्र. २ वरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षात ११ पटीने स्वयंसहायता बचत गटात वाढ झाली आहे त्याचप्रमाणे २००२—०३ मध्ये नागपूर विभाग तर २००६—०७ मध्ये पुणे विभाग स्वयंसहायता बचत यांना ७८ पटीने वित्तपुरवठा वाढ झाली आहे. स्वंयसहायता बचत गटाबाबत पुणे जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे.

## ५.४ सांगली जिल्हा स्वयंसहायता बचतगट वाटचाल

भारताला स्वातंत्र्य मिळून साठ वर्षे झाली. नियोजन आणि नियंत्रणातून सर्वसमावेशक विकासाच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात आली. तथापी अनु. जाती, अनु—जमाती, अल्पसंख्याक व महिला यांच्यामध्ये विकासाच्या सर्वसमावेशक धोरण कार्यक्षमपणे राबविले नाही. दहा पंचवार्षक योजना पूर्ण झाल्या. विशेष घटक योजनांची अंमलबजावणीतून समुदायांना आपण सामाजिक बदिस्कृततेचे ची शिकार झालो आहेत असे वाटते आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत, आपल्या देशाचा खऱ्या अर्थानी विकास साधायचा झाल्यास सर्व समुदायांना सर्व क्षेत्रात प्रतिनिधीत्व देऊन त्यांना, देशाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. याचाच एक भाग म्हणुन सर्वसमावेशक धोरणची अंमलबजावणी ग्रामीण भागामध्ये महिला बचतगट स्थापन करुन वंचित महिलांना आर्थिक विकासामध्ये सामावुन घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. भारतीय समाजात राजकारण, अर्थकारण, शिक्षण, संस्कृति व Governance या सर्वामध्ये प्रतिनिधीकत्व मिळाले पाहिजे. समाजातील शिक्षितअशिक्षित गरीब, शोषित, आदिवासी, महिला आणि अल्पसंख्याक यांना प्रतिनिधीत्व देणे गरजेचे आहे. यामुळे भारतीय लोकशाहीत सर्व समावेशक धोरण गतिमान होण्यास मदत होईल. डॉ. आंबेडकर यांचे  सर्वसमावेशक धोरण वर्तमान परिस्थीतीत किती योग्य व व्यवहार्य आहे हे बचतगटाच्या संघटित महिलांच्या कार्यावरुन लक्षात येते. सर्व जाती आणि धर्मातील महिला एकत्रित येऊन सर्वासाठी संघटित काम करत असल्याचे दिसून येते. खेडयापाडयात वाडयावस्त्यामध्ये बचतगटाचे जाळे विस्तारले आहे. महिला संघटनशक्ती उभी करण्याचे, नैतृत्व गुणांचा विकास साधल्याचे, सहकार व प्रेम भावना वाढीस लावण्याचे आणि आर्थिक बळ वाढविण्याची ताकद महिला बचतगटाचा हा एक यशस्वी प्रयोग आहे.

महिला बचतगटांची संख्यात्मक वाढी बरोबरच गुणात्मक वाढ झालेली आहे. त्यामुळे ग्रामीण महिलांचा व्यक्तीमत्व विकास झालेला आहे. महिलांचे अंतरबाहय जीवनच बदलले आहे. बचतगटातून महिलांना आर्थिक साक्षरता मिळवल्याने सामाजिक व राजकीय क्षेत्रातसुध्दा बदल होतांना दिसतात. ग्रामीण भागात ग्रामपंचायती मध्ये महिला जोमाने काम करत आहेत. राष्ट्रपती मा. सौ. प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी, सुषमा स्वराज, मायावती यासारख्या महिला राजकीय क्षेत्रातील विचारवंत गाजवलेले आहेत. बचतगटाच्या माध्यमातुन महिलांना रोजगार उपलब्ध

झाल्याने महिला आर्थिकदृष्टया स्वावलंबन झाल्या आहेत. महिलां स्वभावातच काटकसर, चिकाटी, तग, संयम सहनशील, सुस्वभावी, सालसा, नम्रता हे गुण असतात. महिलांना कमी पैशात कुटुंब चालवण्याचे कौशल्य उपजतच असते. बचतगटाच्या माध्यमातुन होणाऱ्या नियमित बचतीमुळे तिच्या उदयोगशील कल्पनाशक्तीला आर्थिकदृष्टया बळ मिळाल्याने गटाच्या माध्यमातुन स्वयंरोजगार निर्माण करणारे उद्योग, सुरु झाले आहेत. उदा. ''पाच हजार बचतगटांच्या माध्यमातून पन्नास हजार महिला स्वावलंबी'' मिरज तालुक्यात कार्यरत असलेल्या पाच हजार बचतगटाच्या माध्यमातून पन्नास हजार महिला स्वावलंबी झाल्या आहेत. निरनिराळे उदयोग आणि व्यवसाय सुरू करून सामान्य महिला ताठ मानेने जगत आहेत. शासनाने सुरू केलेली ही बचत गटाची योजना हजारो गोरगरीब महिलांच्यासाठी वरदान ठरली आहे.

महाराष्ट्र शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचत गटाची अभिनव योजना काही वर्षापूर्वी सुरू केली. या योजनेला महिलांमधून उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. गावोगावी मोठया संख्येने महिला बचतगटात सहभागी होवू लागल्या आहेत. मिरज तालुक्यातून या योजनेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे. दारिद्रय रेषेखालील २००० तर दारिद्रय रेषेवरील सुमारे चार हजार असे एकूण पाचहजार बचतगट स्थापन झाले असून हा एक जिल्हयात उच्चांकच आहे. पाच हजार बचतगटातून तालुक्यातील सुमारे पन्नास हजाार महिला कार्यरत आहेत. शासनाने महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी बॅकांच्या माध्यमातून मोठे पाठबळ उभे केले आहे. दारिद्रय रेषेखालील ९९८ पैकी ३३५ बचतगटांना प्रत्येकी पंधरा ते पंचवीस हजार रूपये खेळते भांडवल दिले आहे. १३५ महिला बचतगटातील महिलांना आधारभूत व्यवसायासाठी एक लाख ते अडीच लाखापर्यंत अर्थसहाय्य केले असून यापैकी एक ते सव्वालाख रूपयापर्यंत अनुदान दिले आहे. त्यामुळे कायमपणे दारिद्रयात अडकलेल्या महिलांनी या संधीचा फायदा घेतलेला आहे. बॅकेच्या अर्थपुरवठयातून गाय, म्हैस, शेळीपालन, चर्मकार, प्रिंटींगप्रेस, रेक्झीन बॅगा, बुरूड व्यवसाय, शेवाळया, पापड, लोणचे, चटणीचे व्यवसाय सुरू करून आपला आर्थिक विकास साधला आहे.

मिरज तालुक्यातील म्हैसाळमधील लक्ष्मी महिला बचतगटाने तर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि राज्यपालाच्या हस्ते राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कार पटकावून संपूर्ण राज्याचे लक्ष मिरज तालुक्याकडे वेधले आहे. कवठेपिरान येथील महिला बचतगटाच्या चार शाखा कार्यरत असून चारही बचतगटांना व्यवसायासाठी आडीच लाख प्रमाणे झालेला अर्थपुरवठयाची त्यांनी परतफेड करून तालुक्यात आर्दश निर्माण केला आहे. त्यांनी रेक्झीन बॅग, बुक, बायडिंग, खडू, अगरबत्ती, मेणबत्ती हे व्यवसाय सुरू आहेत.

नांद्रे येथील सौ. सुजाता पाटील महिला बचतगटांना मार्गदर्शन करण्याचे काम करीत आहेत. जिल्हा विमा प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या सौ. पाटील यांनी आजपर्यंत जिल्हयातील सुमारे दहा हजाार

बचत गटातील महिलांचा विमा उतरविला आहे. विमा उतरविल्यानंतर झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे ६० ते ७० महिलांना लाखो रूपयांचे अनुदान त्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदतीचा हात देण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे. मालगावमधील सौ. रेखा रविंद्र शेडबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली नारीशक्ती महिला बचतगटातील सुमारे ७० महिला एम्. आ.डी.सी. मधील एका गारमेंटमध्ये शिलाईचा व्यवसाय करीत आहेत. मिरज तालुक्यातील दारिद्रय रेषेखाली कार्यरत असलेल्या महिला बचतगटाच्या माध्यमातून सुमारे एक हजाारहून अधिक कुटुंबे दारिद्रय रेषेतून बाहेर पडली आहेत. हजारो महिला विविध व्यवसायाच्या माध्यमातून आज आपल्या स्वत:च्या पायावर भक्कम उभ्या आहेत. स्वयंसहाय्यता महिला बचतगटातून अनेक महिला सामाजिक आणि राजाकीय प्रश्न तळमळीने सोडवत आहेत. उदा. बालविवाह, विधवाविवाह, हुंडीबळी वैयक्तीक आणि सार्वजनिक स्वच्छता दारिद्रय निर्मूलन, बेरोजगारी याबाबत स्वत:चे विचार मांडण्यास तयार झालेल्या आहेत. अशा संघटीत विचारातून महिलांची जागृती होऊन वैचारिक प्रगती झालेली आहे. महिला बचतगट महिलांच्या आर्थिक साक्षरता प्रबोधनाची केंद्रे निर्माण होत आहेत. हा एक फार मोठा सामाजिक परिवर्तनाचा महत्वाचा भाग मानावा लागेल. कारण ग्रामीण भागातील सर्वसामान्य महिला एकत्र येणे, विचारविनिमय करणे, संघटीत होणे, निर्णय घेणे ही बाब समाजपरिवर्तनातील महत्वाची नांदी आहे.

देशाच्या विकासामधील कोणतेही कामामध्ये महिलांना बाजूला ठेवून चालणार नाही. तसे केले तर ते काम पूर्णत्वाकडे जााण्यास अनेक समस्या निर्माण होतील. याची जाणीव समाजाला होत आहे. स्त्रीयांचा आर्थिक साक्षरतेचा प्रवास महिला बचत गटाच्या माध्यमांतून सुरू आहे. महिलांमध्ये चिकाटीने काम करण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे हे महिला बचत गटांनी सिध्द करून दाखवले आहे. त्यामुळेच देशात अधिक मोठया प्रमाणात महिला बचतगटातुन ही प्रवृत्ती विकसीत होत आहे.

### ५.५ महिला सक्षमीकरण संलग्न संस्था :

**राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बॅक नाबार्ड :—**

(National Bank for Agriculture and Reral Development)

एक विकासात्मक वित्तीय संस्था म्हणून राष्ट्रीय बॅक नाबार्डची स्थापना १२ जुलै १९८२ रोजी झाली. ही बॅक अर्थसहाय्य व तत्सम सेवाची मदत ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी कटिबध्द आहे. नाबार्ड चे मुख्य रा"ट्रीय कार्यालय, मुंबई येथे असून राज्य कार्यालय पुणे येथे आहे. या बॅकेंची २८ राज्यस्तरीय क्षेत्रीय कार्यालये आणि ३६० जिल्हा कार्यालयाच्या माध्यमातून बॅक आपली भूमिका पार पडत आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमिकरणासाठी वित्तीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या ध्येयांनी स्वयंसहाय्यता महिला बचतगट बॅकांशी संलग्नीकरण करून जागतिक पातळीवरील सर्वात मोठा सुक्ष्म वित्तपुरवठा

कार्यक्रम नाबार्ड राबवित आहे. बॅकांच्या वित्तीय सेवेपासून वंचित असलेल्या ग्रामीण गरिबांपैकी एक तृतियांश म्हणजे ८ कोटी ३५ लाख गरिबासाठी अकरा लाख महिला बचतगटाच्या माध्यमाने वित्तीयसेवा नाबार्ड कडून उपलब्ध करून देण्यात आले आहे. बावीस वर्षातील विकासात्मक कार्याचा अनुभव विचारात घेता बॅकिंग, संख्यात्मक विकास आणि पायाभूत सुविधा अशा बहुविध प्रकल्पातून कौशल्य आणि ज्ञान यांच्याआधारे राष्ट्रीय बॅक सल्ला सेवा असा नवीन उपलक्रम बाबींनी सुरू केला आहे. हा विभाग स्वयंसहाय्यता महिला बचतगटासाठी उपयुक्त ठरते आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमिकरणासाठी या गटामधील सभासद महिलांना विविध प्रकारच्या प्रशिक्षण सुविधा उपलबध करून दिल्या जाात आहेत. याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातील महिला निर्भिड, साक्षर, व्यवहारशील, निर्णयश्रम, स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण होण्यास मदत झाली आहे. बॅक सलग्नकिरणाच्या व्यवहारामध्ये महिला तत्पर झाल्याने आर्थिकदृष्टया सध्या स्वावलंबी होत आहेत.

नाबार्डने ग्रामीण भागातील गटनिर्मितीची जबाबदारी स्वयंसेवी संस्था आणि वैयक्तीक ग्रामीण स्वयंसेवकांच्यावर सोपविली आहे. गटनिर्मिती कामासाठी बॅक त्यांना आर्थिक मदत करते. स्वयंसेवी संस्थानां गटनिर्मिती, देखरेख, संगोपन, नियंत्रण आणि मार्गदर्शनाचे काम करावे लागते. बॅक संलग्नेपासून ते वित्तीय सहाय्य मिळेपर्यतची सर्व कामे चिकाटीने करावी लागतात. नाबार्डनी सर्व बॅकांना इष्टांक दिलेले आहे. इष्टांकाची पूर्तता झाली की नाही याच्या चाचपणीसाठी प्रत्येक महिन्याला आढावा बैठक घेण्यात येते. त्याचा परिणाम म्हणून सर्व बॅका या कामासाठी सतर्क झाल्या आहेत. बॅकाच्या सुक्ष्मवित पुरवठयाच्या सहायाने बॅकाकडील पैसा गरिबांना गरिबी दूर करण्यास म्हणजेच दारिद्रय निर्मूलनास मदत करतो आहे. यामुळे ग्रामीण भागातील गरिब महिलांची विकासाची दारे खुली झाली आहेत. स्वंयसहायता बचतगटातील महिला सुक्ष्मवित्त पुरवठयाचा लाभ घेउन उद्योजिका झाल्या आहेत. शेळी, मेंढी, गाईम्हैशी इत्यादी पशूपालन, दुग्ध उत्पादन आणि विक्री व्यवस्थापन, दुग्धजन्य पदार्थाची निर्मिती यासाठी नाबार्ड महिला बचतगटांसाठी प्रशिक्षण आयोजित करते. उत्पादन वस्तूच्या विक्रीसाठी प्रदर्शन भरवणे आणि विक्रीचे व्यवस्थापन, उत्पादीत मालाची विक्री व्यवस्थेसाठी प्रत्येक जिल्हयात संकुल बांधण्यास प्रोत्साहन देण्याचे महत्वपूर्ण काम नाबार्ड करत आहे.

महिला बचतगटांना अर्थसहाय्य पुरवणाऱ्या वित्तीयसंस्था आणि बॅकांना नाबार्ड शिखर बॅक म्हणून पुनर्वित्तपुरवठा करते. बचतगटातील सभासदांच्या मानसिकतेत बदल घडवून उद्योजकतेची बचत प्रत्यक्ष पाहणी करते. बचतगटांच्या निर्मितीसाठी गटांना, बॅक संलग्नतेखाली बॅकांना, स्वयंसेवी संस्थाना, खेडयातील स्वयंसेवकांना नाबार्ड सतत प्रोत्साहन प्रेरणा देते. त्याचा परिणाम म्हणून महिलांची मनोवृत्ती बदलून त्या स्वयंभू गटामध्ये सहभागी होत आहेत. शिखर बॅक म्हणून विस्तारीत कार्यक्रमाच्या सहायाने महिला सक्षमीकरणास अधिक प्रमाणात व्यापक आणि पोषक

वातावरण निर्माण करण्यामध्ये नाबार्डचे योगदान मोलाचे ठरते आहे. या प्रोत्साहन कार्यक्रमाचा लाभ महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी होत आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी ही निर्माण झालेली मोठी संघ शक्ती लाभदायी ठरते.

### ✄ महिला आर्थिक विकास महामंडळ :—

महिला आर्थिक विकास महामंडळ हे महाराष्ट्र सरकारचे महिला विकासाठीची संस्था आहे. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने २४ फेब्रुवारी १९७५ साली महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना झाली. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महामंडळाला महाराष्ट्र शासनाने २० जाने. २००३ रोजी महिला विकासाची राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून घोषित केले. त्यामुळेच सध्या माविम ही महिलांच्या विकासाला प्रेरक आणि पुरक ठरणारी शिखर संस्था म्हणून काम पाहते. महिलांची गुणवत्ता, स्पर्धात्मक कार्यक्षम वाढवून त्यांना अध्यावत शिक्षण, प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि बाजारपेठेची सांगड घालून देण्याचे काम माविम करते.

मविम मार्फत सन १९९४ ते २००२ या काळात राबविण्यात आलेला महाराष्ट्र ग्रामीण पत पुरवठा कार्यक्रम याला मिळालेला प्रतिसाद आणि महिला सक्षमीकरणाचे परिणाम लक्षात घेउन २००१ साला पासून पूर्वीच्या व्यापारी बदला वरील सर्व योजना बंद करून फक्त स्वयंसहाय्यता बचतगट कार्यक्रम राबविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. माविम निर्णयानुसार केंद्र आणि राज्य शासनाच्या महिला बचतगटावर आधारित अनेक योजनांची अंमलबजावणी माविम करीत आहे.

२००७ अखेर महाराष्ट्रातील ३३२ तालुक्यातील १३०३६ गावापर्यंत माविम पोहचली आहे. ५४२३३ महिला बचतगटांच्या माध्यमातून ६,६८,४८८ महिलांचे संघटन तयार करण्यासाठी यश मिळाले आहे. महिला बचतगटाच्या महिलांची एकूण बचत ६९.५४ को. रू. आणि अंतर्गत कर्ज १५२ कोटी रू. आहे. एकूण महिलांपैकी १.९३ लाख महिला शेती आणि बिगरशेतीवर आधारीत उद्योगामध्ये सहभागी झाल्या आहेत. महिला विकासासाठी माविम मार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना :

- रमाई महिला सक्षमीकरण योजना
- कृषी सप्तक योजना
- स्वयंसिध्द योजना
- महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम
- नाबार्ड ॲड ऑन
- राष्ट्रीय समविकास योजना
- आदिवासी विकास प्रकल्प

- स्वर्ण जयंती ग्राम स्वंयरोजगार योजना
- महिला स्वावलंबन निधी

अशा सर्व योजना राबविण्याचा माविमचे ध्येय महिला सक्षमीकरण हा प्रकल्प कार्यक्रम नसून ही एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत सहभागी होणारी महिला आर्थिकदृष्टया सक्षम करणे, महिला स्वत: आणि कुटूंबासाठी नियोजन करून निर्णय घेउन त्याची अमंलबजावणी करणे,यश मिळविणे, इत्यादी साठी माविमची भूमिका अतिशय मोलाची ठरते आहे. महिला आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी होण्यासाठी माविमने विकासात्मक आणि उत्तेजनात्मक उपक्रम हाती घेतले आहेत. महिला बचतगट, उद्योजकता विकास कार्यक्रम, जाणीव जागृती कार्यक्रम, लिंगभेद जाणीव जागृती, साक्षरता कार्यक्रम, महिला साधन केंद्र, खादयपदार्थ विक्री केंद्र इत्यादी उपक्रम माविम महिला बचत गटाच्या सहाय्याने मोठयाप्रमाणात राबवित आहे.

माविमने कार्यान्वीत केलेल्या ३३२ तालुक्यातील १३०३६ गावामध्ये अनेक योजनेखाली स्वयंसहाय्यता गट आणि महिलांची सदस्य संख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल :


**तक्ता क्र.**

**मार्च २००७ पर्यतचा एकूण महिला संख्या व बचतगट तपशिल**

| अ. नं. | योजनेचे नांव | एस.सी. | एस.टी. | ओ.बी.सी | मायनॉरिटी | एन.टी. | इतर / ओपन | एकूण महिला संख्या | एस. एच. जी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.जी.एस.वाय | २४०११ | २५२८३ | ३२०३० | २४२० | १०५६१ | २२७९४ | ११७०९९ | १०४८६ |
| २ | स्वयंसिध्द | ४५९२ | २०७७८ | १२५६२ | ७४९ | ३४३८ | ७९१६ | ५००३५ | ३९४३ |
| ३ | एस.सी.पी.माविम | १७२४८० | ४९२१ | ६४२४ | १२८८ | ३३०७ | ३०१८ | १९१४३८ | १६०५४ |
| ४ | एन.जी.ाओ. | ५७६७७ | १०८१ | १८१२ | ४३७ | १२१९ | ५८९ | ६२८१८ | ५१०० |
| ५ | एम.आर.सी.पी. | १२४६५ | १२९१७ | २५९९६ | ५१९ | ४७३१ | ७५६६ | ६४१९४ | ४५०० |
| ६ | नाबार्ड | १४८४ | २०२७ | ७२३८ | ६४७ | २०१० | ७७६४ | २११७० | १७६६ |
| ७ | टी.एस.वाय | ५३५ | ८३९६४ | ७५६ | ९० | १६३ | ६३ | ३५५७१ | २९९२ |
| ८ | आर.एस.वाय | २७४१ | ५४२४ | १४३८९ | ६०० | २०९८ | २४६७ | २७७१९ | २२५५ |
| ९ | कृषी | १४१७ | १२१३ | २९२१ | १३५ | ७२५ | १८४२ | ८२५३ | ४४१ |
| १० | महिला स्वालंबन निधी | २२५ | ७४ | ४३४ | १९४ | ३१० | १९२२ | ३१५९ | २३० |
| ११ | तेजास्विनी | ५२७८ | ६१८० | ३०९७१ | ३३८७ | ८७२४ | ३१७५३ | ८६२९३ | ६४०७ |
| १२ | इतर | १४३ | ५१ | ५०३ | ०४ | ०७ | ३१ | ७३९ | ५९ |
| | एकूण | २८३०४८ | ११३९१३ | १३६०३९ | १०४७० | ३७२९३ | ८७७२५ | ६६८४८८ | ५४२३३ |

संदर्भ आर्थिक विकास महामंडळ जिल्हा परिषद सांगली

मविम महिलांच्या आर्थिक विकासासाठी राबवत असलेल्या विविध योजनांचा संख्यात्मक विचार करता असे स्पष्ट होते की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वसमावेशक आर्थिक विकासाचे तत्व माविम पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न केला जात आहे.




### ♣स्टेट बॅंक ऑफ इंडियाचे स्त्रीशक्ती विकासाचे मिशन :

एस. बी. आय. आणि तिच्या संलग्न बॅंका म्हणजे देशातील सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठा बॅंक गट आहे. ही बॅंक अगोदर आणि बॅंकींग क्षेत्रातील अनुभवी संस्था आहे. १८०९ मध्ये बॅंक ऑफ बॅंगोल, १८४० मध्ये बॅंक ऑफ बॉम्बे १८४३ मध्ये बॅंक ऑफ मद्रास अशा तीन बॅंकांची स्थापना झाली होती. या तीन बॅंकेंचे एकत्रीकरण १९२१ मध्ये करून त्यातून इंपिरिअल बॅंक स्थापन करण्यात आली. या बॅंकेनी त्याकाळात सरकारची बॅंक म्हणून कार्य केले. स्वातंत्र्योत्तर काळात प्रामुख्याने ग्रामीण पतपुरवठयाचा प्रश्न सोडविण्यासाठी आणि ग्रामीण भागात बॅंकींगच्या सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्द्‌ीष्ठपूर्तीसाठी १ मे १९५५ रोजी इंम्पीरिअल बॅंकेचे राष्ट्रीयकरण करुन **स्टेट बॅंक ऑफ इंडिया** ची स्थापना करण्यात आली. कारण देशातील मध्यवर्ती बॅंक म्हणून इंम्पीरिअल बॅंकेने १९२१ ते १९३५ या काळात चांगली भूमिका पार पाडली.

स्टेट बॅंकेंनी गेल्या दोन दशकाच्या वाटचालीमध्ये ग्राम विकास, कृषी, सहकार, उद्योग, युवक विकास आणि समाज विकासातील महत्वाचा दुर्लक्षीत घटक म्हणून महिला संघशक्ती विकासाकडे भरीव योगदान करुन

सामाजिक बांधलिकी जपलेली आहे. देशातील प्रथम क्रमांकाची आणि बॅकींग क्षेत्राचे नेतृत्व करणारी आर्थिक मोठी संस्था म्हणून स्टेट बॅकेंनी सामाजिक कार्यात सहभाग वाढवलेला आहे. बचतगट चळवळीतून आर्थिक विकासाचा उददेश साध्य कसा करता येतो हे प्रायोगिक तत्वावर अंमलात आणण्यासाठी या बॅकेंनी भंडारा जिल्हयातील सांगोला गावात प्रत्यक्ष काम केले. कर्जदारांमध्ये कर्ज फेडण्याची क्षमता निर्माण केल्याशिवाय कर्ज परतफेडीचे प्रमाण वाढू शकत नाही हे एस. बी. आय. शाखाधिकाराच्या लक्षात आले. त्यामुळेच बचतगटाच्या सहायाने सांगोला परिसरातील गरिब लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांना सक्षम करण्यासाठी स्टेट बॅकेच्या शाखेनी धाडशी निर्णय घेतला. या परिसरातील महिला बचतगटांना बॅकेशी जोडून घेतले. तेंव्हा महिला बचतगटांना जाणीव झाली की, आपल्याला स्वाभिमानाने जगण्याची संधी मिळाली आहे. कर्जाचा मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रासातून महिलांना बाहेर पडण्यासाठी बॅकेंनी महिलांना दिली. त्याचा वापर करुन त्यांनी छोटे उद्योग आणि व्यवसाय बचतगट स्थापन करून बॅकेंच्या मदतीने बचतगट सुरु केले. प्रथम चार बचतगटांचे काम सुरू केलेल्या बॅकेलायाच गावात ४०० पेक्षा अधिक बचतगट स्थापन केले. आज शाखेचे कर्ज वसुलीचे प्रमाण ९५ टक्क्यापेक्षा जास्त आहे. गावात बचतगटांच्या माध्यमातून बिंद्रीचे कारखाने, उत्तम दर्जाचे बेकरी उत्पादन, स्विपर्स, पेन, ज्वेलरी बॉक्स, छत्र्या, मेणबत्ती, अगरबत्ती, ऑफीस बॅग्ज, फॅशनेबल पर्स, पत्रावळी इत्यादी व्यवसायात महिलांनी स्वयंरोजगार सुरू केलेला आहे. स्टेट बॅकेच्या पुढाकाराने सुरू केलेल्या बचतगटांचा प्रवास हा व्यवसाय लघुउद्योगाकडे सुरू झालेला आहे. या प्रवासामध्ये बचतगटात कार्यरत असलेल्या महिलांना गटामधून निरंतर विकास, वाढत्या उत्पन्नाची खात्री आणि आर्थिकदृष्टया स्वतंत्र होण्याच्या दिशेने प्रयत्न, स्वविकासाबरोबरच ग्राम, राज्य आणि पर्यायाने देशविकास साधता येते.

केवळ सांगोला आणि चंद्रपूर परिसरात स्टेट बॅकेने बचतगटांना चालना दिली असे नाही तर विदर्भ, मराठवाडा, कोकण, गोवा, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र इत्यादी भागामध्ये बचतगट चळवळीला भक्कम आर्थिक पाठबळ देउन त्या त्या भागाचा विकास साधण्यासाठी मदत केली आहे. लक्षावधी कुटूंबांना स्वाभिमानाचा आणि विकासाचा मार्ग दाखविला आहे. बॅकेलाही स्वयंसहाय्यता बचतगटामध्ये दोन शक्यता लक्षात आल्याने एकतर महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि गटांच्या माध्यमातून छोटया घटकांमध्ये बॅकींग सेवा देण्याची संधी आहे. महिला बचतगटांना आर्थिक पाठबळ मिळाल्याशिवाय महिला धाडसाने आपले कार्य करू शकणार नाहीत. एस. बी. आय. ने मिशन हाती घेउन महाराष्ट्र आणि गोवा प्रातांत ३८ हजारपेक्षा जास्त बचत गटांची उभारणी केली आहे. महिला बचत गटांना ८०कोटी रुपयापेक्षा अधिक कर्ज वाटप केले आहे. एस. बी. आय. या बॅकेनी व्यवसायीक दृष्टिकोण बाळगला असता तर ८० कोटी रुपयाचे ८०० कोटी रु. करणे अवघड नव्हते. बॅकेनी व्यवहारीक दृष्टिकोण न

बाळगता महिलांच्या आर्थिक सक्ष्मीकरणाचे कार्य हाती घेऊन सामाजिक बांधीलकीचा ठोस पुरावा दिला आहे. बॅकेनी स्वयंसहाय्यता बचतगटांतील महिलांना असे शिक्षण दिले की, कर्ज हे असं शस्त्र आहे की, जे संयमाने आणि विचारपूर्वक वापरले नाही तर ते तुम्हाला विनाशक ठरु शकेल. परंतू कर्जाचा योग्य वापर केला तर त्यातुन आर्थिक उन्नती होईल. अशा प्रकारचे भान महिला बचतगटामधील महिलांना देऊन मोलांची भर घतली आहे. बॅकेनी महिला बचतगटांना अर्थसहाय्य करताना परस्पर विश्‍वास, प्रामाणिकपणा आणि निष्ठा ठेवल्याने शंभर टक्के वसुली करण्यासाठी बॅकेला यश मिळाले आहे.

स्टेट बॅकेची महिला बचतगटाकडे बघण्याची भूमीका ही, गटातील प्रत्येक सभासद बॅकेचा एक घटक आहे. बचतगट ही बॅकेची चालती बोलती शाखा आहे. गटाची प्रक्रीया निरंतर सुरु आहे. सभासदांचे मनौधैर्य कायम राखणे, नवीन नवीन आव्हाने पेलण्यासाठी क्षमता निर्माण करणे, वैयक्तिक आणि कौटुंबिक अडचणी लक्षात घेऊन त्यावर उपाय सुचविणे, व्यवस्थापन कौशल्य निर्माण करुन बाजाराधिष्ठीत उत्पादनास प्रोत्साहान देणे, इत्यादी सर्व कामे महिला बचतगटानां सामाजिक बांधिलकी म्हणून बॅकेने मार्गदर्शकाची आणि निरिक्षकाची भूमिका स्वीकारली आहे. अशी जाबाबदारी स्वीकारण्यामागची बॅकेचे कारण असे दिसून येते की, जागतिकीकरणामध्ये देशातील बॅकासमोर विदेशी बॅकाही व अर्थसंस्थाचे आव्हान उभे राहिले आहे. अशा स्थितीत बचतगटाची उभारणी करुन कर्जवाटप केल्यास स्पर्धेत टिकून राहण्याचा उत्तम मार्ग आहे.

सध्या बचतगटानीं उत्पादीत केलेल्या वस्तूचा दर्जा, गुणवत्ता, सांभाळणे, बाजारातील स्पर्धात्मक किमंतीची कसरत सांभाळून उत्पादीत माल विकणे, पुरवठा नियमित करणे इत्यादी आव्हाने उभी आहेत. यासाठी तांत्रिक उपाय म्हणुन नाबार्ड, मिटकॉन आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्यामदतीने महिला बचतगटातील महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या कौशल्यात वाढ करण्याचे काम स्टेट बॅकेनी स्वीकारले आहे. त्यांच्या विविध उत्पादनासाठी ठिकठिकाणी विक्री केंद्रे शॉपिंग मॉल उभी करण्यास बॅकेनी पुढाकार घेतला आहे. बॅकेने ग्रामीणभागातील शेती व्यवसायातील शेतकऱ्यांना सश्रम करण्याबरोबर चार भिंतीआड दडलेल्या स्त्री शक्तीला आत्मसन्मान देत हस्तकला, पशुपालन विणकाम, केकरी उत्पादने आणि शेकडो व्यवसायाच्या माध्यमातुन आर्थिक स्वयंपूर्णतेचा महामार्ग महिला बचतगटातील महिला सभासदांना दाखवला आहे.

स्टेट बॅकेच्या सर्व भूमिके संदर्भात सारांश रुपाने असे म्हणता येईल की ज्यावेळी एक महिला आर्थिकदृष्टया सक्षम होते तेव्हा तिच्या कुटूंबाला पौष्टिक आहार, आरोग्याची निगा आणि शिक्षण घेण्याची खात्री निर्माण होते. असा दुर्बल समाजातील घटकांना सक्षम करणे, तेंव्हा देशात आर्थिक आणि सामाजिक मोठी शक्ती निर्माण होते हेच वास्तव आपण सर्वानी स्विकारणे गरजेचे आहे.

**♣चैतन्य, ग्रामीण महिला युवक व बालविकास संस्था :**

या संस्थेची औपचारिक नोंदणी १९९३ मध्ये झाली आहे. महिला बचतगटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना संघटित करण्याची प्रेरणा दिली. आंध्रप्रदेश आणि गुजराथ राज्यातील संस्थाच्या कामाचा अनुभव लक्षात घेउन चैतन्य संस्थेनी कामाला सुरूवात केली आहे. स्वयंसहाय्यता महिला बचतगट ही महिलांच्या आर्थिक विकासाचे साधन आहे. या भूमिकेतून जोमाने कामाला सुरूवात केली. गट हे फक्त पैशाच्या देवाण घेवाणीचे ठिकाण न होता महिला शक्ती एकत्रीत आणण्याचे केंद्र आहे. या केंद्रामध्ये महिला स्वत:चे प्रश्न आणि समस्या समजून घेण्यासाठी आणि त्यावर मार्ग काढण्यासाठी उपयोगी माहिती मिळावी आणि महिलांना समज व प्रेरणा मिळावी अशा भूमीकेतून चैतन्य संस्थेनी बचतगट निर्माण केले आहेत.

महिलेचे काम म्हणजे चूल व मुल आहे ही पारंपारिक मानसिकता बदलण्याशिवाय महिला विकास शक्य नाही. समाजात महिलांच्या जीवनामध्ये आत्मविश्वास वाढवणे आणि निर्णय क्षमता जागृत करणे हीच खरी विकासाची सुरूवात आहे. कामाचा दर्जा वाढविणे, उत्पादकता कौशल्य निर्माण करणे, त्यावर हक्क निर्माण करणे ही विकासाची दुसरी पायरी आहे. या सर्वासाठी समाजाची मानसिकता बदलण्यासाठी तिची पत समाजात निर्माण व्हावी या मुख्य ध्येयाने बचतगट चैतनय संस्थेनी सुरू केलेले आहेत. या संस्थेचे कार्यक्षेत्र नंदुरबार, धुळे, अहमदनगर, नाशिक, सांगली, सातारा, पुणे या सात जिल्हयामध्ये सुरू आहे. महिला बचतगटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण हा या संस्थेच्या कार्यक्षेत्राचा केंद्रबिंदु आहे. यासाठी संस्था अनेक उपक्रम आयोजित करते. त्यापैकी काही उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

१. **प्रशिक्षण आणि इतर मदत** :

नव्याने स्थापन झालेल्या महिला बचतगटांना आणि जुन्या गरजू महिला बचतगटांना प्रशिक्षण देणे. महिला बचतगट पूर्णपणे स्वयंपूर्ण होईपर्यत बैठकीपासून हिशोब लिखाणापर्यतचे मार्गदर्शन करणे. महिला बचतगटाला आवश्यक साहित्य, पासबुब, रजिस्टर इ. उपलब्ध करून देण्यासाठी सहाय करणे.

२. **जाणीव आणि जागृती उपक्रम** :

महिला बचतगटांची निकड लक्षात घेऊन हा उपक्रम सुरू केला आहे. महिला बचतगटाच्या कर्जातून शेती, पशुपालन यातून महिला बचतगटातील महिलांनी गुंतवणुक केली आहे. महिला बचतगटांच्या कामाला मार्गदर्शन म्हणून शेती, पशुसेवा स्वयंरोजगार प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम चैतन्यतर्फे आयोजित केले जाातो आहे.

३. **बचत कर्ज संबंधी शासकीय उपक्रमाशी निगडीत काम :**

नाबार्ड बॅका आणि गटसंघ यांच्यामधील दुवा म्हणून ही संस्था कार्यरत आहे. विविध उपक्रमाचा लाभ स्वयंसहाय्यता महिलां बचतगटापर्यत पोहचवणे हे या संस्थेच्या कामाचे स्वरूप आहे. चैतन्य

संस्थेमार्फत प्रशिक्षण , संवाद, साहित्याची निर्मिती, संघाच्या कामात सहभाग आणि मार्गदर्शनाचे प्रभावी माध्यम म्हणून कार्य केले जाते. महिला बचत गटाचा उपक्रम महिलांच्या बदलाला प्रेरीत करू शकतो. कामाचा दृष्टीकोन, कामाची दिशा व परिणामकारकता निश्चित करतो. वैयक्तिक किंवा सामुहिक महिलांचा निर्णयच विकासाची प्रेरणा आणि कृती आहे हे संस्थेच्या कार्यातून दिसून येते.

♣ **सांराश** : स्वयंसहाय्यता महिला बचतगटाच्या यशामध्ये वरील सर्व वित्तीय संस्थांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष वाटा आहे. अशा संस्थांच्या मार्गदर्शनाने स्वयंसहाय्यता महिला बचतगटाची चळवळ अधिक बळकट होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे या चळवळीचा विस्तार वेगाने होत आहे. महिलांनी बचत करावी, बचतीसाठी एकत्रीत जमावे, गटाच्या मदतीने रोजगार निर्मिती करावी यातून स्वत:चा आणि कुटूंबाचा आर्थिक विकास करावा. इत्यादी साठीच बचतगट आहेत. स्वत:च्या मिळकतीवर महिलांचा अधिकार असावा, आत्मविश्वास जाागृत होऊन निर्णयशक्ती वाढावी, दिलेले घेण्यापेक्षा हवं ते मागण्याची समज आणि ताकद वाढावी यासाठी महिला बचतगटातून कुटूंब, समाजा आणि देशाच्या विकासासाठी मदत व्हावी हा केंद्रबिंदु यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी या वित्तीय संस्थाची भूमिका मोलाची ठरत आहे.

### ५.६ महिला बचतगट उद्योग आणि व्यवसाय

महिला बचतीव्दारे महिलांचे सबलीकरण म्हणजे महिला या सामुहीकपणे आणि सर्वांगीण उन्नतीचा समान विचाराने क्रियाशील होतात. पूर्वापार चालत आलेल्या रुढी परंपरांच्या जोखडाखाली दबलेली महिला नेहमीच साधन संपतीपासून वंचित राहिली आहे. २००१ च्या जनगणनेनुसार देशातील एकूण साक्षरतेचे प्रमाण ७६ टक्के असून स्त्री साक्षरतेचे प्रमाण ५४ टक्के आहे. महारा टातील ६.४६ कोटी नागरीक साक्षर असून त्यामध्ये पुरुषांची संख्या ३.७४५ कोटी आणि महिलांची संख्या २.७१ कोटी आहे. म्हणजेच महिला साक्षरता ५२.३० आहे. साक्षरतेचे प्रमाण शहरी भागात अधिक आहे. गावभागातील महिला निरक्षतेच्या ओइयापासून मुक्त झालेल्या नाहीत. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात भूमीहीन महिलांची संख्याही जाास्त आहे. शेती जनावरे, सांभाळणे, मुलांची देखभाल करणे. स्वयंपाकासाठी लाकूड आणणे, साफसफाई या काम बहुसंख्य ग्रामीण महिला अडकलेल्या आहेत. बेरोजगारी, कमी शिक्षण, अर्थजनासाठी आवश्यक कौशल्याचा अभाव, पारंपारिक समजुतीने घराबाहेर जाऊन काम करण्यावर मर्यादा, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, अशा अनेक अडचणी महिला समोर आहेत. त्यामुळेच ग्रामीण भागातील महिलांच्या सक्रीय सामाजिक सहभागावर मर्यादा येतात. देशाचा, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्तर उंचावण्यासाठी आर्थिक साक्षरतेतून महत्व आहे. जोपर्यत आर्थिक स्वातंत्र्य मिळत नाही. तोपर्यत

महिलांना त्यांच्या कल्याणासाठी विविध उपक्रमाना बळ येणार नाही. हे बळ मिळविण्यासाठी महिलांनी बचतगटाच्या माध्यमातुन उद्योग आणि व्यवसायाचा मार्ग स्विकारणे अंत्यत आवश्यक आहे. सर्वसाधारण पुरुषी मानसिकता, बदलेल्या नाहीत. त्यामुळे पुरुषी मानसिकेतून महिलांना सोयीनुसार, गृहलक्ष्मी म्हणले जाात असले तरी आर्थिकदृष्टया महिला समर्थ नाहीत. जो पर्यत महिला स्वत: स्वावलंबी होत नाहीत तोपर्यत परावलंबित्व संपणार नाही. महिलांना सामाजिक प्रतिष्ठाही मिळणार नाही. या दृष्टिकोणातून नवनवीन उद्योग व्यवसायांच्या अगणित संधीचा पुरेपूर उपयोग महिलांनी त्वरीत करुन घेतला पाहिजे. या देशात बचतीच्या माध्यमातुन महिलांची एकत्रित आर्थिकशक्ती मोठे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तन करु शकते.

देशभरातील महिला बचतगटांची संख्या दरवर्षी लाखाच्या पटीत वाढत आहे. यामध्ये बहुतांश बचतगट महिलांचे आहेत. या गटांना नाबार्डच्या बचतगट बॅक जोडणी कार्यक्रमातंर्गत अर्थसहायही उपलब्ध होत आहे. व्यवसाय कोणताही असो आणि कोणीही करावयाचा असो तो व्यवस्थित करण्यासाठी अनेक बाबींचा योग्य आणि परिपूर्ण माहिती असणे आवश्यक असते. त्यामध्ये भांडवल किती प्रमाणात आवश्यक आहे? कोठून उपलब्ध होऊ शकेल? व्यवसाय करण्यासाठी ती वस्तू तयार करण्याची पध्दत, आवश्यक परवाने, मशिनरी मिळण्याची ठिकाणे आणि बाजारपेठेत या बाबीची व्यवस्थित आणि पुरेशी माहिती असणे आवश्यक आहे. या सर्व महिलांना मार्गदर्शन होईल हा उददेश मनात ठेवून संशोधकांनी या प्रश्नांची निवड केली आहे.

महिला बचतगट म्हणजे फक्त पापड आणि मसाले करणे, कपडे शिवणे आणि धान्य दळणे, अंगणवाडी चालवणे नव्हे. महिला स्वत:च्या हिमंतीवर काय करु शकतात याची खात्री आता पुरुषांनाही झाली आहे. किरण बेदी, कल्पना चावला, बुला चौधरी, शहनाज हुसेन, ऐश्वर्या रॉय, श्रीमती प्रतिभाताई, इंदिरा गांधी, सोनिया गांधी, राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील ही केवळ यशस्वी महिलांची नांवे नव्हेतर तर कमालीची जिदद, प्रयत्नांची पराकाष्ठा करुन यश खेचून आणण्याची उमेद, आत्मविश्वास या सदगुणांचे मुर्तीमंत उदाहरण आहे. अशा असंख्य महिलांनी स्वकर्तृत्वाच्या बलावर यशाची नवनवीन क्षितिजे पादाक्रांत करुन अक्षरश: आकाशाला गवसनी घतली आहे. अशी एकही बाब नाही की जी महिला करु शकत नाही. महिला बचत गटांनी नेहमीच्या उपक्रमाबरोबरच काही नाविन्यपूर्ण उद्योग व्यवसायाचा विचार करुन तो चालवावा. अनेक महिला बचतगटांनी यातील विविध उपक्रम यापूर्वीच सुरु केले आहेत. ज्यांनी अदयापही सुरु केले नाहीत त्यांनी प्रेरणा घेऊन उद्योग व्यवसाय सुरु करावेत. काही उद्योग व्यवसायाची माहिती पुढीलप्रमाणे—

* **दैनंदिन गरजेच्या वस्तू निर्मिती उद्योग:—**

१. अगरबत्ती तयार करणे, २. आकाशकंदील तयार करणे, ३. बालवाडी चालवणे, ४. बिंदीया तयार करणे, ५. ब्युटी पार्लर चालविणे, ६. भांडयाच्या घासण्या तयार करणे ७. भांडी भाडयाने देणे, ८. दंतमंजन तयार करणे, ९. द्रोणपत्रावळी तयार करणे, १०. डिटर्जन पावडर तयार करणे, ११. फाईल्स तयार करणे,१२. गाडीची आवरणे बनविणे १३. हॅण्डवॉश शॅम्पू करणे १४. कागदी डिशेस तयार करणे १५. कागदी पाकिटे तयार करणे, १६. कागदी पिशव्या तयार करणे १७. कापडी पिशव्या तयार करणे १८. कांडी कोळसा तयार करणे १९. काळे फिनेल तयार करणे २०. केशवर्धक तेले तयार करणे २१. कुंकु तयार करणे २२. लिक्वीड बॉक्स तयार करणे २३. द्रवरुप निळ तयार करणे २४. मिठाई बॉक्स तयार करणे २५. मेणबत्ती तयार कणे २६. मेंदी व मेंदीकोन तयार कणे, २७. नर्सरी रोपवाटीका  २८. नारळाच्या करवटीचा कोळसा तयार करणे २९. पांढरे फिनेल तयार करणे ३०. राख्या तयार करणे ३१. रुम फ्रेशनर तयार करणे ३२. स्टार्च पावडर तयार करणे, ३३. स्वेटर तयार करणे ३४. शिवणकाम करणे ३५. शिकेकाई पावडर तयार करणे ३६. उटणे तयार करणे, ३७. भाजीपाला पिकविणे व त्याची विक्री करणे ३८. माहिती केंद्र चालविणे, औषधी वनस्पती गोळा करणे, ३९. हस्तकलेच्या वस्तू तयार करणे ४०. शेळीपालन , कुकुटपालन, ४१. रेशीम उत्पादन ४२. सेंद्रिय खते तयार करणे ४३. गांडुळपालन व गांडुळ खत निर्मिती ४४. डाळी तयार करणे, ४५. कौटुंबिक सल्ला केंद्र व वधु वर सूचक मंडळ चालविणे इ.

* **खाद्य पदार्थ निर्मिती उद्योग :—**

१. आलेपाक तयार करणे  २. आले पेस्ट तयार करणे  ३. आवळा पावडर तयार करणे  ४. आवळा सुपारी तयार करणे  ५. बटाटा किस तयार करणे  ६. आईस्क्रिम तयार करणे  ७. बटाटा वेफर्स तयार करणे  ८. बटाटे वडे तयार करणे  ९. भाजीपोळी पुरविणे  १०. चकल्या तयार करणे  ११. चिवडा व फरसाणा तयार करणे  १२. चिक्की तयार करणे  १३. चटण्या तयार करणे  १४. धनापावडर तयार करणे  १५. डिंक व शेंगदाणे लाडू तयार करणे  १६. इडल्या तयार करणे  १७. इडली रवा तयार करणे  १८. हळदी पावडर तयार करणे १९. जिरापावडर तयार करणे  २०. कडीपत्ता पावडर तयार करणे  २१. कुरडया तयार करणे  २२. केळी वेफर्स तयार करणे  २३. कोकम सरबत तयार करणे  २४. खवा तयार करणे  २५. खाकरा तयार करणे २६. खानावळ चालवणे  २७. खोबरा किस तयार करणे  २८. लसूण पेस्ट तयार करणे  २९. लोणची तयार करणे  ३०. मक्याचा चिवडा तयार करणे  ३१. मसाला तयार करणे  ३२. मसाला सुपारी तयार करणे  ३३. मिरची पावडर तयार करणे  ३४. पापड तयार करणे  ३५. पाणीपुरी तयार करणे  ३६. रवा भाजून देणे  ३७. राजागिरा वडी व

लाडू तयार करणे ३८. सामोसे तयार करणे ३९. सांडगे तयार करणे ४०. साबुदाणा पापडी तयार करणे ४१.शेवई तयार करणे ४२ शेंगदाणे भाजून देणे ४३. टोमॅटो सॉस, सोयासॉस बनविणे ४४. फळ रसवंती चालविणे ४५. कांदा, बटाटा, आवळा प्रक्रिया करणे ४६. हॉटेल चालविणे इ.

वरील सर्व प्रकारचे उद्योग आणि व्यवसाय महिला बचतगटामधील महिला करू शकतात. फक्त त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. लोकांनी, लोकांचे, लोकांमार्फत चालविले जाणारे राष्ट्र म्हणजे लोकशाही राष्ट्र होय. स्वतंत्र भारत देशाची गेल्या साठ वर्षातील प्रगती व महाराष्ट्राची गेल्या पन्नास वर्षाची प्रगती मध्ये रोजगारीचा प्रश्न सोडवण्यामध्ये आलेले अपयश विसरून चालणार नाही. कारण बेरोजगारांना रोजगार मिळवून देणे म्हणजेच स्वयंसहाय्यता महिला बचतगटातील महिलांना रोजगाराची हमी देणे होय. रोजगार समस्या एवढी मोठी समस्या आहे की, ती सोडविणे एकटया शासनाचे काम नाही यासाठी शासनाने कितीही मंडळे, संस्था, खाती, आयुक्तालये निर्माण केली तरी रोजगारीचा प्रश्न सुटणार नाही. रोजगाराचा प्रश्न फक्त बेरोजगारच सोडवू शकते. ज्याप्रमाणे खेळणाऱ्या लहान मुलाला पालक अभ्यासकर, म्हणून त्याच्या मागे लागतात तो काही अभ्यास करत नाही. पण तो स्वतः होऊन स्वयंस्फुर्तीने अभ्यासाला लागतो तेव्हा तो मन लावून अभ्यास करतो. तेंव्हा त्यात तो खरा यशस्वी होतो. तसे स्वयंसहाय्यता महिला बचतगटामध्ये स्वयंस्फूर्तीने महिला एकत्रीत येऊन एकजुटीने काम करत असतात. त्यामुळेच भविष्यात त्यांनी स्वयंस्फुर्तीने केलेल्या कामाला यश मिळणारच आहे.

मागेल त्याला काम मिळेल, पण कोणते काम मिळेल ? जे उपलब्ध आहे ते काम मिळेल. कामासाठी हात की हातासाठी काम? मिळेल ते काम करण्यापेक्षा आवडेल ते काम निवडा. नोकरीची वाट बघण्याची गरज नाही. ज्याला त्याला त्याच्या आवडीप्रमाणे रोजगार मिळवायचा असेल तर ज्याने त्याने आपल्या पसंतीनेच व्यवसायाची आणि उद्योगाची निवड करणे आवश्यक आहे. मन लावून काम केले पाहिजे.. आवडीप्रमाणे रोजगार निवडल्याने त्याच्या केलेला आणि गुणांना वाव मिळणार आहे. मन लावून काम केल्याने रोजगार उपलब्ध होणार आहे. यासर्व बाबी स्वयंसहाय्यता महिला बचतगटातून होत आल्याने देशाच्या आर्थिक विकासासाठी मदत होणार आहे.

वर उल्लेख केलेल्या व्यवसायापैकी काहींची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे.

१. **भाजीपाला पिकवणे आणि त्याची विक्री करणे** : महिला बचतगटाने भाडेपटट्टीवर दोन एकर जागा घेउन त्यात विविध प्रकारचा भाजीपाला पिकविला आहे. हिंदुमुस्लीम या दोन्ही समाजाच्या महिला बचतगटात असून हा भाजीपाला बाजारपेठे मध्ये विकला जातो. हा उद्योग इतका बहरला आहे की, त्या बचतगटाने भाजीपाला पिकविण्यासाठी स्वतंत्र जमीन विकत घेण्याच्या तयारीत आहेत. त्यामध्ये भाजीपाला

लागवडीपासून विक्री पर्यतची सर्व कामे नियोजानबध्द आणि परस्परांच्या सहकार्याने केली जातात. इतर महिला बचत गटांनीही आवश्य करावा असा हा व्यवसाय आहे. गावागावांत भाजीपाला तयार होतो तो शहरातील मार्केटयार्ड मध्ये भल्या पहाटे नेला जातो. तेथे मिळेल तो दर घेउन शेतकरी परत येतात. महिला बचतगटांनी माल थेट ग्राहकांपर्यत पोहचवला तर नक्कीच अधिक पैसे मिळतील. मोबाईल व्हॅनचा वापर करून भाजीपाला ग्राहकांच्या घरापर्यत उपलब्ध करण्याची आणि निवडक भाज्या स्वच्छ करून आणि पॅकबंद करून देण्याची व्यवस्था महिला बचतगटांनी केली तर उपभोक्त्याला ताजी भाजी मिळेल. परिणामी या व्यवसायातून महिला बचत गटांना चांगली अर्थप्राप्ती मिळू शकते.

२. **टोमॅटो सॉस आणि सोयसॉस तयार करणे** : टोमॅटो सॉस हा कायम मागणी असणारा पदार्थ आहे. टोमॅटोचे सॉस तयार करुन तो बाटलीत पॅकबंद करून बझार आणि डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये विक्रीस ठेवण्याचा व्यवसाय महिला बचत गटांनी जारूर करण्यासारखा आहे. सोयाबीनपासून तयार होणाऱ्या सोयासॉसलाही बाजारात चांगली मागणी आहे. विविध फळापासून जॉम, सरबते तयार करून विक्री करता येतात.

३. **फळ रसवंती चालविणे** : बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या बाटलीबंद शीत पेय शरिराला उपायकारक असल्याने सर्वसामान्य उपभोक्ता अधिक मोठया प्रमाणात फळ रसवंतीकडे वळला आहे. संत्री, मोसंबी, चिक्कू, आंबा, या फळामध्ये दुधमिश्रीत रस उपभोक्त्याला त्याच्यासमोर तयार करून दिल्यास हा एक चांगला उद्योग सुरु करता येतो. आपल्या मळया शेजारी आणि रहदारीच्या रस्त्यावर महिला बचतगटामार्फत फळ रसवंती उद्योग सुरु करता येण्यासारखा आहे. सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्हयात अनेक ठिकाणी चक्क वॉशिंग मशीनचा मिक्सर सारखा उपयोग करून तयार केलेल्या लस्सीची विक्री केली जाते. आरोग्यदायक ताक तयार करुन विकता येण्यासारखे आहे. हृद्‌यविकारावर अत्यंत गुणकारी दुधी भोपळयाचा रस काढून तो उपभोक्त्याला घरपोच देण्याचा उपक्रमही स्वयंसहाय्यता महिला बचतगटातील महिलांना करता येण्यासारखा आहे.

४. **कांदा, बटाटा, आवळा प्रक्रिया उद्योग** : महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कांदयाचे उत्पादन होते. महाराष्ट्रातील कांदयाची चव, तिखटपणा रंग व आकार यामुळे विदेशातून या कांदयाला चांगली मागणी आहे. कांदयापेक्षा कांदया पावडरीला विदेशात मोठी मागणी आहे. भाज्यांसाठी आणि मसाल्यासाठी कांदयापासून पन्नासटक्के प्रक्रिया पदार्थ आणि ३३ टक्के पावडर मिळते. हे दोन्ही प्रकार दिडवर्षे उत्तम स्थितीत राहतात. केंद्रसरकार सरंक्षण दलासाठी मसाले कांदा सुमारे बारा रूपये किलो आणि कांदा पावडर एकोणीस रूपये किलो या दराने खरेदी करते. मसाले तयार करणाऱ्या कंपन्या अर्धवट सुकलेला कांदा सुमारे १६० रू. किलो तर

कांदा पावडर १८० रू. किलो दराने खरेदी करतात. कांदा पावडरीला विदेशात सुमारे २९० रू. किलोपर्यत भाव मिळतो. याप्रमाणे सिताफळ, आवळा पावडर, गाजर पावडर, आंबा, कढीपत्ता, चिंच, केळी, बटाटा इत्यादी पावडरी आणि केळी, बटाटा वेफर्स ही सर्व उद्योग महिला बचतगटातील महिलांना आर्थिक साक्षरतेसाठी सहाय्यभूत ठरणारे आहेत.

५. **महिलांसाठी प्रशिक्षण केंद्र चालविणे** : ग्रामीण भागातील अनेक महिलांना एखादे काम किंवा लहानसा उद्योग करण्याची प्रबळ इच्छा असते. पण नेमके काय करायचे याची माहिती नसते. अशी माहिती म्हणजे प्रशिक्षण देणारे केंद्र महिला बचतगट सुरू करू शकतात. विविध उद्योग व्यवसायासाठी प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक आपल्या तालुक्यात आणि जिल्हयात असतात. त्यांच्याशी संपर्क साधून प्रशिक्षकांना योग्य मानधन देऊन त्याचा फायदा महिलांना उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी निश्चित उपयोग होऊ शकतो.

६. **औषधी वनस्पती गोळा करणे** : आयुर्वेद आणि औषधी वनस्पतींना विदेशात मोठया प्रमाणावर मागणी आहे. सारे जगच आयुर्वेदीय जीवनपध्दतीकडे सकारात्मक दृष्टीने विचार करत आहे. आपणही आयुर्वेद प्रसाराला हातभार लावू शकतो. तुळस, आघाडा, दुर्वा, फुले औषधी वनस्पती आहेत. अशा अनेक वनस्पती आपल्या आजूबाजूला फुलतात, वापरा अभावी वाळतात. अशा वनस्पती एकत्रित करून त्यांची वर्गवारी आणि प्रतवारी करून शहरात विक्री करता येतात. महिला बचतगटांनी औषधी वनस्पतीच्या विक्रीसाठी शहरी भागात स्टॉल घेऊन विक्री केल्यास अर्थजनासाठी मोठा व्यवसाय होईल. सदाफुली, माका, जास्वंद, तुळस, आले, पुदीना इ. लागवड देशात मोठया प्रमाणात केली जाते. या औषधी वनस्पतीचा वापर करून तयार केलेल्या पदार्थाचा निर्यातीसाठी वापर झाल्याने महिला बचतगटातील महिलांना आर्थिक लाभ होतील.

७. **शेळीपालन आणि कुक्कुटपालन उद्योग** : शेळया, कोबडया, मधमाशा पाळणे हे उद्योग महिला बचतगटांना चांगले अर्थजान आणि स्वयंरोजगाराचे उत्तम साधन मिळवून आहे. शेतकरी महिलांना सहजापणे हा उद्योग करता येतो. या उद्योग व्यवसायाची माहिती देणाऱ्या अनेक संस्था महाराष्ट्रात आहेत. अशा व्यवसासायाठी अनुदानाची व्यवस्था शासनाने केली आहे. त्याचा फायदा महिला बचतगटांनी घेतल्यास स्वयंरोजगार निर्माण होण्यास मदत होईल.

८. **वाती आणि पूजाचे साहित्य व्यवसाय** : वाती वळणे हा काही फक्त रिकामापणाचा उद्योग नाही. तो चांगला अर्थजनाचा व्यवसाय आहे. अलीकडे विविध पूजेसाठी लागणारे हळद, कुंकू, बुक्का, चंदन, होमहवनासाठी लागणाऱ्या समिधा, धूप हे सर्व एकत्रीत करून सुबक

पॅकींग करून विक्री करता येते. ग्राहक तयार पुजाचे साहित्य खरेदी करतो. कमी भांडवलामध्ये मोठी आर्थिक उलाढाल होणारा हा व्यवसाय महिला बचत गटांना करता येण्यासारखा आहे.

९. **फुलांचे गुच्छ तयार करणारा व्यवसाय** : ग्रामीण भागात अधिक प्रमाणात फुलशेती केली जाते. पुणे शहरात बेंगलोरहून येणाऱ्या गुलछडीच्या फुलांची काही लाख रूपयांची दररोज विक्री होते. या गुलछडीचे रंगीत कागदात गुंडाळलेले बुके दिसायला अतिशय सुंदर दिसतात. विविध समारंभात विविध प्रकारचे बुके देऊन स्वागत केले जाते. फुलांचे हार आणि गुच्छ यांची बाजारपेठे खूपच मोठी आहे. थोडी कल्पकता वापरुन पारंपारीकपणे फुलांचे हार तयार करण्याच्या व्यवसायाला आधुनिकतेची जाडे दिल्यास या व्यवसायाला चांगले भवितव्य आहे. आपल्या शेतातील फुले फक्त शहरात नव्हे तर विदेशामध्ये पाठवता येतात. त्यासाठी फुलांचा दर्जा उत्तम आणि मार्केटिंगही उत्तम प्रकारे महिला बचतगट करु शकतील. त्यातून दैनंदिन अर्थाजनासाठी मदत होऊ शकेल.

१०. **मेणबत्ती आणि पणत्या तयार करणारा उद्योग** : आपण सर्वजण विजेच्या अपुऱ्या पुरवठयाने भारनियमनाला सामोरे जात आहेत. अशावेळी मेणबत्तीची गरज किती असते हे नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. खादी आणि ग्रामोद्योग मंडळाच्या सहकार्याने मेणबत्ती तयार करण्याचे प्रशिक्षण घेऊन महिला बचत गटातील महिला हा उद्योग सुरू केलेला आहे. अनेक व्यावसायिकांनी मेणबत्ती निर्मितीच्या व्यवसायाला आधुनिकतेची जोड दिलेली आहे. उदा. अभिनेत्री डिंपल कपाडियाची कन्या व्टिंकल हिने स्वत: रंगीत मेणबत्याचा व्यवसाय चांगल्या प्रकारे चालविला आहे. तिने तयार केलेल्या मेणबत्या अनेक रंगाच्या आणि मनमोहक रंगाच्या असतात. अशा मेणबत्यांना पंचतारित हॉटेलमध्ये मोठी मागणी असते. त्याचप्रमाणे प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मूर्ती, खेळणी, कलात्मक वस्तू तयार करण्याचा व्यवसाय महिला बचतगटांना करता येण्यासारखा आहे.

११. **माहिती केंद्र चालविणे** : आजच्या काळात घरबसल्या अनेक प्रकारची माहिती केंद्र चालविण्यासाठी मोठी संधी साक्षर महिला बचत गटांना उपलब्ध झालेली आहे. व्यवस्थित माहिती अभावी होणारी कुंचबणा सर्वानाच माहित आहे. शेतकऱ्यांसाठी विविध योजना, अनुदाने, कर्जायोजना, महिलांसाठी केंद्रशासन आणि राज्य शासनाच्या महिला सबलीकरणाच्या विविध योजना इ. सर्व प्रकारची माहिती देणारी केंद्रे सुशिक्षित महिला बचत गटांना चालविता येतील.

**सारांश :**

महिला बचतगटांनी निरनिराळी सेवा क्षेत्रे विचारात घेऊन आपल्या उपक्रमाची रचना केल्यास मोठे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक कार्य उभे राहून महिलांना स्वबळावर रोजागार निर्माण करता येईल. कोणत्याही नवीन व्यवसायाची सुरूवात होते, तेंव्हा काही लोक हसतात, नावे ही ठेवतात. पण यशस्वी झाल्यावर तेच लोक डोक्यावर घेऊन नाचतात हे विसरता कामा नये. चिकाटी, जिदद्, संयम, जिज्ञासा, सर्जनशिलता, प्रामाणिकपणा, धाडस या सदगुणांचा आधार घेऊन आधुनिक उद्योगच्या साहयाने अर्थ आणि समृध्दी महिलांना खेचून आणणे शक्य आहे. त्यामुळेच आपले कुटूंब आणि आपला देश समृध्द होण्यास मदत होणार आहे. हे सर्व महिला बचतगटातील महिला निश्चितपणे करू शकतील यात शंका नाही. दैनंदिन गरजेच्या वस्तूचे उद्योग आणि खादयपदार्थ निर्मिती उद्योग अशापैकी अनेक उद्योग आणि व्यवसाय महिला बचत गटातील महिलांना स्वयंस्फूर्तीने करता येण्यासारखे आहेत. त्यांना मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळावी यासाठी नमूना म्हणून काही उद्योगांची सविस्तर नमुन्यादाखल माहिती दिली आहे.

## ५:७ महिला सक्षमीकरण आणि शासनाच्या योजना :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महिलांच्या सर्वागीण विकासासाठी केंद्रीय आणि राज्यपातळीवर विविध योजनांची आखणी आणि अंमलबजावणी करण्यात येत आहे. महिला सक्षमिकरणासाठी केंद्र शासनाने स्वतंत्र योजाना सुरू केल्या आहेत. राज्य शासनानेही महिलां सक्षमिकरणासाठी योजाना जाहिर करून अंमलबजावणीला सुरूवात केलेली आहे. अशा दोन्ही स्तरावर महिला सक्षमीकरणासाठी अंमलात आणलेल्या योजानांची माहिती महिला बचतगट, बिगर शासकीय संस्था, महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी प्रेरणा, मार्गदर्शन देणाऱ्या शासकीय विभाग या सर्वाना मिळावी हा या मागील उदद्देश आहे. महिला सक्षमीकरणासाठीच्या योजना पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### १. महिलांच्या शिक्षणासाठी योजना : (Women's Education)

मनुष्यबळ विकास मंत्रालय आणि माविम महिलांना समानतेने शिक्षण मिळण्यासाठी ही योजना राबवली जात आहे. औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणामध्ये मुलींना प्रवेश देणे, महिलांसाठी व्यावसायिभिमूख अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणे, अल्प मुदतीचे अभ्यासक्रम सुरू करून आर्थिक आणि सामाजिकदृष्टया महिलांना स्वावलंबी करणे इ. उदद्देशाने या योजाना सुरू केल्या आहेत. महिलांच्या सक्षमीकरणासाठी नाविन्यपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमास शंभर टक्के अर्थसहाय दिले जाते. नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, नोंदणीकृत सोसायटी इ. या योजनेचे फायदे घेता येतात.

२.	**महिलांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार योजना :**

महिलांना रोजगाराचे प्रशिक्षण देण्यासाठी केंद्रशासन पुरस्कृत महिला व बालकल्याण विकास मंत्रालयामार्फत ही योजना राबविली जाते. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धउत्पादन, मत्स्य इत्यादी व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन रोजगार मिळवणे, लघुउद्योग, रेशीम उद्योग, सामाजिक वनिकरण, पडीक जमीनीचा विकास इ. क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे, दारिद्र्य रेषेतील महिलांना प्रशिक्षण आणि रोजगार उपलब्ध करून देणे. या उददे्शाने ही योजना सुरू केली आहे. चालू भांडवली खर्च आणि कच्यामालासाठी पहिल्या वर्षी १००टक्के, दुसऱ्या वर्षी ५० टक्के व तिसऱ्या वर्षी ३० टक्के अनुदान केंद्रशासन देते. या योजनेसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सहकारी स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत लाभ घेता येतो.

३.	**महिलांना उत्पादन वाढीच्या योजना :**

केंद्र सरकारच्या महिला बाल कल्याण विकास मंत्रालयामार्फत योजानेची अंमलबजाावणी केली जाते. शहरी, ग्रामीण, अनुसूचित जाती/ जमाती, गरजू महिलांना लाभ मिळवून देणे, पारंपारीक आणि अपारंपारिक व्यवसाय विषयक प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे, या उददे्शाने योजना चालू केली आहे. प्रत्येक लाभार्थी महिलांना २५० रू प्रतिमाह अनुदान दिले जाते. त्याचप्रमाणे प्रशिक्षण साहित्य, बीजभांडवल, बालक निगा केंद्र, व्यवस्थापन प्रशिक्षण इ. साठी अनुदान दिले जाते. सार्वजानिक क्षेत्रातील महामंडळे, स्वयंसेवी संस्था, विद्यापीठातील माहिती विकास केंद्रे, नोंदणीकृत बिगर शासकीय संस्था, यांच्याकडून सदर प्रस्ताव राज्यशासनामार्फत केंद्राकडे पाठविले जाातात.

४.	**महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी शैक्षणिक कार्य :**

केंद्र शासनाच्या महिला आणि बालविकास मंत्रालयामार्फत ही योजना राबविले जाते. महिला वरील अत्याचार थांबवण्यासाठी कायदे वि ायक माहिती आणि शिबीरे भरवणे, महिलांसाठीच्या कार्यक्रम प्रसारणासाठी अनुदान देणे या उददे्शाने ही योजना राबविली जाते. या योजनेसाठी १०० टक्के अनुदान दिले जाते. सेवाभावी संस्था, विद्यापीठे, औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे, उच्चशिक्षण संबंधित संस्था इ. च्या मार्फत लाभ घेता येतो.

५.	**स्त्रीशिक्षणासाठी लघुअभ्यासक्रम : Short Duraation Education Courses for Women** केंद्रीय समाज कल्याण मंडळामार्फत योजना कार्यान्वीत केली आहे. शिक्षण आणि सुयोग्य कौशल्याचा विकास करून महिलांचे सामाजिाक आणि आर्थिक सक्षमीकरण, शाळा सोडून दिलेल्या, अनुतिर्ण महिलांचे शिक्षण पूर्ण करण्याच्या उददे्शांनी ही योजना सुरू

केली आहे. राज्य शासन संबंधीत विभाग, महिला विकास महामंडळ, स्थानिक स्वराज्यसंस्था, सेवाभावी संस्था यांच्यामार्फत लाभ घेता येतो.

### ६. कामकरी महिलांसाठी वसतिगृहे :— (Working Women's Hostel)

केंद्रीय समाजकल्याण मंडळामार्फत ही योजना कार्यान्वीत केली आहे. कामगार महिलांना सुरक्षित निवासस्थाने पुरविणे, अनुसुचित जाती जमातीसाठी राखीव जागा ठेवणे, अविवाहीत, घटस्फोटीत, विधवा इत्यादी महिलांना वसतीगृहाचा लाभ देणे या उद्देशाने ही योजाना सुरु केली आहे. वसतीगृहाच्या जागा खरेदीसाठी ५० टक्के, इमारत बांधकाम खर्चापैकी ७५ टक्के, अनुदान मिळते. मंजार निधीपैकी ९० टक्के निधी ३ हप्त्यात मिळू शकते. १० टक्के निधी पूर्णत्वाचा दाखला राज्य शासनाने दिल्यानंतर मिळू शकतो. स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, महिला विकास महामंडळे, विद्यापीठ, शाळा महाविद्यालये या योजनेचा लाभ घेऊ शकतात. शहरामधील महिलांचे उत्पन्न १६,००० रुपये आणि इतर ठिकाणी १५,००० रुपये उत्पन्न असणाऱ्या महिलांना याचा लाभ घेता येतो.

### ७. सामाजिक, आर्थिक कार्यक्रमाअंतर्गत उत्पादन केंद्र उभारणे :

(Socio-Eco Programme through Establishment Production Centre)

केंद्रीय समाजकल्याण विभागामार्फत ही योजाना कार्यान्वीत केली आहे. महिला आणि महिला संस्थांना उत्पादनकेंद्रे उघडण्यास मदत करणे, गरजू महिलांना अर्धवेळ, पूर्णवेळ रोजागार पुरवणे इ. उद्देशांनी ही योजाना सुरू केली आहे. प्रत्येक प्रकल्पांचा स्वतंत्रपणे विचार करून जास्तीत जाास्त ३ लाखापर्यत अर्थसहाय्य मिळते. बिगरशासकीय संस्था, महिला बचतगट, लाभार्थीना प्रथम १५ टक्के रक्कम गुंतवावी लागते. नंतर केंद्रीय समाजकल्याण विभागामार्फत मिळविता येतात. प्रशिक्षणार्थीना मानधन, उपकरणे, इमारतीचे भाडे, आकस्मिक निधी इ. साठी अनुदान दिले जाते. नोंदणीकृत शिक्षणसंस्था, समाज कल्याण संस्था व बिगर शासकीय संस्था यांच्यामार्फत लाभ घेता येतो.

### ८. महिला विकास व सहाय्य योजना :

स्वयंसिध्दा एकात्मीक महिला सक्षमीकरण, केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्रालय मार्फत ही योजाना केली आहे. विविध विभागाच्या योजनांच्या एकत्रीकरणातून महिला सक्षमक करणे, जागृकता निर्माण करणे, स्थानिक पातळीवरील नियोजनामध्ये सहभाग वाढवणे इ. उद्देशांनी ही योजना सुरू केली आहे. गट निर्मिती, लोकाभिमूख नाविन्यपूर्ण कार्यक्रम इ. साठी १०० टक्के अनुदान दिले जाते. शासकीय आणि बिगर शासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था हे या योजनेसाठी पात्र ठरतात.

**९. स्वशक्ती ग्रामीण महिला विकास आणि सक्षमीकरण प्रकल्प :**

केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्रालय मार्फत ही योजाना केली आहे. महिला सक्षमीकरणासाठी वातावरण निर्मिती, महिला स्वयंसहाय्यता बचतगटांना प्रेरणा, शोषित, विधवा, निराधार महिला, कैदी महिला, वेश्या व्यवसायातील महिला, मानसिक असंतुलीत महिला इत्यादींना आधिार दिला जाणे. लाभार्थिना केंद्रशासनामार्फत निधी दिला जातो. ५ टक्के रक्कम लाभार्थीना उभारावी लागते. वित्तीय संस्था, बिगर शासकीय संस्था या योजनेसाठी पात्र ठरतात.

**१०. स्वधार हलाखीच्या परिस्थिती मधील महिला योजना :**

महिला व बालविकास मंत्रालय मार्फत ही योजना कार्यान्वीत केली आहे. हालाखीच्या स्त्रीयांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करणे, मानसिक आधार देणे, मार्गदर्शन, शिक्षण, जागरूकता याद्वारे पुनर्वसन करणे अशा महिलांच्या वैद्यकीय कायदेशीर गरजा पूर्ण करणे इ. उदद्‌ेशाने ही योजना सुरु केली आहे. दरडोई २५,०००/— रुपये प्रमाणे आणि रू. २५ लाखापैकी ७५ टक्के किंवा खर्चाच्या ७५ टक्के कमी असलेली रक्कम इमारतीसाठी दिली जाते. ५ वर्षातून एकदा फर्निचर, मनोरंजन साहित्य यासाठी अनुदान मिळते.

**११. कौटुंबिक मार्गदर्शन केंद्रे : (Family Counselling Centers)**

केंद्रीय समाज कल्याण विभागामार्फत ही योजना कार्यान्वीत केली आहे. महिलांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी माग्रदर्शन करणे, सामाजिक आणि कौटुबिक अत्याचारास बळी पडलेल्या महिलांना मार्गदर्शन करून त्यांचे पुनर्वसन करणे इ. उदद्‌ेशासाठी ही योजना राबविली जाते. यासाठी अस्तित्वात असलेल्या केंद्राना वार्षिक १ लाख रू. नवीन सल्लागार केंद्रास १.१५ लाख रू. अनुदान दिले जाते. सेवाभावी संस्था आणि मानसशास्त्र, सामाजिकशास्त्र याविषयातील पदव्युत्तर शिक्षण धारक हे पात्र आहेत.

**१२. राष्ट्रीय पाळणाघर योजना : (Nation Crecle Scheme)**

महिला बालविकास मंत्रालयामार्फत ही योजना कार्यान्वीत केली आहे. कामकरी आणि आजच्या महिलांच्या शुन्य ते पाच वर्षे गटातील बालकांसाठी पाळणाघर सुरू करणे, बालकांना पूरक आहार, वैद्यकीय सेवा, दैनंदिन निगा, मनोरंजनसेवा पुरवणे इ. उदद्‌ेशाने ही योजना सुरु केली आहे. पहिल्या ५ वर्षासाठी दरवर्षी २५ मुलांना पाळणाघरासाठी १८४८० रू. इतका आवर्ती आणि ४००० रू. अनावर्तीसाठी अनुदान देते. त्यानंतर दरवर्षी २००० रू. पुनर्भरण अनुदान मिळते. महिला मंडळ, नोंदणीकृत संस्था, सार्वजनिक न्यास या संस्था ही योजना राबवू शकतात.

**१३. किशोर शक्ती योजना : (Adolescent Girls Scheme)**

महिला आणि बाल विकास मंत्रालय नवी दिल्ली मार्फत ही योजना कार्यान्वीत केली आहे. १५ ते १८ वयोगटातील मुलींचे पोषण व आरोग्य सुधारणा घडवून आणणे, मुलींची निर्णयक्षमता वाढावी यासाठी त्यांना साक्षर करणे. मुलींना संख्या ज्ञानाचे शिक्षण देणे. मुलींच्या प्रश्नाबाबत जागृकता निर्माण करणे इ. उदद्‌शाने ही योजना सुरु केली आहे. एकात्मीक बालविकास प्रकल्प क्षेत्रासाठी वार्षिक १ लाख ९०हजार अनुदान दिले जाते. स्थानिक स्वराज्य संस्था आणि सेवाभावी संस्था या योजनेसाठी पात्र ठरतात.

**१४. महिला संशोधन, प्रकाशन व पर्यवेक्षणासाठी योजना :**
(Women's Research Publication and Monitoring Scheme)

केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालय नवी दिल्ली मार्फत ही योजना कार्यान्वीत केली आहे. महिला व बालकल्याण संशोधन करणे, परि"ादा आयोजित करणे, प्रकाशनासाठी प्रोत्साहन देणे इ. उदद्‌शाने ही योजाना सुरु केली आहे. महिला अभ्यास, अध्ययन, संशोधन आणि प्रकाशनासाठी अनुदान दिले जाते. विद्यापिठे, संशोधनसंस्था, व्यावसायिक संघटना या योजनेसाठी पात्र ठरतात.

**१५. महिला आणि नूतनक्षम उर्जाविकास कार्यक्रम :**
(Women & Eanergy Development programme)

पारंपारिक उर्जा मंत्रालय नवी दिल्ली मार्फत ही योजाना कार्यान्वीत केली आहे.ग्रामीण भागातील महिला बचतगटांना नूतनक्षम उर्जा प्रणालीचा वापर करणे, व्यवस्थापन आणि प्रसार करणे. या कार्यक्रमाअंतर्गत बचतगटातील महिलांना सक्षम करणे इ. उदद्‌शाने ही योजना सुरु केली आहे. बचत गटामधील महिलांना २०,००० अर्थसहाय्य बचत गटासाठी १०००० रू. अनुदान दिले जाते. महिला नूतनक्षम तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणासाठी १५०००/— रु. इ. अनुदान दिले जाते. महिला स्वयंसहाय्यता गट आणि ग्रामीण विकास मंत्रालय या योजनेसाठी पात्र ठरतात.

**१६. राष्ट्रीय महिला कोष योजना : (Rashriya Mahila Kosh Yojana)**

मनुष्यबळ विकासमंत्रालया अंतर्गत महिला व बालविकास विभागाच्या वतीने ही योजना सुरु केली आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील दारिद्रेरेषेखालील महिलांसाठी उत्पन्नाचे मार्ग निर्माण करून देणे, गरिब महिलांना अर्थसहाय देणे, महिला बचतगटांना मदत करणे, रोजगार वाढविणे इ. उद्योगासाठी ही योजना सुरू आहे. यासाठी योजनातंर्गत २५ टक्के कर्ज मध्यम मुदतीचे, ७५ टक्के कर्ज लघुमुदतीच्या स्वरूपात दिले जाते. बिगर शासकीय संस्था, सहकारी संस्था, महिला विकास महामंडळ, महिला बचतगट या योजनेसाठी पात्र ठरतात. राष्ट्रीय महिला कोषाच्या

योजनांतर्गत मुख्य कर्ज योजना व कर्ज प्रोत्साहन योजना, फिरत्या निधीची योजना, स्वयंसहाय्यता गटांचा विकास आणि स्थैर्याच्या योजना, मरणोत्तर कर्जमाफी व पुनर्वसन निधी योजना, असुरक्षिततेसाठी लघु वित्तपुरवठा योजना म्हणजेच दुष्काळ आणि इतर नैसर्गिक कारणाने कमवत्या व्यक्तीच्या आजारपणामध्ये अति गरिबांना पुरेसे अन्न मिळवून देण्यासाठी लघुकर्ज योजना सुरू केली आहे. महत्वाचे म्हणजे ही योजना महिला बचतगटा मार्फत राबविली जाते. प्रत्येकाने ५ किलो धान्य को ाात जामा केल्यास जामा केलेल्या धान्याच्या १०पटीत धान्य कर्ज घेता येते. प्रत्येक सभासद ५० किलो धान्य याप्रमाणे गटास ५ ते ७ क्वींटल धान्य खरेदीसाठी कर्ज मिळू शकते.

**सारांश** : वरील सर्व योजना केंद्रशासनाने महिलांच्या विकासासाठी कार्यान्वीत केल्या आहेत. यापैकी अनेक योजना महिला आर्थिक सक्षमतेसाठी महिला बचतगटांना राबविता येण्यासारख्या आहेत. शासनाने देऊ केलेल्या योजना ग्रामीण भागातील महिलांनी समजून घेणे आणि त्यापध्दतीने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

## ५:८ महिला विकास आणि महाराष्ट्र शासनाच्या योजना

केंद्राप्रमाणे घटनेनुसार महिला विकासाची जबाबदारी राज्य शासनावर असल्याने राज्य सरकारही अनेक योजना तयार केल्या आहेत. राज्या बरोबर केंद्राच्या योजनांची अंमलबजावणी केली जाते महिला विकासासाठी स्वतंत्र योजना राज्यशासन महिला आणि बाल कल्याणद्वारे राबविल्या जातात. समाजामधील निराधार परितक्त्या, विधवा, देवदासी अशा दुर्बल घटकातील महिलांचे कल्याण साधण्यासाठी महाराष्ट्र शासन सातत्याने कार्यरत आहे. अशा योजनांची माहिती महिला व बालिका कल्याण क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, महिला बचतगट कार्यकर्ते, स्थानिक स्वराज्य संस्था, लोकप्रतिनिधी, कर्मचारी यांच्या दृष्टीने महत्वाचे आणि मार्गदर्शक ठरणाऱ्या योजना पुढीलप्रमाणे आहेत.

### १. आधारगृह योजना :

वय वर्षे १८ ते ४० वयोगटातील निराधार, परितक्त्या, कुमारीमाता आणि समस्याग्रस्त महिलांना आश्रय देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याच्या उदद्देशाने ही योजना राबविली जाते. नोंदणीकृत स्वयंसेवासंस्था विशिष्ट नमुन्यातील ४ प्रतिमध्ये संबंधित जिल्हा महिला आणि बालकल्याण अधिकारी यांच्याकडे अर्ज करू शकते. गरजू महिला स्वयंभू संस्थेकडे किंवा सामाजिक कार्यकर्ते यांच्यामार्फत अर्ज करू शकते. कोणतीही नोंदणीकृत स्वयंसेवीसंस्था या योजनेस पात्र असते. या योजनांतर्गत लाभधारकाच्यासाठी ५०० रू. अनुदान स्वंयसेवी संस्थेला दिले जाते.

## २. संरक्षणगृह योजना :

महिलांना स्वतंत्रपणे किंवा पोलीसामार्फत प्रवेश मिळवून दिला जातो. अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदयानुसार वेश्याव्यवसायातून सोडवून आणलेल्या महिलांना अन्न, वस्त्र, निवारा देऊन काही महिलांचे विवाह केले जातात. वेश्याव्यवसायातून पोलीसांनी सोडवून आणलेल्या महिलांचे पुनवर्सन करण्यासाठी संरक्षण गृहे चालविली जातात. महिलांचा अनैतिक व्यापार प्रतिबंध करण्याच्या उदद्‌ेशासाठी संरक्षणगृह योजना राबविली जाते.

## ३. माहेर योजना :

निराश्रीत, परितक्त्या, कुमारीमाता, संकटग्रस्त महिला यांना अनुदान स्वरूपात मदत करून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या उदद्‌ेशानी ही योजना राबविली जाते. या योजनेत महिलेला दरमहा २५० अनुदान १ वर्षासाठी दिले जाते. त्यापैकी १२५ रू. रोख स्वरूपात आणि १२५ रू. बॅकेत तिच्या नावे जमा केले जातात. महिला स्वत: किंवा समाज कार्यकर्ते यांच्यामार्फत महिला बाल कल्याण विभागाकडे अर्ज करू शकते. नोंदणीकृत संस्थेमार्फत ही योजना चालविली जाते.

## ४. महिला आधारगृहातील व अनाथ मुलींच्या विवाहासाठी आर्थिक सहाय्य योजना

शासकीय राज्यगृहे, आधारगृहे, अनाथ मुली, माहेर योजनेतील घटस्फोटीत विधवा महिला यांच्या मुलींच्या विवाहासाठी आर्थिक मदत पुरविणे या उदद्‌ेशांनी ही योजना सुरु केली आहे. अशा मुलींच्या विवाहासाठी १५,००० रू. अनुदान मिळते. यासाठी संबंधीत महिलेने संस्थेच्या अधिक्षकांकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

## ५. व्यावसायिक प्रशिक्षणासाठी मुलींना विद्यावेतन योजना :

आर्थिकदृष्टया मागासलेल्या कुटुंबातील मुलींचे शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी विद्यावेतन देण्याच्या उदद्‌ेशांनी ही योजना राबविली जाते. प्रशिक्षण संस्थेत अशा मुलींना दरमहा १०० रूपये विद्यावेतन देण्यात येते. नर्सिग, पॅकींग, टेलीफोन ऑपरेटर, आय.टी.आय इ. साठी प्रवेश मिळविलेल्या मुली योजनेस पात्र ठरतात. प्रशिक्षण संस्था आणि अभ्यासक्रम शासनमान्य असणे आवश्यक असते.

## ६. स्वयंरोजगार योजनेखाली महिलांना व्यक्तिगत अनुदान योजना

आर्थिकदृष्टया कमकुवत महिलांना स्वत:च्या कुटूंबाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत करणे, लहान व्यवसाय करण्यासाठी अनुदान देण्याच्या उदद्‌ेशांनी ही योजना राबविली जाते. यासाठी व्यक्तीगत व्यवसाय सुरू करण्यासाठी ५०० रू. अनुदान मिळते. निराधार परितक्ता, विधवा, संकटग्रस्त आणि आर्थिकदृष्टया मागास महिलांना व्यवसायाचा परवाना असणे आवश्यक असते. या योजनेच्या लाभार्थीना उत्पन्न

दाखला, परवाना दाखला, वास्तव्य दाखला, दोन प्रतिष्ठीत व्यक्तीचे ओळखपत्र इत्यादीसह अर्ज जिल्हा महिला आणि बाल कल्याण अधिकारी यांचेकडे करावा लागतो.

**७. देवदासी निर्वाह अनुदान योजना :**

देवदासी असलेल्या महिलेला निर्वाह/आर्थिक मदत करणे या उद्द्देशांनी ही योजना राबविली जाते. अशा महिलांना दरमहा ३०० रू. निर्वाह अनुदान देण्यात येते. देवदासी प्रमाणपत्र आणि उत्पन्न दाखल्यासहीत अर्ज ग्रामपंचायतीमार्फत जिल्हा महिला आणि बालकल्याण अधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक असते.

**८.देवदासी किंवा देवदासी मुलींच्या विवाहासाठी अनुदान योजना :**

देवदासी मुलींच्या विवाहास आर्थिक मदत करून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या उद्द्देशांनी अनुदान मिळते. देवदासी मुलींच्या विवाहासाठी १०,००० रूपये अनुदान मिळू शकते. विवाहानंतर साठ दिवसापर्यत जिल्हा महिला आणि बालकल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक असते. १८ वर्षे पूर्ण व वार्षिक उत्पन्न १५००० हजार रुपयेपेक्षा कमी असलेल्या महिला पात्र ठरतात.

**९. देवदासी बीज भांडवल योजना :**

देवदासी महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी बीज भांडवल पुरविण्याच्या उद्द्देशांनी ही योजना राबविली जाते. अशा महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी राष्ट्रीयकृत बॅकेंकडून २६२५० रुपये कर्ज आणि शासनाकडून अनुदान ८७५० रू. असे एकूण ३५००० रू. अर्थसहाय्य मिळू शकते. लाभार्थी महिलेने सर्व आवश्यक कागदपत्रासह जिल्हा महिला आणि बालकल्याण अधिकारी यांचेकडे दोन प्रतित अर्ज करणे आवश्यक असते.

**१०. बहुउद्द्देशीय महिला केंद्र :**

केंद्र आणि राज्य योजनांची माहिती देणे. महिलांना मोकळया वातावरणात विचार विनिमय करता यावा आणि व्यावसायिक प्रशिक्षण, नोकरी, आरोग्य, कायदे सल्ला इ. संदर्भात आपतग्रस्त महिलांना सुविधा पुरवणे या उद्द्देशानी ही योजना राबविली जाते. यासाठी सेवाभावी संस्थाना आवर्तीसाठी १,३७,६०० रू. आणि अनावर्ती साठी २,७४,५०० रू. पर्यत अनुदान मिळते. आपतग्रस्त महिला, कायदेविषयक सल्ला घेणाऱ्या कौटुंबिक कलहात सापडलेल्या महिला आणि आरोग्य आणि वाचनालयाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या स्वयंसेवी संस्था या योजनेला पात्र ठरू शकतात. अशा संस्थांनी या योजनेसाठी जिल्हा महिला आणि बालकल्याण विभागाकडे विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक असते.

## ११. कामधेनू योजना :

गरजू महिलांना घर बसल्या काम मिळावे आणि त्यांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी व्हावे या उददेशानी शासकीय आणि निमशासकीय संस्था मार्फत छोटी छोटी कामे देण्यात येतात. अशा महिलांना बीजभांडवल मिळवून दिले जाते. यासाठी नोंदणीकृत संस्था, महिला मंडळे पात्र ठरतात. शाळा, हॉस्पीटल यांना आवश्यक साहित्यासाठी जिल्हा महिला आणि बालकल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करावा लागतो.

## १२. सेवाघर योजना :

मध्यमवर्गीय कुटूंबामधील पतीपत्नी असे दोघेही नोकरी किंवा व्यवसाय करतात. त्यांच्या मुलांना सांभाळण्यासाठी पाळणाघर, तयार जेवणाचे डबे, धुलाई आणि इस्त्री केंद्र आणि गरजू महिलांना रोजगार पुरवण्याच्या उददेशाने ही योजना राबविली जाते. एका केंद्रासाठी १.५० लाख रू. अनुदान मिळते. नोकरी आणि व्यवसाय करणाऱ्या जोडप्यांना, नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था, आर्थिकदृष्टया मागास महिला या योजनेसाठी पात्र असतात. यासाठी जिल्हा महिला आणि बालकल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक असते.

## १३. महिला मंडळांना सहाय्यक अनुदान योजना :

महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे, महिलांनी स्वत:चा व्यवसाय करणे, त्यांनी प्रशिक्षण केंद्रे सुरू करणे. तसेच हस्त आणि कुटीर उद्योग निर्माण करण्याच्या उददेशानी ही योजना राबविली जाते. या योजनेसाठी २८,५०० रू अनावर्ती खर्चासाठी आणि ४३,००० रू. वार्षिक आवर्ती खर्चास अनुदान मिळते. प्रशिक्षणार्थीला ७५ रू. विद्यावेतन दिले जाते. तीस महिलांना सहा महिन्यात प्रशिक्षणासाठी अनुदान दिले जाते. आर्थिकदृष्टया कुमकुवत महिला, नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था या योजनेसाठी पात्र ठरतात.

## १४. सकस आहार योजना :

समाजातील गरीब, गलिच्छ वस्तीतील गरोदर महिला माता सहा वर्षापर्यतच्या मुलांना पोषक आहार मिळावा या उददेशानी ही योजना राबविली जाते. या योजनेअंतर्गत १०० ग्रॅम शिरा, उसळ, उपीट असे देण्यात येते. अशा पदार्थामध्ये ८ ते १० ग्रॅम प्रथिने २५० ते ५०० ग्रॅम उष्णांक असतो. महिला मंडळ, युवक मंडळ, रोटरी क्लब, स्वयंसेवी संस्था, सकस आहार केंद्रे, गरोदर स्त्रीया अशा योजनेस पात्र असतात. हे केंद्र चालविण्याकरीता संचालिका महिला आणि बालकल्याण विभाग, महाराष्ट्र राज्याचा जिल्हा बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठवावे लागतात.

**सारांश :** वरील विविध योजना केंद्र व राज्य शासनानी महिलांच्या विकासासाठी हाती घेतलेल्या आहेत. यापैकी महिला बचत गटांतर्गत महिलांनी याचा अभ्यास करून अमंलबजावणी केल्यास महिलांच्या रोजगार निर्मिती होण्यास निश्चित मदत होणार आहे. पण यासाठी महिलांना लिहिता वाचता येणे गरजेचे आहे. हे जरी या महिलांच्या लक्षात आले तर त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे त्यांचा कल अधिक वाढणार हा सर्वात मोठा लाभ महिला बचत गटांना होणार आहे.

## स्वयंसाहाय्यता गटांची स्थिती (सन २००६- २००७)

( आकडे कोटी रुपयांत )

| राज्ये | व्यपारी बॅंका | | प्रादेशिक ग्रामीण बॅंका | | सहकारी बॅंका | | एकुण ( भारत ) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बचत गटांची संख्या | कर्ज पुरवठा | बचत गटांची संख्या | कर्ज पुरवठा | बचत गटांची संख्या | कर्ज पुरवठा | बचत गटांची संख्या | कर्ज पुरवठा |
| उत्तरेकडील राज्ये | १९७९६ | ४९.४ | २१४२७ | ५१.६ | ११९७३ | ३१.४ | ५२३९६ | १३२.४ |
| उत्तर -पूर्वे कडील राज्य | २२७९ | ७.८ | ९५२१ | ११.७ | ४७८ | ०.७ | १२२७८ | २०.२ |
| पूर्वेकडील राज्य | ४९६७८ | ९६.५ | ७३१७४ | १२१.० | ३५३८५ | ४३.० | १५८२३७ | २६०.५ |
| मध्य भारतातील राज्य | ४५२९७ | १०८.८ | ७१९५१ | १५०.५ | ९७६१ | १७.१ | १२७००९ | २७६.३ |
| पश्चिमेकडील राज्ये | २८८०३ | ८१.३ | १७१०९ | ४०.० | ८९०३ | १९.६ | ५४८१५ | १४०.९ |
| दक्षिणेकडील राज्य | ३९२५६९ | १९११.१ | २१२८१६ | ९०३.३ | ६८९७१ | २५९.४ | ६७४३५६ | ३०७३.९ |
| भारत (एकूण बेरीज) | ५३८४२२ | २२५४.८ | ४०५९९८ | १२७८.३ | १३४६७१ | ३७१.१ | १०७९०९१ | ३९०४.२ |

Source:Annual Report of NABARD ( 2006-2007)

तक्ता क्रं १

# ( सांगली जिल्हा मध्यवर्ती बॅक वर्षनिहाय बचतगट लिकेज माहीती)

## दि. ०१.०४.२००२ पासून दि. ३१.१२.२००७

| साल | खुले ए.पी.एल गट संख्या | दारिद्रय रेषेखाली बी.पी.एल. गट संख्या | एकूण | एकूण महिला संख्या | बॅकेने केलेला कर्ज पुरवठा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **ए.पी.एल** | | **बी.पी.एल** | |
| | | | | | गट (रू.लाखात) | रक्कम रू.लाखात) | गट | रक्कम |
| सन २००२ ०३ | ६६५० | ७७० | ७४२० | ९०१२५ | १५२ | २८.३७ | २०४ | १३५.७५ |
| सन २००३ ०४ | ७८५० | ८९० | ९६२७ | १०९६०२ | ५३६ | ६८.५१ | ३९६ | २३०.३९ |
| सन २००४ ०५ | ९६३२ | ९०४ | १०५३६ | १३५८८७ | २२९२ | ३४९.६१ | ४३० | ३३२.०६ |
| सन २००५ ०६ | १२९३४ | १४८५ | १४४१९ | १८२८६८ | ६१९९ | १०६२.८८ | ५३४ | ५०३.६५ |
| सन २००६ ०७ | १५३५५ | १८३६ | १७१९१ | २१६८०२ | १०९३४ | २०२६.८७ | ७५४ | ७०१.५१ |
| डिसेंबर २००७ | १६९६५ | २१३४ | १९०९९ | २४४४६९ | ११८०१ | २५१२.४८ | ८९१ | ८९७.५४ |

ए.पी.ल २५ कोटी १२ लाख ४७ हजार
बी.पी.ल. ८९ कोटी ७५ लाख ४ हजार
एकूण ११४ कोटी ८७ लाख ८७ हजार
महिलांची संख्या २४लाख ४ हजार ४६९

मध्यवर्ती बॅक

मुख्य कार्यालय

**संदर्भ :—**

१. नाबार्ड मार्गदर्शिका — बॅक ऑफ महाराष्ट्र ,कृषी विकास केंद्र, पुणे १३

२. डॉ. वि. वि. घाणेकर — स्वयंसहाय्यत्ता समुह बचतगट, प्रकाशन मुद्रालय, १४११ सदाशिव पेठ पुणे —४११०३०, २००६

३. कृषीभूषण वि.ग. राहूल — बचतगट कृषी उदयोजक, सुविधा प्रकाशन, ३७४ उत्तर कसबा सोलापूर ४१३००७

४. एस. बी. पवार — बचतगटासाठी स्वयंरोजगाराचे ५१ महामार्ग, शुभम बहुउददेशीय मार्गदर्शन संस्था पुणे ४११०३०

५. एस. बी. पवार — बचतगटासाठी स्वयंरोजगाराचे १०१ महामार्ग शुभम बहुउददेशीय मार्गदर्शन संस्था पुणे ४११०३०

६. प्रबोधन प्रकाशन ज्योती, २००८, अंक दुसरा महिला दिन विशेषांक समाजवादी प्रबोधिनी,इचलकरंजी

७. आम्ही उदयोजिका मासीक फेब्रुवारी २००८.

८. लोकराज्य मासिक — मार्च २००८ संपादकीय पत्ता सतीश ललीत, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

९ वार्षिक अहवाल २००६—०७ महिला व बचतगट विकास मंत्रालय भारत सरकार

१०. Ashok kumar Harish – Women power status of women in India, Publicatioon- Gian publishing House New Delhi 1991

11- Varma S.B.- Status of Women in modern India, Deep and Deep publication ,pvt.Ltd,New Delhi 2005

12 Datar Chaya – Status of women in Maharashtra An update unit for women's studies Tata institute of social science, Mumbai 2003

13. Borian M.P. - Empowerement of rural women Detterents and Determinats concept publishing company,New Delhi 180059 First published 2008

14. Seibel, H.D. and Khadak S SHG Banking in India saving and development, 132-149 2002
15 NABARD – Studies on self- Help Groups of the rural poor, National Bank for Agriculture and Rural Development Mumbai 1989

# प्रकरण ६
# स्वयंसहाय्यता गटामधील महिलांच्या आर्थिक अणि कौटुंबिक घटकांचे विश्लेषण :

## ६:१ प्रस्तावना :—

भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले पण महिलांना स्वातंत्र मिळाले का? याचा शोध घेताना खेदाने नाही असे म्हणावे लागते. इतर देशात महिलांना घटनात्मक अधिकार मिळण्यासाठी अनेक प्रकारे संघर्ष करावे लागले. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनात्मकरित्या महिलांना अधिकार दिले. महिला स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिला फक्त आर्थिकदृष्टया सक्षम झाल्यामुळे महिला समाजकारणात आणि राजकारणात सक्रीय सहभागी होऊ लागल्या आहेत. देशपातळीवर राष्ट्रपतीपासून ग्रामपंचायत सदस्य पदावर महिला विराजमान झाल्या आहेत. गेल्या दशकात स्वयंसहाय्यता महिला गटाच्या माध्यमातून गग्रमीण भागातील महिलांचे आर्थिक परिवर्तन समाजाला पोषक आणि उज्वल भविष्याकडे नेणारे आहे असा विश्वास वाटतो.

स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिलांनी विशेषता: ग्रामीण महिलांनी विविध क्षेत्रात जी भरारी घेतली आहे. ती नक्की आर्थिक विकासाला मदत करणारी आहे. शहरामधील महिला सर्वत्र आघाडीवर असल्याचे दिसून येते. स्वयंसहाय्यता महिला बचतगटातून ग्रामीण भागामधील महिला या कार्यात्मक आर्थिक साक्षरतेमुळे बोलू लागल्या आहेत, अन्यायाची चीड त्याच्यामध्ये निर्माण झाली आहे. ही बदलत्या सामाजिक प्रणालीचे घोतक आहे. बचत गटातून संघटित महिला सामाजिक बांधीलकीतून अनेक सामाजिक आणि आर्थिक प्रश्न सोडवित आहेत. उदा. दारुबंदी, ग्रामस्वच्छता, पाणीप्रश्न, हुंडाबली, स्त्रीभृणहत्या, बालविवाह, इ. सामाजिक प्रश्नासमवेत आर्थिकदृष्टया सक्षम होत असल्याने कुटूंबाला हातभार लावण्यासाठी स्वतंत्र उद्योगांची निवड करुन रोजगार निर्माण करताना दिसत आहेत. अशा आर्थिक आणि सामाजिक अभ्यासातून योग्य मूल्यमापन करण्याचा दृष्टीकोन ठेवून सांगली जिल्हयातील स्वयंसहाय्यता महिला बचतगटामधील रोजगार निर्मित प्रतिसादक बचतगटाचे ‘Sample Study’ (नमुना निवड) म्हणून अभ्यास केला आहे.

## ६.२ सांगली जिल्हा तालुका निहाय स्वयंसहाय्यता गटाचा तपशिल :

सांगली जिल्हयातील ग्रामीण विकास कार्यालयानी जाहीर केलेले स्वयंसहाय्यता गटाची साख्यिंकीय माहिती तक्ता क्रमांक ६:१ मध्ये दर्शविली आहे. तक्त्यानुसार सांगली जिल्हयात एकूण दहा तालुक्यामध्ये ७०५ गांवाचा समावेश होतो. जिल्हयातील एकूण कुटूंबाची संख्या ३९५३९३ आहे. त्यापैकी दारिद्रय रेषेखालील ५१३८६ आणि दारिद्रयरेषेवरील ३४४००७ अशी आहे. सांगली जिल्हा दहा

तालुक्यामधील २८ फेब्रुवारी २००७ पर्यतची बचत महिला स्वयंसहाय्यता गटाची एकूण संख्या २०७१८ आहे.

## तक्ता क्रमांक ६.१

| अ. नं. | तालुका | गावांची संख्या | एकूण कुटूंब संख्या | दा.रेषे खालील कुटुंब संख्या | दा. रेषे वरील कुटुंब संख्या | २८ फेब्रु. ०७ अखेर एकूण स्थापन बचतगट | | एकूण बचतगट | १.४.९९ ते १.२.०७ रोजगार निर्मित बचतगट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | दा.रेषे खालील | दा. रेषे वरील | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | मिरज | ६४ | ६४३२८ | १२१८१ | ५२१४७ | ९०१ | २९५१ | ३८५२ | १६३ |
| २. | तासगांव | ६८ | ३७९८८ | ४३२१ | ३३६६७ | ३५६ | १३२० | १६७६ | ७१ |
| ३. | पलूस | ३५ | ३०६२६ | ६०७० | २३५५६ | १८८ | १३१६ | १५०४ | ५४ |
| ४. | खानापूर | ६५ | २४३४६ | २९४२ | २१४०४ | २७४ | १२८४ | १५५८ | ३५ |
| ५. | आटपाडी | ५६ | २६९९५ | ३४६७ | २३५२८ | १८० | ५९९ | ९७९ | ९८ |
| ६. | जत | ११७ | ५३७०६ | ७७५५ | ४५९५१ | ३८४ | १६६० | २०४४ | ४० |
| ७. | क.महाकांळ | ६० | २७४३४ | ३४९६ | २३९३८ | २१४ | १२८९ | १५०३ | ८१ |
| ८. | वाळवा | ९४ | ६७१६१ | ५८३७ | ६१३२४ | ४९१ | ४१०८ | ४५९९ | ३२ |
| ९. | शिराळा | ९३ | ३५१५५ | २४९६ | ३२६५९ | २१५ | १४५६ | १६७१ | ३९ |
| १० | कडेगांव | ५५ | २७६५४ | २८२१ | २४८३३ | २१९ | १११३ | १३३२ | ३७ |
| | एकूण | ७०५ | ३९५३९३ | ५१३८६ | ३४४००७ | ३४२२ | १७२९६ | २०७१८ | ६५० |

**स्त्रोत :— जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सांगली**

वरील तक्त्यानुसार सांगली जिल्हयातील दहा तालुक्यामध्ये २००७ पर्यत एकूण २०७१८ बचतगट कार्यान्वीत आहेत. प्रत्येक गटामध्ये साधारण दहा महिला निवडल्यास एकुण २०७१८० महिला आहेत. स्वयंसहाय्यता गटामधून ग्रामीण भागातील महिलांना आपल्या अस्तीत्वाची जााणीव झालेली आहे. हे सांख्यिकीय माहितीवरुन दिसून येते. ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार महिला सक्षम करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना सामावून घेतले आहे. परंतु निर्णय प्रक्रीयेमध्ये समाविष्ठ केले जात नाही. ही खंत या योजनेतून पूर्ण होत आहे. कारण स्वयंसहाय्यता गटामधून महिलांनी आर्थिक आणि सामाजिक कार्यामध्ये मोठी झेप घेतली आहे. उदा. हुंडाबळी, बालविवाह, स्त्री भृणहत्या, दारुबंदी, ग्रामस्वच्छता यामध्ये ग्रामीण भागातील महिला जोमाने पुढे आल्याचे लक्षात येते. स्वयंसहाय्यता महिला बचतगटामधुन ग्रामीण भागामध्ये स्त्री—पुरुष हा भेदही कमी होताना दिसत आहे. वरील तक्ता नुसार सर्वाधिक महिला बचतगट वाळवा (४५९९) आणि सर्वात कमी बचत गट आटपाडी (९७९) तालुक्यामध्ये स्थापन झालेले दिसतात.

## ♣ अभ्यासासाठी नमुना निवड रोजगार निर्मित प्रतिसादकांची तालुकानिहाय माहिती :


सांगली जिल्हयातील दहा तालुक्यातील एकूण स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या २०७१८ इतकी आहे. रोजगार निर्मित बचत गट ६५० इतके आहेत. त्यापैकी नमुना निवड म्हणून २०० प्रतिसादक बचत गटाची निवड केली आहे. प्रस्तुत संशोधन वैयक्तिक पातळीवर पूर्ण करावयाचे असल्याने तसेच सदर संशोधनास कोणतेही अर्थसहाय्य उपलब्ध नसल्याने आवश्यक साधनाचा विचार करून ३० टक्के बचतगटाची निवड निश्चित केली आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे

**तक्ता क्रमांक ६.२**

**नमुना निवड प्रतिसादकांची तालुकानिहाय माहिती**

| अ. क्र. | तालुका | गावाची संख्या | नमुना निवड गावे | तालुकानिहाय स्वयंसहाय्यता महिला बचतगट | नमुना निवड |
|---|---|---|---|---|---|
| १. | मिरज | ६४ | १० | ३८५२ | ३० |
| २. | तासगांव | ६८ | १० | १६७६ | २६ |
| ३. | पलूस | ३५ | १० | १५०४ | २३ |
| ४. | खानापूर | ६५ | १० | १५५८ | २१ |
| ५. | आटपाडी | ५६ | १० | ९७९ | १७ |
| ६. | जत | ११७ | १० | २०४४ | २० |
| ७. | क.महाकांळ | ६० | १० | १५०३ | २० |
| ८. | वाळवा | ९४ | १० | ४५९९ | २५ |
| ९. | शिराळा | ९३ | १० | १६७१ | १४ |
| १०. | कडेगांव | ५५ | १० | १३३२ | १४ |
| | **एकुण** | **७०५** | **१००** | **२०७१८** | **२००** |

**स्त्रोत :— संकलीत माहिती**



प्रस्तुत संशोधनासाठी दारिद्रिय रेषेखालील आणि दारिद्रिरेषेवरील स्वयंसहाय्यता महिला बचत गटातील प्रतिसादकांच्या रोजगार निर्मितीचा अभ्यास केला आहे. तक्ता क्रमांक ६.२ प्रमाणे स्वयंसहाय्यता महिला बचत गटातील प्रतिसादकांनी स्वतंत्र रोजगार निर्माण केला आहे. सांगली जिल्हयातील दहा तालुक्यात फेब्रुवारी २००७ पर्यत ६५० महिला बचतगट ( ६५० X१० = ६५००) स्वतंत्रपणे रोजगार निर्माण केला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये अधिकाधिक सत्यता यावी यासाठी संशोधकानी स्वयंसहाय्यता महिला बचतगटातील रोजगार निर्मिती दोनशे प्रतिसादक बचतगटांची अभ्यासाठी निवड केली आहे. प्रतिसादकांच्या प्रत्यक्ष भेटी नमुना निवड केलेल्या प्रतिसादकाकडून व्यवस्थीत माहिती घेऊन तक्ता क्रमांक ६.२ मध्ये दर्शविली आहे. अभ्यासासाठी दारिद्रयरेषेखालील अशा एकूण दोनशे प्रतिसादक बचतगट नमुना निवड म्हणून संशोधनासाठी मिळालेल्या आहेत.

## ६.३ वैयक्तिक माहिती

### ६.३.१ प्रतिसादकांचे वय आणि वैवाहीक स्थिती :

संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या रोजगार निर्माण केलेल्या प्रतिसादकांचे वय आणि वैवाहीक स्थिती याबाबत माहिती तक्ता क्रमांक ६.३ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्रमांक ६.३**

**प्रतिसादकांचे वय आणि वैवाहीक स्थितीनुसार वर्गीकरण :**

| प्रतिसादक महिलांचे वय | विवाहीत (:) | अविवाहीत | विधवा (:) | देवदासी (:) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २१ ते २५ | ५ (२.८५) | — | — | — | ५ (२.८५) |
| २६ ते ३० | २० (११.४२) | — | — | — | २० (१०.०) |
| ३१ ते ३५ | ३३ (१८.८५) | — | २ (१०.०) | — | ३५ (१७.५) |
| ३६ ते ४० | ३६(२०.५७) | — | १ (५.०) | २ (४०) | ३९(१९.५०) |
| ४१ ते ४५ | ३८ (२१.७१) | — | २ (१०.०) | — | ४० (२०.०) |
| ४६ ते ५० | २६ (१४.८५) | — | १ (५.०) | १ (२०) | २८ (१४.०) |
| ५१ ते ५५ | ७ (४.००) | — | ५ (२५) | १ (२०) | १३ (६.५०) |
| ५६ ते ६० | ७ (४.००) | — | ८ (४०) | . | १५ (७.५०) |
| ६१ ते ६५ | ३ (१.७१) | — | १ (५.०) | १ (२०) | ५ (२.५) |
| ६५ पेक्षा अधिक | — | — | — | — | — |
| **एकूण** | **१७५** | **००** | **२०** | **०५** | **२००** |
| | ( १००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) |

**स्त्रोत :— प्राथमिक माहिती संकलीत ६.२ प्रमाणे**

**(टीप—कंसातील अंक टक्केवारी दर्शवतात)**

वरील तक्त्यानुसार प्रतिसादकाचे वय व विवाह संदर्भात अभ्यास करता महिला बचतगटात अविवाहीत प्रतिसादक नाहीत. बहुतांश महिला प्रतिसादक १७५ (८७.५०) प्रतिसादक विवाहीत आहेत. फक्त ५ (२.५०) प्रतिसादक देवदासी आहेत. २० (१०.००) विधवा प्रतिसादक असल्याने

त्यांना फारशा मर्यादा येत नाहीत. अशी समाजात मानसिकता असल्याने स्वतंत्र रोजगार निर्मितीमध्ये त्याचा सहभाग अधिक जाणवतो. एकूणच रोजगार निर्मितीमध्ये कुटूंबातील सर्वाचा पाठींबा असल्याखेरीज जमत नाही. तसेच महत्वाची बाब म्हणजे चारित्र्याच्या दृष्टीकोनातून विवाहीत महिलाकडे या योजनेमुळे सकारात्मक दृष्टीने पाहिले जात असल्याने महिला अधिक कार्यरत झाल्याचे दिसून आले. तक्त्यामधील वय वर्षे ३१—५० या दरम्यान असलेल्या प्रतिसादक अधिक मोठया प्रमाणात प्रतिनिधीत्व करत असल्याचे दिसून आले. प्रतिसादकांच्या शिक्षणाचा तक्ता क्र. ६.४ खाली दर्शविल्याप्रमाणे.


## ६.३.२ प्रतिसादकांचे शिक्षण :

**तक्ता क्रमांक ६.४**

**प्रतिसादकांचे शिक्षणनिहाय सांख्यिकीकरण वर्गीकरण :**

| शिक्षण | प्रतिसादक संख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| अशिक्षित | ७८ | ३९.० |
| प्राथमिक | ५९ | २९.० |
| माध्यमिक | ४० | २०.० |
| उच्च माध्यमिक | १४ | ०७.० |
| पदवी | ०५ | ०२.५ |
| पदव्यूत्तर | ०४ | ०२.० |
| **एकूण** | **२००** | **१००.००** |

**स्त्रोत : संकलीत माहिती**




वरील तकत्यानुसार रोजगार निर्मित प्रतिसादकाचे शिक्षणासंबधी तक्ता क्रमांक ६.४ मध्ये दर्शविल्या प्रमाणे अधिक प्रमाणात ७८ (३९.०)

प्रतिसादक अशिक्षीत ५९ (२९.०) प्रतिसादक प्राथमिक शिक्षण पूर्ण झालेल्या ४० (२०.०) प्रतिसादकांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण झालेल्या असून विशेष बाब म्हणजे त्यातील ७ प्रतिसादक सरपंच आहेत. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या प्रतिसादक ५ (२.५) आणि ४ (२.०) आहेत. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण घेतलेल्या एकूण १७७ (८७.५) प्रतिसादक आहेत. परिणामी रोजगार निर्मितीमध्ये या प्रतिसादकांचा पुढाकार अधिक असल्याचे दिसून येते. रोजगार निर्मितीसाठी मदत करणाऱ्या प्रतिसादकांच्या गट स्थापनाबाबत तक्ता क्र. ६.५ मध्ये माहिती आहे.


### ६.३.३ प्रतिसादकांनी बचतगट स्थापना कालावधी निहाय वर्गवारी

**तक्ता क्र. ६.५**

**कालावधी निहाय वर्गवारी**

| अ.नं. | कालावधी | प्रतिसादक संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | १ ते २ वर्ष | ३७ | १८.५ |
| २ | १ ते ५ वर्ष | १५१ | ७५.५ |
| ३ | कालावधी निश्चित नाही | १२ | ६.० |
| | **एकूण** | **२००** | **१००.०** |

**स्त्रोत : — संकलीत प्राथमिक माहिती**




तक्ता क्र. ६.५ वरून १ ते २ वर्ष असे ३७ (१८.५) महिला प्रतिसादकांनी बचत गट स्थापन केले आहेत. तसेच १ ते ५ वर्षे १५१ (७६.५) इतके गट स्थापन झालेले दिसून येतात. याचाच अर्थ प्रतिसादक सातत्याने गट सक्षमीकरणासाठी प्रयत्न करत आहेत. फक्त १२ बचत गट हे कालावधी सांगू शकले नाहीत.

### ६.३.४ गट स्थापना स्त्रोत


स्वयंसहाय्यता बचत गटांची स्थापना किंवा निर्मिती करणारे विविध स्त्रोत आहेत. प्रत्यक्ष मुलाखतीव्दारे खालील स्त्रोत स्पष्ट झाले आहे

**तक्ता क्रमांक ६.६**

**गट स्थापना स्त्रोत**

| अ. नं. | स्त्रोत | प्रतिसादक बचत गट संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | सरपंच | ४५ | २२.५ |
| २ | ग्रामसेवक | १९ | ९.५ |
| ३ | निवृत्त शिक्षक | ०९ | ४.६ |
| ४ | स्वयंसेवी संस्था कार्यकर्ता | ३७ | १८.५ |
| ५ | स्थानिक बॅका | ९० | ४५.० |
| | **एकूण** | **२००** | **१००** |

**स्त्रोत :— संकलीत माहिती**




या तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, ९० (४५.०) प्रतिसादक गटाची स्थापना स्थानिक बॅकानी सर्वाधिक केली आहे. त्यांच्याखाली महिला सरंपचानी ४५(२२.५) इतकी प्रतिसादक गटाची स्थापना केली आहे. महिला सरपंच त्या गावात जास्त संख्येने गटांची निर्मिती झाली आहे.

### ६.३.५ कारण निहाय गट स्थापना


कारण निहाय गट स्थापना वेगवेगळया कारणासाठी होते हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक ६.७**

**कारणनिहाय प्रतिसादक गट स्थापना**

| अ.नं. | कारण | प्रतिसादक गट संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | कर्जासाठी | ६३ | ३१.५ |
| २ | शेजाऱ्याने सांगितले | ११ | ५.५ |
| ३ | सहकारी धोरण | ८ | ४.० |
| ४ | बचतीसाठी | ११४ | ५७.० |
| ५ | एकापेक्षा जास्त कारण | ४ | २.० |
| | **एकूण** | **२००** | **१००** |

**स्त्रोत :— संकलीत माहिती**




वरिल तक्यावरून असे स्पष्ट होते की, ११४ (५७.०) टक्के प्रतिसादक गटांना बचतीचे महत्व पटलेले आहे. कारण सर्वाधिक कारण बचतीसाठी आहे. त्यांच्या नंतर ६३(३१.५) कारण हे कर्जासाठी आहे. याचाच अर्थ स्वयंसहाय्यता बचत गटात प्रतिसादकांना बचतीची सवय लागलेली आहे आणि त्यांना कर्जाचीही निकड आहे.

### ६.३.६ प्रतिसादक बचत गट संख्या


महिला बचत गटात जास्तीत जास्त २० महिला सदस्य म्हणून काम करतात. गटाचा आकार खालील प्रमाणे

**तक्ता क्रमांक ६.८**

**प्रतिसादक संख्या**

| अ.नं | आकार | प्रतिसादक बचत गट संख्या | प्रतिशत | सदस्य संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ ते १० | ६६ | ३३.० | ६६० | २४.२० |
| २ | ११ | २१ | १०.५ | २३१ | ८.४ |
| ३ | १२ | १७ | ८.५ | २०४ | ७.४ |
| ४ | १३ | १० | ४.० | १३० | ४.७ |
| ५ | १४ | ०९ | ४.५ | १२६ | ४.६ |
| ६ | १५ | १२ | ६.० | १८० | ६.६ |
| ७ | १६ | ०५ | २.५ | ८० | २.९ |
| ८ | १७ | १८ | ९.० | ३०६ | ११.२ |
| ९ | १८ | १३ | ६.५ | २३४ | ८.५ |
| १० | १९ | ०४ | २.० | ७६ | २.७ |
| ११ | २० | २५ | २.५ | ५०० | १८.३ |
| | **एकूण** | **२००** | **१००** | **२७२७** | **१००** |

स्त्रोत :— पूर्वोक्त तक्ता क्र. ६.२




स्वयंसहाय्यता बचत गटामध्ये जास्तीत जास्त २० सभासद असतात. त्यापेक्षा कमी सभासद असणारे गटही आहेत. वरिल तक्त्यावरून ते स्पष्ट

होते. २० सभासद असलेले २५ प्रतिसादक गट व १० सभासद असलेले ६६ प्रतिसादक गट संकलीत माहितीवरून स्पष्ट होते. परंतु लहान आकाराच्या गटाची आर्थिक उलाढाल कमी असलेली दिसून येते.

## ६.४ कौटुंबिक पार्श्वभूमी


६.४.१ प्रतिसादकांच्या मुलांचे सांख्यिकीय वर्गीकरण

**तक्ता क्रमांक ६.९**

**प्रतिसादकांच्या मुलांचे सांख्यिकीय वर्गीकरण**

| मुलांची संख्या | प्रतिसादकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| लागू नाही | १२ | ६.० |
| एक | २५ | १२.५ |
| दोन | ५८ | २९.० |
| तीन | ६६ | ३३.० |
| चार | २९ | १४.५ |
| पाच | ०.९ | ४.५ |
| सहा | ०.१ | ०.५ |
| **एकूण** | **२००** | **१००** |

**स्त्रोत : पूवोक्त तक्ता क्र. ६.२ प्रमाणे**




वरील तक्त्यानुसार १२ (६.०) प्रतिसादकांना मुलांचा प्रश्न लागू नाही. त्या प्रतिसादकांना मुले नाहीत. अपत्य असणाऱ्या प्रतिसादकापैकी २५ (१२.५) प्रतिसादकांना एकच अपत्य आहे. दोन अपत्य असणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ५८ (२९.०) प्रतिसादकांपैकी ६६ (३३.०) प्रतिसादकांना तीन अपत्य आहेत.

महाराष्ट् शासनाच्या अधिनियमानुसार कोणत्याही कल्याणकारी कार्यक्रमामध्ये एखादया व्यक्तीला सहभाग घ्यायचा असेल तर दोनपेक्षा अधिक अपत्य असू नयेत, असल्यास त्यांना प्रशासकीय योजनेमध्ये त्यांची दखल घेतली जात नाही तसेच निवडणुकीत सहभाग घेतोत नाही. अभ्यासाअंती असे स्पष्ट करता येते की, ग्रामीण भागातील महिला बचत गट योजनामुळे आर्थिक साक्षर होत असल्यामुळे ''मुले ही देवाघरची फुले याला छेद दिला जात आहे.


## ६.४.२ प्रतिसादकांच्या पतिचे शिक्षणाचे वर्गीकरण

**तक्ता क्रमांक. ६.१०**

**प्रतिसादकांच्या पतिचे शिक्षणाचे वर्गीकरण**

| शिक्षण | प्रतिसादकाचे पति | प्रतिशत |
|---|---|---|
| लागू नाही | २५ | १२.५ |
| अशिक्षित | ५४ | २७.० |
| प्राथमिक | ६५ | ३२.५ |
| माध्यमिक | ३३ | १६.५ |
| उच्च माध्यमिक | १७ | ०८.५ |
| पदवी | २ | ०१.० |
| पदव्यूत्तर | ४ | ०२.० |
| **एकूण** | **२००** | **१००.००** |

**स्त्रोत : तक्ता क्र. ६.२ प्रमाणे**




वरील तक्त्यानुसार २५ (१२.५) प्रतिसादकांना सदर प्रश्न लागू होत नाही. कारण यापैकी पाच प्रतिसादक देवदासी आणि वीस प्रतिसादक पति विधवा असल्यामुळे त्यांना प्रश्न विचारताच त्या भावनिक झाल्या.

काही प्रतिसादक या प्रश्नांचे उत्तर देण्यास टाळले आहे. त्यामुळे असे प्रतिसादकांना हा प्रश्न लागू होत नाही.

उर्वरित प्रतिसादकांपैकी ५४ (२७.०) पती अशिक्षित, ६५(३२.५) प्रतिसादकांच्या पतींचे प्राथमिक शिक्षण, तसेच माध्यमिक व उच्चमाध्यमिक पर्यंतचे शिक्षण घेतेलेले प्रतिसादकांचे पती अनुक्रमे ३३ (१६.५) १७ (८.५) आहेत. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या प्रतिसादकाचे पतीचे प्रमाण अत्यल्प आहे. यावरुन ग्रामीण भागामध्ये अदयापही शिक्षणापासून वंचित असलेल्या प्रतिसादकांच्या पतीची संख्या मोठी आहे.


### ६.४.३ प्रतिसादकाच्या पतिच्या व्यवसायाचे वर्गीकरण

**तक्ता क्र. ६.११**

**प्रतिसादकांच्या पतिच्या व्यवसायाचे वर्गीकरण**

| व्यवसाय | संख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| लागू होत नाही | २५ | १२.५ |
| शासकीय नोकरी | ०४ | २.० |
| निमनशासकीय नोकरी | १२ | ६.० |
| खाजगी नोकरी | १७ | ८.५ |
| असंघटीत क्षेत्रातील नोकरी | ८८ | ४४.० |
| सामाजिक कार्य | ०८ | ४.० |
| व्यवसाय | ०३ | १.५ |
| शेती | ३८ | १९.० |
| निवृत्ती वेतन | ०५ | २.५ |
| **एकूण** | **२००** | **१००.००** |

**स्त्रोत :— संकलीत माहिती**



वरिल तक्त्यानुसार लागू नाही अशी वर्गवारी २५ (१२.५) आहे. उर्वरित प्रतिसादकांच्या पतिचा व्यवसाय पहाता शासकीय नोकरी असणारे ०४ (२.०), निमशासकीय नोकरीत असणारे १२(०६.०) आणि खाजगी नोकरी करणारे १७ (८.५) आहेत. यापैकी सर्वात अधिक ८८(४४.०) पति शेतमजूर, सेट्रींग काम, गवंडी इ. सारख्या असंघटीत क्षेत्रात कामात गुंतलेले आहेत. इतक्या मोठया प्रमाणात असंघटीत क्षेत्रात काम करत असलेले प्रतिसादकांचे पती प्रतिसादकांना आर्थिक साक्षरतेसाठी प्रोत्साहान दिले आहे. यातूनच असे स्पष्ट होते की, उदरनिर्वाहासाठी कौटुंबिक खर्चामध्ये आणि उत्पन्नामध्ये आपल्याही पत्नीचा सहभाग आवश्यक आहे. याची जाणीव त्यांना होत आहे. ग्रामीण भागामध्ये सर्वसाधारपणे आपल्या पत्नीस सार्वजनिक ठिकाणी एकटेपणे वावरण्यास बहुतांश पति परवानगी देत नाहीत यालाही छेद दिला आहे असे संशोधनातून स्पष्ट होते.


### ६.४.५ **प्रतिसादकांच्या कौटुंबिक उत्पन्नाचे वर्गीकरण**

**तक्ता क्रमांक ६.१२**

**प्रतिसादकांच्या कौटुंबिक उत्पन्नाचे वर्गीकरण**

| उत्पन्नाची वर्गवारी | प्रतिसादकाची संख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| रु. १००० पेक्षा कमी | १५ | ०७.५ |
| रु. १००० ते ५००० | २७ | १३.५ |
| रु. ५००१ ते १०००० | ४९ | २४.५ |
| रु. १०००१ ते १५,००० | २२ | ११.० |
| रु. १५,००१ ते २०,००० | ३६ | १८.० |
| रु. २०,००० पेक्षा अधिक | ०७ | ३.५ |
| उत्तर दिले नाही | ४४ | २२.० |
| **एकूण** | **२००** | **१००.००** |

**स्त्रोत : संकलीत माहिती**



तक्ता क्र. ६.१२ नुसार प्रतिसादकाच्या दारिद्रियाच्या दोन्ही बाजूंनी विचार करता उत्पन्न असले तरी ते दिसू नये. तसेच या प्रश्नाने आपल्या गरिबाचे प्रदर्शन होणार नाही ना? या भितीने प्रश्नांचे उत्तर दिले नसावे. त्यामुळे वरील तक्त्यानुसार ४४ (२२.०) प्रतिसादकांनी या प्रश्नांचे उत्तर देणे टाळले आहे. उर्वरित १५६ प्रतिसादकापैकी १५ (७.५) आणि २७ (१३.५) कुटूंबाचे उत्पन्न अनुक्रमे रु. १००० पेक्षा कमी आणि रु. १००१ ते ५००० इतके आहे. ४९ (२४.५) प्रतिसादकाचे उत्पन्न ५००१ ते १०००० असून २२ (११.०) प्रतिसादकाचे उत्पन्न रू १०००० ते १५००० आहे. ३६ (१८.०) प्रतिसादकाचे उत्पन्न रू.१५००० ते २००००, ७ (३.५) प्रतिसादकांचे उत्पन्न २०००० रु. पेक्षा अधिक आहे.

## ६.५ बचतीचा तपशील


### ६.५.१ प्रतिसादकांची मासिक बचतीची सरासरी

**तक्ता क्र. ६.१३**

**संकलीत माहितीनुसार प्रतिसादकांची मासिक बचतीची सरासरी**

| मासिक बचतीचे प्रमाण | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| रु. ५० | ९६ | ४८.० |
| रु. ५१ ते १०० रु. | ४१ | २०.५ |
| रु. १०१ ते ५०० रु. | ३२ | १६.० |
| रू २०१ ते ३००रू | १८ | ९.० |
| रू ३०१ ते ४०१ | ११ | ५.५ |
| रू ४०१ ते ५०० | २ | १.० |
| **एकूण** | **२००** | **१००.००** |

**स्त्रोत: संकलीत माहिती**



वरिल तक्त्यामध्ये संकलीत माहितीत समाविष्ठ असणाऱ्या गावातील प्रतिसादकांची मासिक बचतीचा तपशील दिला आहे. त्यानुसार ९६ (४८.०) प्रतिसादकाची बचत ही ५० रु. इतकी आहे. ४१(२०.५) प्रतिसादकांची बचत ही रु. ५० ते १०० इतकी आहे. आकडेवारीच्या अभ्यासाअंती असे स्पष्ट होते की, दारिद्रय रेषेखालील ग्रामीण भागातील प्रतिसादक अधिक प्रमाणात बचतगटातून आर्थिक साक्षर झाले आहेत. ग्रामीण भगातील महिलांच्या दृष्टीने हे उचलेले महत्वाचे पाऊल आहे असे म्हणावे लागेल. स्वंयसहाय्यता बचतगटात येण्यापूर्वी बचत करण्याचे प्रमाण कमी होते. गटात आल्यामुळे ती सवय लागली आहे. अभ्यासकांनी संशोधनासाठी मांडलेल्या गृहीताची प्रचिती या तक्त्यावरून दिसून येते.


### ६.५.२ प्रतिसादकांच्या बचतीचा विनियोग

**तक्ता क्रमांक ६.१४**

**प्रतिसादकांच्या बचतीचा विनियोग**

| सहभाग | प्रतिसादक | टक्केवारी |
|---|---|---|
| उत्पादक | १८७ | ९३.५ |
| अनुउत्पादक | १३ | ६.५ |
| **एकूण** | **२००** | **१००.००** |

**स्त्रोत : संकलीत माहिती**




तक्ता क्र. ६.१६ नुसार उत्पादन कारणासाठी कर्ज घेतलेल्या महिला प्रतिसादकांची संख्या १८७(९३.५) आहे. १३(६.५) प्रतिसादक या अनु उत्पादक म्हणजेच उपभोगासाठी बचत गटाकडून कर्ज घेतले आहे. प्रतिसादकांनी काटकसरीने पैशाचा वापर उत्पादनासाठी केल्याने त्यांची कौटूंबिक आर्थिक स्थिती सुधारली आहे. त्यांच्या सर्वसाधारण आर्थिक गरजा भागवण्यासाठी प्रतिसादक सक्षम आहेत. त्यामुळे स्वयंसहाय्यता

गटामध्ये प्रतिसादकांचा आर्थिक साक्षरतेचा सकारात्मक परिणाम म्हणावा लागेल.


### ६.५.३ बॅंकनिहाय बचत गट संख्या

**तक्ता क्रमांक ६.१५**

**बॅंकनिहाय प्रतिसादक संख्या**

| अ.नं | अभिकर्ते | प्रतिसादक संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | व्यापारी बॅंका | ३७ | १८.५ |
| २ | स्टेट बॅंका | ५१ | २५.५ |
| ३ | जिल्हा मध्यवर्ती बॅंक | ९७ | ४८.५ |
| ४ | सहकारी बॅंक | १५ | ७.५ |
| | **एकूण** | **२००** | **१००** |

**स्त्रोत : संकलीत माहिती**




वरिल तक्त्यावरून स्पष्ट होते की, ३७ (१८.५) प्रतिसादक बचतगट हे व्यापारी बॅंकेत खाती उघडलेली आहेत. सर्वात अधिक रक्कम ९७ (४८.५) ही प्रतिसादकांनी जिल्हा मध्यवर्ती बॅंकेत ठेवलेली आहेत. यावरून ग्रामीण भागातील प्रतिसादकांना बॅंकेत जाण्याची सवय लागलेली आहे. बॅंकेशी व्यवहार प्रामाणिकपणे केल्याने बॅंकाना बचतगटांची खाती मिळालेली आहेत. गटाव्दारे धनव्यवहारातून आर्थिक समस्याची सोडवणूक झाली आहे हे दिसून येते.

### ६.५.४ महिलांचे आर्थिक सबलीकरण

स्वयंसहाय्यता बचत गटात प्रतिसादांकचा सहभाग वाढल्यामुळे आर्थिक स्तर उंचावला आहे. हे आर्थिक स्तराचे (सबलीकरण) निदेशक म्हणजे उत्पन्न वृध्दी, व्यवसाय जाण, बचत व काटकसर वृध्दींगत कर्ज घेणे व परतफेड, व्यवसाय, प्रशिक्षण, बॅंकेत येणे जाणे, कागदपत्राची हाताळणी, रोजगार निमैती, गटाचे हिशोब व रेकॉर्ड या बाबी प्रतिसादक करू लागल्याने त्याचे आर्थिक सबलीकरण होत आहे. प्रतिसादक या स्वयंसहाय्यता बचतगटात येण्यापूर्वी व गटात आल्यानंतर कशी सुधारणा


झाली यांचा उहापोह केला आहे म्हणून आर्थिक सबलीकरणासाठी खालील निदेशक मांडले आहे.

**तक्ता क्र ६.१६**

**हिशोब व कागदपत्र हाताळणी निहाय वर्गवारी**

| अ. नं | तपशिल | गटात येण्यापूर्वी | | गटात आल्यानंतर | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत | |
| १ | हिशोब ठेवणे | ३० | १५ | १७० | ८५ | २०० |
| २ | कागदपत्र हाताळणी | २२ | १७ | १७८ | ८९ | २०० |
| ३ | धनादेश | १८ | ०९ | १८२ | ९१ | २०० |
| ४ | कागदपत्रात शिक्का मारणे माहिती | ११ | ५.५ | १८९ | ९४.५ | २०० |
| ५ | रेकॉर्ड लिहीणे | ०७ | ३.५ | १९३ | ९६.५ | २०० |
| ६ | बॅकेशी पत्रव्यवहार | १३ | ६.५ | १८७ | ९३.५ | २०० |
| ७ | बॅकेत जाणे | — | — | १०० | १०० | २०० |
| ८ | बॅकेत पैसे भरणे व काढणे व्यवहार | — | — | २०० | १०० | २०० |

**स्त्रोत : संकलीत माहिती**




वरिल तक्त्यावरून सुचित होते की, प्रतिसादक बचतगटात आल्यामुळे बॅक व्यवहार करण्याचे प्रमाण ९० टक्के वाढले आहे. त्याचप्रमाणे हिशोब आणि रेकॉर्ड लिहीण्याची कला अवगत झाली आहे. तसेच बॅकेतील पैसे काढणे व भरणा करणे १०० टक्के प्रतिसादकांना जमलेले आहे. याचाच अर्थ आर्थिक व्यवहाराची माहिती मिळू लागली

आहे म्हणून ग्रामीण भागातील महिलाचे आर्थिक सबलीकरणाद्वारे रोजगार निर्मितीस मदत होत आहे.


## ६.६ कर्जासंबंधी

स्वयंसहाय्यता बचतगटातून महिलांना व्यवसाय करण्यासाठी मागताक्षणी विना खर्च, विना कागदपत्र कर्ज मिळते. अशा प्रतिसादकांना रक्कमनिहाय कर्जाचा तपशील तक्ता क्र. ६.१७ प्रमाणे

**तक्ता क्रमांक ६.१७**
**प्रतिसादकांनी घेतलेली कर्जे**

| कर्ज रक्कमेची वर्गवारी | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| रु. ५००० ते १०,००० | ६२ | ३१.०० |
| रु. १०,००० ते १५,००० | ५२ | २६.०० |
| रु. १५,००० ते २०,००० | ४० | २०.०० |
| रु. २०,००० ते २५,००० | २७ | १३.८ |
| रु. २५,००० ते ३०,००० | ९ | ४.५ |
| रु. ३०,००० ते ३५,००० | ०५ | २.५ |
| रु. ३५,००० ते ४०,००० | २ | १.० |
| रु. ४०,००० ते ४५,००० | २ | १.० |
| रु. ४५,००० ते ५०,००० | १ | ०.५ |

**स्त्रोत — संकलीत माहिती**




वरिल तक्ता क्र. ६.२० नुसार ६२ प्रतिसादकांनी (३१.०) ५,००० ते १०,००० रु पर्यत कर्ज, ५२ प्रतिसादकांनी (२६.००) प्रतिसादकांनी १०,००० ते १५,००० रुपया पर्यत कर्ज, आणि ४० प्रतिसादकांनी (२०.०) १५,००० ते २०,००० रु. पर्यत कर्ज घेतले आहे. एकूण १५४ प्रतिसादकांनी या कर्जाचा विनीयोग उत्पादन कार्यासाठी केल्यामुळे प्रतिसादक आणि त्यांच्या कुटूंबाला रोजगार मिळाल्याने त्यांच्या राहणीमानात बदल आला आहे. त्यांची मुले ज्या शाळेत जातात त्या शाळेत जावून आम्हाला काही करता येईल काय? याची विचारणा शिक्षकाकडे करतात. यापैकी काही प्रतिसादकांनी शाळेतील अल्पोपहारांची जबाबदारी उचलेली आहे. तक्त्या नुसार कर्जाच्या आकडेवारीचा विचार करता विनाकारण म्हणजे फक्त उपभोगासाठी घेतलेल्या कर्जाचे प्रमाण अतिशय अत्पल्प आहे. ५०,००० रु. कर्ज घेतलेल्या प्रतिसादकांची संख्या एकंच आहेत. त्यानी दोन कांडप मशीनी आणि शेवयाचे मशिन घेतलेले असल्याने त्यांच्याकडे सहा प्रतिसादकाना दिवसाचा ८० रु. प्रमाणे रोजगार मिळालेला आहे.

## ६.६.२ प्रतिसादकांनी परतफेड केलेल्या कर्जाची रक्कम

**तक्ता क्रमांक ६.१८**
**प्रतिसादकांनी परतफेड केलेल्या कर्जाची रक्कम**

| परतफेड कर्जाची वर्गवारी | प्रतिसादक संख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| रु. ५००० ते १०,००० | ६१ | ३०.५ |
| रु. १०,००० ते १५,००० | ५० | २५.० |
| रु. १५,००० ते २०,००० | ३९ | १९.५ |
| रु. २०,००० ते २५,००० | २७ | १३.५ |
| रु. २५,००० ते ३०,००० | ०८ | ४.० |
| रु. ३०,००० ते ३५,००० | ०५ | २.५ |
| रु. ३५,००० ते ४०,००० | ०२ | १.० |
| रु. ४०,००० ते ४५,००० | ०२ | १.०० |
| रु. ४५,००० ते ५०,००० | ०१ | ०.५ |
| **एकूण** | **१९५** | **९७.५** |

**स्त्रोत — संकलीत माहिती**




तक्ता कं. ६.१८ नुसार ६१ प्रतिसादकांनी पाच हजार ते दहा हजार रुपयापार्यत कर्जाची परतफेड केली. पन्नास प्रतिसादकांनी दहा ते पंधरा हजार रुपयापार्यतची कर्ज कोणत्याही अडचणी न सांगता परतफेड, ३९ प्रतिसादकांनी पंधरा ते वीस हजार रुपयापार्यतचे कर्ज परतफेड केली, सत्तावीस प्रतिसादकांनी वीस ते पंचवीस हजार रुपयापार्यतचे कर्ज परतफेड आहे. म्हणजे १७७ प्रतिसादकांनी कर्जाची परतफेड केली आहे. यावरुन असे सूचीत होते की, प्रतिसादक कर्जे परतफेडीमध्ये कोणत्याही प्रकारे कसूर करत नाहीत. जितकी कर्ज घेण्याची जबाबदारी त्या उचलतात तितकीच परतफेड करण्याचीही जबाबदारी त्यांनी पूर्ण केल्याचे अभ्यासा अंती दिसून आले.

**६.६.३ स्वयंसहायता बचत गटात महिला आल्यामुळे उत्पन्न वृध्दी झाली आहे. फक्त पाच वर्षाच्या कालखंडात हा बदल झाला आहे ते खालील तक्तावरून स्पष्ट होते.**

**तक्ता क्रमांक ६.१९**

**उत्पन्नवृध्दी वर्गीकरण**

| अ. नं | तपशिल | गटात येण्यापूर्वी | | गटात आल्यानंतर | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| १ | ५००० पर्यंत | ५५ | २७.५ | २०० | १०० |
| २ | ५००१ ते १०००० | २८ | १४.० | २०० | १०० |
| ३ | १०००० ते १५००० | २१ | १०.५ | ११० | ५५.० |
| ४ | १५००० ते २०००० | १७ | ८.५ | ११६ | ५८.० |
| ५ | २०००० ते २५००० | — | — | ४२ | २१.० |
| ६ | २५००० ते ३०००० | — | — | ३८ | १९.० |
| ७ | ३०००० च्या वर | — | — | २१ | १०.५ |

**स्त्रोत : संकलीत माहिती**

वरिल तक्यावरून स्पष्ट होते की, स्वयंसहाय्यता गटात आल्यानंतर सर्वच प्रतिसादकांच्या उत्पन्नात वृध्दी झालेली आहे. ५००० ते २०००० वार्षिक उत्पन्नात वाढ झालेली आहे. त्यामुळे प्रतिसादकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे त्याचा परिणाम म्हणून इतर बचतगटातील महिलांना प्रोत्साहन मिळत आहे.


## ६.७ रोजगार

**६.७.१ प्रतिसादक स्वयंसहाय्यता बचत गटात आल्यामुळे हंगामी आणि बारमाही रोजगार स्वतंत्र व्यवसायातून प्राप्त झाला आहे. शिवाय घरगुती कामे पाहून करीत असल्यामुळे रोजगार प्राप्त होत आहे. खालील तक्त्यानुसार**

**तक्ता क्र. ६.२०**
**रोजगार निर्मिती**

| क्र | तपशिल | रोजगार प्राप्त संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | शेती संलग्न व्यवसाय | ८८ | ४४.० |
| २ | व्यापारातून | ९७ | ४८.५ |
| ३ | सेवाक्षेत्र | १५ | ७.५ |
| | **एकूण** | **२००** | **१००** |

**स्त्रोत संकलीत माहिती**




वरिल तक्यावरून ८८(४४.०) प्रतिसादक शेती संलग्न व्यवसायात रोजगार निर्माण केला आहे. तसेच ९७(४८.५) प्रतिसादकांनी व्यापारातून रोजगाराची निर्मिती केलेली आहे. प्रतिसादकांना अर्थ स्वरूपात घराच्या कामाबरोबर व्यवसायाच्या कामातून रोजगार मिळाल्याने दीर्घ कालखंडानंतर दारिद्रय निर्मूलनास मदत होणार आहे.

## ६.७.२ प्रतिसादकांचे सभेस उपस्थितीचे प्रमाण

**तक्ता क्रमांक ६.२१**
**प्रतिसादकांचे सभेस उपस्थितीचे प्रमाण**

| प्रमाण | प्रतिसादक | टक्केवारी |
|---|---|---|
| नेहमी | १९२ | ९६ |
| कधीतरी | ००७ | ३.५ |
| जात नाही | ००१ | ०.५ |
| **एकूण** | **२००** | **१००.००** |

**स्त्रोत : संकलीत माहिती**




तक्ता क्रमांक ६.१७ नुसार एकूण २०० प्रतिसादकापैकी १९२ नियमित सभेसाठी उपस्थिती, ७ (३.५) प्रतिसादक कधीतरी सभेला उपस्थित राहतात. तर ००१ (०.५) प्रतिसादक सभेला उपस्थित नसतात. जे प्रतिसादकं सभेस उपस्थित नाहीत त्या प्रतिसादकांना असुरक्षितता वाटते. त्यांच्या कौटुंबिक समस्यांही असल्याचे लक्षात येते.


**६.७.३ सभा व सभेची जागा निहाय वर्गवारी स्वयंसहाय्यता बचतगटाची सभा महिन्यातून एकदा घेतली जाते. तसेच सभेची जागा शक्यतो प्रतिसादकांच्या वर्तुळाप्रमाणे घरी घेतले जाते सभेची जागा खालीलप्रमाणे**

**तक्ता क्र. ६.२२**

**सभा व सभेची जागानिहाय वर्गवारी**

| अ.नं. | तपशिल | प्रतिसादक संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | घर | १६८ | ८४.० |
| २ | शाळा | १८ | ९.० |
| ३ | मंदिर | ६ | ३.० |
| ४ | चावडी | ३ | १.५ |
| ५ | समाजमंदिर | ४ | २.० |
| ६ | अस्मिता भवन | १ | ०.५ |
| | **एकूण** | **२००** | **१००** |

**स्त्रोत संकलीत माहिती**





प्रतिसादक स्वयंसहाय्यता बचत गटाची सभा घरी घेण्याचे प्रमाण १६८(८४.०) सर्वाधिक आहे. कारण सभा संध्याकाळी घेतात. घरी सुरक्षेच्या दृष्टीने योग्य वाटते. प्रतिसादकांनी आयोजित केलेली बैठक दुपारी शाळेला सुटी असल्याने शक्य झाले आहे.

**६.७.४ स्वयंसहाय्यता गटाची सभेची आदर्श वेळ संध्याकाळ मानली जाते. कारण प्रतिसादक स्वयंपाक व घरगुती कामे संध्याकाळ संपतात. शिवाय मोकळा वेळ असतो.**

**तक्ता क्रमांक ६.२३**
**कारणानिहाय सभेची वेळ**

| अ.नं. | तपशिल | प्रतिसादक संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | सकाळ | १० | ५.० |
| २ | दुपार | ८ | ४.० |
| ३ | संध्याकाळ | १८२ | ९१.० |
| | **एकूण** | **२००** | **१००** |

**स्त्रोतः संकलीत माहिती**





वरिल तक्त्यावरून असे स्पष्ट होते की सकाळी सभा होणारे प्रतिसादक बचतगटाची संख्या १० (५.०) आणि दुपारी प्रतिसादक बचतगटाची संख्या ८(४.०) इतकी आहे. संध्याकाळी सभा घेणारे प्रतिसादक बचत गटाची संख्या १८२ (९१.०) इतकी आहे. सांयकाळची सभेची वेळ प्रतिसादकांना अधिक सोयीची असल्याने सभा यशस्वी होत आहे.

**६.७.५ सेवा स्वरूपात फायदयाची वर्गवारी** :—
स्वयंसहाय्यता बचत गटात प्रतिसादक सहभागी झाल्याने घरामध्ये वस्तू घेता आल्या. शिवाय व्यवसाय प्रशिक्षण, रेकॉर्ड, मेटेनेन्स, सामूहीक व्यवसायाचे फायदे मिळाले आहेत. खालीलप्रमाणे

## तक्ता क्रमांक ६.२४
## सेवा स्वरूपात फायदयाची वर्गवारी

| अ. नं. | तपशिल | प्रतिसादक संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | गॅस, फर्निचर, भांडी | **३३** | **१६.५** |
| २ | दूरदर्शन रेडिओ टेलिफोन बुथ | ४२ | २१ |
| ३ | दुचाकी वाहन | ९ | ४.५ |
| ४ | घरदुरूस्ती व घरबांधणी | ६० | ३०.० |
| ५ | स्वयंसहाय्यता गटाचे ज्ञान प्राप्ती | २९ | १४.५ |
| ६ | शैक्षणिक माहिती | १७ | ८.५ |
| ७ | व्यवसाय प्रशिक्षण | ६ | ३.० |
| ८ | व्यवसाय निवडीस मदत | २ | १.० |
| ९ | गटातील अंदाजपत्रक | १ | ०.५ |
| १० | तरतूदी | १ | ०.५ |
| | **एकूण** | २०० | १०० |

**स्त्रोत संकलीत माहिती**




वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, प्रतिसादक स्वयंसहाय्यता बचत गटात आल्यामुळे प्रतिसादकाच्या कुटंबाना वरिल प्रमाणे लाभ मिळाले आहेत. त्यामुळे प्रतिसादकांच्या कौटुंबिक राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. त्याचा परिणाम इतर महिला बचतगटावर होत असल्याचे दिसून आले.

**६.७.६** स्वयंसहाय्यता बचतगटामध्ये प्रतिसादकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते अशा समस्येचे वर्गवारी खालीलप्रमाणे

**तक्ता क्रमांक ६.२५**

**समस्यानिहाय वर्गवारी**

| अ.नं. | **प्रशासकीय समस्या** | **प्रतिसादक संख्या** | **प्रतिशत** |
|---|---|---|---|
| १ | मार्गदर्शनाचा अभाव | ३४ | १७.० |
| २ | सभेत गैरहजर | ८ | ४.० |
| ३ | अवेळी सभा | ४ | २.० |
| ४ | ग्रामसभेत हजर न राहणे | ५ | २.५ |
| ५ | भ्रष्टाचार | २ | १.० |
| ६ | प्रसिध्दीचा अभाव | २८ | १४.० |
| ७ | वेगळी बैठक व्यवस्थेचा अभाव | ४ | २.० |
| ८ | बॅकेत जाण्यासाठी वाढता खर्च ( गावापासून दूरवर बॅक) | ३० | १५.० |
| ९ | संघटिका कार्यकत्यांची दरमहा भेट न घेणे | १६ | ८.० |
| १० | आत्मविश्वासाचा अभाव | ३ | १.५ |
| | **एकूण** | **१३४** | **६७.०** |

| **ब** | **वित्तीय समस्या** | **प्रतिसादक संख्या** | **प्रतिशत** |
|---|---|---|---|
| १ | बॅकेच्या मदतीचा अभाव | २६ | ८.० |
| २ | कर्ज थकबाकी व अनियमित बचत | ०६ | ३.० |
| ३ | बिगर द्रारिदयरेषेतील गटाना अनुदान नाही | ५ | २.५ |
| ४ | नुकसान भरपाईचा अभाव | २ | १.० |
| | **एकूण** | **२९** | **१४.५** |

| **क** | **विपणन समस्या** | **प्रतिसादक संख्या** | **प्रतिशत** |
|---|---|---|---|
| १ | विपणन प्रशिक्षणासाठी अनुपस्थिती | ८ | ४.० |
| २ | विद्युत समस्या | ३ | १.५ |
| ३ | विपणनाचा अभाव | ८ | ४.० |
| | **एकूण** | **१९** | **९.५** |

| **ड** | **सामुहिक समस्या** | **प्रतिसादक संख्या** | **प्रतिशत** |
|---|---|---|---|
| १ | पुरूषांचा बचत गटात वाढता हस्तक्षेप | १२ | ६.० |
| २ | अ + ब+ क एकूण | १८२ | ९१.० |
| ३ | उत्तर न देणारे | ६ | ३.० |
| | **एकूण** | **२००** | **१००** |

**स्त्रोत संकलीत माहिती**

वरिल तक्त्यावरून स्पष्ट होते की, प्रतिसादक स्वयंसहाय्यता महिला बचत गटांना प्रशासकीय समस्यांचे प्रमाण जास्त जाणवते.

### ६.६.७ समस्या निमूर्लनाच्या स्थितीनिहाय वर्गवारी :—

प्रतिसादक स्वयंसहाय्यता बचत गटाच्या समस्या निर्मूलनासाठी मानद तत्वावर यंत्रणा वरीलप्रमाणे निमूर्लनासाठी खालील स्त्रोतांचा वापर करतात.

**तक्ता क्रमांक ६.२६**
**समस्या निमूर्लनाच्या स्त्रोतनिहाय वर्गवारी**

| क्र | स्त्रोत | प्रतिसादक गट | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | चर्चा | ७६ | ३८.० |
| २ | कर्ज हप्त्यात सवलत | २३ | ११.५ |
| ३ | पंचायत समिती अधिकाऱ्यांशी चर्चा व निर्णय | १९ | ९.५ |
| ४ | स्वयंसेवी सहयोगिनी | ३१ | १५.५ |
| ५ | सभासदामध्ये सलामसलत | १२ | ६.० |
| ६ | दंड | ४ | २.० |
| ७ | जेष्ठ व्यक्ती | ८ | ४.० |
| ८ | बॅकेशी संपर्क | १७ | ८.५ |
| ९ | सभेत निर्णय | १० | ५.० |
| | **एकूण** | **२००** | **१००** |

**स्त्रोत : संकलीत माहिती**

वरिल तक्त्यावरून स्पष्ट होते की, समस्या निर्मूलनासाठी लोकशाही मार्गाचा अवलंब केला जात आहे. म्हणून स्वयंसहाय्यता बचत गट चळवळ ही प्रतिसादकासाठी प्रतिसादकांची आणि प्रतिसादकांनी अधिक प्रमाणात स्थापन केले आहेत. त्यामुळे प्रतिसादकांनी पुढाकार घेवून म्हणजेच तितके कुटुंब यामध्ये सहभागी झाल्याने चळवळ लोकांची आहे. याची जाणीव झाल्याने प्रतिसादक बचतगट वृध्दीगत होत आहे.

कोणतीही समस्या सोडवण्यासाठी चर्चा हा मार्ग सर्वाधीक उत्कृष्ट असतो. त्यामुळे ७६(३८) प्रतिसादकांनी या मार्गाचा अवलंब केलेला आहे. त्यानंतर ३१ प्रतिसादकांनी (१५.५) संघटिकाव्दारे चर्चा करून मार्ग काढला आहे. प्रतिसादक बचतगट सर्वानुमते चर्चेचा अवलंब केल्याने त्यांची प्रगती भविष्यात उत्कृष्ट होणार आहे.


**६.७.८ शासकीय/सामाजिक योजनेत सहभाग :—** स्वयंसहाय्यता बचतगटामध्ये प्रतिसादक आल्यामुळे सामाजिक सबलीकरण झाले आहे. सामाजिक सबलीकरणाचे निदेशक शासकीय कार्यक्रमात प्रतिसादकांचा सहभाग व्यक्तीमत्व विकासात भर याद्वारे स्पष्ट होते. गाव विकासासाठी शासन पातळीवर विविध योजना राबविल्या जातात. त्यामध्ये प्रतिसादकांचा सहभाग वाढला आहे. हे स्वयंसहाय्यता बचतगटामुळे परिवर्तन झाले आहे हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ६.२७**

**शासकीय/सामाजिक योजनेत सहभाग**

| क्र. | तपशिल | प्रतिसादक संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | महिला बचतगट अभियानात सहभाग | १९५ | ९७.५ |
| २ | पौष्टिक आहार योजना | १६० | ८०.० |
| ३ | शालेय अन्नपोषण | ५५ | २७.५ |
| ४ | अस्मिताभवन बांधकाम | ७८ | ३९.० |
| ५ | पाणलोट क्षेत्र कार्यक्रम | ६८ | ३४.० |
| ६ | वनराई बंधारे | ८८ | ४४.० |
| ७ | घरकुल योजना | ७९ | ३९.० |
| ८ | साक्षरता अभियान | ६० | ३०.० |
| ९ | दारूबंदी | १९० | ९५.० |
| १० | आरोग्य शिबीर | १८४ | ९२.० |
| ११ | कुटुंब कल्याण कार्यक्रम | ५९ | २९.० |
| १२ | ग्रामस्वच्छता | १६५ | ८२.५ |
| १३ | राष्टीय सण | २० | १०.० |
| १४ | महिला दिन | १९७ | ९८.५ |
| १५ | वाढदिवस | १८९ | ९४.५ |
| | **एकूण** | **२००** | **१००** |

**स्त्रोत : संकलीत माहिती**




(टिप — एकापेक्षा जास्त योजनेत अनेक प्रतिसादक सहभागी होतात म्हणून बेरीज २०० नाही)

वरिल तक्त्यावरून निदेर्शित होते की, प्रतिसादकांनी स्वयंसहाय्यता बचतगटामुळे विविध कार्यक्रमात सहभाग वृध्दीगत झाल्यामुळे शासकीय योजनांची माहिती प्रतिसादकाना प्राप्त होण्यास मदत झाली आहे.

## ♣ विशेष प्रतिसादक

### ♣वाळवा तालुका विशेष

वाळवा पंचायत समितीने दारिद्रयरेषेखालील बचतगटातील महिलांना दिलेल्या व्यवसायभिमुख कर्जामुळे ४२५ महिलांनी दारिद्रयरेषा ओलांडली आहे. या महिलांनी म्हैस खरेदीसाठी १४ कोटी ४० लाख रूपयांचा कर्जपुरवठा करण्यात आला. यासाठी महिलांनी वेळेत कर्ज परतफेड करून सव्वाचार कोटी रूपयांचे अनुदान मिळवले. तालुक्यातील महिलांनी नव्याने खरेदी केलेल्या ८५० म्हैशीमुळे सरासरी अडीच हजार लिटर दुध उत्पादन वाढले आहे. वाळवा पंचायत समिती कार्यालयात दारिद्रयरेषेखालील बचत गटांना मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र कक्ष आहे. २००७—०८ या आर्थिक वर्षात ३६ बचतगटांना ४ लाख रूपयांप्रमाणे म्हैसखरेदीसाठी कर्जवाटप करण्यात आले. ३६ बचतगटातील ४२५ महिलांनी या कर्जाचा लाभ घेतला. ४२५ महिलापैकी ८० महिला अनुसुचित जाती, ३९ महिला अल्पसंख्याक आणि एक महिला अपंग आहे. वाळवा तालुक्यातील ४२५ महिलांनी दुग्ध उत्पादनातून आर्थिक अन्नती साधली आहे. वाळवा पंचायत समितीच्या माध्यमातून या महिलांनी दारिद्रयरेषा ओलांडली आहे. राष्ट्रीयीकृत बॅकांनी या महिलांवर विश्वास व्यक्त करून त्यांना १४ कोटी ४० लाख रूपयांचा कर्जपुरवठा केला आहे. यासर्व महिलांनी बॅकेच्या विश्वासाला तडा न देता वेळेत

कर्जाची परतफेड केली आहे. प्रत्येक महिलेला दहा हजार रूपये अनुदान मिळाले आहे. म्हैशीची नव्याने खरेदी झाल्याने दुग्ध उत्पादन अडीच हजार लिटरने वाढले याचा अर्थ वाळवा तालुक्यातील ४२५ महिलांना बचत गटाच्या माध्यमातून रोजगार मिळालेला आहे. वाळवा तालुक्यात शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसायाकडे पाहिले जाते. याचाच लाभ उचलत दारिद्रयरेषा पार करण्याचा हा उपक्रम बचतगटांतून महिलांनी राबविला आहे.

**♣ प्रतिसादक क्रमांक १:**

सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यात रमाई महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत चालू असलेल्या मातंग समाजातील सावित्री स्वयंसहाय्यता महिला बचतगटाच्या माध्यमातून कार्य कृतीतून दाखवून दिले आहे. सावित्री स्वयंसहाय्यता महिला बचतगटामध्ये येण्याआधी बाहेरील जग काय आहे हे आम्हाला माहित नव्हते. महिला बचतगटांच्या माध्यमातून समाजातील सर्व महिलांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. महिला गटात आल्यानंतर बॅकेंची ओळख झाली. बॅकेत येणे जाणे राहिल्याने बॅकेचे आर्थिक व्यवहार समजले. बॅकेने प्रतिसादकांना बोलावून कारागीर स्वयंरोजगार योजनेची माहिती दिली. प्रतिसादकांनी पंचायत समिती कारागीर संस्थेत जावून कर्जासाठी फॉर्म भरला आहे. सर्व कागदपत्रांची पूर्तता केली. कर्ज प्रकरणातून रू. दहाहजार कर्ज मंजूर झाले. त्या कर्ज रक्कमेतून केरसूणी व्यवसायासाठी लागणारा कच्चामाल आणि इतर साहित्य आणले. स्वत:चा केरसुणी व्यवसाय सुरू केला. त्यातून माझे कुटूंबाची आर्थिक गरज पूर्ण करता आली. प्रत्येक शुक्रवारी वाळव्याच्या बाजारात माझ्या केरसुणीची विक्री होते. हे सर्व बचतगटामुळे शक्य झाले. मी जर बचत गटात नसते तर मला काही माहित झाली नसती. माझी परिस्थिती बेताची, मला कोणीच आर्थिक मदत केली नाही. बाहेरून कर्ज घेण्यासाठी पत नव्हती. मोठी पत बचतगटामुळे निर्माण झाली. सध्या मी माझा उदरनिर्वाह केरसुणी व्यवसायातून व्यवस्थितपणे पूर्ण करीत आहे.

**♣प्रतिसादक क्रमांक २:**

सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यामधील चिकुर्डे गावामध्ये दोन मागासवर्गीय वस्त्या आहेत. बौध्द आणि मातंग समाजाने रमाई महिला सक्षमीकरण योजनेतील तीन गटांची निर्मिती केली. बचत गटांना तीनवर्षे कालावधी पूर्ण झालेली आहे. तिन्ही गटांचे बॅकेकडून ग्रेडेशन झाल्याने दोन गटांची बॅक लिंकेज झालेली आहे. सुविधा आणि लक्ष्मी बचतगट या दोन गटांनी प्रत्येकी ५०,०००/— रू. इतके कर्ज घेऊन महिलांनी केरसुणी व्यवसाय, आणि शेळी पालन व्यवसाय सुरू केलेला आहे. एका महिला सदस्यांने बॅकेकडून मिळालेल्या कर्जातून (रू. २००००/—)

चटणी व्यवसाय सुरू केला आहे. चटणी तयार करून चिकुर्डे गांवचा ऊसतोड वस्तीमध्ये विकण्यास सुरूवात केली. नंतर गावात फिरून चटणी विकण्यास सुरूवात केली. सध्या मला घरबसल्या चटणीची मागणी मोठयाप्रमाणात वाढली आहे. हा व्यवसाय सध्या इतका वाढला आहे की, विक्रीसाठी बाहेर जाण्याची गरज नाही. लोक घरी येऊन चटणी घेऊन जातात. या व्यवसायातून माझे कुटूंब चालवून मी एक एकर शेती खरेदी घेतली आहे. मी खूप आनंदी आहे. कामात दिवस जातो. काम मनापासून केले तर त्याचे फळ नक्कीच मिळते. फक्त प्रयत्नाची गरज असते. संधी हवी असते ती संधी मला महिला बचतगटाच्या माध्यमातून मिळाल्याने त्याचे मी सोनं केले आहे. माइयासारख्या गावतल्या अनेक महिला बचतगटात आल्या. त्यांनी भाजी व्यवसाय केला. आम्ही सर्व महिला पैसा मिळविण्यासाठी कष्ट करतो. त्याप्रमाणे आम्हाला पैसाही मिळतो.

♣ **प्रतिसादक क्रमांक ३:**

सांगलवाडीची ही प्रतिसादक आहे. आकस्मित दुदैवी घटनेमुळे यापुढील आयुष्य कसे जगायचे ? हा प्रश्न समोर उभा होता. फक्त मी एकटीच, माइया दोन वर्षाच्या मुलीचा भविष्याचा विचार होता. माझे शिक्षण बारावीपर्यतचे झाले. शिक्षणसुध्दा माइया वडिलांच्या गरिब परिस्थितीत व मैत्रीणिच्या सहकार्याने शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर लग्न झाले. माझे पती जुजबी नोकरीस होते. माझे दुदैव असे की, माइया वाटेला आलेल्या संसाराचा कालावधी जेमतेम दोन वर्षाचा. लग्नानंतर दोन वर्षानी माइया पतीचे आकस्मित निधन झाले. त्यांनतर मी मुलीला घेऊन माहेरी राहायला आले. परावलंबन किती काळचे? माइया मुलीचे पुढे कसे होणार ? नोकरी व्यवसायासाठी अनेक ठिकाणी प्रयत्न केले पण अपयश आले. अशा मनस्थितीत असताना एके दिवशी दैनिकामध्ये महिला आर्थिक विकास महामंडळची जाहिरात वाचली. फॅशन डिझायनिंग कोर्स, विधवा आणि दुर्बल महिलांसाठी मोफत प्रशिक्षण सुरू आहे. मी त्वरीत जिल्हा परिषद कार्यालयाशी संपर्क साधला. साहेबांशी समक्ष बोलून वस्तुस्थिती सांगितली आणि सहा महिन्याचा कोर्स पूर्ण केला.

त्यानंतर दिनांक १ ऑक्टोंबर २००३ रोजी मी सांगलवाडी येथे शिवाजी फॅशन डिझायनिंग या नावाने कोर्स सुरू केला. त्या बरोबरच चार महिला बचतगट तयार केले. आयुष्यात माझ्यासाठी आणि दुर्बल महिलांसाठी काहीतरी करू शकते. याची प्रचिती मला आली. सध्या मी महिला बचतगटातील महिलांना या कोर्समधून प्रशिक्षण देते आहे. त्याला उत्तम प्रतिसादही मिळतो आहे. महिला आर्थिक विकास महामंडळानी हे काम माइयाकडे दिले आहे. त्यामुळे मी स्वत:च्या पायावर उभे राहू शकले. माइया मुलीच्या पालनपोषणा इतके मानधनही मिळते. शासनाच्या विधवा आणि दुर्बल महिलांसाठी चालविले जाणारे महिला बचतगट उपक्रम यशस्वीरित्या पार पाडणारे अधिकारी आणि त्यांचे कर्मचारी यांच्या कार्यक्षमतेमुळे हे उपक्रम उत्तमरित्या महिला पार पाडतात. त्याची प्रचिती

म्हणजे माझी आणि माझ्या मुलीच्या जगण्यासाठी ध्येयस्फूर्ती महिला बचतगट आहे.

**♣प्रतिसादक क्रमांक ४:**

सांगली जिल्हयातील मिरज तालुक्यामध्ये मौजे डिग्रज गांव. गावातील महिला व पुरुष शेतमजूरी करतात. काहीजण नोकऱ्या करुन आपला उदरनिर्वाह चालवितात. गावामध्ये मागासवर्गीय समाजाची वस्ती आहे. मातंग समाजातून वीस महिलांची मिळून प्रतिसादकांनी दोन बचत गट तयार केले आहेत. रमाई महिला सक्षमीकिरण योजनेअंतर्गत निशीगंधा व जिजाऊ बचत गट या दोन गटांची स्थापना पाच वर्षापूर्वी केली आहे.

दोन्ही गटातील महिला स्वयंभू असा उद्योग करण्यास नेहमीच उत्सुक असतात. सुरुवातीला रु. ३०/— प्रमाणे बचत करून कामाला सुरूवात केली. कार्यक्रमामधून जिल्हा परिषदेतील विविध योजनांची व कर्ज प्रकरणाची माहिती महिलांनां मिळू लागली. प्रतिसादकांनी सुरुवातीचा शेळी उद्योगासाठी कर्ज घेतले. त्यासाठी कर्ज म्हणून रु. १४०००/— उद्योगासाठी मंजूर झाले. कर्जातून नोव्हेंबर २००३ साली पाच शेळया आणि एक बोकड अशी जनावरे खरेदी केली. त्यांची एका वर्ष कर्जाचा हप्ता व्यवस्थीत भरुन सहा हजार रुपये फायदा झाला. त्या म्हणाल्या की, बचत गटात आल्यानंतर अंतर्गत कर्ज आणि बचत यातून त्यांचा कौटुंबिक विकास उत्तमप्रकारे झाला आहे. त्यांच्या मुलापैकी एका मुलाला सांगलीच्या बापट शाळेत आणि दोन मुले गावात शिक्षण घेत आहेत. बचत गटातून शिक्षणाचा प्रश्न आणि घरच्या अडचणी दूर करता आल्या. पूर्वी मजुरी करुन कुटूंब चालविणे, अतिशय त्रासाचे होते. शेळीपालन उद्योगामुळे आर्थिक प्रश्न सोडवता आला. माझें पाहून गटातील इतर महिला काहीतरी करायला पाहिजे म्हणुन काही महिलांनी कोबंडया पालन व्यवसाय करण्यास सुरुवात केली आहे. प्रतिसादकांच्या मते एक माहिला शिक्षित असेल तर घर शिक्षित होते. बचत गटातून एक महिला आर्थिक साक्षर झाली तर सर्व गटातील महिला आर्थिक साक्षर होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे समाजातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचतगट हे एक प्रभावी माध्यम आहे.

**♣प्रतिसादक क्रमांक ५:**

बुर्ली गावाची बचतगटाची ही प्रतिसादक आहे. यशोदामाता स्वयंसहाय्यता महिला बचतगटात सोळा महिला सभासद आहेत. बचत गटाच्या मदतीने घरासमोरील दोन गुंठे मोकळया जागेत वाया जाणाऱ्या पाण्यावर भाजीपाला परसबाग तयार केली आहे. बागेत कांदां, लसूण, वांगी, भेंडी, कारली, टोमॅटो, भोपळा इ. भाजीपाला विकसीत केला आहे. कडेला फुलझाडे व लिंबू, कडीपत्ता यांचीही झाडे लावली आहेत. रोजचे सांडपाणी, कपडे धुण्याचे पाणी आणि घरगुती नळाचे वाया जाणारे पाणी

याची व्यवस्था करुन बागेत सोडले आहे. माविमनी दाखविलेल्या जनजागृती कॅसेटमधील महिलांची कामगिरी बघून मला हे सर्व करता आले. हा भाजीपाला मी कुटूंबासाठी महिला बचत गटातील महिलांसाठी विकत देते. माझे काम बघून गटामधील दोघीनी आपल्या घरासमोर परसबाग तयार केली आहे. गटामधील चौघीनी मिळून भाडे तत्वावर पाच एकर जमीन घेऊन धान्य आणि भाजीपाला उत्पादन सुरु केले आहे. दोघीनी म्हैस पालन व्यवसायास सुरुवात केली आहे. अशा पध्दतीने आम्ही बचत गटामधील महिलानीं एकमेकींचे पाहून कामाला सुरुवात केली. कामातून आम्हाला घरखर्चासाठी पैसे मिळतात. बचत गटामुळे अनेक महिलानां एकत्र येण्याची संधी मिळाली, त्यामुळे आमची सुख:दुखे, अडी अडचणी आम्हाला समजू लागल्या. कौटुंबीक आर्थिक अडचणी सोडवता आल्याने आनंदी वातावरण तयार झाले आहे. आम्हाला खूप काही समजून घेऊन मोठा उद्योग व्यवसाय सुरु करण्याची इच्छा आहे. प्रतिसादकाच्या मते प्रत्येक देशाची स्त्री ही त्या देशाची प्रतिबिंब असते. आर्थीक स्वातंत्र्य प्रत्येक महिलेला आवश्यक आहे. त्यासाठी शासनानेही स्त्रीला आर्थिक मिळवून देण्यास मदत करणे आवश्यक आहे. असे प्रतिसादकाचे मत आहे.

**♣ प्रतिसादक क्रमांक ६:**

शाहीरी पोवाडे गाऊन समाज प्रबोधन आणि उदरनिर्वाह अशा दोन्ही गोष्ट साधण्याचे करताना मानधन बेताचंच, शेत जामीन नाही. पारंपारिक कलेचा वारसा आणि कलेवर जीवापाड भक्ती म्हणूनच हलाखीत कलेचा वारसा आम्ही जपला आहे. लहानपणापासून हुशार असल्याने शाळेत चांगले गुण मिळायचे. पण परिस्थती हलाखीची असल्याने पोवाडयांचे काय्रर्कम करुनच शिक्षण घ्यावे लागले. बसभाडे बचत करणे, चालतच दोन की.मी. जावे तेव्हां वेळ मिळेल तेव्हां अभ्यासही करायंचा. एकत्र कुटूंब मोठे असल्याने खर्चासाठी शिक्षण सोडावे लागले. माझ्या आजूबाजूची परिस्थिती काही वेगळी नव्हती. मजुर महिलांची परवड पहावत नव्हती. मन सुन्न व्हायचें. माझे घरचे लोक अडाणी असले तरी अजाण नव्हते. प्रबोधनाचे काम करीत असल्यामुळे स्त्री पुरुष समानता घरात नांदत होती. आजूबाजूला अहंकारी आणि व्यसनाधीन पुरुष महिलांना त्रास देत, मारहाण करत होते ते पाहून असे मनात विचार येत होते की, काहीतरी करुन या परिस्थतीमध्ये बदल करायला हवा.

बचतगटाच्या माध्यमातून महिलांना एकत्र आणण्यासाठी चांगली संधी आहे. 'कोशिश करणे वालो की हार नहीं होती' गल्लीतल्या बारा बायकांची सभा घेऊन दि. ८.५.२००४ रोजी ''नवभारत स्वयंसहाय्यता महिला बचतगट स्थापन केली. सुरुवातीला बचतीची रक्कम रु. दहा महिना एवढीच होती. लोक हसायचे पण भावभावकीतले मतभेद, स्त्री पुरुष भेदभाव, व्यसनाधीनता, गरिबी या सगळयाशी लढायचे तर महिलाच हवी. महिला गटाला प्रथम घरचा विरोध व्हायचा. पण सर्वांना

धाडसाने समजून सांगण्यात मला यश मिळाले. आम्हाला बैठक घ्यायची म्हटले की, घरची कामे करा. आम्हाला जेवण वाढा, मंग काय बैठका घ्यायची घ्या असें पुरुष मंडळीकडून बजावले जायचें त्यामुळे बैठकीची वेळी रात्री उशीरा ठरली. मिटिंग मधील विचार विनिमयातून आपापसात भांडणाऱ्या महिला हळुहळु एकमेकाशी प्रेमाने वागू लागल्या, त्यामुळे एकमेकींच्या सुख दु:खाचा व आर्थिक प्रश्न सोडवण्यास सुरुवात झाली. बचत गटातून कर्ज घेऊन शेळया घेतल्या, पण घरातील पुरुषी अहंकार हिणवून म्हणत होता ''बायकांचे ऐका अब गाडगभर पैका'' शेळयांनी कुंठ प्रपंच्याला हातभार लागतो का? पण आम्ही ठरवंल की बचतकमी म्हणून कर्ज कमी त्यामुळे महिना रु. पंन्नास बचतीला सुरुवात केली. आजारपण, घरखर्च, लग्न सोहळा, यासाठी मोठया रकमा कर्जाऊ घेण्यास सुरुवात झाली. परतफेडही कष्टाने जमेल तितकी काटकसर करुन केली. शाहीराच्या वादयांची गरज गटातून पूर्ण करता आली. गटामधील एक सदस्य बिचारी अशिक्षित सासरचा त्रास खूपच होता. तिला पहिली मुलगी झाली मुलगा हवा आहे. यासाठी गर्भलिंग परिक्षा करुन घे म्हणून घरच्याचा तगाद्याला खूपच कंटाळली होती. एक दिवस त्या महिलेने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. हे कळताच बचत गटाची बैठक घेतली. आम्ही सर्वजण तिच्या घरी गेलो. आम्ही बजावून सांगीतले जर तिला त्रास दिलात, तिची व गंर्भलिंग परिक्षा केलात, तर तुमच्यावर गुन्हा दाखल करु. गर्भलिंग परिक्षा करणं कायद्याने गुन्हा आहे हे त्यांना माहीत होते. त्यामुळे तिच्या कुटूंबातील छळास पायबंध घालता आला.

एका सदस्य महिलेचा नवरा खूप दारु पित होता. आपली सर्व कमाई दारुसाठी खर्च करायचा. महिला बचत गटातील सर्व महिला एकत्रितपणे त्यांच्या घरी जाऊन ताकीद दिले, जर यापुढे दारु पिलात तर तुमच्या विरुध्द गुन्हा दाखल करु, या महिलेला घटस्फोट मिळवून देऊन तुम्हाला घरातून हाकलून देऊ. सुरुवातीला त्याने वाद घातला नंतर दारु सोडली. आम्हाला बचतगटाच्या प्रशिक्षणातून माहिती, धाडस व एकता यांची ताकद किती मोलाची आहे याची जाणीव झाली. यापूर्वी गरिबीमुळे दुध फक्त लहानपणी आईचेच प्यायलेले आठवत पण सद्या बचतगटामुळे प्रत्येकीच्या घरी एक दोन म्हशी, शेळया, असल्याने दुधदुभत्यांची रेलचेल सुरु आहे. जेमतेम दैनंदिन गरजा भागवून, प्रसंगी उपाशी राहणाऱ्या महिला आज स्वावलंबी झाल्या आहेत. स्वाभीमानाने जागण्यासाठी मतभेद सोडले आहेत. बचत गटांनी आमच्या अडचणी सोडवण्यासाठी मार्ग दाखवला. ''आमची कोलमडलेली घरे आणि कोमजलेली मने पुन्हा उभी केली.'' गटातून आम्ही केलेली प्रगती व आर्थिक आधाराची भक्कम इमारत बघून, पुरुष मंडळी पाठीशी उभी आहेत. गरिबीचा शाप बचतगटातून पुसला जात आहे. महिला अबला नसून सबला आहे. महिला कुणाची गुलाम नसून तिला सलाम करावा असे कर्तृत्व ती करु लागली आहे. हे सर्व यश मनाला आणि समाजाला पटवून देण्यात आमच्या नवभारत महिला बचतगटाला आले आहे असे प्रतिसादकांला वाटते.

**♣ प्रतिसादक क्रमांक ७:**

शिक्षण माध्यमिकपर्यंत पूर्ण केले आहे. समाजासाठी काहीतरी करावे अशी तीव्र इच्छा असल्यामुळे बचतगट स्थापन करुन समाजातील स्त्रीयांना एकत्र आणले. मुस्लीम महिलांना बचत गटात सामील करुन घेतले. प्रतिसादकांच्या पतीचा व्यवसाय वखार, दुकान आणि पिठाची चक्की असल्यामुळे प्रतिसादकांचा संपर्क अधिक वाढला. बचतगट स्थापनेपूर्वी काहीही माहीत नव्हते. बचत गटांच्या स्थापने नंतर आणि बैठकीला सुरूवात झाली. त्यामुळे बाहेरचे जग काय असते ते समजायला लागले. महिलावर अन्याय होत असेल तर आपण निमुटपणे सहन करायचे का ? यावरही मिटींगमध्ये चर्चा होवू लागली. त्यामुळे धाडसाने आम्ही सर्व महिला ग्रामसभेला जाण्यास सुरूवात केली. एक दिवस आम्ही बचतगटातील महिला बाजार करून रिक्षातून परत येताना एका रूपयांसाठी रिक्षावाल्याने माझ्या मैत्रिणीला खाली उतरवले. रिक्षात तिचा नवरा खूप दारू पिला होता. वादावादी झाल्यावर रिक्षावाल्यानी आम्हाला रिक्षातून खाली उतरवले, ही बातमी गावात इतर गटातील महिलांना समजली. तेंव्हा गावातील वडापबंदी आणि दारूबंदी करण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्यादिवशी बचतगटातील सर्व महिलांनी एस.टी. डेपोला अर्ज करून एस.टी. ची मागणी केली. गटामधील दहा महिलांचा ग्रुप तयार करून प्रत्येकांच्या हातात काठया दिल्या. वडाप आले की, त्यात कुणालाही बसू दयायचे नाही असा कार्यक्रम सकाळी सात ते रात्री आठपर्यत चार दिवस चालू होता. वडापमध्ये बसणाऱ्यांना पाचशे रूपये दंड केला. त्याचप्रमाणे दारू अडड्े उध्वस्त केले. रात्री अकरापर्यत महिलांचे पथक गावात फिरत होते. त्यामुळे सध्या गावात दारूबंदी झाली आहे. आता महिलांनी डेपो मॅनेजरकडे पिकअप शेड बांधून मिळावा म्हणून अर्ज केला आहे. गावात एकही वडाप नाही. तसेच प्रतिसादकांनी स्वच्छता मोहिम सुरू केली आहे. निरक्षर महिलांना लिहायला सही करायला शिकवले जात आहे. जे काम पुरूषांना जमले नाही ते बचत गटामधील प्रतिसादकांनी करून दाखविले आहे.

**♣ प्रतिसादक क्रमांक ८:**

प्रतिसादक पूर्णपणे निरक्षर आणि एकत्र कुटूंबात राहून बागणी गावात सावित्रिबाई फुले महिला बचतगट स्थापन केली आहे. बचतगटात अकरा महिला सभासद आहेत. गटस्थापनेपूर्वी कोणताही आर्थिक व्यवहार केला नाही. बाहेर कुठे जाण्याचा प्रसंगही आला नाही. पण गटात आल्यानंतर छोटंस किराणा मालाचे दुकान सुरू केले. आमच्या बचतगटाला बॅकेकडून रू. २६००० इतकी रक्कम मिळाली. ती रक्कम महिलांनी वाटून न घेता मला एकटीलाच दुकान सुरू करण्यासाठी देवून मदत केली. प्रतिसादक बचतगटातून २६०००/— रू. आणि इतर रूपये

रू. २४०००/— असे एकूण रू. ५०,०००/— गुंतवणूक केली. दुकानाची मासिक उलाढाल रू. ३०,०००/— आणि मासिक फायदा ८०००/— रू. मिळतो आहे. गटात आल्यापासून घरच्या लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. प्रतिसादकांचा बचतगट हा बागणी गावापासून एका ठराविक अंतरावर असल्यामुळे एका छोटयाशा वसाहतीमध्ये दुकान इतरांचे लक्ष वेधून घेणारे आहे. बचतगटात आल्यानंतर वस्तीत लाईट आणली. गटामधील आम्ही सर्व महिला एकत्रित विचार विनिमय करून एकमेकींच्या समस्या सोडवतो. गटामधील सर्वच महिला किराणा सामान आमच्याकडून घेतात.

गटाच्यावतीने जागतीक महिला दिनाच्या मेळाव्याला गेले. तिथे आम्हाला रेशनिंग कृती समितीच्या जिल्हा प्रमुखांनी रेशनिंग दुकानाबाबत माहिती देवून फॉर्म भरून घेतले. आम्ही सर्व महिला मिळून रेशन दुकानांत जावून महिन्याचा मिळणारा माल मागितला, दुकानदाराने सध्या माल नाही असे सांगितले, त्यावर आम्ही सर्व महिलांनी वाद घातला. तो फॉर्म ही त्या दुकानदारास दाखविला. त्यानंतर तो म्हणाला की, मी पुढच्या महिन्यात देतो. आता माझेकडे माल शिल्लक नाही. पुढच्या महिन्यात आम्हाला माल दिला, महिन्याला व्यवस्थित माल देत आहे. त्यामुळे भ्रष्टाचार निर्मूलन व माहितीचा अधिकार मिळाल्याने संघ शक्तीचा म्हणजेच बचतगटामुळे महिला सघशक्ती एकत्रीत आल्याने आम्हाला न्याय मिळाला हे फक्त बचतगटामुळेच शक्य झाले असे म्हणावेसे वाटते.

## ♣ प्रतिसादक क्रमांक ९:

महिला बचतगट प्रतिसादक गटातून आपण काय करू शकतो हे कृतीतून दाखविले आहे. बचतगट स्थापनेविषयी माहिती दिल्यानंतर आम्ही कामाला सुरूवात केली. नवचेतना महिला बचत गटात सतरा महिला सभासद आहेत. बचतगटाविषयी सांगितल्यानंतर घरच्यांनी परवानगी दिली. बचतगटाचा हप्ता भरण्यासाठी बॅकेत जाऊ लागले. तिथे मला अंगणवाडी सेविकेविषयी माहिती मिळाली. गटातून कर्ज घेऊन पुढच्या शिक्षणाला सुरूवात केली. गटामधून विविध योजनांची माहिती मिळाली. बचतगट मेळावा जि.प. शाळेत होता. त्या शाळेच्या मुख्याध्यापकांची ओळख झाली. माझे शिक्षण बारावीपर्यत झाल्याचे त्यांना समजल्याने त्यांनी माझी निरंतर शिक्षण केंद्राचे प्रेरक म्हणून निवड केली. सध्या मी अंगणवाडी व निरंतर केंद्र या क्षेत्रात काम करते. बचतगटामुळे ग्रामपंचायतमार्फत असणाऱ्या शासकीय योजंनाची आणि अडचणी मांडण्याची संधी मिळते. त्यातून महिलांचे प्रश्न सोडवण्यात मला यश मिळाले आहे. मी एम.एस. सी.आय.टी. कॉम्प्यूटर कोर्स पूर्ण केला आहे. बचतगटाच्या माध्यमाने एखादा महिला ग्रामोद्योग सुरू करायचा, चार महिलांना रोजगार मिळेल हे माझे स्वप्न आहे. मी आर्थिकदृष्टया स्वावलंबी झाले. त्यामुळे बचतगटातून मला जे अनुभव आले ते मी गावात सांगू शकते.

## ६.८. सारांश :

### ६.८.१ कौटुंबिक आर्थिक स्थिती :

क्षेत्रीय पहाणीतील सांगली जिल्हयाच्या दहा तालुक्यामधील निवडयात आलेली गावे ग्रामीण भागातील असल्याने प्रत्येक महिला शेतीशी निगडीत आहे. काही बचतगटामधील महिलांच्याकडे कमी जास्त प्रमाणात शेती असल्याने महिला शेतात काम करतात. स्वत:ची शेती सांभाळून शेती पुरक व शेती संलग्न व्यवसाय करत असल्याने दिसून आले. विशेष करुन शेळीपालन, मेंढीपालन, म्हैसपालन, कुक्कुट पालन, गांढूळखत यासारखे व्यवसाय महिला करीत आहेत. ग्रामीण भागातील महिला घरकाम, शेतीकाम सांभाळून स्वयंसहाय्यता बचतगटाच्या माध्यमाने व्यवसाय सुरु केला आहे. वैयक्तिक व्यवसायात कुटूंबातील सदस्याची मदत होत असल्याने अतिरिक्त भांडवलाची निकड नसते. कुटूंबातील सदस्यांना रोजगार उपलब्ध होत असल्याने कौटूंबिक आर्थिक स्थिती सुधारली आहे. स्वयंसहायता गटातून उदयोग व्यवसाय सुरू केल्याने ग्रामीण भागातील महिलांना रोजगार मिळू लागलेला आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीत बदल झालेला आहे. महिलांकडे पैसा उपलब्ध झाल्याने त्या पैशाचा योग्य वापर करण्याचा आणि स्वतंत्र निर्णय घेण्याची क्षमता वाढली आहे. महिलाकडे जिदद, काटकसरी, चिकाटी, इत्यादी उपजात गुण असल्याने मिळालेला पैसा योग्य व्यवसायात गुंतवून अधिक उत्पन्न मिळकतीचा प्रयत्न करतात. त्यामुळेच स्वयंसहाय्यता गटामधील महिला आर्थिक साक्षर झाल्या आहेत.

### ६.८.२ दारिद्रय रेषेवरिल महिला बचतगटांची आर्थिक स्थिती :

दारिद्रय रेषेवरील स्वयंसहाय्यता बचतगटात लोक प्रत्येक गटात पंधरा ते वीस सभासद असतात. या बचत गटामधून प्रत्येक सभासदाकडून पन्नास रूपये किंवा शंभर रूपये बचत गोळा केली जाते. प्रत्येक महिन्याला एक बचतगटाची रक्कम एक हजार पेक्षा अधिक गोळा होते. यापैकी ज्या सभासद महिलांना व्यवसाय करायचा आहे, त्या गटातून कर्ज घेतात. व्यवसायात चांगला जम बसला की, त्याचे अनुकरण दुसरी सभासद महिला करत असल्याने महिलांची आर्थिक स्थिती सुधारली आहे. दारिद्रय रेषेवरील बहुसंख्य महिलांकडे स्वत:ची शेती असल्याने त्याची आर्थिक स्थिती चांगली आहे. अशा महिला शेती बरोबर गटातून कर्ज घेऊन व्यवसाय जोमाने करत असल्याने त्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे. स्वयंसहाय्यता गटातून जी नियमित बचत गोळा केली जाते ती रक्कम गटाच्या नांवे बॅकेत जमा केली जाते. एखादया सभासदाला गरज असल्यास कर्जही दिले जाते. सभासद ती रक्कम व्यवसायासाठी उपयोग करून घेतात. संपूर्ण गटाला एकत्रित व्यवसाय करायचा असेल तर गटाला बॅकेकडून कर्ज घेऊन एकसंघ व्यवसाय करता येतो. ग्रामीण भागात गांडूळखत प्रकल्प, शेळीपालन, मेंढीपालन, कुक्कुटपालन, म्हैसपालन इ.

शेतीपूरक व्यवसायाला महत्व असल्याने शेतीबरोबर शेती पूरक व्यवसाय केले जात आहेत. स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांनी शेतीपुरक किंवा शेती संलग्न व्यवसाय वैयक्तिक किंवा सामुहिकपणे केल्याने रोजगार उपलब्ध होऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे. खऱ्या अर्थाने महिला आर्थिकदृष्टया सक्षम होणे हीच खरी काळाची गरज आहे.

### ६.८.३ दारिद्रय रेषेखालील महिला बचतगटांची आर्थिक स्थिती :

दारिद्रय रेषेखालील महिला बचतगटांची सभासद संख्या दहा असते. प्रत्येक सभासदाकडून पन्नास रूपये बचत गोळा केली जाते. प्रत्येक महिन्याला एका गटातून साधारणपणे पाचशे रूपये ते एक हजार रूपयापर्यत बचत गोळा करून ही बॅकेत जमा केली जाते किंवा गटामधील सभासदांना पैशाची निकड असल्यास कर्जाच्या रूपाने दिली जाते. अशा गटांना विनातारण कर्जाच्या रूपाने मिळालेला पैसा हा इतरत्र खर्च न करता व्यवसायासाठी वापरला जात आहे. दारिद्रय रेषेखालील स्वयंसहाय्यता महिला बचतगटातील बहुतांश सभासदाकडे शेती नाही, महिला इतरांच्या शेतात मोलमजुरी करण्यासाठी जातात. अशा महिलापैकी काही महिलांनी व्यवसाय करायचा असल्यास गटातून कर्ज घेतात. एखादया महिला बचत गटाला एकत्रित व्यवसाय करायचा असेल तर गटाला बॅकेकडून कर्ज घेता येते. व्यवसायातून मिळालेल्या उत्पन्नाच्या प्रमाणात बॅकेच्या कर्जाचे हप्ते फेडतात. अशा गटांना बॅकेतून कर्ज घेताना व्याजदरात सवलत मिळते. इंदिरा आवास योजनेचा फायदा सभासदांना घेता येतो. त्यामुळे दारिद्रय रेषेखालील महिला बचतगटांना कौटुंबिक आर्थिक विकास साधता आला आहे. महिलांची कामाची चिकाटी आणि शासनाने या योजनेसाठी दिलेले प्रोत्साहान, यामुळे प्रतिसादकांची आर्थिक स्थिती सुधारली आहे. गटातील महिला एकत्रित येऊन चर्चा, गांवपातळीवर ग्रामस्वच्छता, शैक्षणिक प्रगती, आरोग्य जागृती, वैचारिक देवाण घेवाण, स्त्रीभ्रूण हत्या, हुंडाबळी या विषयावर बोलत आहेत. महिलांचा व्यक्ती विकासातून कौटुंबिक आणि सामाजिक विकास देशाला पुढे प्रगती पथावर नेण्यासाठी उपयुक्त ठरत आहे.

### ६.८.४प्रतिसादकांनी सुरू केलेल्या व्यवसायातून रोजगार निर्मिती :

सांगली जिल्हयात एकूण दहा तालुक्यामधील ७०५ गावे आहेत. त्यापैकी सर्वेक्षणासाठी प्रत्येक तालुक्यामधून दहा गावांची निवड करण्यात आली असून ही गावे ग्रामीण भागात मोडतात. त्यामुळे ग्रामीण भागात ९० टक्के व्यवसाय हा शेती आहे. ग्रामीण भागातील लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. शेती हा पर्जन्यवृष्टी आणि निसर्गाच्या चक्रावर अवलंबून आहे. अशा हंगामी चक्रानुसार शेतीत पिके घेतली जात असल्याने विशिष्ट हंगामात विशिष्ट पिके घेतली जातात. त्यानुसार ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध होतो. पर्जन्यवृष्टी आणि इतर घटक शेतीला योग्य वेळेत मिळाले तर उत्पादन अधिक आणि त्यातून रोजगारही मोठया प्रमाणावर मिळतो. हंगाम योग्य नसेल तर रोजगार उपलब्ध होत नाही. याचाच अर्थ ग्रामीण भागातील लोक कृषीवर अवलंबून असल्याने हंगामानुसार रोजगार मिळतो. हंगाम नसेल तर बहुसंख्य लोक बेकार असतात. त्यातूनही शेती आणि शेतीसंलग्न रोजगाराच्या बाजारपेठेत सहभागी महिलाचे प्रमाण अधिक आहे.

ग्रामीण भागातील रोजगाराचे हे बदलते स्वरुप पाहता बिगरशेती व्यवसायांना चालना देणे हा ग्रामीण विकास विषयक धोरणाचा एक अग्रक्रम होत आहे. या महिला बचतगटांची सुरुवात झाल्यापासून ग्रामीण भागातील महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. महिला स्वयंसहायता गटात नियमित बचत जमा करतात. सभासद महिला व्यवसाय प्रशिक्षण घेऊन गरजेनुसार व्यवसायाला सुरुवात केली आहे. व्यवसायासाठी महिला बचत गटातून कर्ज घेऊन वैयक्तिक आणि सामुहिक व्यवसाय करतात. सामुहीक व्यवसायाचे प्रशिक्षण घेऊन व्यवसाय निवडून त्यासाठी बॅकेकडून कर्ज घेतात. व्यवसायात मिळणाऱ्या उत्पन्नातून महिला या कर्जाची परतफेड नियमित करत आहेत.

ग्रामीण भागातील स्वयंसहायता महिला बचत गटांना रोजगार मिळाल्यामुळे महिला आर्थिक साक्षर झाल्या आहेत. व्यवसायाची प्रगती करुन उत्पादन करत असल्याने त्यातून रोजगार वाढला आहे. पूर्वी शेती हंगाम नसताना महिला व्यवसाय करित होत्या पण शेती सांभाळून शेती पूरक जोड व्यवसाय करित आहेत. यातून स्वतंत्र रोजगार मिळतो. महिलांना अतिरिक्त उत्पन्न मिळाल्याने ग्रामीण भागातील महिला बचत गटातील सभासदांची आर्थिक स्थिती सुधारली आहे. काही स्वयंसहायता बचत गटातील महिला सभासद इतर महिलांसाठी रोजगार निर्माण करीत आहेत. व्यवसायांचा विस्तार झाल्यामुळे कुटूंबातील व्यक्तिंना रोजगार मिळतो. शिवाय कुटूंबाबाहेरील महिलांनी रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. खऱ्या अर्थाने महिला बचतगटांमुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मिती झालेली आहे.

भांडवलाच्या अभावामुळे शेतीमध्ये एक किंवा दोन पिके हंगामानुसार घेतली जात होती. पण महिला बचतगटातून कर्ज घेऊन

शेतीमध्ये अधिक पिके आणि पर्यायी उत्पादन घेताना दिसतात. काही बचतगटातील महिला या भाडेकरारावर शेती घेऊन फळभाज्यांचे उत्पादन करीत आहेत. शेतीत पाण्याची सोय, खते, बियाणे इतर साहित्य यासाठी लागणाऱ्या भांडवलाची निर्मिती बचत गटातून होऊ लागल्याने भांडवलाअभावी शेती पडून राहण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. महिला बचतगटाच्या कर्जातून शेती सलग्न आणि शेतीपूरक असा जोड व्यवसाय करता आल्याने स्वतंत्र रोजगार निर्मितीस प्रोत्साहन मिळत आहे. स्वयंसहाय्यता महिला बचत गटामुळे व्यवसायाचे प्रशिक्षण, सल्ला, भांडवल, मार्गदर्शन, बॅकेकडून आर्थिक सहाय्य यामुळे रोजगार निर्मितीस प्रेरणा मिळालेली आहे. ग्रामीण भागातील महिला अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासासाठी हातभार लावताना दिसत आहेत. हाच चिरकालीन रोजगार निर्मितीचा मार्ग अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी लाभदायक ठरणार आहे.

गरज ही शोधाची जननी आहे. मग ती आपली असो वा समाजाची असो. जे काही निर्माण झाले आहे ते गरजेतूनच. माणसाला गरज नसती तर हे विश्व निर्माण झाले नसते. निसर्गाने मानवाला पोटाबरोबर बुध्दी दिली आहे. पोट भरण्यासाठी तो त्या बुध्दीचा वापर करत आहे. आपण समाजाचे काही तरी देणे लागतो त्याची परतफेड केली पाहिजे. समाजाची गरज पूर्ण करण्याच्या दृष्टीने महिलांना घर, प्रपंच सांभाळून काम करता येईल याचा विचार केला तर त्यांच्या अंगी कला कौशल्य आहे. त्याचा वापर करुन खाद्यपदार्थ निर्मिती उद्योग गटांतर्गत तयार करुन विक्री करणे हा व्यवसाय महिला बचत गटांना कमीत कमी खर्चात करता येत आहे असे व्यवसाय गटाअंतर्गत वैयक्तिक किंवा एका गटाने बॅकेकडून कर्ज घेऊन चालविले जात आहे. सांगली जिल्हयात लहानमोठे उद्योग, व्यवसाय शेतीपूरक अशा स्वरुपात सुरु आहेत ते पुढीलप्रमाणे

१.**खाद्यपदार्थ —** महिला बचतगटाअंतर्गत चालणाऱ्या खाद्यपदार्थ तयार करणे हा व्यवसाय महिला मनापासून आणि उत्साहाने करताना दिसतात. काही खाद्यपदार्थ तयार करुन हॉटेलमध्ये विक्रीसाठी ठेवतात किंवा टिकाऊ खाद्यपदार्थ पॅकिंग करुन विक्री करतात. हॉटेलमधील दिवसाला लागणाऱ्या चपात्याची ऑर्डर घेऊन सकाळ, संध्याकाळ पुरवितात. दिवाळीचे खाद्यपदार्थ, मिठाई, दुधाचे पदार्थ मोठया प्रमाणावर रुचकर बनविले जातात. काही ठिकाणी असे पदार्थ दोन बचतगट एकत्र येऊन करतात. त्यामुळे महिलांना घरबसल्या संसार सांभाळून रोजगार उपलब्ध झाला आहे.

२.**बटाटे वडे तयार करणे** — पृथ्वीवरील मानवाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा या आहेत. सर्व काही चालते आहे ते फक्त पोटासाठी आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात माणसाला वेळेवर जेवण देखील मिळत नाही. वडापाव खाल्ला नाही असा एकही माणूस सापडणार नाही. वडापाव हे असे एक अन्न आहे की, गरीबातील गरीब व मोठयातला मोठा माणूस देखील याच्यावर दिवस काढतो. त्याच कल्पनेतून बटाटे वडे तयार करुन विक्री करणे हा एक गरजेतून पुढे आलेला व्यवसाय

बचतगटातील महिला असा व्यवसाय करताना दिसतात. सध्या गरज आहे ती आपले घर, गाव, देश सुखी संपन्न करण्याची त्यासाठी महिला बचतगटातील चिकाटीने आपल्या मालाचा दर्जा व वाजवी किंमत ठेवून अनेक खाद्यपदार्थासाठी बाजारपेठ मिळविण्याचा प्रयत्न या आमच्या भगिनी करीत आहेत.

३.**पापड तयार करणे** — महाराष्ट्रातील पापड उत्पादनाला इतर राज्यातून चांगली मागणी आहे. बचत गटातील महिला हा व्यवसाय काही ठिकाणी सामुदायिक आणि काही ठिकाणी वैयक्तिक करत आहेत. पापड हे स्वादिष्ट आणि पचायलाही हलका, सहजासहजी बाजारपेठ मिळवण्यासारखा खाद्यपदार्थ आहे. अतिशय कमी भांडवलात करता येण्यासारखा उद्योग असल्याने बहुसंख्य बचतगटात याची उत्पादने आणि विक्री मोठया प्रमाणात होत आहेत.

४.**मिरची पावडर तयार करणे** — आपल्याकडे मिरची मोठया प्रमाणात पिकते. त्यामुळे बाराही महिने मिरची मिळत असल्याने त्यांची किंमत आपल्याला कळत नाही. परंतु ज्या देशात हे पिक कमी आहे किंवा पिकतच नाही अशा देशांकडून या मसाल्याच्या पदार्थाला चांगली मागणी आहे. आपल्याला माहितच आहे की, याच मासाल्याच्या व्यापारासाठी इंग्रज भारतात आले व दिडशे वर्षे राज्य करुन गेले. याच मसाल्याच्या पदार्थाला अदयापही बाहेरील देशातून मागणी आहे. असा हा व्यवसाय सध्यातरी गटातून कर्ज घेऊन मोठया प्रमाणात केला जात आहे.

५.**चकल्या तयार करणे** — पाकशास्त्रात आपल्या अंगी असलेल्या प्राविण्याचा इतरांना लाभ आणि त्याचबरोबर अर्थाजन या दोन्ही गोष्टी साध्य होतात. समाजात गरीब लोक आहेत. तसे श्रीमंतही आहेत. सर्वच लोक सर्व वस्तू घरी तयार करुन खाऊ शकत नाहीत. असा घरगुती स्वादिष्ट तयार केलेला माल गरीब बनवू शकत नाही. म्हणून तो घेऊन जातो. श्रीमंत लोकांना बनवायला वेळ नाही म्हणून तो अधिक पैसे देऊनही खरेदी करतो. असा हा स्वादिष्ट, चवदार, खमंग चकली व्यवसाय महिला बचतगटातून चकल्यावाल्या बाई म्हणून ओळखायला लागल्या आहेत. हॉटेल्सचे, ऑफीसमधील कार्यक्रमाचे ऑर्डर्स घेऊन हा व्यवसाय चालू आहे.

६.**लोणची तयार करणे** — आहार चांगला तर तब्येत चांगली आणि तब्बेत चांगली असेल तर सर्वकाही चांगले, आहार चवदार आणि स्वादिष्ठ व्हायला लोणच्याला पर्याय नाही. लोणची कमी खर्चात उत्पादन आणि कौशल्याचा हा व्यवसाय म्हणून फायदेशीर आहे. मार्च ते मे कैऱ्यांचा सिझन असतो. जनरली लोणचे आंबा, लिंबु, मिरची, आवळा या प्रकारच्या लोणच्याला खूप मागणी आहे. हा व्यवसाय वैयक्तिक किंवा मोठया प्रमाणावर एका गटामार्फत केला जातो. महिला बचतगटांना अतिशय कमी भांडवलात करता येण्यासारखा उद्योग असल्याने बहुसंख्य महिला बचतगट यात गुंतलेले आहेत.

७.**चहाचे लहान हॉटेल** — गटांतर्गत कर्ज घेऊन चहाचे हॉटेल, हातगाडी किंवा टपरी टाकली आहे. यात्रेत बाजारादिवशी, गावात, शहारातील चौकात, कार्यालय, कोर्टात हा व्यवसाय चांगला चालतो. या व्यवसायात निश्चित कौशल्याची गरत नसल्याने खर्च ही कमी असतो. कमी जोखमीचा आणि चांगले उत्पन्न देणारा हा व्यवसाय बचतगटातून उत्तमरित्या चालविला जात आहे.

८.**केळी वेफर्स तयार करणे** — महिलांना घरप्रपंच सांभाळून कमीत कमी भांडवलात करता येण्यासारखा हा व्यवसाय आहे. साधारणपणे पापड, लोणची, कुरुडया प्रत्येक सणावाराला लागणारे पदार्थ आहेत. त्यामुळे महिला उन्हाळयात घरच्या घरी बनवतात. परंतू उपवासाकरीता कधीतरी वेगळे म्हणून तळून खावेसे वाटणारे केळी वेफर्स सध्या कोणी घरी बनवित नाहीत. त्यामुळे केळी वेफर्स तयार करुन विक्री करणे हा एक अगदी अल्प गुंतवणूकीचा व्यवसाय ग्रामीण महिला बचतगट वैयक्तिक किंवा सामुदायिकरित्या करत आहेत.

९.**अगरबत्ती तयार करणे** — प्रत्येक ग्रामीण भागातील महिलेला वाटते की, चूल आणि मूल यातून बाहेर पडून काहीतरी उद्योग करावा. बचतगटामुळे शहरीच काय पण ग्रामीण भागातील महिलाही जाग्या झाल्या आहेत. काळ बदलत आहे. प्रत्येक क्षेत्रात प्रगती होत आहे. राष्ट्रीयकृत बॅका आणि शासन या बचतगटांना सर्वोतोपरी मदत करीत आहेत. अल्पावधीत या बचतगटामुळे प्रत्येक घर एक कारखाना होत आहे. आज प्रत्येक क्षेत्रात लक्षणीय प्रगती दिसून येत आहे. 'कामात राम, श्रमात आराम, कष्टात समाधान' असते. व्यवसायाच्या या तत्वानी गटाद्वारे कर्ज घेऊन किंवा वैयक्तिक पध्दतीने अगरबत्ती तयार करणे हा व्यवसाय करीत आहेत. कमी खर्चिक असणारा हा व्यवसाय असून कोणत्याही अतिरिक्त कौशल्याची गरज लागत नाही. त्यात पैसे किती मिळाले यापेक्षा कसे मिळाले यालाही फार महत्व आहे. अगरबत्ती हा माल नाशवंत नाही. घरात तयार करणे घातक नाही किंवा आरोग्याला हानीकारक नाही. याचा घरात काही वाईट परिणाम होत नाही. उलट घरात सतत सुगंध दरवळत राहतो अशा या लहानश्या व्यवसायाला सर्वत्र मागणी आल्याने विक्रीचाही प्रश्न निर्माण होत नाही. त्यामुळे या व्यवसायात उत्पन्न मिळत असल्याने अलिकडे बहुसंख्य महिला यात गुंतलेल्या दिसत आहेत.

१०.**बालवाडी चालविणे** — निसर्गाने मानवाला पोट दिले आहे. मच्छीमारी, कुक्कुटपालन, बिअरबार असे अवैध धंदे करण्यापेक्षा समाजातील गरज पाहून बालवाडी चालविण्याचा महिलांसाठी उत्तम व्यवसाय आहे. या व्यवसायात सन्मान आहे, किंमत आहे, पैसाही मिळतो. सध्याच्या काळात शिक्षण हा व्यापार झाला आहे. या क्षेत्रात जे पडेल ते फार मोठे झाले आहेत. शहरी भागात कुटूंबातील दोघे नवरा बायको नोकरी करतात. त्यांच्या मुलाबाळांना सांभाळण्याची फार अडचण असते. चांगली सेवा दिली तर असे कुटूंब मागेल तेवढी फी देण्यास तयार असतात. तेव्हा जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे बालवाडी,

अंगवाडीचा दोन महिन्याचा कोर्स महिला बचत गटातील महिलांनी घेऊन चांगल्या पध्दतीने या व्यवसायात जम बसला आहे.

**६.९ सारांश :** बचतगट स्थापन करण्यामागे शासनाचा मूळ हेतू महिलांना बचतीची सवय लागावी, बचतीतून महिलांना काम मिळावे, महिला आर्थिकदृष्टया सबळ आणि सक्षम व्हाव्यात. हा बचतीचा उददेश फक्त अडचणी भागवून सावकारकी करणे किंवा बॅंकिंग करणे इतकाच नाही तर त्यातून प्रत्येक महिलेने वैयक्तिक किंवा सामुहीक तत्वावर स्वयंरोजगार निर्माण करावा. त्यातून आपला आणि आपल्या कुटूंबाचा विकास करावा अशी कल्पना ही जिल्हयात सुरु असलेल्या बचतगटांचा अभ्यास केल्यानंतर रोजगार निर्मितीचा सकारात्मक दृष्टीने चाललेला हा प्रवास महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी नक्कीच लाभदायी ठरलेला आहे.

बचतगट स्थापन करुन महिलांनी फक्त बचत करणे किंवा बचतीच्या रक्कमातून आपापसातील आर्थिक गरज भागविणे हा एवढाच उदद्‌ेश नाही. तर बचत गटातील भांडवलातून स्वत:हा काही तरी व्यवसाय करुन आपल्या प्रपंचाला हातभार लावला पाहिजे. या उदद्‌ेशाने सुरु असलेल्या महिला बचतगट रोजगार निर्मितीतील योगदान समाज आणि देशासाठी मोलाचे ठरले आहे.

# प्रकरण — ७
# निष्कर्ष आणि शिफारशी

## ७.१ प्रस्तावना :

बचत केलेला पैसा उत्पन्न असते. व्यक्तीने दररोज एक रूपयाची बचत केली असता त्याच्या आयुष्याला कलाटणी मिळते. भारतीय उपखंडातील लक्षावधी कुटूंबानां स्वंयसहाय्यता महिला बचतगटांनी तारले आहे. महिलांना जगण्यासाठी आवश्यक असलेला आत्मसन्मान दिला आहे. गरीब देशासाठी बचतगटांची योजना मार्गदर्शक आहे. याची दखल अमेरिकेसारख्या संपन्न अर्थव्यवस्थेलाही घ्यावी लागली. अमेरिकेतील अकॉन्समधील गरिबांच्या उन्नतीसाठी हा प्रयोग जोमाने राबविला जात आहे. स्वंयसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून व्यक्तीला दारिद्रयातून बाहेर पडता येते हे बचत गटाच्या चळवळीतून दिसू लागले आहे. दारिद्रय निर्मूलनाच्या पुस्तकी सिध्दांताचा शिक्षणापलिकडे फारसा उपयोग नाही. केवळ अनुदाने किंवा मदत देऊन गरिबी हटत नाही. याचाही अनुभव आला आहे. भारतात दारिद्रय निर्मूलनासाठी अनेक शासकीय योजना राबविल्या आहेत. पण त्यांना फारसे यश मिळाले नाही. पण देशातंर्गत बचतगट गरिबी हटावच्या दृष्टीने क्रीयाशिल भूमिका बजावित आहेत. बचत लहान पण बदल महान या तत्वानुसार धडपडणारे लाखो बचतगट भारतात आणि अन्य देशात आज कार्यरत आहेत. अपुरे पोषण, उपासमार, अनारोग्य, बालमृत्यू, बालमजूरी अशा अनेक समस्या गरिबांपुढे उभ्या आहेत. त्यावर प्रभावी उपाय म्हणून ठिकठिकाणी महिलांचे बचतगट अस्तित्वात आले असल्याने महिलांचा जीवनस्तर उंचावला आहे. बचतगट चळवळीमुळे महिला एकत्रित आल्या, त्यांचे संघटन झाले, संघटनेतून शक्ती निर्माण झाली, या शक्तीचा फायदा त्यांच्या तसेच कुटुंब आणि समाजाच्या विकासासाठी होत आहे. महिलांनी आपल्या बचतीतून आणि बॅक कर्ज सहकार्यातून विविध व्यवसाय सुरु केले. त्यामुळे अनेकांना रोजगार मिळाला. बचतगटाची उत्पादने फक्त गावापुरतीच मर्यादीत न राहता त्यांना जिल्हा, राज्य देशात आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होत आहे. भारतातील बचतगट चळवळ महिलासाठी एक सुवर्णसंधी आणि दारिद्र निर्मूलनाचा मार्ग आहे. हे सिध्द होत आहे. महिला बचतगटामुळे काही खेडी सावकारी कर्जाच्या विळख्यातून मुक्त झाली आहेत. त्यांनी विविध उपक्रम हाती घेऊन महिलांना स्वत:च्या पायावर उभे केले आहे. महिला आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळावी. या हेतूने महावितरणाने राज्यभरातील वीजबील विवरणाचे काम महिला बचतगटांना देण्याचा निर्णय घेतला आहे. आता महिला कृषी व्यवसाय करु लागल्या असून शेतात राबणाऱ्या महिलांचे संसार बचतगटामुळे उजळले आहेत. या गटामार्फत शेतीपूरक जोडधंदा करता येवू लागला आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिला आर्थिक सबलीकरण अधिक वेगाने होऊ शकते. याचा अनुभव गेल्या काही वर्षात राज्यात मोठया

प्रमाणात दिसू लागला आहे. महिला बचत गटाची निर्मिती वेगाने झाली. त्यांना शासनाने प्रोत्साहनही मिळाले आहे. ग्रमीण महिलांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी आणि आर्थिकदृष्टया स्वावलंबी होण्यासाठी बचत गटांचा फायदा होत आहे.

दारिद्रयाविरुध्दच्या आणि रोजगार निर्मितीच्या लढयात एक परिणामकारक चळवळ म्हणून ग्रामीण भागात अंत्यत लोकप्रिय स्वयंसहाय्यता बचतगट झाली आहे. महिलांना आर्थिकदृष्टया सबल करणे, महिलांना आर्थिक अडचणीतून सोडवणे, त्यांचे राहणीमान उंचावणे, इत्यादी कार्य महिला स्वयंसहाय्यतागटाने करुन नवी क्रांती केली आहे. संशोधकांनी हे सत्य संशोधनाच्या सहायाने आणि अभ्यासावरुन स्पष्ट होते.

## ७.२ स्वयंसहाय्यता बचतगटासमोरील आव्हाने :—

देशात महिला स्वयंसहाय्यता बचतगट ग्रामीण, शहरी व आदिवासी भागात स्थिर होऊन आर्थिकदृष्टया सक्षम होत आहेत. त्यामुळेच ग्रामीण भागातील महिलांची सक्षमीकरण सुरु झाले आहे. बचतगटामुळे महिला स्वयंरोजगार निर्माण करु लागल्या आहेत. महिलांनी एकत्र येणे, सुख दुखःच्या गोष्टी करणे, बचत करणे, कायद्याची माहिती करुन घेणे, स्वयंरोजगार निर्माण करणे अशा अनेक घटना गटांतर्गत घडत आहेत. ग्रामीण भागात सहकाराला पर्याय म्हणून बचतगट चळवळ जोमात सुरु आहे. बचतगटाच्या कामाला शासकीय सहकार्य मिळत आहे. सध्य परिस्थितीत जागतिक पातळीवरील बॅका, बहुराष्ट्रीय कंपन्या, विमा कंपन्या बचतगट चळवळीमध्ये सहभागी होत आहेत. सर्वच स्तरावरील गटांना मिळणारा प्रतिसाद पाहुन आपणा सर्वाना सर्व काही सुरळीत आहे असे वाटते. पण प्रत्यक्षात बारकाईने पाहिले गेले तर बचतगटा समोर सध्या अनेक समस्या आहेत. समस्या ओळखून काळाच्या बरोबरीने चालणारे बचतगटच पुढे जातील. त्यादृष्टिने धोरणे राबवून अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सद्य परिस्थितीतील, गटासमोरील समस्या पुढीलप्रमाणे—

१. बचतगटाकडे राजाकीयपक्ष वेगळया दृष्टिने बघत असल्याने सहकाराप्रमाणे स्वंयसहाय्यता बचतगट चळवळ राजकीय बटीक बनत आहे. या चळवळीच्या संघ शक्तीचा वापर होट—मत बॅकाप्रमाणे करीत आहेत. राजकीय निर्णयात महिलांना नगण्य स्थान असल्यामुळे राजकीय पक्ष फक्त गटाचा वापर करत आहेत. त्यामुळे महिला बचत गटांचे प्रबोधन करावे हस्तक्षेप करु नये.

२. राजकीय पक्ष बचतगटात जातीवाचाला खत पाणी घालत आहेत. ग्रामीण, शहरी, प्रादेशिक मागास, आदिवासी भागात धर्म, जाती, पोटजाती अशा विविध रुपानी या संघशक्तीला कमकुवत करत आहेत. हे एक फार मोठे आव्हान बचतगट चळवळीसमोर उभे आहे.

३. बचतगट चळवळ लोकशाही संघटन, पारदर्शक, सामूहीक स्वावलंबन, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक मूल्य जपणारी आहे. पण सद्याच्या जागतिकिकरणाच्या वातावरणामुळे मूल्यावर अतिक्रमण होत आहे.

४. बचतगटामध्ये मोठे मार्केटींग नेटवर्क आहे. पण या चळवळीतील महिलांना बाजारपेठेचा फायदा, अशिक्षीतपणा, कुटूंबाचा दबाव, यामुळे ते उचलता येत नाही.

५. गटांतर्गत मोठा पैसा गोळा होत आहे. हा पैसा हाताळण्यासाठी संघटन कौशल्य, वक्तृत्व कौशल्य, सभेचे नियम अशाबाबत मोठी आव्हाने आहेत. यासर्वासाठी व्यवस्थापन प्रशिक्षण धोरण गरजेचे आहे.

६. गटबांधणी, मजबूतीकरण, सगणकीकरण यासाठी स्वयंसेवी संस्थाचे कार्य कौतुकास्पद आहे. पण या स्वयंसेवी संस्थानमध्ये काम करणाऱ्या सहयोगिनी कमी मानधनावर काम करतात. गटांची संख्या अधिक व गुणात्मक काम कमी असे होते. म्हणून मानधन, प्रवासखर्च, गट संख्या, अंतरानुसार वेतन देण्याचे धोरण राबविणे आवश्यक आहे.

७. बऱ्याच गटांमध्ये आर्थिक संस्थेच्या प्रमुखाचा वचर्स्व दिसतो. बचतगट प्रमुख गटांचे व्यवहार, दस्तऐवज सांभाळणे, माडणी, ताळेबंद अशी सर्व कामे स्वत:हा करतो. अशावेळी महिला सक्षमीकरणाबाबत प्रश्न पुढे येतात. कारण असे केल्याने गटाचा आत्मा संपुष्टात येतो. अशा प्रवृत्तीला छेद देण्यासाठी सर्वकष प्रबोधन आवश्यक आहे.

८. महिलांच्या अशिक्षितपणाचा, अज्ञानाचा, अबोल स्वभावाचा, फायदा स्वयंसेवी संस्था, बॅका, पंचायत समिती, विमा अभिकर्ते घेत आहेत. लाचखोरपणा वाढीस लागला आहे ही अपप्रवृत्ती चळवळी पुढे प्रश्न निर्माण करीत आहेत.

९. बचतगटांअर्तगत व्याजदराचे आव्हाने गटासमोर आहेत गटामध्ये मासिक व्याज दोन ते तीन टक्के आहे. वार्षिक व्याजदर २४ ते ३६ टक्के इतके आहे. अशा व्याजातून प्रदर्शन, कार्यक्रमाचा खर्च लहान मोठे संघ निधी यासाठी खर्च होतो म्हणून सहभागीदार वाढतात म्हणून एक समाईक व्याजदराची आवश्यकता आहे.

१०. राष्ट्रीयकृत बॅकाना कार्यक्षेत्र ठरवून दिलेले असते. त्याच कार्यक्षेत्रातील बॅकेत गटाचे खाते असावे. परंतू कमी वेळात अधिक बॅक शाखामुळे महिला दोन्ही गटात सदस्य होऊन दोन्ही बॅकेतून स्वत:च लाभ घेतात. कार्यक्षेत्रात एकच बॅक आवश्यक आहे.

११. स्वयंसहाय्यता गटांना मार्केटींगचे व्यापक प्रयोग करता येत नाहीत. कर्ज फिटेल की नाही हा धोका असतो. जाहीरातीतंत्रासाठी वेगळा पैसा नसतो. अशा कारणामुळे बचतगट उत्पादन विक्रीसाठी स्थानिक पातळीपर्यत जाऊ शकत नाहीत. आठवडी बाजार लिलावाने घेण्याचे काम व ते चालविण्याचे काम काही बचतगटांनी केले आहे. ज्या त्या विभागातल्या बचतगटांचा माल विकला जातो. त्याला प्रतिसादही चांगला मिळतो आहे. परंतु असे बचतगट नगण्य आहेत. कायमस्वरुपी टिकाऊ प्रयोग करणाऱ्या बचतगटांची संख्या खूपच कमी आहे.

१२. बाजारपेठे बाबत बचतगटांना खूप स्पर्धा निर्माण होत आहेत. शेती पशुसंवर्धन यांच्या संदर्भातील कौशल्य बचतगटातील महिलांना शिकवण्याची गरज आहे. वस्तूचा दर्जा उत्कृष्ठ असावा, किमंतही बाजारपेठेशी सुसंगत असावी. बचतगटांना अनेक प्रसंगातून जावे लागते. उत्पन्न आणि खर्च यांचा ताळमेल गटांना साधता आला पाहीजे. हे ज्या गटांना शक्य आहे तेच दिर्धकाळ मार्केटींगमध्ये टिकून आहेत.

१३. बचतगटातल्या महिला एखादे उत्पादन तयार करतात पण अशा वस्तूचा उत्पादन खर्च अधिक असेल तर बाजारपेठेतील किमंतीनुसार ती वस्तू कमी किमंतीत विक्री करु शकत नाहीत. म्हणून बचतगटांतील महिलांनी बाजारधिष्ठित उत्पादन करणे आवश्यक आहे. यासाठी त्यांनी जनसंपर्क अधिक वाढवणे हिताचे ठरेल. तरच त्या एखादा व्यवसाय मोठया प्रमाणात आणि चांगल्या पध्दतीने करु शकतील.

१४. बऱ्याचदा बचतगट तयार होतात त्यावेळी बचत ही एक निमित्त असते. काही बचत गटामध्ये महिलांनी सुख दु:खांचे व्यासपीठ मिळते. काही बचत गट दारुबंदीसारखे चांगले काम करतात. ज्या बचतगटांची उदिष्टे कणखर आहेत ते पुढे स्पर्धेत यश मिळवतात. कामात सक्रीय होऊन चांगले काही कामामध्ये रस घेतात. तो खर्च सुस्थितीत चालण्यासाठी बचतगटांचे चांगले नेटवर्क असल्यास ते आपल्या कामाचा दर्जा कसा आहे हे तपासणे शक्य होईल.

१५. अलीकडे काही कंपन्या गटातील महिलांना हाताशी धरुन महिलाविषयक उत्पादनाचे मार्केटींग करत आहेत. हे योग्य धोरण नाही त्यापेक्षा बचतगटांनी इतरांना हाताशी धरुन स्वत:च्या उत्पादनाच्या बाजारपेठ मिळणे अधिक योग्य आहे. यासाठी गटांना आर्थिक सक्षमतेची गरज आहे. पुन्हा गटांतर्गत महीलांना व त्यांच्याकडून इतर महीलांना प्रशिक्षण देणे खूप गरजेचे आहे. कशावर खर्च किती केला? उत्पादन खर्च किती? विक्री किती? बचत किती? कर्जे किती घेतले? अशा सर्व गोष्टी त्यांना समजणे आवश्यक आहे. असे झाले तरच बचतगट मोठया प्रमाणात उद्योग, व्यवसाय करु शकतील.

१६. गटामध्ये योग्यरितीने पाठपुरावा नसल्यामुळे योजनेचा लाभ महिलांना घेता येत नाही. प्रत्येक गट कोणत्या ना कोणत्या स्वयंसेवी संस्थेनी तयार केलेला असतो. किंवा सरकारी यंत्रणेने तयार केलेला असतो. याठिकाणी योग्य मॉनिटरिंग होणे आवश्यक असते. पण तसे होत नाही. काही गट योजना तयार करतात. ते विखुरलेले असतात. महिलांची संख्या पुरेसी नसते. अशा बचत गटांनी अधिक सक्रीय होऊन स्वतंत्रपणे काम करणे गरजेचे आहे.

१७. बचतगट कुठल्या प्रेरणेने स्थापन झाले त्यावर त्याचे आयुष्य अवलंबून आहे. काही बचतगट तीन वर्षे चालवतात. काही गट पाच वर्षे चालतात. सभासद बदलतात त्यात पुनर्रचना होते. कधी विस्तार होऊन नवे गट निर्माण होतात काही बचतगटांमध्ये महिला वेळेवर येतात. मिटींग व्यवस्थीत नियमित होतात. परंतू असे होत नसणारे ही बचतगट बरेच

आहेत. बऱ्याच ठिकाणी भिशी मंडळासारखे फक्त पैसाच गोळा केला जातो. मिंटींग्ज वगेरे होत नसल्याने क्रियाशीलता नसते.

**सारांश :—**

सध्याच्या स्पर्धेच्या युगात बरीच आव्हाने गटासमोर दिसून येतात. पण सध्याची परिस्थिती वेगाने बदलत आहे. बँका, स्वयंसेवी संस्था, सरकारी यंत्रणा, यांनी सकारात्मक दृष्टिकोन विकसीत करुन गटासोबत चांगले काम केले तर चांगली यंत्रणा उभी राहू शकेल. त्यासाठी प्लॅनिंगची गरज आहे. गांवपातळीवरील नियोजन त्यामध्ये गटांचा सहभाग, त्याची व्याप्ती काय? आपण काय करायला पाहीजे? यासर्व गोष्टी विचारात घेणे निकडीचे आहे. आपला विकास आमच्या हातात हे लक्षात घेऊन पाठबळ तयार करणे गरजेचे आहे. हे जिथे शक्य होईल तिथे संघटना मजबूत होईल गटांची वाटचाल एकमेकांत गुफलेली दिसेल. महिला एकत्रीत विचार करायला शिकतील. यांना जाणकार व्यक्तीचे पाठबळ मिळाल्यास काम चांगले करतील. त्यासाठी दिर्घकालीन नियोजनाची गरज आहे.

**७:३ निष्कर्ष :—**

❖ आर्थिक स्वायत्तता, क्षमता, परिपूर्णता मिळाल्यास व्यक्तीच्या स्वावलंबनातून आत्मविश्वास वाढतो. आत्मबल वृध्दीगत झाल्याने व्यक्ती वर्तमानकाळात जगतानाच भविष्याचाही साधक बाधक विचार करते. यातून व्यक्तीच्या स्वप्रगतीचा, कौटूबिंक, प्रगतीचा आणि अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा मार्ग आपोआप खुला होतो. परावलंबनातून सुटावयाचे असेल, आत्मविश्वास आणि आत्मबल वाढवावयाचे असेल तर प्रथम आर्थिकदृष्टया सक्षम होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील महिलांना सक्षम करण्यासाठी त्याची खूप गरज आहे. यासाठी महिला स्वयंसहाय्यता बचतगटाची कल्पना पुढे आली आहे. देशातच नाही तर जागतिक पातळीवरही महिलांना दुय्यम दर्जा दिला जातो यात शंका नाही. पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये कुटूंबाच्या अर्थजनाची आणि संरक्षणाची जबाबदारी त्याच्यावर आणि महिलांचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल असे मानण्यात येत होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हळूहळू महिलांमध्ये जागृती निर्माण झाल्याने विविध क्षेत्रात चमकू लागल्या. नंतरच्या काळात स्त्री चळवळीनेही जोर धरल्याने महिलांना पाठबळ मिळाले. त्यामुळेच महिला सक्षम होण्यास सुरूवात झाली.

❖आज पुरूषप्रधान संस्कृतीचा शहरी जीवनावरील, सुशिक्षीत महिलावरील, अर्थाजन करणाऱ्या महिलांवरील पगडा कमी झाला आहे. पण ग्रामीण भागातील प्रभाव मात्र कायम असल्याचे जाणवते. निरक्षरता, बाहेरच्या जगाची फारशी माहिती नसणे, परंपरागत चालत आलेला, अनुभवलेला, पाहिलेला दबाव याखाली या महिला आत्तापर्यत दडपलेल्या होत्या. सध्या बचतगटाच्या माध्यमातून परिवर्तनाला सुरूवात

झाली आहे. आजपर्यंत मी अडाणी मला काही येत नाही ? माझ्याजवळ कुठे पैसे आहेत? मला काही जमत नाही? या विचारापासून ते मी हे करू शकते, मला हवं ते मिळवता येण्यासारखे आहे. इथेपर्यंत महिलांचा प्रवास जोमाने सुरू आहे. हे फक्त महिला स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून साध्य करता आलेले आहे. महिलांच्यामध्ये निर्मिती क्षमतेची उर्जा प्रचंड मोठया प्रमाणात आहे. पण आपल्याकडे कोणती आणि किती क्षमता आहे हे कळू नये अशी समाजव्यवस्था निर्माण केली आहे. आपल्याकडे कोणते गुण आहेत हे न कळताच अनेक जीवांचा अंत होतो. खऱ्या अर्थानी येथे चळवळीची नेतृत्वाची भूमिका सुरू होते. स्वयंसहाय्यता चळवळ ही यापैकी एक आहे. कारण महिला बचत गटाची चळवळ महिलांना आर्थिक सक्षम करणारी आणि खरोखरच अत्यंत यशस्वी अशी व्यापक चळवळ ठरली आहे.

❖ आर्थिकदृष्टया कमकुवत लघु व्यावसायिक महिलांसाठी सुक्ष्म वित्तपुरवठा करण्याचे बचतगट हे एक साधन आहे. एकसंघ निर्माण झालेले गट, त्या गटांनी गोळा केलेली बचत, महिलांच्या सक्षमीकरणाचे, दारिद्रय निर्मूलनाचे, स्वयंरोजगार निर्मितीचे, आणि सावकारी पाशातून मुक्त करण्याचे प्रभावी हत्यार आहे. खाजगी सावकारी पाशातून मुक्तता आणि प्रसंगी सहज उपलब्ध होणारी, आपल्याच पैशातून मिळणारी मदत हाच मोठा महिलांना दिलासा देणारा बचतगटांचा मुख्य हेतू आहे. महिलांना संघटित करून त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम करणे हेच बचतगटाचे प्रमुख ध्येय आहे. त्याप्रमाणेच गटाची वाटचाल जोमाने सुरू आहे. आपल्या देशात हे जाळे विस्तारण्याचे काम स्वयंसेवी संस्थानकडे, बॅकांकडे सोपविले आहे. त्याला महिलांचा उत्तम प्रतिसादही मिळालेला आहे. म्हणूनच महिला आर्थिक सक्षमिकरणाच्या प्रगतीचे ते एक घोतक वाक्य आहे. सध्या देशात बचतगटाच्या चळवळीने चांगलेच मुळं धरले असले तरी अजूनही बराच मोठा पल्ला गाठायचा आहे.

❖ ग्रामीण भागात मोलमजुरी करणाऱ्या, शेतात राबणाऱ्या, धुण्याभांडयाची कामे करणाऱ्या अशा महिलांना बचतीची सवय लावण्यासाठी त्यांच्या आर्थिक अडचणीला मदत व्हावी या हेतूने बचतगट तयार झालेले आहेत. या महिला दरमहा फक्त ५० रूपयांपासून बचत गोळा करून बॅकेत खाते उघडतात. गटातंर्गत निकडीनुसार कर्जपुरवठा केला जातो. आपल्या आर्थिक अडचणीमध्ये आपणच बचत केलेला पैसा सहजगत्या आपल्यासाठी उभा राहतो. याचे महत्व महिलांना चांगलेच समजले आहे. परिणामी प्रसारही वेगाने झाल्याने राज्यात लाखो बचतगट कार्यरत आहेत. मुलांचे शिक्षण, लग्नकार्य, घरदुरूस्ती, शेतीकामे यापासून ते स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्यापर्यंत महिला या बचतगटांतर्गत कर्ज घेतात व त्याची परतफेड चोख करतात. महिलांनी गटातून घेतलेल्या कर्जातून विविध व्यवसाय चालू केल्याने रोजगार निर्मिती झाली आहे. महिला स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी झाल्याने आणि स्वत:च्या पायावर उभ्या राहिल्याने आत्मविश्वास वाढला आहे. कुटूंबातही वेगळे स्थान त्यांना

मिळत आहे. म्हणूनच प्रगतीच्या दिशेने पडत असलेले ते एक पाऊल आहे असे लक्षात येते. बचत गट चळवळीचा विस्तार झपाटयाने झाल्याने महिला आत्मनिर्भर होण्याचा विचार कृतीत अवतरतोय हे वास्तव सत्य आहे.

❖ देशात सध्या महिला स्वयंसहाय्यता गटाची यशस्वी वाटचाल सुरू असल्याने ग्रामीण भागातही याची पाळेमुळे खोलवर रूजत ओहत. त्यामुळेच ग्रामीण भागातील निराधार गरिब महिला आर्थिक सबळ आणि सक्षम होण्याची ही यशस्वी पायरी आहे. या यशामागचे स्वयंसहाय्यता गटाचे क्रांतीचे खरे जनक डॉ. महमंद युनुस हे आहेत हे विसरून चालणार नाहीत. त्यांनी बांगला देशात हातावर पोट असणाऱ्यासाठी ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. अल्प उत्पन्न गटांना पैशाची अधिक निकड असते. अशांना बॅंका तारणाशिवाय कर्ज देत नाहीत. गरिबांना खाजगी सावकाराकडून किंवा गावातील आर्थिकदृष्टया प्रतिष्ठीत व्यक्ती याच्यां कर्जातून सुटका करून घेणे शक्य होत नाही. याचाच अभ्यास करून डॉ. युनूस यांनी महिला बचतगटाची संकल्पना अंमलात आणली. त्यांनी राबविलेल्या या विशेष चळवळीबध्दल त्यांना नोबेल पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. ही त्यांच्या कामाची पोहच पावती आहे असे म्हणता येईल.

❖ १९८३ पासून डॉ. युनूस यांनी सुरू केलेल्या बचतगटांना त्या देशातील हजारो महिलांनी लाभ घेतला असून सध्या या संस्थेचे रूपांतर ग्रामीण बॅंकेत झाले आहे. आज या बॅंकेचा विस्तार १०८४ शाखेमध्ये झाला आहे. दररोज ही बॅंक सुमारे सहा कोट रूपयाचे लहान कर्जाचे वाटप करते. या कर्जापैकी ९८०२ कर्ज वसूल होते. जागतिक पातळीवर कोणत्याही बॅंक व्यवस्थेपेक्षा वसुलीची ही संख्यात्मक आकडेवारी सरस आहे. दैनंदिन केलेल्या बचतीतूनच या बॅंकेत ठेवी ठेवलेल्या आहेत. अशा सर्व जगाला मार्गदर्शक ठरणारी चळवळ भारतामध्ये लोकप्रिय असलेल्या महिला बचत गटांचे कामही त्यांच्या संकल्पनेवर आधारलेले आहे. याचे अनुकरण करणाचा निर्णय देशात १९९१ मध्ये घेण्यात आला. खऱ्या अर्थानी बचतगट त्यांना जोडलेल्या सुमारे साडेचार कोटी महिला व अठरा हजार कोटी उलाढाल झाली आहे. यापूर्वी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी कोणतीही चळवळ इतकी यशस्वी झाली नाही. बचतगटांची कल्पना प्रत्यक्षात आणून दारिद्रय निर्मूलन रोजगार निर्मितीचा आदर्श निर्माण करणारी क्रांती घडली आहे.

❖ देशात स्वयंसहाय्यता महिला बचतगट चळवळ १९ व्या शतकात सुरू झाली. महिला बचत गट चळवळीला आकार येण्यास विसावे शतक उजाडले आहे. नाबर्डने हे गट बॅकांकडून होणाऱ्या पतपुरवठयाची सांगड घातल्यानंतर खऱ्या अर्थानी ही चळवळ व्यापक होत गेली आहे. रिझर्व्ह बॅकेंनी सुक्ष्मवित्तपुरवठा कसे असावे यासंबंधी मार्गदर्शन तत्वे जाहीर केल्याने या योजनेला प्रोत्साहन मिळाले. ग्रामीण भागात दारिद्रय निर्मूलनाच्या योजनेपासून वंचित राहिलेल्यांना बचतगट चळवळीचा मोठा

आधार मिळाला आहे. व्यावसायिक संधी त्यातून रोजगार निर्मिती आणि सामाजिक बांधलिकीतून बॅकांनी जबाबदारी उचललेली आहे. देशाच्या मुख्य प्रवाहात ग्रामीण जनतेला सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने बॅकांचा सहभाग मोलाचा ठरत आहे.

❖ संयुक्त राष्ट्रसंघाचे २०१५ पर्यत जगातील गरिबी अर्ध्यावर आणण्याचे उदिद्ष्ट आहे. लहान रक्कमांची कर्जे हे गरिबीवरचे औषध आहे. कर्ज लहान पण बचत महान या तत्वांनी वाटचाल करण्यासाठी धडपडणारे लाखो बचतगट आहेत. गरिबांना स्वयंपूर्ततेचे हत्यार मिळाल्यास गरिब लोक कष्ट करून स्वत:च्या पायावर स्वावलंबी होऊ शकतात. हे अनेक महिला बचतगटांनी सिध्द केले आहे. ग्रामीण भागातील महिलांचे आणि मुलांचे आरोग्य संवर्धन शैक्षणिक, सामाजिक, व्यावसायिक आणि दारिद्र निर्मूलन करण्याच्या हेतूने बचतगट चळवळ महत्वाकांक्षी ठरत आहे. घरातील महिलांचा विकास झाला तर मुलांचा आणि घराचा खरा विकास शक्य होईल या प्रेरणेने बचतगटाचे काम महिला जोमाने करत आहेत. स्वावलंबी व आर्थिक सक्षम होण्यासाठी प्रत्येक जण प्रयत्न करत आहे. यासाठी महिलांना बचतगट चळवळी सारखे साधे सापे माध्यम उपलब्ध झाले आहे. परिणामी महिला सक्षमीकरण वेगाने झाल्याचा अनुभव गेल्या काही वर्षात महाराष्ट्रात अधिक प्रमाणात आला आहे. शासनाच्या प्रोत्साहनामुळे बचतगटाला प्रेरणा मिळालेली आहे. त्यातूनच महिलांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी आणि आर्थिकदृष्टया स्वावलंबनासाठी बचतगटाचा फायदा झाला आहे.

❖ बचतगट भक्कमपणे स्वत:च्या पायावर उभे असल्याने व्यावसायीक गट निर्मितीला सुरूवात झाली आहे. कारण बचती बरोबर स्वयंरोजगार, महिला सक्षमीकरण, सामाजिक उपक्रम, साक्षरता आणि आरोग्य असे विविध अंगी हे गट कार्यरत आहेत. त्यामुळे महिलांना समाजात आणि कुटूंबात एक मानाचे स्थान मिळत आहे. महिलांवरील अत्याचारांचे प्रमाण काही अंशी कमी होण्यास मदत झाली आहे. आर्थिक साक्षर झाल्याने शाळामधील मुलांची गळती रोखण्यात काही प्रमाणात यश मिळाले आहे. गटामुळे महिलांना आत्मसन्मान मिळाल्याने चुल व मूल यातून बाहेर पडून महिला विकासाच्या प्रवाहात सहभागी झाल्या आहेत.

